# कथारुप यशवंतराव



संपादनः प्रा. नवनाथ लोखंडे

प्रस्तावनाः ॲड. रावसाहेब शिंदे

'' प्रा. नवनाथ लोखंडे यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात यशवंतरावांच्या जीवनातील प्रेरक, विचार प्रवर्तक, अंत:करणाचा ठाव घेणारे प्रसंग आहेत तसेच आशा आणि महत्वाकांक्षा उद्दिपित करणारे आणि डोळ्यांतून अश्रू ढाळायला लावणारे प्रसंग देखील आहेत. जीवनातील आदर्शांचे उत्तुंग दर्शन यातून होते. या ग्रंथातील सर्वच कथा विविध अर्थांनी मनाला भिडणाऱ्या आहेत.

प्रा. नवनाथ लोखंडे यांनी इतक्या मोठ्या संख्येने कथा संपादित करून यशवंतरावांच्या जीवनाचे इंद्रधनुष्यासारखे विविधरंगी दर्शन वाचकांना करून देण्याची अनमोल कामगिरी केलेली आहे. यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमाची आपण कल्पना करू शकतो. यासाठी ते प्रशंसेला पात्र तर आहेतच; पण त्याहीपेक्षा यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या एका अद्वितीय, आदर्श आणि प्रेरक अशा महान नेत्याच्या जीवनकथेची जी निवड त्यांनी केली त्यासाठी ते प्रशंसेला अधिक पात्र आहेत. या कथा वाचल्यावर वाचकांना जीवनात अनुकरणीय आणि मौल्यवान असे काहीतरी मिळाल्यासारखे निश्चितच वाटेल.''

- ॲड. रावसाहेब शिंदे
(प्रस्तावनेतून)

कथारुप
# यशवंतराव

संपादक
प्रा.नवनाथ लोखंडे

कथारूप यशवंतराव

**Katharup Yashwantrao**

© प्रा.नवनाथ लोखंडे

प्रकाशक :
सौ. प्रतिभा नवनाथ लोखंडे
संस्कार प्रकाशन,
'आनंदवन', मु.पो.ढवळ, ता.फलटण, जि.सातारा
मोबाईल : ९८२२९९१६०३
प्रथमावृत्ती : ऑगस्ट २०१४
E-mail : ndlokande@gmail.com

मुद्रक :
श्री.प्रदीप पवार
दिशा प्रिंटर्स, फलटण

अक्षर जुळणी :
श्री.विशाल शहा, फलटण

मुखपृष्ठ :
श्री.रवी ढेंबरे, फलटण

सर्व हक्क लेखकाधिन

ISBN - 978-93-81528-76-1

**मूल्य : तीनशे पन्नास रुपये (Rs. 350/-)**

यशवंतरावांचा
विकासाभिमुख राजकारणाचा,
समन्वयवादी समाजकारणाचा,
पारदर्शी सहकाराचा,
विकेंद्रीत लोकशाहीचा,
चारित्र्यसंपन्न आणि नेतृत्वाचा
आणि नि:स्वार्थ कर्तृत्वाचा
आदर्श समोर ठेवून
कार्यरत असलेल्या
महाराष्ट्राच्या
सर्व क्षेत्रातील
छोट्या - मोठ्या कार्यकर्त्यांना
ही कथापुष्पे
आदरपूर्वक
अर्पण...

# प्रस्तावना

रवींद्रनाथ टागोरांचे खालीलप्रमाणे एक अवतरण आहे -

**''संध्याकाळ झाल्यानंतर दिवा लावून**
**तू जेंव्हा गायीच्या गोठ्याकडे जाशील,**
**तेंव्हा आई..., मी फुलांच्या फांद्यांशी खेळून**
**टुपकन् भुईवर उडी मारीन.**
**मी परत तुझे मूल होईन**
**आणि तुला म्हणेन, ''गोष्ट सांग.''**
**तू विचारशील, ''कुठे रे होतास खट्याळा!''**
**मी म्हणेन, ''आम्ही नाही सांगणार जा!''**

मानवी संस्कृतीच्या विकासाच्या संदर्भात वरील अवतरण अतिशय बोलके आहे. मानवजातीच्या इतिहासासंबंधी बरेच ग्रंथ आजपावेतो प्रसिद्ध झालेले आहेत."History of Human civilization' या संबंधी डॉ. वुईल ड्युरांड आणि लेडी ड्युरांड यांचे खंड जागतिक वाङ्मयात उच्चस्थानी असल्याचे आज जगभर मान्य झालेले आहे. या ग्रंथासाठी या दांपत्याने आपले आयुष्यच समर्पित केले असे वास्तव आहे. एकूणच मानवजातीच्या इतिहासावरून मानवजात कशी कशी विकसित होत गेली आणि त्यातही वाङ्मयात प्रामुख्याने गोष्टींचा सहभाग किती महत्त्वाचा आहे याची जाणीव आपल्याला होते. मराठी वाङ्मयातील हितोपदेश, पंचतंत्र, रामायण, महाभारत, कथासरितसागर यावरही आपण दृष्टिक्षेप टाकला तर असे लक्षात येते की हे सगळे वाङ्मय कथाप्रकारांनीच भरून गेलेले आहे. अलीकडच्या काळातील साने गुरुजींची 'श्यामची आई', रशियन वाङ्मयातील अँटन पी. चेकॉव्ह यांच्या कथा; विशेषतः त्यातील 'पैज' ही विशेष गाजलेली कथा, मॅक्झिम गॉर्कीची 'देशद्रोहीची माता' ही कथा तसेच 'बहिरीससाण्याची कथा' अशा अनेक कथा मनाला चटका लावणाऱ्या व मानवी संस्कृती संपन्न करणाऱ्या आहेत. त्याचबरोबर बौद्ध वाङ्मयातील जातक कथा, तसेच बिरबल आणि बादशहा व बेगम यांच्या गोष्टी तर सर्वश्रुत असून तितक्याच लोकप्रियही आहेत. या प्रत्येक गोष्टीतून काही ना काही तरी मोलाचा बोध माणसाला मिळत असतो. त्या एकप्रकारच्या बोधकथाच आहेत असे म्हणणे यथायोग्यच ठरेल. या देखील मानवी संस्कृतीला वळण देण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावतात.

माणसाने आपल्या सभोवताली दिसणाऱ्या सृष्टीचे गूढ उकलण्याचा प्रयत्न सुरू केला, त्यातून कल्पनारम्य कथांचा जन्म झाला. पृथ्वी, सूर्य, चंद्र-तारे, समुद्र, नद्या, जमीन, झाडे, पीके, फळे, फुले, माणसे, पशु-पक्षी या सगळ्यांनाच गोष्टीत स्थान मिळाले. या सगळ्यांवर माणसांनी गोष्टी रचल्या. साहजिकच त्या एकमेकांना सांगण्याची प्रथा विकसित होत गेली. त्यातूनच ''आई मला गोष्ट सांग ना!'' ही विकसित मानवी संस्कृती उदयाला आली. मात्र जगातल्या दुसऱ्या कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या तुलनेत खूप अगोदर भारतीयांनी अद्भुत कथा, कल्पित कथा, प्राणी-पक्षी कथा आणि मानवी कथा-कहाण्या यांना अभिजात साहित्याचे रूप देऊन ग्रंथबद्ध केले. या ग्रंथात भरपूर नाविन्य आणि वैचित्र्य आढळते. त्यात देवादिक आहेत, राक्षस, आहेत. राजे-राण्या आहेत, बलशाली योद्धे आहेत, लावण्यवती राजकन्या आहेत तसेच शुद्ध चरित्र असलेले राजर्षी व ब्राह्मणही आहेत. तसेच विविध तऱ्हेच्या वैचित्र्यपूर्ण व्यक्तिरेखा देखील त्यात सर्वत्र विपुल प्रमाणात आहेत.

एक बाब मात्र निश्चितपणे आपल्या लक्षात येते की, या विविध तऱ्हेच्या कथांतून जी नीतितत्त्वे मनात

येतात, तसेच प्रामुख्याने ज्या नीतिकथाच आहेत त्यांनी मानवी समाजाच्या नीतिशिक्षणाच्या संस्कृतीमध्ये मोलाची भर घातलेली असून मानवी समाजाला सुसंस्कृत समाज म्हणून वळण देण्याच्या महान कार्यात सिंहाचा वाटा उचललेला आहे. कथांचे दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी मनोरंजनाचे तर मोठेच काम केलेले आहे. नीतिकथांच्या अधिक तपशीलात इथे जाण्याचे प्रयोजन नाही. एक उल्लेख मात्र आवर्जून करावा लागेल; तो म्हणजे या कथांचे पाश्चिमात्य जगताशी, म्हणजे ॲरिस्टॉटलसारख्या तत्त्ववेत्यांशी म्हणा व इतिहासकारांशी म्हणा, असलेले अतूट नाते.

मुनष्यप्राण्याला गोष्टींचे एवढे आकर्षण आहे की माणसे जिथे जिथे गेली आणि जिथे जिथे त्यांचे वास्तव्य झाले, तिथे तिथे आपल्याबरोबर त्यांनी गोष्टी नेल्या. त्या त्या देशात गोष्टी तर गेल्याच, पण देशोदेशी देखील त्या फिरल्या. साहजिकच त्यात प्रसंगानुरूप वेष बदलला, भाषा बदलली, रंग बदलला, ढंग बदलला तसाच चेहरा-मोहराही बदलला. वैचारिक विश्व देखील बदलत गेले. एकूणच मानवी संस्कृतीच्या विकासात गोष्टीला एक आगळेवेगळे असे अढळ स्थान आहे

यशवंतराव चव्हाण यांना 'महाराष्ट्राचे शिल्पकार' म्हणूनच सर्व जनमानसांत मान्यता आहेच. मी तर असे म्हणेन की भारताचे संरक्षणमंत्री झाल्यापासून; म्हणजे २२ नोव्हेंबर १९६२ पासून त्यांनी देशपातळीवर या देशाला जे कर्तृत्वशाली नेतृत्वाचे योगदान दिले, त्यावरून त्यांना या देशाचे शिल्पकारच म्हणावे लागेल, भले त्यांना पंतप्रधानपदी अथवा राष्ट्रपतीपदी विराजमान होण्याचा योग लाभलेला नसो. तथापि, त्यांच्यासारखा अभ्यासू, बुद्धिमान, व्यासंगी, सुसंस्कृत तसेच सभ्याचारी आणि साहित्याचा सखोल व्यासंग असलेला त्यागी, चारित्र्यशील आणि स्वातंत्र्ययोद्धा असा मुत्सद्दी राजकारणी मात्र विरळाच. त्यातही त्यांनी चीनी आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर आणि त्यानंतर पाकशी झालेल्या लढाईत या देशाला जे एकात्मतेने संघटित करून शक्ती आणि सामर्थ्य देऊन विजयी भारत म्हणून विश्वात भारताच्या विजयाची पताका फडकावली ही त्यांची वीरगाथा एकमेवाद्वितीय म्हणावी लागेल. यशवंतरावांचा एकूणच जीवनप्रवास पाहता तो जेवढा चित्तथरारक आहे, तेवढाच प्रेरक आणि विचारप्रर्वतकही आहे. जन्मापासूनच अठरा विश्वे दारिद्र्याशी सामना करण्याची परिस्थिती त्यांच्यापुढे वाढून ठेवलेली होती. त्यातही वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षीच वडिलांचे छत्र कायमचे हिरावले. वडिलांच्या जाण्याचा दुर्दैवी आघात त्यांच्या कुटुंबियांवर झाला. अतिशय टोकाच्या प्रतिकूल अवस्थेतून शिक्षणासाठी महत्प्रयास करायचे. पुढे गांधीजीच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढा, भूमिगत चळवळ, प्रसंगानुरूप वेळोवेळी झालेला तुरुंगवास, स्वातंत्र्योत्तर काळातील आमदारकी, पार्लमेंटरी सेक्रेटरीपासून ते विविध खात्याची मंत्रिपदे, राज्याचे मुख्यमंत्रीपद, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील तारेवरच्या कसरतीसारखी तोलून धरावी लागलेली मुख्यमंत्रीपदाची कामगिरी, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि लोकप्रियतेने भरभरून वाहणारी अव्दितीय आणि देशभर गाजलेली मुख्यमंत्रीपदाची तेजोमय कारकिर्द ही सगळी वाटचाल यशवंतरावांच्या जीवनातील कर्तृत्वाने उजळून निघालेला सुवर्णकाळ..! कारण सुवर्णालाही अग्निदिव्यातून जावे लागते.

त्यानंतर भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आवर्जून सोपविलेली संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी व तेवढीच सतेज असणारी गृहमंत्रीपदाची कारकिर्द, आणि त्यानंतर तेवढ्याच यशस्वीपणे लीलया आणि उच्च पातळीवरून पेललेले अर्थमंत्रीपद आणि परराष्ट्रमंत्रीपद. मा. यशवंतरावांच्या आयुष्याची ही सगळी वाटचाल म्हणजे एक तेजोमय गाथा आहे. भारताच्या उपपंतप्रधानपदी विराजमान होण्याचा अल्पसा काळ का होईना; त्यांना सन्मान लाभला. गरीब घराण्यात जन्मलेला, दुष्काळी खेड्यातला एक मुलगा केवळ आपल्या गुणांनी आणि कर्तृत्वाने अशा थोर पदावरही विराजमान व्हावा ही सहजसुलभ अशी बाब नाही. त्यातही विशेष म्हणजे या सगळ्या वाटचालीत त्यांनी जोपासलेली चारित्र्यशील संस्कृती आणि सभ्याचार. या सगळ्याबरोबर त्यांच्या जीवनात तेजोमय अशी दिसणारी अतिशय मौल्यवान बाब म्हणजे त्यांचा अद्वितीय आणि थक्क करणारा

व्यासंग. जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी या व्यासंगाची आवर्जून जोपासना केली. एक सुसंस्कृत व्यासंगी, विद्वान, मुत्सद्दी आणि राजकीय सभ्याचार जाणिवपूर्वक जपणारा आणि जोपासणारा अजोड कर्तृत्ववान असा अद्वितीय राजकीय नेता म्हणून यशवंतराव भारताच्या राजकीय पटलावर चमकून गेले. या वाटचालीत त्यांना अनेक तऱ्हेच्या प्रतिकूल तसेच अनाकलनीय आणि कधी कधी अनिष्ट आणि दुर्दैवी अशा प्रसंगांना देखील सामोरे जावे लागले. तथापि, ते न डगमगता धीरोदात्तपणे अखेरपर्यंत मार्ग काढतच गेले. माझ्या मते मा. यशवंतराव हे महाराष्ट्रालाच नव्हे, तर या देशाला लाभलेले एक दैवी देणे म्हणावे लागेल. आपणच त्याला पात्र होतो की नाही? असा प्रश्न मात्र सहजगत्या पुढे येतो.

प्रा. नवनाथ लोखंडे यांनी 'कथारूप यशवंतराव' हा ग्रंथ संपादित केला आहे. या ग्रंथात एकूण २५९ कथांचा समावेश आहे. यशवंतरावांचे जीवन जसे उंच उंच झेप घेणारे तसेच विविध तऱ्हेच्या भरगच्च घटनांनी आणि आशयांनी समृद्ध असलेले एकप्रकारचे श्रीमंत जीवन. निर्मळ गंगेचा खळाळणारा स्फटिकासम असा प्रवाह म्हणायचा की अथांग सागरासारखा प्रशांत असा निळाशार, स्वच्छ आणि पारदर्शक दिसणारा जलाशय म्हणायचा. त्याला जशी सागराची खोली होती तशीच आकाशाची भव्यता आणि उंचीही लाभली होती. अर्थात हे सगळं घडलं ते केवळ त्यांच्या स्वकर्तृत्वाने. यशवंतराव सांगतात माझी खरी शिक्षिका ही माझी आई होती.

**''नका बाळांनो डगमगू । चंद्रसूर्यावरील जाईल ढगू ।।''**

गरीबीला तोंड देताना अशी धीरोदात्त शिकवण लहानग्या यशवंतरावांना आणि त्यांच्या भावंडांना आई देत होती. तसेच 'आई, गीतेतले तुला काय कळले?' या प्रश्नावर आई सांगते की ज्ञानेश्वरीतील कृष्ण-अर्जुन संवादामधील भाष्यात कृष्ण अर्जुनाला म्हणतो, ''तू तुझा 'मी पणा' सोड आणि तुझे जे काम आहे (म्हणजे जे कर्तव्य आहे) ते मुकाट्याने कर.'' आईचे हे उत्तर ऐकून विद्यार्थी यशवंतराव थक्क होऊन म्हणाले, ''ज्ञानेश्वरीचा इतका सोपा आणि सहज अर्थ मला कोणाही पंडिताकडून कधीही ऐकण्यात आला नाही.'' आईने यशवंतरावांच्यावर अनन्यसाधारण असे संस्कार केले.

प्रा. लोखंडे यांनी संपादित केलेल्या या कथांमध्ये यशवंतरावांच्या जीवनातील विविध तऱ्हेचे प्रेरक, विचारप्रवर्तक, अंतःकरणाचा ठाव घेणारे तसेच जसे आशा आणि महत्त्वाकांक्षा उद्दीपित करणारे प्रसंग आहेत, तसेच डोळ्यातून अश्रू ढाळायला लावणारे देखील प्रसंग आहेत. मानवी जीवनातील उंच उंच झेपावणारे आदर्शांचे उत्तुंग दर्शन यातून होते. सहज असा विचार मनात येऊन जातो की त्यांच्या अखंड चरित्राचे वाचन करणे आणि अशा गोष्टींच्या रूपातून यशवंतरावांच्या जीवनाचा आढावा घेणे यात खरोखरच वाचकाला कदाचित हे 'कथारूप यशवंतराव' या ग्रंथाचे वाचन हे अधिक सहज सुलभ आणि मनाची एकप्रकारे करमणूक करणारेही वाटते. यातल्या 'मी यशवंतराव चव्हाण होणार!', 'माफी कशासाठी मागायची?', 'आता तुला मी आणि मला तू!', 'अगोदर विद्यापीठ नंतर महाविद्यालय', 'विद्वानांचा विनम्र सत्कार', 'मि. चव्हाण कसे आहेत?', 'तुम्ही मला दवाखान्यात नेत आहात?', 'माझी जीवननौका आता भरकटू लागली' या कथा विविध अर्थांनी मनाला जाऊन भिडणाऱ्या आहेत. तशा तर या ग्रंथातल्या सर्वच कथा कोणत्या ना कोणत्या दिशेने मनाचा वेध घेणाऱ्या आहेतच. या प्रस्तावनेत त्यासंबंधीच्या तपशिलात जाण्याचे प्रयोजन मुळीच नाही. वाचकांनीच त्या सर्व कथांच्या पोटात शिरून वाचनाचा आनंद लुटायचा आहे आणि या ग्रंथाची गोडी चाखायची आहे.

प्रा.नवनाथ लोखंडे यांनी इतक्या मोठ्या संख्येने कथा संपादित करून यशवंतरावांच्या जीवनाचे इंद्रधनुष्यासारखे विविधरंगी दर्शन वाचकांना करून देण्याची अनमोल कामगिरी केलेली आहे. यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमाची आपण सहजच कल्पना करू शकतो. यासाठी ते प्रशंसेला पात्र तर आहेतच; पण त्याहीपेक्षा यशवंतराव चव्हाणांच्यासारख्या एका अद्वितीय, आदर्श आणि प्रेरक अशा महान नेत्याच्या जीवनकथेची जी निवड त्यांनी

केली त्यासाठी ते प्रशंसेला अधिक पात्र आहेत. या कथा वाचून बहुसंख्य वाचकांना जीवनात अनुकरणीय आणि मौल्यवान असे काहीतरी मिळाल्याचा निश्चितच लाभ झाल्यासारखे वाटेल. थोडक्यात सांगायचे तर या सगळ्या कथा संग्रहातून आपणांस दर्शन होते ते जीवनातील शाश्वत मूल्यांचे. शाश्वत मूल्ये ही इतकी मौल्यवान असतात की ती कुठल्याही भौतिक संपत्तीच्या मोबदल्यात मिळत नाहीत. किंबहुना अशा भौतिक संपत्तीच्या मोबदल्यात जे काही मिळू शकते ती मुळीच शाश्वत मूल्ये नसतात. योगायोगाने माझे बंधू स्व.अण्णासाहेब शिंदे (माजी शेती राज्यमंत्री, भारत सरकार) तसेच थोर स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात यांच्यामुळे यशवंतरावांचा मलाच नव्हे; तर आम्हा सर्व कुटुंबियांना खूपच निकटचा सहवास लाभला. बऱ्याच वेळा आमच्या घरी त्यांचे आतिथ्य करण्याची आम्हा उभयतांना संधी मिळाली. इतकेच नव्हे तर एकदा वेणूताईंच्या समवेतही त्यांचे आमच्या घरी येणे झाले. एकदा तर महाराष्ट्राचे महाकवी ग.दि. माडगूळकर यांच्या निवासस्थानीही त्यांची व माझी भेट होण्याचा योग आला. मनाला चटका लावून जाणारी घटना म्हणजे त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या वर्षात; म्हणजे १९८४ च्या एप्रिल-मे च्या सुमारास त्यांचे आमच्या निवासस्थानी दोन दिवस वास्तव्यही झाले. अर्थात तेही माझे बंधू स्व. अण्णासाहेब यांच्यामुळेच. रयत शिक्षण संस्थेत त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत मी ६ वर्षे व्हाईस चेअरमनही होतो. या व अशा अनेकविध परिस्थितीमुळे मी यशवंतरावांना खूप जवळून पाहू शकलो. एकप्रकारे अभ्यासूही शकलो. साहजिकच ते माझे श्रद्धास्थान बनले.

प्रा. लोखंडे यांची खरोखरच मनापासून प्रशंसा करावीशी वाटते. डॉ. अल्बर्ट श्वाईट्झर यांच्या टेबलावरील एक काव्य स्मृतीपटलापुढे येते. हा ग्रंथ वाचून वाचकांच्या मनात अशी स्वप्ने आणि अशा आशा निश्चितच जागा धरतील असा मला विश्वास वाटतो.

**''उंच, आणखी उंच चढू द्या,**
**तुमची स्वप्ने तुमच्या आशा,**
**अग्नीशिखांपरि त्यास भिडू द्या,**
**उंच जाऊनी वर आकाशा,**
**उंच, आणखी उंच चढू द्या,**
**घनतिमिरी नभ जाता कोंदून**
**स्वप्नीचा तारा चमकू दे,**
**जोवर नभ गेले न उजळून''**

**ॲड्. रावसाहेब शिंदे,**
**स्वातंत्र्यसैनिक**

# संपादकाचे मनोगत

प्रिय वाचकहो, सप्रेम नमस्कार.

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील उद्‌बोधक प्रसंगांची माहिती देणारा 'कथारूप यशवंतराव' हा स्मरणग्रंथ आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

साहेबांचे जन्मशताब्दी वर्ष महाराष्ट्र शासनाने व मराठी जनतेने नुकतेच मोठ्या उत्साहाने व कृतज्ञ भावनेने साजरे केले. या निमित्ताने महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील त्यांच्या अनमोल योगदानाचा आढावा घेतला गेला. अनेक मान्यवर लेखकांनी यशवंतरावांच्या सव्यसाची व्यक्तिमत्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण तरुण पिढीला असे मोठमोठे आणि गंभीर प्रकृतीचे ग्रंथ वाचण्याइतका वेळ (आणि कदाचित् इच्छाही) नाही. त्यांना सोप्या भाषेत व कमी शब्दांत नेमकी माहिती हवी असते. नव्या पिढीला यशवंतरावांच्या संयमी व सुसंस्कृत व्यक्तिमत्वाची ओळख व्हावी या एकमेव उद्देशाने प्रेरित होऊन मी हा ग्रंथ संपादित केला आहे. मोठ्या माणसांची खरी ओळख ही त्यांच्या जीवनातील छोट्या छोट्या प्रसंगांतून अगर घटनांमधूनच होत असते असे मला वाटते. या पुस्तकातील प्रत्येक कथा कोणता ना कोणता तरी संस्कार करते. सर्व क्षेत्रांतील व सर्व वयोगटातील वाचकांना ही कथापुष्पे आवडतील असा मला विश्वास वाटतो.

चव्हाणसाहेबांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे ना. शरद पवारसाहेब यांनी पत्ररूपाने दिलेली कौतुकाची थाप हा माझ्यासाठी सर्वोच्च सन्मान आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लावलेल्या व ममतेने वाढविलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या इवल्याशा रोपाचे रूपांतर आता प्रचंड वटवृक्षात झाले आहे. ही प्रक्रिया सुरू असतानाच स्व. यशवंतरावांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले आणि अशा दिग्गजांच्या कार्याने पुनित झालेल्या या संस्थेत सेवा करण्याची संधी मला लाभली याचा मला विशेष आनंद व अभिमान वाटतो.

संस्थेचे चेअरमन व ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, शिक्षणतज्ज्ञ ॲड. रावसाहेब शिंदे यांनी त्यांची प्रकृती बरी नसतानाही केवळ यशवंतरावांवरील श्रद्धेपोटी व माझ्या आग्रहाखातर या ग्रंथास सविस्तर प्रस्तावना दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व या प्रतिष्ठानचे कराड येथील विभागीय केंद्र; तसेच सौ. वेणुताई चव्हाण स्मारक ट्रस्टतर्फे चालविले जाणारे ग्रंथालय व तेथील सर्व सेवकवर्ग यांनी केलेल्या सहकार्यावाचून हा ग्रंथ

साकार होणे शक्य नव्हते याची विनम्र जाणीव मला आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार! ज्येष्ठ पत्रकार श्री बाबुराव शिंदे यांनी वेळोवेळी केलेल्या बहुमोल सूचनांचा मला अतिशय उपयोग झाला. या ग्रंथासाठी मी ज्या मान्यवर लेखकांच्या लिखाणाचा 'संदर्भग्रंथ' म्हणून उपयोग केला, त्या सर्व लेखक-प्रकाशकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. सीताराम गोसावी सरांचे सहकार्य मला वेळोवेळी लाभले. स्व. यशवंतरावांच्या जीवनावर निघालेला 'लोकराज्य'चा विशेषांक सरांनी मला त्यांच्या घरून आणून दिला, ही आस्था मी विसरू शकत नाही. या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

पंढरपूर येथील माझे श्वशुर, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व विधिज्ञ मा.ॲड. श्री वामनराव माने हे यशवंतरावांचे निस्सिम चाहते आहेत. स्व. चव्हाणसाहेबांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊनच गेली चाळीसहून अधिक वर्षे ते सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मला सुरुवातीपासून लाभले. मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक डॉ. पी.एम. पाटील सर यांनी मला माझे संशोधन चालू असतानाही या पुस्तकाच्या लेखनासाठी प्रोत्साहन दिले. 'एकवेळ संशोधन थोडे रखडले तरी चालेल; पण महाराष्ट्रातील उगवत्या पिढीला प्रेरणा देणारे हे पुस्तक लवकरात लवकर लिहा' अशी आदेशवजा प्रेमळ सूचना त्यांनी मला दिल्याने मला खूप आधार वाटला. त्यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

माझी आई श्रीमती कांताबाई लोखंडे, पत्नी सौ. प्रतिभा, बंधू अंकुश व त्याची पत्नी सौ. वनिता तसेच सौ. लतिका व श्री. मिलिंद गडदे या माझ्या परिवारातील सदस्यांचे ऋण शब्दातीत आहेत. त्यांच्या निरपेक्ष सहकार्यामुळेच मी हे कार्य करू शकलो. शेवटी या ग्रंथाच्या निर्मितीप्रक्रियेत ज्यांची बहुमोल मदत झाली त्या सर्वांचे मी आभार मानतो.

हा ग्रंथ परिपूर्ण आहे असा माझा मुळीच दावा नाही. स्व. यशवंतरावांच्या बहुआयामी जीवनातील इतर अनेक प्रसंगांची भर यात टाकता येईल याची मला विनम्र जाणीव आहे. या संदर्भात सर्व रसिक वाचकांकडून येणाऱ्या सूचनांचे मी स्वागत करतो. या पुस्तकात समाविष्ट होऊ शकेल अशी एखादी अप्रकाशित आठवण आपणाकडे असेल तर कृपया ती लिखित स्वरूपात पाठवावी. या निमित्ताने तुम्ही व मी मिळून हा ग्रंथ अधिक समृद्ध करूया. स्व. चव्हाणसाहेब यांच्यासारखे द्रष्टे व युगप्रवर्तक नेतृत्व पुनःपुन्हा जन्माला येत नसते. पण त्यांच्या विचारांचा व कार्याचा जागर होत रहावा यासाठी त्यांच्या आठवणींचा नंदादीप सतत तेवता ठेवणे हे आपले कर्तव्य आहे.

महाराष्ट्राच्या या थोर शिल्पकाराच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून ही कथापुष्पे मी आपल्या हाती सोपवितो. धन्यवाद!

**- प्रा. नवनाथ लोखंडे**

## ■ विभाग पहिला : कृष्णाकाठ
## (१९१३ - १९४६)


१. आईच्या प्राणांची साक्ष / १
२. यशवंत हो...! / २
३. मी यशवंतराव चव्हाण होणार..! / ३
४. देवाघरचे नाते / ४
५. असे दबून कसे चालेल? / ६
६. असेच करीत राहण्याचा आमचा निर्णय आहे! / ८
७. त्यागाचे तेजोवलय / ९
८. राजकीय जीवनाचे तोरण / ११
९. माफी कशासाठी मागायची? / १३
१०. नाटकासाठी काय पण / १४
११. हिमालयाचे पहिले दर्शन / १५
१२. पुणे जिंकणारे यशवंतराव / १७
१३. सागर आणि सावरकर /१८
१४. समतेचा संस्कार / २०
१५. हजरजबाबी यशवंतराव / २१
१६. त्यांचे काय करायचे? / २२
१७. आपण कधी बदलणार? / २३
१८. नात्यापेक्षा तत्त्व मोठे..! / २४
१९. पिके जाळणे हा जनताद्रोह आहे ! / २५
२०. तुम्हालाही आया-बहिणी आहेत..! / २६

## ■ विभाग दुसरा : सागरतीर

## (१९४६ - १९६२)


२१. नियतीचा हात/ २८
२२. शंभरभर रुपये आणावेत..!. / २९
२३. मूलभूत प्रश्नांची जाण / ३०
२४. लोककलांचा विकास /३१
२५. जातीयवादाला थारा नको..! /३२
२६. सर्वच कर्ज माफ करून टाकू.. ! /३३
२७. अखेरपर्यंत एकमेकांसाठी..! / ३४
२८. शांततेची हमी /३५
२९. सजग वाचक यशवंतराव /३६
३०. ग्रंथप्रेमी यशवंतराव / ३७
३१. बाबासाहेबांच्या भेटीला यशवंतराव / ३८
३२. का उगाच ताटकळता? / ३९
३३. महिलांना संरक्षण द्या..! / ४०
३४. रोपट्याचाच महावृक्ष होतो / ४२
३५. एका लग्नाची गोष्ट / ४३
३६. जगावेगळी संक्रांत / ४५
३६. राजीनामा कशासाठी? / ४६
३७. तेवढी आपली ऐपत नाही..! / ४७
३८. त्याचे ज्ञान मातीमोल होता कामा नये..! / ४८
३९. मीही काही पालापाचोळा नाही...! / ४९
४०. ममईतलं पगारपाणी पुरतं ना?/ ५०
४१. नेहरुंचे आशीर्वाद / ५१
४२. नाट्यगृहाचे नाट्यमय उद्घाटन ! / ५३
४३. दादांना मला मत द्यायला सांगा..! / ५४
४४. आपण थांबू नये...ताबडतोब जावे! / ५५
४५. हजरजबाबी यशवंतराव / ५६
४६. ही माझी नीती नाही ! / ५७
४७. स्वराज्य सर्वांच्या कल्याणासाठी आलेय ! / ५८
४८. प्रामाणिकपणाची मीठभाकरी. / ५९
४९. वा गड्यांनो...अगदी हुबेहूब..! / ६०

५०. जीव लावणारा नेता. / ६१
५१. महामार्ग करायला लागा! / ६२
५२. माधवरावांचे आयुष्य वाढवा! / ६३
५३. स्थितप्रज्ञ यशवंतराव / ६४
५४. मी जनतारूपी दुधावरची साय आहे..! / ६६
५५. अभ्यासांती निर्णय / ६७
५६. अनाकलनीय यशवंतराव..! / ६८
५७. सामाजिक समतेच्या दिशेने / ६९
५८. तर मुख्यमंत्रीपद काय कामाचे ? / ७०
५९. ते मुख्यमंत्री आणि हे मुख्यमंत्री / ७१
६०. आज मला कृतार्थ वाटते! / ७२
६१. अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार चांगले! / ७३
६२. मुख्यमंत्री कुणासाठी थांबत नसतो! / ७४
६३. सत्ता खाजगी कारणासाठी वापरायची नसते! / ७५
६४. ...तर बरे झाले असते..! / ७६
६५. यशवंतरावांची शिवनिष्ठा. / ७७
६६. मला कॉलेज जीवनाची आठवण झाली..! / ७९
६७. कलावंतांची कदर / ८०
६८. प्रश्न महाराष्ट्राच्या भावनेचा आहे ! / ८१
६९. मी तर भूमीहीन माणूस ! / ८२
७०. समाजपरिवर्तनाची प्रयोगशाळा. / ८३
७१. अगोदर विद्यापीठ, नंतर महाविद्यालये! / ८४
७२. मराठी शिका! / ८५
७३. कायद्यानुसार जे योग्य आहे ते करा..! / ८६
७४. मी न्यायबुद्धीने वागेन! / ८७
७५. मी येतोय! / ८८
७६. केशवरावांच्या कॉलेजचे लग्न करायचे आहे! / ८९
७७. रसिक वाचक यशवंतराव! / ९०
७८. सामान्य जनतेचा मुख्यमंत्री. / ९१
७९. ...म्हणून मी 'मराठा' वाचीत नाही..! / ९२
८०. जनता जनार्दन हाच माझा परमेश्वर ! / ९३
८१ आम्हाला विकासासाठी सत्ता हवी आहे! / ९४
८२. ... मी दिलगिरी व्यक्त करतो! / ९५

८३. हे मी वाचले आहे ! / ९६
८४. विद्वानांचा विनम्र सत्कार. / ९७
८५. असा प्रकार होणार नाही! / ९८
८६. मी खाऊ आणायला हवा होता! / ९९
८७.. त्यांची जाण ठेवायला नको? / १००
८८. शिक्षकांचा सन्मान राखा! / १०१
८९. मथुरेचा बाजार. / १०२
९०. लोककलेचा गौरव. / १०३
९१. मी कुणाला टोपी घातली नाही..! / १०४
९२. फक्त पदव्या मिळवू नका..! / १०५
९३. राजकारणात कधी कधी दोन घोडे लागतात! / १०६
९४. बंगल्यांची इंग्रजी नावे बदलू या ! / १०७
९५. सह्याद्री सर्वांचा आहे! / १०८
९६. मला टीका हवी आहे! / १०९
९७. सवलत म्हणजे उपकार नव्हे! / ११०
९८. लोकांना नाराज कशासाठी करायचे? / १११
९९. हे शासनाला परवडणार नाही! / ११२
१००. भजी खाताना दादांची आठवण येते! / ११३
१०१. हे अश्रू 'त्या' दुःखाचे आहेत! / ११४
१०२. मनाचा मोठेपणा ! / ११५
१०३. चंद्रपूरमध्ये कारखाना काढा! / ११६
१०४. शेतकऱ्यांवर अन्याय कशासाठी? / ११७
१०५. मला निष्पक्षपाती चौकशी हवी आहे! / ११८
१०६. म्हणून त्या वाटेला आम्ही जात नाही..! / ११९
१०७. कवीचे स्वागत / १२०
१०८. कॉन्फरन्स चांगली झाली पाहिजे! / १२१
१०९. लोक वाट पाहात असतील! / १२२
११०. असं कधी बोलू नये! / १२३
१११. साहित्यिक आणि अभियंते / १२४
११२. विकेंद्रीकरण की विघटन? / १२५
११३. मला नेमाडेंना भेटायचंय..! / १२६
११४. तो वेडा कुंभार! / १२७
११५. आई, मीच यशवंतराव! / १२८

११६   तू गडावर जाऊन दार उघड! / १२९
११७. ज्याचं पोट दुखतं, तोच ओवा मागतो! / १३०
११८. अगोदर लोकमातेचं दर्शन घेऊया! / १३१
११९. केसेस काढता येणार नाहीत! / १३२
१२०. ही रात्र मी कधीच विसरणार नाही! / १३३
१२१ खेड्यापाड्यातला तरुण ज्ञानसंपन्न झाला पाहिजे / १३४
१२२. त्याचा प्रेस उभा राहिला पाहिजे! / १३५
१२३. मी कुणाच्या पायाशी बसणार नाही! / १३६
१२४. कारखान्यात मंत्री कशाला? / १३७
१२५. न्यायाधीशांचा सन्मान / १३८
१२६ मला गेले पाहिजे! / १३९
१२७. महिलांचा मान राखलाच पाहिजे! / १४०
१२८. प्रेमाने माणसे कायमची जोडली जातात / १४१
१२९. हे थांबले पाहिजे! / १४२
१३०. त्याला इंग्लंडला जाऊ द्या! / १४३
१३१. वाहनयोग / १४४
१३२. कसोटीचे भाषण / १४५
१३३. आमचे बोट सर्वसामान्यांच्या नाडीवर! / १४६
१३४. हे पक्षवाढीचेच काम आहे! / १४७
१३५. आपण अधिक 'डावं' व्हावं! / १४८
१३६. समाजाने त्यांचे ऋण मानले पाहिजेत! / १४९
१३७. तिळगूळ घ्या, गोड बोला!! / १५०
१३८. आपली मैत्री ही मैत्रीच राहू दे! / १५१
१३९. तुम्ही आमची पंचाईत केलीत! / १५२
१४०. आपण निश्चित असा...! / १५३

## ■ विभाग तिसरा : यमुनाकाठ
## (१९६२ - १९८४)

१४१. एका व्यक्तीला विचारले पाहिजे.. / १५६
१४२. मी तुमचा भाऊ आहे! / १५७
१४३. मीही कधीतरी 'माजी' होणार! / १५८
१४४. रक्ताने लिहिलेले महाकाव्य / १५९
१४५. तुम्हीच माझी पसंती आहात / १६०
१४६. निवृत्त अधिकारी सेवेत / १६१
१४७. माणसे आहेत तशी स्वीकारयला नकोत का ? /१६२
१४८. ते तुम्हाला नाही कळायचं! / १६३
१४९. माझा तुमच्यावर विश्वास आहे! / १६४
१५०. बेडीमित्र. / १६५
१५१. माझ्या विचारांचा केंद्रबिंदू सामान्य माणसे आहेत! / १६६
१५२. माझ्या घरी चहाला याल का? / १६७
१५३. भीमसेनचे गाणे ही जाता जाता ऐकण्याची गोष्ट नाही! / १६८
१५४. आपण खास मोहिमेवर जात आहोत! / १६९
१५५. सभा संपल्यावर घरी येईन! / १७०
१५६. फसवू नका आणि फसूही नका! / १७१
१५७. सामान्य जनतेचं न्यायालय! / १७२
१५८. कसा आहेस बाळू? / १७३
१५९. चहा घेतल्याबिगर जाऊ देणार नाही! / १७४
१६०. सगळा खर्च सरकारतर्फे करा! / १७५
१६१. यशवंता, टांग्याला पैसे कोठून दिलेस? / १७६
१६२. तुमचा कान कसा आहे? / १७७
१६३ गो अहेड...! / १७८
१६४. मी वाद खेळण्यासाठी दिल्लीला गेलो नाही..! / १७९
१६५. पु.लं. चे भाषण ऐकू द्या! / १८०
१६६. नेहमी धूळ चारणाराने.....! / १८१
१६७. अन् शरद पवार आमदार झाले..! / १८२
१६८. मी गाणे संपल्यावर येईन! / १८३
१६९. आम्ही काळे झेंडेवाले! / १८४

१७०. 'त्या' झाडाशी आमच्या भावना गुंतलेल्या आहेत! / १८५
१७१. ज्ञानेश्वरांच्या नावानेच कॉलेज निघाले पाहिजे! / १८६
१७२. कसोटीला उतरणारा वक्ता / १८७
१७३. तुमच्यासाठी एवढे तरी करू द्या! / १८८
१७४. प्रसंगी अखंडित वाचीत जावे! / १८९
१७५. मला घाई झालेली नाही! / १९०
१७६. बाळ वाढतंय याचा आनंद आहे! / १९१
१७७. बघू या काय करता येईल ते! /१९२
१७८. कोंडी तोडणे हेच आपले काम! / १९३
१७९. 'हा मुलगा तुम्ही आम्हाला द्या!' / १९५
१८०. गैरसमज वेळीच दूर करावा! / १९७
१८१. यांचं अन्न खाल्लंय, विसरणार कसे? / १९८
१८२ ते तुझे नोकर नाहीत! / २००
१८३. सर्व काही दिल्या घेतल्याचे नसते! / २०१
१८४. नव्या पिढीला संधी दिली पाहिजे! / २०२
१८५. मी टोकाची भूमिका घेऊ शकत नाही! / २०३
१८६. या पैश्यांचं काय करू? / २०४
१८७. भायेरील भानगडीचो मंत्री! / २०५
१८८. तुमच्या सूचना काय आहेत? / २०६
१८९. अजून लोकांची कृपा आहे..! / २०७
१९०. मॉस्कोत आहात की पुण्यात? / २०८
१९१. तुमच्या मुखात ही भाषा नको! / २०९
१९२. हे आमचे दुर्दैव होय! / २१०
१९३. धीर धरा, सुखाने रहा! / २११
१९४. व्होल्गा ते कृष्णा / २१३
१९५. मी तुझ्या घरी येणार आहे! / २१४
१९६. दुष्काळात एकसष्ठी नको! / २१५
१९७. जनतेचे समाधान ही पुढाऱ्यांची पहिली जबाबदारी आहे! / २१६
१९८. सौजन्यमूर्ती / २१७
१९९. कलावंतांनी काही पथ्ये पाळली तर... / २१८
२००. का आला आहात मावशी?/ २१९
२०१. आमचा महानोर कुठं आहे? / २२०
२०२ सत्ता राबविणं अवघड आहे..! / २२१

२०३. हे माझं गाणं आहे! / २२२
२०४ 'त्याच्या वाटेतून बाजूला व्हा !' / २२३
२०५ मी लक्षात ठेवून येईन! / २२४
२०६. आपला मान आपणच राखला पाहिजे! / २२५
२०७. आणि यशवंतराव गुणगणू लागले! / २२६
२०८. अभ्यास कधी सुटता कामा नये! / २२७
२०९. मला त्यांना भेटलं पाहिजे! / २२८
२१०. 'यशवंतरावांचा आम्हाला पाठिंबा आहे' असं लिहा! / २२९
२११. पैजेचा रुपाया! / २३०
२१२. कुठं आहेत तुझी हरणं?/ २३१
२१३. हे योग्य नाही! / २३२
२१४. कलाप्रकल्प / २३३
२१५. तुझ्या उदार अंत:करणामध्ये...! / २३५
२१६ गाडी पळसखेडला वळवा! / २३६
२१७. तुम्ही महाराष्ट्राची मोठी सेवा केलीय! / २३७
२१८. कुरूप बदकाची गोष्ट! / २३८
२१९. मी फक्त नेत्रसुखासाठी आलो आहे..! २३९
२२१. मागेल त्याला शिक्षण द्या ! / २४०
२२२. तत्त्वनिष्ठा / २४१
२२३. मी ते चित्र पाहिले! / २४२
२२४. भाषणस्वातंत्र्य / २४३
२२५. आबा चेअरमन झाले पाहिजेत..! / २४४
२२६. विचारस्वातंत्र्याचा आदर / २४५
२२७. हे मला आवडले नाही! / २४६
२२८. मायेची भाकर / २४७
२२९. तू राज्याचा मंत्री आहेस! / २४९
२३०. ही आमची संस्कृती नाही! / २५०
२३१. विरोधासाठी विरोध नाही! / २५१
२३२. तो माझा रस्ता नाही! / २५२
२३३. मिस्टर चव्हाण कसे आहेत? / २५४
२३४. 'मेड फॉर इच अदर'..! / २५५
२३५. गप्पा मारायला येऊ का? / २५६
२३६. यशवंतराव, तुम्ही शब्द राखलात! / २५७

२३७. ....म्हणून परत आलो! / २५८
२३८. जिकडे यशवंतराव तिकडे...! / २५९
२३९. मिसेस साळवेंना त्रास नको ! / २६०
२४०. तुम्हाला वेळ आहे का? / २६१
२४१. भस्मासूर उलटला! / २६३
२४२. अशा घरात मी राहणार नाही! / २६४
२४३. तुमचं 'बलुतं' आवडलं !/ २६५
२४४. माझे घर कृष्णाकाठीच असू शकते! /२६७
२४५. आमच्या सोबत चहा घ्या! / २६८
२४६. न बोलता मदत. /२६९
२४७. अशी प्रस्तावना मी लिहू शकणार नाही! / २७०
२४८. मी तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही...! / २७१
२४९. तुम्ही मला दवाखान्यात नेताय? / २७३
२५०. आधी दाढी कर ! / २७५
२५१. शब्दांशिवायचे भाषण. / २७६
२५२. तू गेल्यावर.../ २७७
२५३. भावना उचंबळून येतात! / २७८
२५४. आर.आर. ना आत बोलवा..! / २८०
२५५. या प्रेमाला पात्र ठरण्याचे भाग्य मला लाभावे..! / २८२
२५६. पैशाची अडचण आहे..! / २८३
२५७. अधिक काय लिहावे? / २८४
२५८. माझी जीवननौका भरकटू लागलीय! / २८६
२५९. अखेरचा प्रवास / २८७

## ■ परिशिष्टे

जीवनपट / २८८
संदर्भग्रंथ सूची / २९०
व्यक्तिसूची / २९२
ऋणनिर्देश / २९७

## विभाग पहिला

# कृष्णाकाठ

(१९१३ ते १९४६)



# आईच्या प्राणांची साक्ष

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात देवराष्ट्रे नावाचं एक छोटंसं गाव आहे. हे यशवंतराव चव्हाण यांचं आजोळ. याच गावात १२ मार्च १९१३ रोजी यशवंतरावांचा जन्म झाला. इथेच त्यांचं बालपण गेलं. लहानपणापासूनच यशवंता जिज्ञासू आणि चौकस होता. तो आठ-दहा वर्षांचा असताना एकदा त्याने आजीला विचारले, 'आज्जी, आईचं नाव तू विठाई असं का ठेवलंस?'

आजी म्हणाली, 'आक्काचं (विठामातेचं) नाव देवाचं आहे. विठाई आपला देव आहे.'

आजीच्या बोलण्याचा अर्थ यशवंताला तितकासा समजला नाही. त्याने काही वेळ मनाशी विचार केला व मग पुन्हा विचारले, 'आणि मग माझं नाव यशवंत कोणी ठेवलं?'

'मीच ठेवलं. तुझ्या जन्माच्या वेळी आक्काला फार त्रास झाला. ती बेशुद्ध झाली. आपलं गाव हे असं खेडेगाव. दवापाण्याची सोय नव्हती. घरगुती औषधपाणी केलं, पण गुण येईना. माझ्या जीवाला घोर लागला. शेवटी मी सागरोबाला साकडं घातलं. देवाला हात जोडलं, देवा सागरोबा, अक्काला जगविण्यात माझ्या हाताला यश दे. तुझी आठवण म्हणून मुलाचं नाव आम्ही यशवंत ठेवू. सागरोबानं माझं गाऱ्हाणं ऐकलं. आक्काची सुखरूप सुटका झाली. माझ्या हाताला यश आलं म्हणून तुझं नाव यशवंत ठेवलं!'

असे म्हणून आजीने यशवंताच्या गालावरून बोटे उतरली आणि कडकड मोडली. तिच्या डोळ्यात पाणी तरारले. आपल्या नावामागचा हा इतिहास ऐकून यशवंता शहारला. आईविषयीच्या कृतज्ञतेने त्याचे बालमन भरून आले. आईच्या प्राणांची साक्ष म्हणून आपले नाव यशवंत आहे हे कळाल्यापासून आई हाच यशवंताचा प्राण झाली!

# यशवंत हो...!

यशवंताचे वडील बळवंतराव कोर्टात बेलिफ होते. विटा येथील कोर्टात काही काळ नोकरी केल्यावर त्यांची कराडला बदली झाली. पुढे काही दिवसांनी कराडमध्ये प्लेगची साथ आली. सुरक्षिततेसाठी बळवंतरावांनी विठामातेला व मुलांना देवराष्ट्र येथे हलवले. पण दुर्दैवाने त्यांना स्वत:लाच प्लेगने गाठले. घरातल्या कमावत्या व्यक्तीच्या मृत्यूने चव्हाण कुटुंबावर आकाश कोसळले. लहानग्यांचा सांभाळ कसा करायचा या चिंतेने विठामाता अस्वस्थ झाल्या. कोणीतरी त्यांना सुचवले की जिल्हा न्यायाधीश दयाळू आहेत, तुम्ही त्यांना भेटलात तर ते तुमच्या मुलाला; ज्ञानदेवाला- बळवंतरावांच्या जागी बेलिफाची नोकरी देतील. त्याप्रमाणे लहानग्या यशवंताला घेऊन विठामाता साताऱ्याला जिल्हा न्यायाधीशांना (डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट) भेटायला गेल्या. सोबत कराडचे तालुका न्यायाधीशही होते. त्यांनी चव्हाण कुटुंबियांची हकीकत जिल्हा न्यायाधीशांच्या कानावर घातली. त्यांनी काही प्रश्न विचारले. मग ते विठामातेला म्हणाले, 'तुम्ही काळजी करू नका. लवकरच मी तुमच्या मुलाची ऑर्डर काढतो.' त्यावेळी लहानगा यशवंता आईचे बोट पकडून तिला बिलगून उभा होता. मॅजिस्ट्रेटने तालुका न्यायाधीशाला विचारले, 'या लहानग्याचे नाव काय ?'

'यशवंत.'

'त्याचा इंग्रजीत काय अर्थ होईल ?'

'Victorious'

मग यशवंताकडे पाहून ते म्हणाले, 'Be Victory to you, oh lad! (यशवंत हो बाळा !)'

त्या कनवाळू ब्रिटिश न्यायाधीशांनी दिलेला आशीर्वाद पुढे तंतोतंत खरा ठरला.

यशवंता, 'यशवंत आणि कीर्तिवंत' झाला.

# मी यशवंतराव चव्हाण होणार !

यशवंता कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना घडलेला हा प्रसंग. एकदा शेणोलीकर सरांनी वर्गातल्या सर्व मुलांना सांगितले, 'तुम्हाला प्रत्येकाला पुढच्या आयुष्यात काय व्हायचे आहे, ते तुम्ही एका कागदाच्या चिठ्ठीवर लिहून द्या.'

वर्गातले विद्यार्थी थोर पुरुषांची नावे आठवू लागले. त्यापैकी काही नावे कागदावर लिहू लागले. यशवंताने मनाशी विचार केला की, कुठल्यातरी मोठ्या पुरुषाचे नाव लिहून देणे म्हणजे आपली स्वत:ची फसवणूक करून घेणे होय. मोठी माणसे आपल्या कर्तृत्वाने मोठी झालेली असतात. त्यांच्यासारखे आपण होऊ हा विचार चांगला असला तरी तसा निर्णय घेणे चुकीचे ठरेल. म्हणून यशवंताने आपल्या चिठ्ठीवर एकच वाक्य लिहिले, 'मी यशवंतराव चव्हाण होणार.'

थोड्या वेळाने शेणोलीकर सरांनी सर्व मुलांच्या चिठ्ठ्या पाहिल्या. यशवंताची चिठ्ठी पाहून ते म्हणाले, 'अरे, तू तर चांगलाच अहंकारी दिसतोस. तू सार्वजनिक कामात रस घेतोस हे चांगले आहे, पण त्यामुळे तू निदान देशातील मोठ्या माणसांचा आदर्श तरी आपल्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजेस.' यशवंता स्वत:च्या निर्णयाशी ठाम होता. पण त्याला सरांशी वाद घालायचा नव्हता. तो म्हणाला, 'सर, तुमचे म्हणणे खरे आहे, पण मला वाटले ते मी लिहिले, झाले!' हा विषय तिथेच संपला. नंतर शेणोलीकर सरांनी स्टाफमधील इतर सहकाऱ्यांना हा प्रसंग सांगितला. मुख्याध्यापक पाठक सरांना ही घटना कळल्यावर त्यांनी यशवंताला बोलावून घेतले. त्याचे कौतुक केले व म्हणाले, 'यात काय गैर आहे? आपले व्यक्तिमत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करण्याची तुझी इच्छा आहे आणि ते योग्यच आहे.'

मोठेपणी आपल्याला काय व्हायचे आहे हे इतके स्पष्टपणे पाहू शकणारा यशवंता म्हणूनच पुढे 'यशवंतराव चव्हाण' म्हणून जगाला माहित झाला. मोठी माणसे मोठे होण्याचा निर्णय लहानपणीच घेत असतात..!

# देवाघरचे नाते...!

यशवंताचे बहुतेक सगळे बालपण त्याच्या आजोळी; म्हणजे देवराष्ट्रे या छोट्या गावात गेले. मामाच्या घराभोवतीची इतर घरे सणगर, रामोशी, पाटील, मुस्लिम अशा अनेक जातीधर्मांच्या लोकांची होती. अशाच एका झोपडीवजा घरात कुलसुम दादी नावाची वृद्धा राहायची. तिचा नातू गुलाब आणि यशवंता हे दोघे एकाच वयाचे होते. यशवंताच्या आजीची आणि कुलसुम दादीची अगदी घट्ट मैत्री होती. सकाळ-संध्याकाळच्या वेळेस काही ना काही मागायला किंवा द्यायला आणि त्या निमित्ताने गप्पाटप्पा करायला ही कुलसुम दादी हमखास यायची. मग दोघींच्या जिव्हाळ्याच्या गप्पा व्हायच्या. यशवंताही दादीच्या घरी नेहमी जात असे. इतकेच नव्हे तर अधुनमधून तिथेच जेवणही करत असे. यशवंताला खाऊ-पिऊ घालताना कुलसुम दादीला वेगळाच आनंद मिळायचा. हळूहळू त्या दोघांमध्ये आजी-नातवाचा जिव्हाळा निर्माण झाला होता.

पुढे शिक्षणासाठी यशवंता कराडला राहिला, तरी दरवर्षी दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत तो न चुकता आजोळी जात असे. आजोळी आल्यावर पहिल्यांदा तो धावत कुलसुम दादीकडे जायचा. दादीला भेटल्यावर त्याला एक वेगळाच आनंद मिळायचा. एकदा अशाच एका वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत तो आजोळी आला होता. वैशाख महिन्यातल्या अमावस्येची ती रात्र होती. सर्वजण अंगणात झोपले असताना मध्यरात्रीच्या सुमारास मोठ्याने आरडाओरडा सुरू झाला, म्हणून यशवंता दचकून जागा झाला. पाहतो तर त्याला समोर आगीचे लोळ दिसत होते. शेजारच्या वाड्यातल्या कडब्याच्या गंजीला आग लागली होती. स्वसंरक्षणासाठी सगळेजण घरात शिरले. पण यशवंताची वृद्ध आजी कुलसुमच्या काळजीने बेचैन झाली होती. गंजीशेजारीच दादीचे घर होते. आजी म्हणाली, 'अरे, ही आग कुलसुमचं घर खाऊन टाकील. बाहेर जाऊन कुणीतरी पाहा.'

कुलसुमच्या घराला व जिवाला धोका आहे हे लक्षात येताच यशवंता तीरासारखा धावत सुटला. रस्त्यावर शुकशुकाट होता. अधूनमधून दगड पडत होते. यशवंता दादीच्या घराजवळ आला, आता आगीने घराला वेढा घातला होता. दादी शेळ्या सोडून मोकळ्या

करण्यासाठी धडपडत होती. यशवंता तिच्याजवळ गेला व ओरडला, 'आमच्या आजीनं तुला बोलावलंय..!'

डोळ्यासमोर जळणारं घर पाहून दादी सुन्न झाली होती. तिचा पाय निघत नव्हता, पण यशवंताने तिला हाताला धरून आजीकडे आणले. दादीचा जीव शेळ्यात अडकला होता. इतक्यात तिचा मुलगाही शेळ्या घेऊन आला. त्या रात्री दादीची झोपडी त्या आगीत नष्ट झाली, पण ती, तिची मुलंबाळं, शेळ्या सगळेजण आजीच्या अंगणात सुरक्षित राहिले.

त्या वर्षीच्या सुटीनंतर बरेच दिवस यशवंताला आजोळी जाणे फारसे झाले नाही. पुढे काही वर्षांनी आजी वारल्याचे कळल्यावर जेव्हा यशवंता देवराष्ट्रेला आला तेव्हा त्याला कुलसुम दादी दिसली नाही आणि तिचे घरही दिसले नाही. ती कुठं गेली हे कुणालाच माहित नव्हतं. कुलसुम दादीच्या न भेटण्यानं यशवंताचं आपली आजी गेल्याचं दुःख अधिकच वाढलं. रक्ताच्या नात्याइतकीच अशी जोडलेली नाती घट्ट असतात याची त्याला जाणीव झाली. दादीचं आणि आपलं काय नातं होतं असा प्रश्न यशवंताला पडला आणि त्याच्या मनानं उत्तर दिलं, 'ते देवाघरचं नातं होतं!'

# 'असे दबून कसे चालेल?'



१९२६ सालची गोष्ट. यशवंता तेव्हा तेरा-चौदा वर्षांचा होता. आई विठाई गरीबीचा संसार चालवून मुलांचे शिक्षण करीत होती. यशवंतापेक्षा चार-पाच वर्षांनी मोठे असलेल्या गणपतरावांना नेहमी असे वाटायचे की आपली आई सर्वांसाठी एकटीच इतके कष्ट उपसते. तिला आपण मदत केली पाहिजे. एकदा गावातल्याच त्यांच्या एका मित्राने एक नवीन प्रस्ताव गणपतरावांसमोर मांडला. 'इंदूर संस्थानात भरपूर शेतजमीन उपलब्ध असून शेती करण्याची तयारी असणाऱ्यांना तिथे भरपूर जमीन दिली जाते' असे तो म्हणाला. आपण इंदूरला जावे, भरपूर शेती मिळवून मेहनत करावी आणि पैसे कमवावेत असे गणपतरावांना वाटले. त्यांनी इंदूरला जायचे ठरविले. विठामातेला ही कल्पना पसंत नव्हतीच; पण गणपतरावांनी आईचे म्हणणे ऐकले नाही. इंदूरला गेल्यावर सुमारे एक महिन्यानंतर गणपतरावांचे पत्र आले की, इंदूर सरकारने त्यांना गरोढ या गावी दीडशे एकर जमीन कसण्यासाठी दिली असून ते खुशाल आहेत. सर्वांनाच खूप आनंद झाला. 'आपण आता जमीनदार झालो' असे यशवंताच्या बालमनाला वाटून गेले.

पुढे चार-सहा महिन्यांनी गणपतरावांबरोबर गेलेला त्यांचा स्नेही कराडला परत आला. 'गणपाला तिथं एकटाच सोडून तू परत कसा आलास?' असे विठामातेने विचारले असता तो म्हणाला,'मी शेतीसाठी लागणारं सामान न्यायला आलोय. काही दिवसांनी परत जाणार आहे, आणि गणपत तिथं खुशाल आहे.' पण पुढे महिना उलटून गेला तरी तो मित्र परत जायचे नाव घेत नव्हता. काही दिवसांनी तर त्याने लष्करातली नोकरी धरली आणि निघून गेला. इकडे विठामातेचा जीव वाऱ्यावर उडत होता. त्या परमुलखात आपलं लेकरू एकटं काय करत असेल या चिंतेनं तिला अन्नपाणी गोड लागेना. भावाच्या काळजीनं यशवंताही कासावीस झाला. अशातच गणपतरावांचे पत्र आले की 'बाबुराव

अजून परत का येत नाही? मी इथे एकटाच पडलोय, आणि माझी प्रकृतीही बरी नाही. माझ्याजवळ साधनेही नाहीत.' भावाची ही अवस्था पाहून यशवंताचे मन कळवळले. त्याने साध्या पोस्टकार्डावर पत्र लिहून गणपतरावांना सांगितले की 'तुम्ही असाल तसे परत या. आम्हाला जमीन नको, पैसा नको, तुम्ही हवे आहात.' पण हाती आलेली पिके सोडून तरी कसे जाणार असा प्रश्न गणपतरावांनाही पडला होता. अर्थात पिके काढण्यासाठी त्यांच्याकडे पैसे व साधने नव्हती ही वस्तुस्थिती होतीच. मात्र दूरदेशी असलेला आपला भाऊ अडचणीत आहे आणि आपण त्याच्यासाठी काहीच करू शकत नाही या भावनेने यशवंता विमनस्क बनला.

पुढे काही महिने उलटल्यानंतर एके दिवशी शरीराने खंगलेल्या आणि मनाने खचलेल्या अवस्थेत गणपतराव कराडला परत आले. आपल्या भावाला त्या अवस्थेत पाहून यशवंताने त्यांना मिठी मारली आणि रडायला सुरुवात केली. भावाने सोसलेल्या यातनांबद्दलचे दुःख आणि इतक्या यातनांतून भाऊ पुन्हा परत घरी आल्याचा आनंद या दोन्हीचा संगम यशवंताच्या अश्रूंमध्ये झाला होता.

यशवंताला धीर देत गणपतराव म्हणाले, 'अरे, असं दबून कसं चालेल? यातून मला नवीन काहीतरी शिकायला मिळालं हे काही कमी नाही...!'

# असेच करीत राहण्याचा आमचा निर्धार आहे !

सन १९२७ पासून (म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षापासूनच) यशवंता राजकारणविषयक घडामोडी जाणून घेऊ लागला. १९३० साली सत्याग्रह आणि प्रभातफेऱ्यांना उधाण आलं आणि यशवंताने त्यात उडी घेतली. १९३० सालच्या लाहोर अधिवेशनात पं.जवाहरलाल नेहरूंनी सांगितल्याप्रमाणे २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून देशभर साजरा करावा असे ठरले. त्यानुसार कराड शहराच्या म्युनिसिपल कचेरीवर तिरंगा फडकवायचा असे यशवंताने व त्याच्या सहकाऱ्यांनी ठरवले. त्यासाठी तालुक्यातील गावांमध्ये सायकलवर फिरून यशवंताने तरुणांना संघटित केले. शहरातील सर्व प्रमुख ठिकाणी तिरंगा फडकाविणे, गांधीजींना अटक केल्याबद्दल सरकारच्या निषेधाच्या घोषणा देणे, कायदेभंगाच्या चळवळीसंबंधीची पत्रके वाटणे व टिळक हायस्कूलच्या प्रांगणात सकाळी आठ वाजता झेंडावंदन करणे असा या बाल क्रांतिकारकांचा कार्यक्रम होता. त्याप्रमाणे सर्वजण कामाला लागले. ठरल्याप्रमाणे सकाळी आठ वाजता यशवंताने हायस्कूल समोरच्या कडुनिंबाच्या झाडावर तिरंगा फडकावला आणि 'वंदे मातरम्' हे गीत म्हणून सर्वजण आपापल्या घरी गेले. योगायोग म्हणजे त्याच दिवशी शाळा तपासणीसाठी आलेले शिक्षणाधिकारी शाळेसमोरच्या बंगल्यात मुक्कामासाठी थांबले होते. त्यांनी सगळा कार्यक्रम पाहिला व मुख्याध्यापकांकडे चौकशी केली. आपल्याला कधीही अटक होऊ शकते हे यशवंताने ओळखले. दुसऱ्या दिवशी अटकेच्या तयारीनेच तो शाळेत गेला. वर्गात बसला. तास चालू असतानाच पोलीस अधिकाऱ्याला घेऊन मुख्याध्यापक वर्गात आले. यशवंताला बाहेर बोलावून घेतले. त्या अधिकाऱ्याने सकाळच्या कार्यक्रमाची सर्व माहिती विचारली. यशवंता म्हणाला, ''हो, मी हे सर्व केले आहे आणि असेच करीत राहण्याचा आमचा निर्धार आहे.''

त्यावर तो पोलीस अधिकारी मुख्याध्यापकांना म्हणाला, ''या मुलाला मी अटक करून घेऊन जातोय. त्याच्या पालकांना तसे कळवा.'' पुढे यशवंताला मॅजिस्ट्रेटसमोर उभे करून त्याच्यावरील आरोप वाचून दाखविण्यात आले. यशवंताने गुन्हा कबूल केला आणि मॅजिस्ट्रेटने त्याला अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. तुरुंगाच्या दिशेने चालत जाताना यशवंता मनात म्हणत होता, 'स्वातंत्र्य मिळेपर्यंत असेच करीत राहण्याचा माझा निर्धार आहे.'

# त्यागाचे तेजोवलय

सन १९२९ सालची गोष्ट. कराड शहरात प्लेगची साथ आली. प्लेगच्या भीतीने माणसे रानावनात झोपड्या बांधून राहू लागली. शाळांना सुट्ट्या जाहीर झाल्या. पण शाळेत जायला व अभ्यास करायला यशवंताला मुळात वेळच कुठे होता? त्यावेळी देशातील क्रांतीकारकांनी सशस्त्र लढ्याचा मार्ग अवलंबून इंग्रज सरकारला जेरीस आणले होते. जुलुमी सरकार व बंडखोर देशभक्त यांच्यातील विषम लढाईने देश ढवळून निघाला होता. सरकारविरुद्ध शूरपणाने लढणाऱ्या देशभक्तांविषयीची माहिती जाणून घेण्याची अनावर इच्छा यशवंताला स्वस्थ बसू देत नव्हती. त्यावेळी आजच्यासारखी दळणवळणाची प्रगत साधने उपलब्ध नव्हती. कराडात त्यावेळी केसरी, ज्ञानप्रकाश व नवाकाळ एवढीच वर्तमानपत्रे वाचायला मिळत असत. ती वाचण्यासाठी यशवंता दररोज दोन-तीन मैलांचे अंतर चालून गावात येत असे. वर्तमानपत्र विकत घ्यायला त्याच्याकडे पैसे नसायचे. मग गावात ज्यांच्या घरी वर्तमानपत्र येत असे तिथे जाऊन यशवंता ताटकळत उभा रहायचा. घरमालकाचे व इतर प्रौढ लोकांचे वाचन संपल्यावरच पेपर त्याचा हातात मिळायचा. यशवंता अधाशासारखा चळवळीच्या बातम्या वाचायचा.

त्यावेळी बंगालमधील क्रांतीकारक जतींद्रनाथ दास यांच्या आमरण उपोषणाची बातमी देशभर गाजत होती. लाहोर कटाशी संबंध नसतानाही सरकारने त्यांना तुरुंगात डांबले. तिथे राजकीय कैद्यांना निर्ढावलेल्या गुन्हेगाराप्रमाणे वागविले जात आहे हे पाहून सात्विक संतापाने जतींद्रांनी तुरुंगातच अन्नसत्याग्रह सुरू केला. अगोदरच तोळामासा असलेली त्यांची तब्येत झपाट्याने खालावू लागली. उपोषणाला एक महिना उलटून गेला तरी सरकारला घाम फुटेना. एक एक दिवस वाढत होता आणि जतींद्रांचे काय होणार या धास्तीने यशवंता कासावीत होत होता. दररोज कमरेइतक्या पाण्यातून नदी ओलांडून चिखल तुडवत यशवंता कराडात यायचा. धडधडत्या अंतःकरणाने वर्तमानपत्र हातात घ्यायचा आणि क्षणाक्षणाने मृत्युच्या जबड्यात शिरणाऱ्या जतींद्रांविषयीच्या बातम्या वाचून सुन्न व्हायचा. देशासाठी प्राण पणाला लावणारे जतींद्रनाथ आपले कोणीतरी जवळचे आप्त आहेत अशी यशवंताची भावना झाली आणि तो




त्यांच्यासाठी मनोमन प्रार्थना करू लागला. पण दोन महिने उलटून गेले तरी तोडगा निघेना. शेवटी १३ सप्टेंबर १९२९ रोजी उपोषणाच्या बासष्टाव्या दिवशी जतींद्रांनी प्राणत्याग केला.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात यशवंताने जतींद्रांच्या मृत्यूची बातमी वाचली आणि तो भांबावून गेला. त्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. आपल्या घरातलेच कोणीतरी मरण पावले आहे असे त्याला वाटले. काही वेळाने तो घरी जायला निघाला आणि चालता चालता रडायला लागला. काही केल्या रडू थांबेना. तशाच अवस्थेत तो घरी गेला. भूक लागली होती, पण जेवण्याची इच्छा होईना. यशवंताच्या रडण्याचे कारण विठामातेला समजेना. यशवंताचा इतका व्याकुळ चेहरा त्या माऊलीने कधीही पाहिला नव्हता. तिनं काळजीनं विचारलं, 'येस्वंत्ता, लेकरा काय झालं? कोण काय म्हणालं का तुला?'

यशवंताने आईला जतींद्रांच्या बलिदानाविषयी सांगितले, पण विठामातेला अर्थातच त्यातलं काही कळालं नाही. कलकत्त्यात एक माणूस मरण पावला म्हणून कराडातल्या आपल्या मुलानं रडावं ही गोष्ट विठामातेच्या आकलनापलिकडची होती. यशवंताला लागीर झाली असावी किंवा आपल्या मुलावर कोणीतरी करणी केली असावी असे तिला वाटले. ती अंगारेधुपारे शोधू लागली. शेवटी यशवंताने तिला समजावले, 'मला काहीही झालेले नाही. तू काळजी करू नकोस.' तेव्हा कुठे तिचा जीव भांड्यात पडला.

जतींद्रनाथांच्या देहत्यागाचे तेजोवलय यशवंताचे अंतःकरण भेदून गेले. देशासाठी आयुष्य वेचण्याचा निर्धार त्याने केला आणि पुढच्याच वर्षी यशवंता राष्ट्रीय चळवळीत सामील झाला!

# राजकीय जीवनाचे तोरण

वयाच्या सतराव्या वर्षी यशवंता राष्ट्रीय चळवळीत सामील झाला. प्रबोधन, लोकजागृती करू लागला. सरकारविरोधी कार्यक्रमात सहभागी होऊ लागला. त्यावेळी त्याचे वय कमी असले तरी वयाच्या मानाने त्याची समज खूपच जास्त होती. त्याची विचारपद्धती निर्णयक्षमता आणि राजकीय आकलनाविषयी त्याच्या सहकाऱ्यांना पूर्ण खात्री होती. त्याच्या शब्दाला मान होता. अशातच १९३७ साली असेंब्लीच्या निवडणुका जाहीर झाल्या. राष्ट्रीय सभेने ही निवडणूक लढवायचे ठरवले. कराड मतदारसंघातून कोणाला उमेदवारी द्यावी यावरून वाद निर्माण झाला. उमेदवार हा सुशिक्षित आणि स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेतलेला असावा असे यशवंताचे व त्याच्या सहकाऱ्यांचे म्हणणे होते. त्या दृष्टीने आत्माराम पाटलांचे नाव त्यांनी सुचविले. पण जिल्हा काँग्रेसच्या प्रस्थापित नेत्यांचा या नावाला विरोध होता. तिकिटवाटपाचा अधिकार त्यांनाच असल्याने अर्थातच आत्मारामबापूंना तिकिट मिळाले नाही. पण यशवंता व त्याचे सहकारी डगमगले नाहीत. सहकाऱ्यांच्या वतीने प्रदेशाध्यक्षांशी चर्चा करण्यासाठी यशवंता पुण्याला गेला. शंकरराव देव आणि केशवराव जेधेंची त्याने भेट घेतली. त्यांना कार्यकर्त्यांची इच्छा सांगितली. जेमतेम चोवीस वर्षांचा हा तरुण जिल्ह्यातील प्रस्थापित नेत्यांच्या विरोधात राज्यपातळीवरील नेत्यांना एकटाच भेटायला जातो ही एक अपूर्व घटना होती. जेधे आणि देवांनी यशवंताला अपेक्षित असलेला निर्णय दिला नाही. उदास मनाने यशवंता साताऱ्याला परत आला. पण कार्यकर्ते स्वस्थ बसायला तयार नव्हते. ते म्हणाले, 'यशवंता, तू मुंबईला जाऊन सरदार पटेलांना का भेटत नाहीस?'

यशवंताही जिद्दीला पेटला होता. तो म्हणाला,

'प्रवासभाड्यासाठी पैसे द्या. मी मुंबईला जातो.'

अखेर कार्यकर्त्यांनी वर्गणी गोळा केली आणि यशवंता एकटाच मुंबईला गेला. सरदार पटेल तेव्हा मुंबईत त्यांच्या मुलाच्या घरी रहात होते. यशवंता त्यांच्या घरी गेला आणि भेटीसाठी चिठ्ठी आत पाठवली. बराच वेळ झाला तरी आतून बोलावणे येईना. सरदार पटेल हे उग्र प्रकृतीचे नेते होते. ते काय म्हणतील ही धास्ती होतीच. शेवटी पटेलांनी यशवंताला आत

बोलावले. यशवंताने स्वतःची ओळख करून दिली. 'का आला आहात?' सरदारांनी विचारले.

"असेंब्लीच्या निवडणुकीसाठी सुशिक्षित आणि स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतलेल्या व्यक्तीला उमेदवारी मिळावी अशी आम्हा सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे. आत्माराम पाटील हे शेतकरी कुटुंबातील आहेत आणि त्यांच्या उमेदवारीने ग्रामीण भागात चांगला संदेश जाईल असे आम्हाला वाटते."

सरदारांनी यशवंताचे म्हणणे ऐकून घेतले व मिश्किलपणे म्हणाले, "पण तुमचा हा शेतकऱ्यांचा उमेदवार पडला तर त्याची जबाबदारी कोण घेणार?"

"आम्ही सर्व कार्यकर्ते ती जबाबदारी घेऊ!" यशवंता आत्मविश्वासाने म्हणाला,

भेट संपली. सरदारांनी 'हो' किंवा 'नाही' असा निर्णय दिला नाही. यशवंता साताऱ्याला परत आला. त्यानंतर चारच दिवसांनी आत्मारामबापूंना उमेदवारी मिळाल्याचे जाहीर झाले. यशवंताच्या मुत्सद्देगिरीचा हा पहिला विजय होता. कार्यकर्त्यांनी प्रचाराला वाहून घेतले आणि त्या निवडणुकीत आत्मारामबापू सर्वाधिक मतांनी निवडून आले. यशवंताच्या राजकीय जीवनाचे तोरण बांधले गेले!





# माफी कशासाठी मागायची?



मातोश्री विठामाता

१९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत यशवंता सामील झाला. त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी टिळक हायस्कूलसमोरच्या कडुनिंबाच्या झाडावर तिरंगा फडकावला. 'वंदे मातरम'च्या घोषणा दिल्या. या कृत्याबद्दल मॅजिस्ट्रेटने यशवंताला १८ महिन्यांची शिक्षा सुनावली. शिक्षा झालेल्या कैद्यांची रवानगी पुण्याला येरवडा तुरूंगात व्हायची होती. त्यावेळी टिळक हायस्कूलमधील एक शिक्षक यशवंताच्या घरी गेले आणि मुलाला भेटण्यासाठी विठामातेला घेऊन आले. फौजदाराने पोलीस पहाऱ्यात दोघांची भेट घडविली. आईचे डोळे पाण्याने भरले. शिक्षक सांत्वन करू लागले आणि यशवंताला म्हणाले, 'हे पहा, फौजदार साहेब दयाळू आहेत. माफी मागितली तर सोडून देऊ म्हणतात.'

यशवंता काही बोलण्यापूर्वीच विठाईमाता कडाडल्या, 'काय बोलता मास्तर? माफी मागायची? कशासाठी? काही माफी बिफी मागायची नाही. यशवंता, तब्येतीची काळजी घे म्हणजे झालं. परमेश्वर आपल्या पाठीशी आहे.' असे म्हणून त्या परत फिरल्या. आईच्या कृश पाठमोऱ्या आकृतीकडे पहात यशवंता मनात म्हणाला, 'आपल्याला वाटते तितकी आपली आई दुबळी नाही.'

असा स्वाभिमानाचा संस्कार करणारी विठाई जेथे असते, तिथेच 'यशवंतराव चव्हाण' जन्म घेतात.

# नाटकासाठी काय पण !

विद्यार्थीदशेत असताना यशवंतरावांना नाटक पाहण्याची आवड निर्माण झाली. शाळेच्या संमेलनात 'माईसाहेब' या नाटकात त्यांनी कामही केले होते. चांगली नाटके आवर्जून पहावीत असे त्यांना वाटे. एकदा केशवराव दाते यांच्या तत्कालीन महाराष्ट्र नाटक कंपनीचे नाटक कोल्हापूरला आहे असे त्यांना समजले. दाते यांच्या कंपनीच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाची जाहिरात यशवंतरावांनी 'नवा काळ' मध्ये पाहिली. हे नाटक आपण पहायचे असे यशवंतरावांनी ठरवले. त्यावेळी कराडमध्ये माधवराव घाटगे नावाचे त्यांचे एक मित्र होते. यशवंतरावांनी आपली इच्छा त्यांना सांगितली. सुदैवाने त्या दिवशीच घाटगे गुरूजींचा पगार झाला होता. ते म्हणाले, 'जरूर जाऊया, पण कोल्हापूरमध्ये राहणार कुठं ?'

यशवंतरावांनी पर्याय सुचवला, 'मुक्कामाची गरजच नाही. दुपारच्या सर्व्हिस मोटरने कराडहून निघून संध्याकाळी कोल्हापूरला जायचं. कुठेतरी हॉटेलात चहा-फराळ करून नाटक पाहून झालं की थेट स्टेशनवर येऊन रात्रीच्या गाडीनं कराडला येऊ.'

घाटगे गुरुजींना ही सूचना पटली व दोघे दुपारच्या सर्व्हिस मोटारीने कोल्हापूरला गेले. संध्याकाळी कोल्हापुरात पोहोचल्यावर विचारत-विचारत दोघे पॅलेस थिएटरकडे गेले. दोन तिकीटे घेऊन आत गेले. नाटक सुरू झाले. जयंताची भूमिका करणाऱ्या केशवराव दाते यांचा अभिनय पाहून आपल्या तीन तासांच्या प्रवासाचे सार्थक झाले असे त्यांना वाटले.

रात्री दीड-दोनच्या सुमारास नाटक संपले. आता पुढे काय करायचे? त्या मध्यरात्री दोघेजण थिएटरपासून चालत रेल्वे स्टेशनपर्यंत गेले. स्टेशनवर विलक्षण शांतता व कमालीची थंडी होती. कराडला जाणारी गाडी सकाळपर्यंत नव्हती. ती रात्र दोघांनी एका बाकावर थंडीने कुडकुडत काढली व दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने कराडला परत आले. हा सगळा त्रास त्यांनी केवळ नाटक पाहण्यासाठी घेतला!

# हिमालयाचे पहिले दर्शन!

सन १९३१ सालची गोष्ट. यशवंता तेव्हा कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होता. परंतु स्वतःच्या शिक्षणापेक्षा स्वातंत्र्याच्या चळवळीकडेच त्याचे जास्त लक्ष होते. वर्तमानपत्रातील बातम्या वाचून देशातील बदलत्या वातावरणाची त्याला कल्पना येत होती. आपल्या सवंगड्यांना तो या घटनांचा अन्वयार्थ समजाऊन सांगायचा. यशवंताचे विश्लेषण बऱ्याचदा अचूक असायचे. गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली व पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या स्वातंत्र्याच्या लढाईत सामील होण्याचा निर्णय त्या सर्व बालवीरांनी घेतला होता.

जवाहरलाल नेहरू हे त्या काळातील युवकांच्या गळ्यातील ताईत बनले होते. एके दिवशी यशवंताला समजले की, पं. जवाहरलाल नेहरू बंगलोर मेलने हुबळीला जाणार आहेत. आपला प्रिय नेता आपल्या गावावरून पुढे जाणार आहे याचा यशवंताला विशेष आनंद झाला. लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या या तडफदार नेत्याचे दर्शन आपण घ्यायचेच असा त्याने निर्धार केला. आपला हा मनोदय त्याने मित्रांना सांगितला. त्यांनाही आनंद झाला, पण काहीजण म्हणाले, 'बंगलोर मेल कराड स्टेशनवर रात्री बारा नंतर येते. पंडितजी तेव्हा झोपलेले असणार. अशावेळी त्यांची झोपमोड करून त्यांना कोण उठवणार?'

'त्याची काळजी करू नका. नेहरू आपल्याला नक्की भेटतील.' यशवंता आत्मविश्वासाने म्हणाला. काही झाले तरी नेहरूंना उठवून विद्यार्थ्यांसमोर उभे करायचेच असे यशवंताने मनोमन ठरवले. ठरल्याप्रमाणे चारशे ते पाचशे विद्यार्थ्यांचा तांडा रात्री कराड स्टेशनकडे निघाला. सगळेजण बंगलोर मेलची वाट पहात होते. गाडीची वेळ जसजशी जवळ येऊ लागली तसतशी मुलांची उत्सुकता शिगेला पोहोचली. अखेर तो क्षण आला. बंगलोर मेल कराड स्टेशनवर येऊन उभी राहिली. यशवंताने व त्याच्या सहकाऱ्यांनी पंडितजींचा डबा शोधून काढला. डब्याभोवती सर्वजण उभे राहिले. धडधडत्या अंतःकरणाने यशवंताने डब्याचे दार वाजवले. जवाहरलाल जागे झाले व दार उघडून बाहेर आले. झोपमोड झाल्याने काहीशा

रागीट मुद्रेनेच त्यांनी मुलांकडे पाहिले, पण आपल्याला भेटण्यासाठी इतकी सगळी लहान मुले रात्रभर फलाटावर ताटकळत उभी राहिली होती हे कळाल्यानंतर त्यांचा राग क्षणार्धात मावळला. त्यांनी मुलांचे आभार मानले. त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. गाडी सुटण्याची वेळ होईपर्यंत नेहरू त्या बाळगोपाळांच्या मेळाव्यात रमले. दहा मिनिटांनी गाडी सुटली. 'जयहिंद' म्हणून नेहरूंनी सर्वांचा निरोप घेतला. यशवंता हात हलवून त्यांना निरोप देत होता. त्याला कुठे माहित होते की आता हात हलवून त्याचा निरोप घेणारे जवाहरलाल पुढे एकतीस वर्षांनी त्याला हाक देऊन दिल्लीला बोलावून घेणार आहेत ते?

घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे नियतीचा हात असतो हे खरे, पण प्रत्येकवेळी तो दिसतोच असे नाही. ते काही असो, आपल्या आवडत्या नेत्याच्या पहिल्या दर्शनाने यशवंताला अपूर्व आनंद झाला. आपणही नेहरूंप्रमाणे थोर राजकारणी बनायचे अशी खूणगाठ त्याने मनाशी बांधली.



# पुणे जिंकणारे यशवंतराव

सन १९३१ सालची गोष्ट. यशवंता तेव्हा कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होता. सतरा वर्षांच्या या जिज्ञासू विद्यार्थ्याला भाषणे करण्याची व ऐकण्याची खूप आवड होती. टिळक हायस्कूलमध्ये होणाऱ्या वक्तृत्वस्पर्धेत तो आवर्जून भाग घ्यायचा. त्यावेळी पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात दरवर्षी वक्तृत्वस्पर्धा होत असत. त्या स्पर्धेत भाग घेण्याची यशवंताची खूप इच्छा होती.

१९३१ साली पुण्यात होणाऱ्या त्या वक्तृत्वस्पर्धेत यशवंताने भाग घेतला. पुण्याला जायचे तर पैसे हवेत, पण ते तर जवळ नव्हते. आता काय करायचे? सुदैवाने श्री. शिवाजीराव बटाणे यांनी त्याला मदत केल्याने ती काळजी मिटली.

त्या स्पर्धेत विद्यार्थ्याला आयत्यावेळी विषय देऊन दहा मिनिटे बोलायला सांगत असत. यशवंताला 'ग्रामसुधारणा' हा विषय देऊन बोलायला सांगण्यात आले. त्याचे भाषण ऐकूण परीक्षक फार खुश झाले. त्यांनी त्याला आणखी दहा मिनिटे वेळ वाढवून दिला. यशवंताने आपल्या भाषणाने सर्वांची मने जिंकली. सर्वांनी त्याचे कौतुक केले व त्या स्पर्धेत यशवंताला पारितोषिक मिळाले.

नंतरच्या आयुष्यात यशवंतरावांनी पुणे शहरात अनेक भाषणे केली आणि त्या प्रत्येक भाषणाने त्यांनी पुणेकरांची मने जिंकली, पण त्याची सुरुवात यशवंता हायस्कूलचा विद्यार्थी असताना झाली होती.

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात हे जसे खरे आहे, तशी वक्त्याची 'वाणी' अशा वक्तृत्व स्पर्धेत दिसते हेही तितकेच खरे !

# सागर आणि सावरकर

लहानपणापासूनच यशवंताला भव्यतेचं आकर्षण होतं. कर्तबगार व्यक्तींबद्दल त्याला मनस्वी आदर होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहसी व्यक्तिमत्वासंबंधी अनेक गोष्टी यशवंताने ऐकल्या होत्या. 'श्रद्धानंद' नावाच्या नियतकालिकात प्रसिद्ध होणारी 'माझी जन्मठेप' ही सावरकरांची आत्मकहाणीही त्याने वाचली होती. स्वातंत्र्यासाठी अवघे जीवन वेचणाऱ्या या देशभक्तास एकदा डोळे भरून पहावे असे त्याला वाटू लागले. कृष्णाकाठी वाढलेल्या यशवंताने अजून समुद्र पाहिला नव्हता. समुद्राच्या भव्यतेविषयी त्याने फक्त ऐकले होते. पण एकदा अगदी अनपेक्षितपणे या दोन्हींचे दर्शन घेण्याची संधी यशवंताला मिळाली.

१९३० साली बिळाशीच्या सत्याग्रहात सामील होण्यासाठी यशवंता आणि राघुअण्णा लिमये बिळाशीला गेले. तिथे शेतकऱ्यांची सभा घेऊन ते मलकापूरला आले. राघूअण्णा म्हणाले, 'यशवंता, आता इतक्या दूर आपण आलो आहोतच, तर सरळ खाली कोकणात जाऊया.'

'कोकणात जाऊन आपण काय करणार?' यशवंताने विचारले.

'अरे, आमचं लिमयांचं मूळ गाव इथून जवळच आहे. ते गाव पाहू आणि पुढे रत्नागिरीला जाऊ.'

रत्नागिरीचे नाव ऐकताच यशवंत एकदम खूश झाला. तो म्हणाला, 'रत्नागिरीला गेल्यावर समुद्र आणि सावरकर यांचे दर्शन एकाचवेळी घेता येईल. फार चांगली कल्पना आहे. चला कोकणातच जाऊया.'

त्याप्रमाणे दोघे लिमयांच्या गावाला व तिथून पुढे रत्नागिरीला गेले. नारळ आणि पोफळीच्या झाडांनी वेढलेल्या रत्नागिरी शहरात ते मनसोक्त भटकले. मिऱ्या बंदराच्या बाजूने चालत असताना अचानक लख्खदिशी समुद्र नजरेसमोर दिसला. यशवंताचे मन हरखून गेले. कार्तिकातल्या निळ्याभोर नभासारखे दिसणारे समुद्राचे ते विशाल रूप दोघांनी डोळे भरून पाहिले. यशवंताच्या डोळ्याचे पारणे फिटले. त्यादिवशी रत्नागिरीतच थांबून दुसऱ्या दिवशी सकाळी ते दोघे सावरकरांना भेटायला त्यांच्या घरी गेले. बाहेरच्या खोलीत त्यांना बसायला सांगितले गेले. आतल्या खोलीत सावरकर कोणाशीतरी बोलत होते. ते



लोक गेल्यानंतर सावरकर या 'बालक्रांतिकारांना' भेटण्यासाठी बाहेर आले. राघुअण्णा व यशवंताने उठून त्यांना नमस्कार केला. सावरकरांनी त्यांचे कुशल विचारले.

'मी यशवंत चव्हाण, कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकतो.' यशवंताने आपली ओळख करून दिली.

'एवढ्या लांब प्रवास कशासाठी केलास बाळ?' सावरकरांनी विचारले. त्यावर राघुअण्णा म्हणाले, 'आम्ही मिठाच्या सत्याग्रहातील काँग्रेसचे कार्यकर्ते आहोत. बिळाशीच्या बंडात सहभागी होण्यासाठी आलो होतो.'

'मोठेच पराक्रमी दिसता तुम्ही!' खळखळून हसत सावरकर म्हणाले, काही वेळ इतर विषयासंबंधी बोलणे झाल्यावर सावरकर म्हणाले, 'तुम्हाला मला काही विचारायचंय काय?'

यशवंता म्हणाला, 'निदान मला तरी काही विचारायचं नाही. मला फक्त आपणास डोळे भरून पाहायचं होतं.'

यशवंताचा हा आदरभाव सावरकरांच्या हृदयाला भिडला. ते उठून त्याच्याजवळ आले. त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, 'माझ्यात बघण्यासारखं काय आहे? मीही तुमच्यासारखाच एक माणूस. तुमच्या अगोदर काही वर्षे जन्माला आलो. देशसेवेचं व्रत घेतलं आणि बलिदानाची प्रतिज्ञा करून कामाला लागलो. यात विशेष असं काय आहे? आमच्या पिढीने आम्हाला जे योग्य वाटलं ते करायचा प्रयत्न केला. आता तुमची नवी पिढी काय करते ते पहायचं आहे.' आणि गंभीर होऊन सावरकर खाली बसले.

त्यांच्या मनाच्या सागरात उसळणाऱ्या देशभक्तीच्या लाटा यशवंताला स्पष्टपणे जाणवल्या. त्यांच्या घरातून बाहेर पडताना यशवंता मनाशी म्हणाला, 'ही माझ्या जीवनातील अविस्मरणीय घटना आहे. आज मी एकाच वेळी समुद्र आणि सावरकर पाहिले. दोघांपैकी अधिक भव्य कोण हे ठरवणे अवघड आहे!'

# समतेचा संस्कार..

सन१९३३ साली (वयाच्या एकविसाव्या वर्षी) यशवंताने कराडमध्ये मित्रांच्या मदतीने अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करायचे ठरवले. या शाळेच्या उद्घाटनासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना बोलवावे अशी यशवंताची इच्छा होती. कारण महर्षींनी आपले उभे आयुष्य अस्पृश्योद्धाराला वाहिले होते. त्यांच्या आशीर्वादाने शाळा सुरू करणे अत्यंत उचित ठरणार होते. पुण्याला जाऊन महर्षी शिंदेंची परवानगी घेण्याची जबाबदारी सर्वांनी यशवंतावर सोपवली आणि महर्षी शिंदे यांच्याशी कसलीही ओळख नसताना यशवंता पुण्याला त्यांच्या घरी गेला. कराडहून आलेल्या या नवख्या मुलाची थट्टा करण्याच्या उद्देशाने महर्षी म्हणाले, 'तू एक साधा पोर; तुझ्या सांगण्यावरून मी कसा येऊ?'

'आमचा समविचारी मुलांचा ग्रूप आहे. त्या सर्वांच्या वतीने मी आलोय.'

'मी येईन, पण माझ्या काही अटी आहेत.'

'आम्ही सर्व अटी पाळू.'

'कुठं उतरवणार मला?'

'माझ्या घरीच उतरवणार आहे.'

'घरच्या माणसांची संमती घेतली आहेस?'

'हो' यशवंताने दाबून उत्तर दिले.

'माझ्याबरोबर जेवायला गावातील हरिजनांना आणावं लागेल. घरचे लोक मान्यता देतील?' या प्रश्नावर यशवंताने ठामपणे उत्तर दिले.. 'हो.'

'घरी कोण कोण आहेत?'

'आई, थोरले बंधू आहेत, पण ते नाही म्हणणार नाहीत.'

'तुझ्या घरी हरिजनांची पंगत कधी झाली आहे का?'

'नाही, पण आपल्याबरोबर ही पंगत होईल याची मला खात्री आहे.' महर्षींचा होकार घेऊनच यशवंता कराडला आला. भीत-भीतच त्याने सगळे आईला सांगितले. विठाईमातेने चटकन् होकार दिला. ठरल्याप्रमाणे महर्षी आले. त्यांचे सुंदर भाषण झाले. यशवंताच्या घरी पंगत झाली. महर्षींनी विठाईमातेला याविषयी विचारले, तेव्हा त्या म्हणाल्या, 'मला सारी मुलं सारखीच, त्यात कसली आलीय जातपात?'

# हजरजबाबी यशवंतराव

इंग्रजी पाचवी-सहावीत असताना यशवंताला तमाशा पाहण्याचा छंद जडला. आवडीचा तमाशा पाहण्यासाठी आठ-दहा मैलांचे अंतर तो मित्रांबरोबर चालत जात असे. कराडच्या परिसरातील गावांमध्ये यात्रेदरम्यान होणारे तमाशांचे फड तो आवर्जून पहात असे. शाळेतील संमेलनाच्या निमित्ताने एकदा बर्नार्ड शॉ च्या 'डॉक्टर्स डिलेमा' या नाटकातील एका प्रवेशात यशवंताने काम केले होते. त्या निमित्ताने त्याची बर्नार्ड शॉ या नावाशी ओळख झाली होती.

एकेदिवशी कराडजवळच्या एका गावात एक नामांकित तमाशा होणार होता. यशवंता आपल्या चार-पाच मित्रांसह संध्याकाळी त्या गावाकडे जायला निघाला. कृष्णा नदीवरील पूल ओलांडून काही अंतर पुढे गेल्यावर अचानक त्यांच्या शाळेचे शिस्तप्रिय क्रीडाशिक्षक समोरून येताना दिसले. सगळेजण मनातून धास्तावले. त्या शिक्षकांनी 'कुठे चाललात?' असे विचारले तर काय सांगायचे असा प्रश्न सर्वांना पडला. खरे सांगून जमणार नव्हते व खोटे काही सुचत नव्हते. इतक्यात यशवंताला एक कल्पना सुचली. तो बरोबरच्या मित्रांना म्हणाला, 'मास्तरांशी खरे बोलता आले नाही तरी खोटे नक्कीच बोलायचे नाही.' यशवंताला वाटले होते तसेच झाले. मुलांना पाहिल्यावर क्रीडाशिक्षकांनी विचारले, 'कोठे चाललात रे, एवढ्या संध्याकाळी?'

यशवंता पुढे होऊन म्हणाला, 'आम्ही स्टेशनवर चाललो आहोत. तेथे टॉम शॉ येणार आहे. त्यांना बघायला आम्ही चाललो आहोत.'

'हा कोण टॉम शॉ ?'

'हा बर्नार्ड शॉ चा छोटा भाऊ आहे.'

मास्तरांना हे उत्तर पटले. ते म्हणाले, 'जा, जा, चांगले आहे.' ते पुढे निघून गेल्यावर हसून हसून मुलांची मुरकुंडी वळली.

भावी आयुष्यात गंभीर व मितभाषी म्हणून ओळखले गेलेले यशवंतराव लहानपणी किती मिश्कील होते हे या घटनेवरून दिसून येते.

# ...त्यांचे काय करायचे ?

यशवंतरावांनी आपल्या साऱ्या निष्ठा काँग्रेस पक्षाला वाहिल्या होत्या. पण याचा अर्थ असा नव्हे की, त्यांच्यावर इतर राजकीय विचारांचा प्रभाव नव्हता. समाजवादी, रॉयवादी, हिंदुत्ववादी अशा अनेक विचारधारांशी त्यांचा परिचय झाला होता. पण त्यांची भूमिका डोळस सत्यशोधकाची असल्याने त्यांना फार काळ वैचारिक गोंधळाचा सामना करावा लागला नाही. राष्ट्रीय सभेचे जे व्यापक संस्कार त्यांच्यावर झाले ते प्रभावी ठरले. इतर समकालीन प्रवाहांचा अभ्यास मात्र ते आवर्जून करीत असत. अगदी वयाच्या विसाव्या वर्षापासूनच त्यांची ही चिकित्सक वृत्ती दिसून येते.

ते १९३४-३५ सालचे दिवस होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांचे व्याख्यान कराडमध्ये आयोजित केलेले होते. तरुण यशवंतराव श्रोते म्हणून या व्याख्यानास हजर होते. डॉ. हेडगेवार यांच्या व्यक्तिमत्त्वाने ते प्रभावित झाले, पण 'आसिंधु सिंधू' ही जी हिंदुत्वाची व्याख्या सावरकरांनी केली होती त्या व्याख्येप्रमाणे जो वागेल तोच हिंदुस्थानचा खरा निष्ठावान नागरिक असे मत हेडगेवारांनी मांडले. यशवंतरावांना ही भूमिका पटली नाही. व्याख्यान संपल्यानंतर त्यांनी हेडगेवारांना विचारले, 'आपण सांगितलेल्या व्याख्येत बसत नाहीत अशी कोट्यवधी माणसे या देशात आहेत, त्यांचे काय करायचे ?'

यावर हेडगेवार म्हणाले, 'जेव्हा हा प्रश्न उभा राहील, तेव्हा पाहता येईल.'

यशवंतरावांनी ओळखले की ही संघटना सर्व धर्मांच्या लोकांना बरोबर घेऊन जाऊ शकत नाही. तेव्हापासून आयुष्यभर ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून दूर राहिले.

# आपण कधी बदलणार ?

यशवंतरावांकडे जातीभेद, धर्मभेद अशा संकुचित विचारांना थारा नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांचे जुने मित्र ढवळे यांनी सांगितलेली ही आठवण.

१९४२ च्या छोडो भारत चळवळीचा प्रसार करण्यासाठी यशवंतराव कराड तालुक्यातील अनेक गावात जात असत. काँग्रेसची व गांधीजींची भूमिका समजावून देत असत व पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट करीत असत. एकदा उंडाळे परिसरातील एका गावात संध्याकाळच्या वेळी अशीच बैठक सुरू होती. अनेक गावकरी सभेला उपस्थित होते. जो तो काही ना काही सूचना करीत होता. त्या गावातला लष्करात सेवा करणारा एक मागासवर्गीय जवानही त्या सभेला उपस्थित होता. आंदोलनाबद्दल त्याचे मत मांडण्यासाठी जेव्हा तो उठला तेव्हा गावचा पाटील त्याला म्हणाला, 'खाली बस, तुला काय कळतंय?' देशाचे रक्षण करणाऱ्या एका शूर जवानाला केवळ तो दलित आहे म्हणून मिळणारी ही अपमानास्पद वागणूक पाहून यशवंतरावांना अत्यंत वाईट वाटले. त्यांच्या मनात विचार आला, 'कधीतरी बाजार करायला तालुक्याच्या गावी जाणारा हा पाटील केवळ 'पाटील' आहे म्हणून शहाणा, आणि दुसऱ्या महायुद्धात जगातील चार देश पाहून आलेला हा जवान 'मागासवर्गीय' म्हणून अडाणी?, असल्या बुरसटलेल्या कल्पना आपण केव्हा बदलणार?'

स्वातंत्र्य मिळाल्यावर जर आपल्याला संधी मिळाली तर अस्पृश्यांचा आत्मसन्मान व सामाजिक प्रतिष्ठा वाढावी यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार यशवंतरावांनी मनोमन केला.

# नात्यापेक्षा तत्त्व मोठे

यशवंताचे थोरले बंधू गणपतराव यांनाही राजकीय घडामोडींमध्ये रस होता. त्यांच्यावर सत्यशोधक समाजाचा विशेष प्रभाव होता. कराडमध्ये कळंबे गुरुजी सत्यशोधक समाजाचे काम करीत होते. गणपतराव त्यांचे शिष्य बनले. यशवंतानेही आपल्याबरोबर सत्यशोधक समाजाचे काम करावे अशी गणपतरावांची इच्छा होती. त्यांनी अनेकवेळा यशवंताचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण यशवंताचा पिंडच वेगळा होता. आपला थोरला भाऊ सांगतोय म्हणून त्याचे ऐकायचे व त्याप्रमाणे वागायचे हा त्यांचा स्वभाव नव्हता. स्वत: अनुभव घ्यायचे आणि त्या आधारे स्वत:चे स्वतंत्र निष्कर्ष काढायचे ही यशवंताची पद्धत होती.

त्या पद्धतीनुसार सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते टोकाची भूमिका घेत आहेत आणि काँग्रेस मध्यममार्गी आहे असे त्याला वाटले, म्हणून त्याने मनोमन काँग्रेसची निवड केली होती. एकदा गणपतराव कराड नगरपरिषदेच्या निवडणुकीला उभे राहिले. काँग्रेसने त्यांच्या विरोधात आपला उमेदवार उभा केला. यशवंताला मोठा पेच पडला. इकडे भाऊ आणि तिकडे पक्ष. कोणाची निवड करायची? कोणाचा प्रचार करायचा? यशवंताला मोठे कोडे पडले. पण शेवटी त्याने निर्णय घेतला - काँग्रेस पक्षाचे काम करायचे. आणि मनावर दगड ठेवून त्या निवडणुकीत यशवंताने काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार केला.

मतदान झाले, निकाल लागला. गणपतराव पराभूत झाले. यशवंताच्या पक्षाचा उमेदवार जिंकला, पण यशवंताला आनंद झाला नाही. आपल्या बंधूच्या पराभवाला आपणही काही प्रमाणात जबाबदार या भावनेने त्याला अपार यातना झाल्या. विमनस्क अवस्थेत तो गावाबाहेर जाऊन एकटाच शोक करीत बसला. अंधार पडला तरी त्याला घरी जावेसे वाटेना. शेवटी गणपतराव त्याला शोधत आले. म्हणाले, 'वाईट वाटून घेऊ नकोस, तुझे काही चुकले नाही. नात्यांपेक्षा तत्त्वे महत्त्वाची असतात.'

आणि मग दोघे भाऊ घराकडे निघाले.

# पिके जाळणे हा जनताद्रोह आहे!

सन १९४२ च्या ऑगस्ट महिन्यात 'चले जाव' आंदोलन सुरू झाले. तरुण यशवंतरावांनी स्वत:ला त्या आंदोलनात झोकून दिले. इंग्रज सरकारने क्रांतिकारकांची धरपकड सुरू केल्यावर यशवंतराव भूमिगत झाले. या भूमिगत अवस्थेत असतानाच एकदा ते मुंबईला गेले. इंग्रज सरकारने क्रांतिकारक व भूमिगत कार्यकर्ते यांच्याविरुद्ध कडक मोहिम उघडली होती. सरकारच्या या जुलूम - जबरदस्तीचा प्रतिकार कसा करायचा याची चर्चा करण्यासाठी मुंबईत भूमिगत कार्यकर्त्यांची एक बैठक भरली होती. यशवंतराव या बैठकीला हजर होते. बैठकीत अनेक क्रांतिकारकांनी आपापले मत मांडले. नंतर एक कार्यकर्ता उठून उभा राहिला आणि म्हणाला, 'ग्रामीण भागामध्ये सरकारच्या हातामध्ये वाटणीसाठी धान्य जाऊ देता कामा नये. यासाठी काहीतरी योजना आखली पाहिजे.' यावर बाकीचे कार्यकर्ते म्हणाले, 'ते सर्व ठीक आहे, पण हे होणार कसे ?' यावर तो कार्यकर्ता आवेशाने म्हणाला, 'रशियात ज्याप्रमाणे जर्मन आक्रमकांना शरण जाण्यापूर्वी शेतातील उभी पिके जाळून टाकण्याचा कार्यक्रम तेथील लोकांनी हाती घेतला होता, तोच मार्ग आपल्याला येथे अवलंबावा लागेल.'

ही विघातक सूचना यशवंतरावांना अजिबात पटली नाही. त्यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत या कल्पनेला विरोध करत ते म्हणाले, 'ही अत्यंत अव्यवहार्य अशी योजना आहे. शेतात उभी असलेली पिके फक्त ब्रिटीश सैन्यासाठीच नाहीत. ती भारतातील जनतेसाठीही आहेत, सामान्य शेतकऱ्यांसाठी आहेत. पिके जाळण्याचा कार्यक्रम हाती घेणे म्हणजे लोकांशी लढाई सुरू करणे असा त्याचा अर्थ होईल आणि लोक आपल्याबरोबर न येता उलट सरकारला मदत करतील. वर्तमानपत्रात वाचलेल्या पुस्तकी कार्यक्रमांचा अवलंब करून आपल्याला ही चळवळ चालविता येणार नाही.'

यशवंतरावांचे म्हणणे बरोबर नाही असे काही लोकांना वाटले, पण यशवंतराव ठामपणे म्हणाले, 'मी या विचाराशी कदापी सहमत असणार नाही, आणि त्याचा प्रसार करणार नाही. कारण यामध्ये अंतिमत: लोकलढ्याचे नुकसान आहे अशी माझी खात्री आहे.'

शेतकऱ्याला आपल्या पिकाविषयी किती प्रेम वाटते हे यशवंतरावांना चांगले माहित होते. कारण ते स्वत: एका शेतकरी कुटुंबात जन्मले होते. म्हणूनच पिके जाळण्याच्या कार्यक्रमाला त्यांनी तीव्र विरोध केला.

# तुम्हालाही आया बहिणी आहेत!

सन १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत यशंतवरावांनी उडी घेतली. सरकारने क्रांतीकारकांची धरपकड सुरू केल्यावर ते भूमिगत झाले. इंग्रज सरकारने त्यांना पकडण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना अटक करायला सुरुवात केली. काही महिन्यांपूर्वीच विवाह होऊन चव्हाणांच्या कुटुंबात सून म्हणून आलेल्या वेणुताईंना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याबरोबर कासेगांवकर वैद्यांच्या पत्नी व काशीनाथ देशमुखांच्या पत्नीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले. खरेतर त्या तिघीही गृहिणी होत्या. चळवळीशी त्यांचा काहीच संबंध नव्हता पण केवळ क्रांतिकारकांवर दडपण आणण्यासाठी व त्यांनी स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन व्हावं यासाठीच ही अटक केली होती. यशवंतराव चव्हाण तेव्हा पुण्यात टिळक रोडवरील भागवत बोर्डिंगमध्ये गुप्तपणे राहत होते. त्यांच्यासोबत शांताराम इनामदारही होते. कोणीतरी यशवंतरावांना सांगितले की, देशमुख नावाचे एक पोलिस अधिकारी क्रांतिकारकांच्या स्त्रियांनाही त्रास देतात. देशमुख पुण्यात रास्तापेठ भागात राहात होते. यशवंतरावांनी या देशमुखाला धडा शिकवायचे ठरविले. त्यांचा मित्र दयार्णव कोपर्डेकरला त्यांनी देशमुखांचा नेमका पत्ता मिळवायला सांगितला. त्याप्रमाणे दयार्णवने पत्ता मिळविला. दुसऱ्या दिवशी पहाटे शांतारामला सोबत घेऊन यशवंतराव रास्ता पेठेकडे निघाले.

देशमुखांच्या घराजवळ आल्यावर ते शांतारामला म्हणाले, 'मी या इमारतीत जाणार आहे. जगलो वाचलो तर ठीक, पण समजा माझे काही बरेवाईट झाले तर तू लगेच आपल्या ठिकाणी परत जा.'

इनामदार खाली उभे राहिले. यशवंतराव जिना चढून वर गेले. अजून पुरेसे उजाडले नसल्याने जिन्यात अंधारच होता. यशवंतरावांनी देशमुखांच्या फ्लॅटची बेल दाबली. देशमुखांनी दरवाजा उघडला. त्यांच्या डोळ्यांवर झोप होती 'काय पाहिजे?' त्यांनी विचारले-

यशवंतराव करड्या आवाजात म्हणाले 'मी यशवंतराव चव्हाण. तुम्ही पोलिस अधिकारी देशभक्तांच्या बायकांच्या पदराला हात घालता. तुम्हालाही आयाबहिणी आहेत हे लक्षात ठेवा.'

इतक्या सकाळी आणि इतक्या अनपेक्षितपणे झालेल्या शाब्दिक हल्ल्याने देशमुख चांगलेच भांबावले. घरात जाण्यासाठी वळले. त्यांनी रिव्हॉल्व्हर शोधायला सुरुवात केली. इतक्यात अत्यंत चपळाईने यशवंतरावांनी पुढचा दरवाजा ओढून घेतला व व खाली धूम ठोकली.

'देशमुखांशी भांडण केलेत की काय?' शांतारामने विचारले.

'नाही. फक्त शंख फुंकून आलो. त्याचा नक्कीच परिणाम होईल.' यशवंतराव म्हणाले,

एका पोलिस अधिकाऱ्याला त्याच्या घरी जाऊन दम देण्यासाठी लागणारे धैर्य व धाडस यशवंतरावांच्याकडे होते.

विभाग दुसरा

# सागरतीर

(१९४६ ते १९६२)



# नियतीचा हात

१९४६ सालची विधानसभेची निवडणूक यशवंतरावांनी लढविली आणि ते विजयी झाले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी केले. एक वर्ष निघून गेले आणि मोरारजी देसाईंनी त्यांना गृहखात्यात उपमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली. या त्यांच्या उत्कर्षाच्या काळात कराड-वाळवा भागातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये यादवी सुरू झाली. यशवंतरावांचे जिवलग मित्र; कामेरीचे के. डी. पाटील यांची हत्या झाली. हा सूडाचा प्रकार होता. त्यापूर्वी आमदार चंदू पाटील यांचा खून झाला होता. त्यांच्या खुनाचा आळ के.डी. पाटील यांच्यावर आला. यशवंतराव हे के.डी. पाटील यांच्या गटाचे म्होरके मानले जात होते. त्यामुळे त्यांच्यावरही हत्येचे संकट कधीही ओढवू शकणार होते.

एकदा वडील बंधूंची विचारपूस करण्यासाठी यशवंतराव कराडला आले. त्यावेळी ते कल्याणी बिल्डींगमध्ये राहत होते. यशवंतरावांनी गणपतरावांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. नंतर खोलीबाहेर येऊन सिगारेट पेटवली. अंधार पडू लागला होता. त्या इमारतीच्या गच्चीवरून सभोवतालच्या शिवाराकडे पहात यशवंतराव उभे होते. विचारांची तंद्री लागलेली असताना अचानक त्यांना दूरवर रेल्वे स्टेशनचा सिग्नल दिसला. का कोण जाणे, पण आपण ताबडतोब कराड सोडले पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले. त्यांनी तात्काळ रेल्वे स्टेशनचा रस्ता धरला. त्यांची बहीण त्यांना जाऊ देत नव्हती, पण त्यांनी तिचे ऐकले नाही. कराड स्टेशनमध्ये उभ्या असलेल्या गाडीत ते शिरले आणि पुण्याला निघून गेले.

इकडे कराडमध्ये त्याच रात्री भीषण प्रसंग घडला. यशवंतराव कल्याणी बिल्डींगमध्ये आले आहेत ही बातमी विरोधी गटाला कळाली. मध्यरात्री दोनच्या सुमारास सहा धिप्पाड तरुण बंदुका, भाले व कुऱ्हाडी घेऊन कल्याणी बिल्डींगवर चाल करून आले. त्यांनी दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला. ही बातमी गावात पसरली, पोलिसांपर्यंत पोचली. यशवंतरावांना विरोधकांनी पळवून नेले असा लोकांचा समज झाला. त्यांचा शोध सुरू झाला. सर्वत्र तारा झाल्या. यशवंतराव पुण्याच्या रेस्ट हाऊसमध्ये झोपी गेले होते. पुण्याच्या पोलिसांनी कराडच्या पोलिसांना खुशालीची बातमी दिली. भीषण प्रसंग टळला. यशवंतरावांच्या अंतर्मनाने एकाएकी त्यांना कराड सोडण्याचा आदेश का दिला या गूढ इशाऱ्याचा अर्थ समजून घेण्याचा यशवंतरावांनी खूप प्रयत्न केला आणि शेवटी ते म्हणाले, 'तो खुणेचा हात नियतीचा होता.

# शंभरभर रुपये आणावे !

१९४६ च्या विधानसभा निवडणुकीत यशवंतरावांना कराड विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळाली. ते निवडून आले व मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी केले. यशवंतराव मुंबईला राहू लागले. तुटपुंज्या उत्पन्नामुळे मुंबईत कुटुंबाचे पालन-पोषण करणे अशक्य ठरल्यानं त्यांनी कुटुंबकबिला कराडातील घरीच ठेवला.

१९४५ साली यशवंतरावांच्या थोरल्या बंधूंना क्षयाची बाधा झाली. वेणूताईंनी त्यांची उत्तम शुश्रुषा केली पण त्यामुळे त्यांनाही क्षयरोग झाला. या काळात दवाखान्याचा खर्च फार वाढला होता. आर्थिक ओढाताण सुरू होती. आज कदाचित कुणालाच हे खरे वाटणार नाही, पण आमदार असताना यशवंतराव मुंबईत कधी एकवेळ जेवत होते, तर कधी मित्राच्या डब्यातील अर्धा डबा खात होते. अशा अवस्थेत २६ जुलै १९४९ रोजी यशवंतरावांनी वेणूताईंना पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले होते -

> 'मी सध्या सकाळ-संध्याकाळ नाना कुंटे यांच्याकडे जेवण करतो. त्यांनी फारच आग्रह केला म्हणून जातो आहे. मनातून मात्र अस्वस्थ आहे. नात्यातली इथली मंडळी भेटून जेवायला बोलावतात. बहुधा तू त्यांना लिहिले असावेस. परंतु या लोकांना मी साफ नकार दिला. या आठवड्यात तुमची पैश्याची ओढाताण झाली असेल. गौरीहर (सिंहासने) कडे कोणाला तरी पाठवून शंभरभर रुपये आणावे. काय करीत आहात ते कळवा.'

स्वतः आमदार असतानाही यशवंतरावांची आर्थिक स्थिती किती कमकुवत होती हेच वरील पत्रातून लक्षात येते.

# मूलभूत प्रश्नांची जाण !



१९४६ साली विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि बहुमत मिळवून काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळात यशवंतराव पार्लमेंटरी सेक्रेटरी (संसदीय सचिव) म्हणून काम पाहू लागले.

सेक्रेटरी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्या दिवशी एका परदेशी पत्रकाराने यशवंतरावांना विचारले, 'तुम्ही तुमच्या देशातील लोकांच्या जीवनामध्ये बदल करण्यासाठी कोणता क्रांतिकारक कार्यक्रम राबवीत आहात ?' पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याची यशवंतरावांची ही पहिलीच वेळ होती. अनपेक्षितपणे विचारलेल्या या प्रश्नाने ते काहीस गोंधळले व मग गंभीर मुद्रा करून ते म्हणाले, 'आम्ही आमच्या देशात पहिला क्रांतिकारक कार्यक्रम राबविला- लोकांना प्यायला पाणी देण्याचा कार्यक्रम.' त्यावर पत्रकार हसू लागला. यशवंतरावही हसू लागले. मग म्हणाले, 'अहो, विमाने बांधण्याइतकेच लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवणे महत्त्वाचे आहे.'

राज्यासमोरील मूलभूत प्रश्नांची यशवंतरावांना उत्तम जाण होती आणि कोणत्या योजना प्राधान्याने राबवायच्या याचे त्यांना भान होते.

# लोककलांचा विकास

तमाशा ही महाराष्ट्राची दुर्लक्षित लोककला आहे. अभिजनांना ती आपली वाटत नाही आणि बहुजनांना ती आपली वाटते, पण तिला आश्रय देणे जमत नाही. १९४६ साली यशवंतराव विधानसभेत निवडून आले आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी बनले. तमाशा या लोककलेला तेव्हा प्रतिष्ठा नव्हती. मुळात तमाशाला लोककला मानायलाच सरकार तयार नव्हते. यशवंतरावांनी या लोककलेबाबत एक सविस्तर नोट तयार केली. तमाशाला लोककला म्हणून मान्यता देणे कसं योग्य ठरेल याचं विश्लेषण त्या टिपणीमध्ये केलं होतं. या टिपणीचं हस्तलिखित तयार झाल्यावर ते टाईप करण्यासाठी त्यांनी मोरारजी देसाई यांच्याकडे टायपिस्टची मागणी केली. मोरारजींनी श्रीपाद डोंगरेंना यशवंतरावांकडे पाठविले. अशाप्रकारे ती नोट प्रथम मोरारजींकडे व नंतर मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्याकडे पाठविली गेली. मुख्यमंत्र्यांनी त्यावर 'उत्कृष्ट' असा शेरा मारून ती नोट परत पाठविली, पण पुढे काहीच कार्यवाही झाली नाही.

काही दिवसांनी यशवंतरावांनी ती नोट परत मोरारजींकडे पाठविली. मग मोरारजींनी बाळासाहेब खेर यांच्याकडे न पाठविता त्यावर निर्णय दिला आणि महाराष्ट्रात तमाशा बोर्ड निर्माण झाले. पुढे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी लोककला आणि लोकसाहित्यासाठी भरपूर प्रयत्न केले. त्याची सुरुवात या टिपणापासून झाली होती.



# जातीयवादाला थारा नको..!

सन १९४७ सालची गोष्ट पट्टाभि सितारामैय्या तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. पं.नेहरु अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असताना काँग्रेस कार्यकारिणीने एकमुखी निर्णय घेतला की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला काँग्रेसमध्ये प्रवेश द्यावा. त्यावेळी शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ वगैरे महाराष्ट्रातील दिग्गज नेते उपस्थित होते. काँग्रेसचा हा निर्णय जेव्हा बाबुराव काळेंना समजला तेव्हा ते अस्वस्थ झाले. व्यथित मनाने यशवंतरावांना ते म्हणाले, 'असे होणार असेल तर मी काँग्रेसचा त्याग केला पाहिजे.'

यशवंतराव विचारमग्न होते. ते म्हणाले, 'तशी वेळ येणार नाही, पण आलीच तर मी तुझ्याआधी काँग्रेसबाहेर पडेन.' त्यांनाही कार्यकारिणीचा हा निर्णय मान्य नव्हता. संघाचे विसर्जन करून संघातील स्वयंसेवकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास त्यांची हरकत नव्हती. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून काँग्रेसमध्ये त्या संघटनेला स्थान देणे काँग्रेसच्या ध्येयधोरणांशी विसंगत आहे, अशी त्यांची धारण होती. पण श्रेष्ठींनी तर निर्णय घेतला होता. तरीही यशवंतरावांना नेहरुंच्या पाठिंब्याची आशा होती. त्यांनी प्रदेश काँग्रेसची बैठक घेऊन त्यात संघाला काँग्रेसच्या घटनेतील चुकीमुळे काँग्रेसप्रवेश दिला असेल, तर घटनेत दुरुस्ती करावी आणि संघाला प्रवेश देऊ नये, असा ठराव श्रेष्ठींना न जुमानता मंजूर करून घेतला व इतर प्रांतांच्या काँग्रेस कमिट्यांकडे पाठवला. त्यांनीही असेच ठराव केले. नेहरु अमेरिकेच्या दौऱ्यावरुन परत आल्यावर पत्रकारांनी त्यांना याविषयी विचारल्यावर ते म्हणाले, 'कोणत्याही जातीयवादी संघटनेला काँग्रेसमध्ये स्थान नाही.'

शेवटी गैरसमजातून ठराव झाल्याची सारसासारव पक्षाध्यक्ष सीतारामैय्या यांना करावी लागली. यशवंतरावांची धर्मनिरपेक्षता सच्ची होती. ते त्यांच्या राजकीय जीवनाचे पायाभूत तत्त्व होते.

# सर्वच कर्ज माफ करून टाकू !



एस.एम. जोशी

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे नावाच्या माथेफिरू तरुणाने महात्मा गांधीजींची हत्या केली. सारा देश दुःखाने व संतापाने थरारून गेला. महाराष्ट्रात तर आगडोंबच उसळला. नथुराम ब्राह्मण होता, म्हणून महाराष्ट्रात गावोगावी ब्राह्मणांची घरे जाळली जाऊ लागली. कित्येक ब्राह्मण कुटुंबं खेडी सोडून शहरात आश्रयाला आली. त्यामुळे त्यांच्या स्थावर मालमत्तेची मात्र जाळपोळीमुळे प्रचंड हानी झाली. बहुजन समाजाच्या मनात असलेला ब्राह्मणांविषयीचा रागच या निमित्ताने उफाळून आला होता. या जाळपोळीत ज्यांचे नुकसान झाले होते अशा लोकांना त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारने कर्ज दिले होते. पण बऱ्याच कर्जदारांना कर्जाची परतफेड करता आली नव्हती. यापैकी काही कर्जदार, तत्कालीन विरोधी पक्षनेते एस.एम. जोशी यांना भेटले. त्यांचे म्हणणे असे होती की आम्ही निम्म्यापेक्षा अधिक कर्ज फेडले आहे, पण आता आमची शक्ती संपलेली आहे. आम्हाला सूट मिळावी म्हणून काहीतरी खटपट करा.

त्यानंतर काही दिवसांनी एस.एम. जोशींनी यशवंतरावांजवळ हा विषय काढला आणि असे सुचविले की ज्यांनी निम्म्याहून अधिक कर्ज परत केले आहे, त्यांचे उरलेले कर्ज माफ करावे. यावर यशवंतरावांनी थोडा वेळ विचार केला व म्हणाले, 'असे कशाला आण्णा? आपण सर्वच कर्ज माफ करून टाकू!' आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी कर्जमाफीची घोषणाही करून टाकली!

# अखेरपर्यंत एकमेकांसाठी..!



१९४९ सालची गोष्ट. यशवंतराव तेव्हा पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. ते मुंबईत एकटेच रहात होते. वेणूताईंना क्षयाची बाधा झाली होती म्हणून त्यांना मिरजेच्या दवाखान्यात दाखल केले होते. हा यशवंतरावांच्या जीवनातील मोठा खडतर काळ होता. ते शरीराने मुंबईत असले तरी त्यांचे सगळे लक्ष कराडमध्ये व मिरजेमध्ये लागले होते. प्रदीर्घ उपचारानंतर डॉक्टरांनी वेणूताईंना विश्रांतीसाठी घरी घेऊन जायला सांगितले. त्यांना घेऊन येण्यासाठी यशवंतराव मुंबईहून मिरजेला गेले. शहराबाहेरील माळावर एका मोकळ्या व हवेशीर जागेत क्षयरोग झालेल्या रुग्णांची राहण्याची व्यवस्था केली होती. तिथेच एका छोट्याशा खोलीत लोखंडी खाटेवर वेणूताई झोपून होत्या.

यशवंतराव कॉटवर बसले. ती वैशाखातील एक उदास दुपार होती. वारा स्तब्ध होता. यशवंतरावांनी वेणूताईंच्या प्रकृतीची चौकशी केली. वेणूताईंनी तब्येतीची एकूण अवस्था सांगितली. यशवंतराव चेहऱ्यावर हसू आणत म्हणाले, 'तू लवकर बरी होशील.' काही क्षण असेच निघून गेले. मग वेणूताई म्हणाल्या, 'डॉक्टर म्हणतात, यापुढे संतती होण्याचा संभव नाही.' यशवंतराव स्तब्ध बसून होते.

मग थोडे थांबून त्या म्हणाल्या, 'तुम्हाला वंशाचा दिवा पाहिजे. तुम्ही दुसरं लग्न करा.'

यशवंतरावांची स्तब्धता जरासुद्धा ढळली नाही. पण त्यांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते. वेणूताईंनी काहीशा आग्रही स्वरात पुन्हा तेच सांगितलं, तेव्हा स्थिर व दृढनिश्चयी स्वरात ते म्हणाले, 'मला वंशाच्या दिव्याची आवश्यकता नाही. येथून पुढे तुला मी आणि मला तू. हा विषय इथे बंद !'

त्या ओसाड माळावर भर दुपारी वेणुताईंना दिलेला शब्द यशवंतरावांनी आयुष्यभर पाळला. शेवटपर्यंत ते दोघे एकमेकांसाठी जगले!

# शांततेची हमी..!

सन १९५० नंतर महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष आणि समाजवादी पक्षाची शक्ती वाढू लागली होती. १९५२ च्या निवडणुकीत एकदा बारामतीला काँग्रेसची प्रचारसभा होती. मार्केट कमिटीच्या मैदानावर सभेचे आयोजन केले होते. त्याकाळी बारामती भागात शे.का.प. व समाजवादी पक्षाचा प्रभाव होता. काँग्रेसच्या सभेत साताऱ्याचे यशवंतराव चव्हाण बोलणार म्हणून जाहीर झाले होते. सभेमध्ये गोंधळ होणार या शक्यतेने गर्दी उसळली होती.

सभा सुरु होताच श्रोत्यांमध्ये गोंधळ सुरु झाला. काँग्रेसच्या प्रचारकांना बोलताच येईना. काय करावे कोणाला कळेना. इतक्यात आतापर्यंत व्यासपीठावर शांतपणे बसून समोरचा गोंधळ पाहणारे यशवंतराव उठले, माईकजवळ गेले आणि म्हणाले, 'बंधु - भगिनींनो, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भाई उद्धवराव इंगळे याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की त्यांनी माईकसमोर यावे आणि आपली भूमिका मांडावी.' काँग्रेसच्या प्रचारसभेत शे.का.प.च्या कार्यकर्त्याला भाषण करण्याची विनंती करण्यात आली, आणि ही विनंती कोणी केली? तर ज्यांची प्रचारसभा आयोजित केली होती त्या यशवंतरावांनी!

समोरची परिस्थिती पाहून तात्काळ आणि अचूक निर्णय घेण्याची यशवंतरावांची ही खास पद्धत होती. उद्धवरावांचे भाषण सुरु झाले, त्यामुळे श्रोत्यांमध्ये असलेल्या शे.का.प.च्या कार्यकर्त्यांना गडबड करता येईना. परिणामी गोंधळ थांबला. त्यांचे भाषण संपल्यावर यशवंतराव उठून म्हणाले, 'उद्धवरावांचे म्हणणे आपण सर्वांनी ऐकले आता मला माझे विचार सांगावयाचे आहेत. सभेमध्ये शांतता राखण्याची हमी मला तुमच्याकडून हवी आहे.' या वाक्याचा परिणाम झाला. लोकांनी यशवंतरावांचे भाषण शांतपणे ऐकून घेतले.

आपल्या भाषणाने श्रोत्यांना जिंकणारे अनेक वक्ते असतात पण भाषणापूर्वीच्या भाषणाने श्रोत्यांना आपलेसे करणारे यशवंतराव महान वक्ते होते.

# सजग वाचक यशवंतराव !

यशवंतराव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात पुरवठा मंत्री होते तेव्हाचा हा प्रसंग. त्यावेळी यशवंतराव वेणूताईंसह मुंबईतच रहात होते. यशवंतरावांचे भाचे आणि स्वातंत्र्यसैनिक बाबुराव कोतवाल हे देखील तेव्हा त्यांच्या घरीच रहात होते.

एके दिवशी यशवंतराव सचिवालयातून घरी आले. सौ.वेणूताईंबरोबर चहा घेताना ते म्हणाले, 'वेणूबाई, आमचे एक काम कराल ना ?'

अनेक वर्षांच्या सहवासामुळे यशवंतरावांचे 'एक काम' काय असेल हे ओळखायला वेणूताईंना मुळीच वेळ लागला नाही.

त्या लगेच म्हणाल्या, 'पुस्तके आणायची असतील, पाठवते.'

मग वेणूताईंनी शिपायाला बोलावले. साहेब बाबुरावला म्हणाले, 'बाबुराव, मी सांगतो ती नावे एका कागदावर लिही, आणि याच्याबरोबर जाऊन ती दोन पुस्तके घेऊन ये.' बाबुराव कागद व पेन घेऊन बसल्यावर साहेबांनी 'The Bridge on the River Quie' आणि 'From Here to Eternity' अशी दोन पुस्तकांची नावे सांगितली.

सौ.वेणूताईंनी दिलेले पैसे घेऊन बाबुराव आणि शिपाई बुक स्टॉलमध्ये गेले. शिपायाने ती चिठ्ठी दुकानदाराला वाचून दाखविली. दुकानदार थक्कच झाला. म्हणाला, 'चव्हाण साहेबांना पाहिजेत काय?' शिपाई म्हणाला, 'हो.'

दुकानदार कौतुकाने म्हणाला, 'चव्हाणसाहेब मोठा ग्रेट माणूस आहे. अहो, ही पुस्तके दहा बारा दिवसांपूर्वीच प्रकाशित होऊन आजच आमच्याकडे आली आहेत.'

यशवंतरावांमधील वाचक असा सजग आणि नाविन्याची ओढ असणारा होता.

# ग्रंथप्रेमी यशवंतराव..!



ते १९५१ साल होते. डॉ. हे. वि. इनामदार तेव्हा पुण्यातील ख्यातनाम वकील आबासाहेब वाघोलीकर यांचेकडे सहाय्यक म्हणून काम करीत होते. आबासाहेब, खा. शंकरराव मोरे आणि यशवंतराव चव्हाण हे तिघेही रॉयवादी विचारसरणीचे अभ्यासक होते. परस्परांचे स्नेही होते. यशवंतराव पुण्यात आले आहेत असे शंकररावांना समजले. चौकशीसाठी ते आबासाहेबांकडे आले. पण यशवंतराव तर आबासाहेबांकडे आले नव्हते. मग ते गेले कुठे ? आबासाहेब म्हणाले, 'अहो शंकरराव, चुकलेला फकीर मशिदीत सापडायचा, तसे यशवंतराव पुस्तकाच्या गराड्यातच आढळतील. चला माझ्याबरोबर, इनामदार तुम्हीही या.' असे म्हणून ते तिघेजण टांग्याने शनिवार पेठेतील वाघोलीकरांच्या घरून निघाले. डेक्कन जिमखान्यावरील इंटरनॅशनल बुक सर्व्हिस या पुस्तकाच्या दुकानासमोर टांगा थांबला. ते तिघेजण खाली उतरले. दुकानाचे मालक विठ्ठलराव दीक्षित यांना आबासाहेबांनी विचारले, 'यशवंतराव आलेत का?' त्यावर त्यांनी काहीही न बोलता एका कोपऱ्याकडे बोट दाखवले. त्या कोपऱ्यात यशवंतराव उभे होते. एक पुस्तक चाळण्यात ते गढून गेले होते. 'लॉ, लिबर्टी ॲण्ड लाईफ' हे न्या.छगला यांचे पुस्तक ते वाचत होते. उभ्याउभ्याच यशवंतराव त्या पुस्तकाविषयी बोलू लागले. छगलांच्या संपन्न जीवनदृष्टीचा प्रत्यय कसा पानापानांतून येतो हे सांगण्यात ते रंगून गेले. असे होते यशवंतरावांचे ग्रंथप्रेम !

# बाबासाहेबांच्या भेटीला यशवंतराव

१९५२ च्या विधानसभा निवडणुकीत कराड मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेल्यावर यशवंतराव राज्याचे पुरवठामंत्री झाले. घरवाटपाच्या (अ‍ॅकोमोडेशन) खात्याचा कार्यभारही त्यांच्याकडेच होता. त्यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मुंबईत जागेची गरज होती. राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये बाबासाहेबांचे फार मोठे योगदान होते आणि यशवंतरावांना त्यांच्याविषयी नितांत आदर होता.

एकेदिवशी राजभोज नावाचे एक कार्यकर्ते यशवंतरावांकडे गेले व म्हणाले, 'साहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना तुमची अपॉईंटमेंट हवी आहे. जागेच्या संदर्भात त्यांना तुमच्याशी चर्चा.....'

त्यांना मध्येच थांबवत यशवंतराव म्हणाले, 'तुमचं डोकं ठिकाणावर आहे का? अपॉईंटमेंट कोणी कोणाची मागायची? बाबासाहेबांनी माझी, की मी बाबासाहेबांची? जा आणि डॉक्टरांना सांगा की, यशवंतराव चव्हाण तुमची अपॉईंटमेंट मागताहेत. ते सांगतील तो दिवस व ते देतील ती वेळ मला कळवा. काम जरी त्यांचं असलं तरी मी ते त्यांच्या घरी जाऊन करून देईन.'

त्याप्रमाणे तो कार्यकर्ता बाबासाहेबांना भेटला. बाबासाहेबांनी सोयीचा दिवस कळवला व त्याप्रमाणे यशवंतरावांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांचं काम मार्गी लावलं.

यशवंतराव आयुष्यभर सत्तेत राहूनही सत्ता त्यांच्या डोक्यात कधी गेली नाही, हेच त्यांचे वेगळेपण होते.



# का उगाच ताटकळता ?

१९५२ ची विधानसभा निवडणूक जिंकल्यावर यशवंतराव मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळात पुरवठा मंत्री झाले. मुंबईत राहू लागल्यावर यशवंतरावांनी आपल्या आईला; विठामातेला आपल्याबरोबर राहण्यासाठी मुंबईला नेले होते. मंत्री असल्यामुळे साहेबांना पोलीस संरक्षण लाभले होते. एकेकाळी पोलीसांना सापडू नये म्हणून भूमीगत होणाऱ्या आपल्या मुलाला येता-जाता पोलीस अधिकारी सलाम करतात हे पाहून विठामातेचा ऊर अभिमानाने भरून येई.

एकदा रात्री अकराच्या सुमाराला विठाबाईंना जाग आली. पुन्हा झोप येईना म्हणून त्या सहज बाहेरच्या दरवाजापर्यंत आल्या. घराबाहेर दोन पोलीस पहारा करीत होते. त्यांना पाहून विठामाता मायेने म्हणाल्या, 'आरं बाबानू, का उगा ताटकळता? येसवंता झोपलाय वरती. तुमीबी झोपा की आता.' बिचाऱ्या पोलीसांना काय करावे कळेना. ते 'हो हो' म्हणाले, पण विठामाता एवढे म्हणून थांबल्या नाहीत. आत जाऊन त्यांनी घरातल्या मंडळींना उठवले व सांगितले, 'बाहेर पोलीस ताटकळलेत. त्यांना सतरंजी व उशी नेऊन द्या. त्यांना झोपू द्या.' हा सगळा गोंधळ ऐकून यशवंतराव जागे झाले आणि बाहेर आले. चौकशी केल्यावर त्यांना गोंधळाचे कारण कळले. साहेब हसून पोलिसांना म्हणाले, 'तुम्ही झोपल्याशिवाय आमची आई झोपणार नाही. तुम्ही झोपा.'

# महिलांना संरक्षण द्या...!

सन १९५३ सालची गोष्ट. कोल्हापुरात कमलाबाई काळे नावाच्या समाजसेविका राहात होत्या. समाजकार्याची आवड असल्याने त्यावेळी स्थापन झालेल्या रेशनिंग सल्लागार समितीच्या त्या सदस्या होत्या. काळेबाईंच्या कमिटीचे काम चांगले चालले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या समितीला विशेष अधिकार दिले होते. यशवंतराव तेव्हा पुरवठामंत्री होते.

एकदा कोल्हापूरच्या दौऱ्यावर असताना यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली समितीची मीटिंग झाली. तिथे कमलाताईंना पाहिल्यावर यशवंतराव म्हणाले, 'तुम्ही फारच चांगले काम करता असे माझ्या कानावर आले आहे. त्याबद्दल सर्व आमदार व खासदारांच्या वतीने मी आपले अभिनंदन करतो', आणि रत्नाप्पा कुंभार यांच्याकडे वळून साहेब म्हणाले, 'काय अण्णा, एवढ्या हुषार बाई तुमच्या कोल्हापुरात असताना त्यांना तुम्ही अजून काँग्रेसचे सभासद करून घेतले नाही का?' एवढे बोलून त्यांनी खिशातून चार आण्याचे नाणे काढले व म्हणाले, 'ही घ्या त्यांची सभासद वर्गणी. कमलाबाईंना सभासद करून घ्या.'

पुढे १९५६ साली कमलाताई मुंबईला जाऊन कापडी बाहुल्या बनविण्याचा कोर्स पूर्ण करून आल्या. यशवंतराव तोपर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. एकदा पुण्यात ते आले असता तेथील कार्यकर्त्यांनी त्यांची उघड्या जीपमधून मिरवणूक काढली होती. यशवंतराव जनतेला अभिवादन करीत होते, इतक्यात त्यांचे लक्ष कमलाताईंकडे गेले. त्या खडकवासल्याला जाण्यासाठी बसस्टॉपवर उभ्या होत्या. इतक्या गर्दीतून यशवंतरावांनी कमलाताईंना ओळखले व सुहास्य वदनाने हात हलवला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्यासारख्या सर्वसामान्य स्त्रीला एवढ्या गर्दीत ओळख द्यावी याचे कमलाताईंना प्रचंड आश्चर्य वाटले. सहा वर्षांपूर्वी केवळ अर्ध्या तासासाठी झालेली भेट यशवंतरावांच्या अजून लक्षात होती. त्यांच्या स्मरणशक्तीने व आपुलकीने त्या इतक्या प्रभावित झाल्या की त्याच दिवशी त्या यशवंतरावांना भेटण्यासाठी सर्किट हाऊसवर गेल्या. त्यांना पाहताच

यशवंतराव म्हणाले, 'कमलाताई तुम्ही इथं कशा? मी तर तुम्हाला बसस्टॉपवर पाहिले.'

यावर कमलाताई म्हणाल्या, 'साहेब, आपण एवढे मोठे झालात, तरीसुद्धा माझ्यासारख्या एका सामान्य महिलेची ओळख ठेवता याचा मला खूप आनंद झाला आणि केवळ तो आनंद व्यक्त करण्यासाठी मी आले आहे. आम्ही खडकवासल्याला ग्रामीण महिलांना बाहुल्या बनविण्याचे प्रशिक्षण देणारे केंद्र काढले आहे. त्याला तुमचा आशीर्वाद हवा आहे. उद्या पानशेतहून येताना खडकवासल्याला भेट द्यावी एवढीच इच्छा आहे.'

यावर यशवंतराव म्हणाले, 'म्हणजे तुम्ही राजकारण सोडून बाहुल्या खेळायला लागलात की काय? छान आहे, मी जरूर येईन.'

दुसरे दिवशी यशवंतराव त्या प्रशिक्षण केंद्राच्या उद्‌घाटनाला गेले. तिथे जमलेल्या लोकांसमोर त्यांनी छोटेसे भाषणही केले. आपल्या भाषणात कमलाताईंची स्तुती करून ते म्हणाले, 'लोकहो, तुमच्या नशिबाने चुकून राजकारणातल्या बाई तुमच्या गावाला आल्या आहेत. त्या आपल्याच आहेत. त्यांच्या बुद्धिमत्तेचा फायदा करून घ्या. त्यांना संरक्षण द्या. '

यशवंतरावांच्या या प्रेरक शब्दांनी कमलाताईंना हत्तीचे बळ मिळाले. त्या अधिक जोमाने कामाला लागल्या व त्या भागातील लोक त्यांना आपले मानू लागले.



# रोपट्याचाच महावृक्ष होतो!

सातान्यातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. संभाजीराव पाटणे यांनी सांगितलेली ही आठवण! ते १९५६ साल होते. यशवंतराव मुंबई राज्याचे पुरवठामंत्री होते, तेव्हा वाई येथील काही कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन महर्षि विठ्ठल रामजी शिंदे विद्यालय सुरू करण्याचे ठरविले. या विद्यालयाचे उद्‌घाटन यशवंतरावांच्या हस्ते व्हावे अशी सर्वांचीच इच्छा होती. उद्‌घाटनसाठीचे निमंत्रण देण्यासाठी ही सर्व मंडळी जेव्हा यशवंतरावांकडे गेली तेंव्हा त्यांनी अतिशय आनंदाने होकार दिला. एकतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे उद्‌घाटन करणे यशवंतरावांना आवडत असे. कारण भावी पिढ्यांना आकार देण्याचे कार्य अशा ठिकाणी घडत असते अशी त्यांची श्रद्धा होती, आणि त्यातही महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावानं सुरू होणाऱ्या शाळेचे उद्‌घाटन करणे हा मोठा सन्मान आहे असे त्यांना वाटले. कारण त्यांच्या लहानपणी कराडात सुरू केलेल्या अस्पृश्य मुलांच्या शाळेच्या उद्‌घाटनासाठी यशवंतरावांनी खुद्द महर्षि शिंदेंनाच बोलावले होते. महर्षिंविषयी त्यांना नितांत आदर होता.

या सर्व पार्श्वभूमीवर यशवंतराव ११ मे १९५६ रोजी उद्‌घाटनसाठी वाईत आले. जेमतेम चार-पाच खोल्यांची इमारत होती. त्यातल्याच एका खोलीला रिबीन बांधली होती. संभाजीराव पाटणे हे यशवंतरावांच्या बाजूलाच उभे होते. त्यांनी रिबीन कापल्यावर संभाजीराव म्हणाले, 'शाळा तशी खूपच लहान आहे.'

यावर हसून यशवंतराव म्हणाले, 'रोपट्याचाच पुढे महावृक्ष होतो!'

यशवंतरावांचे हे भाकित तंतोतंत खरे ठरले. केवळ पंधरा-वीस विद्यार्थ्यांसह सुरू झालेल्या या शाळेत आज दोन हजारांहून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. यशवंतरावांचे बोलणे हे असे द्रष्टेपणाचे असे.

# एका लग्नाची गोष्ट...!

सन १९५३ ची गोष्ट. यशवंतराव तेव्हा मुंबई प्रांताचे पुरवठा मंत्री होते. राज्यातील जनतेला पुरेसा अन्नसाठा उपलब्ध करून देण्याची महत्वाची जबाबदारी त्यांना पार पाडावी लागत होती पण याशिवाय अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्याही आता पूर्ण कराव्या लागत होत्या. यशवंतरावांचे दोन्ही थोरले बंधू (ज्ञानोबा व गणपतराव) हयात नसल्याने तेच आता कुटुंबातील कर्ते पुरुष होते. ज्ञानोबादादांची कन्या सुधा आता उपवर झाली होती. यशवंतराव तिच्यासाठी सुयोग्य स्थळ शोधत होते. एकेदिवशी फलटणहून दत्ताजीराव सूर्यवंशी आपल्या प्रतापराव पवार नावाच्या मित्राला घेऊन सुधाला पाहण्यासाठी आले. दत्ताजीराव तसे जुन्या नात्यातलेच होते. कराडला सोमवार पेठेतील यशवंतरावांच्या घरी मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाला. यशवंतराव स्वतः या प्रसंगी हजर होते.

'आम्हाला मुलगी पसंत आहे.' असे दत्ताजीरावांनी सांगितले.

मग देण्याघेण्याच्या संबंधीची चर्चा सुरू झाली. प्रतापरावांनी वरपक्षातर्फे चार हजार रुपये हुंडा मागितला. १९५३ साली चार हजार रुपये ही मोठी रक्कम होती. (तेव्हा हुंडाविरोधी कायदा अस्तित्वात आला नव्हता!)

शेजारच्या खोलीत विठामाता बसल्या होत्या. यशवंतरावांनी हुंडा देण्याची तयारी दर्शविली व म्हणाले, 'आमच्या आईला हुंड्यासंबंधी काही सांगू नका, मी तिला लग्न जमल्याचे सांगून येतो.'

मग यशवंतराव उठून विठामातेकडे गेले व म्हणाले,

'आई, सुधाचं लग्न ठरवतोय.'

'कुठं?' विठामातेचा प्रश्न

'फलटणला.'

'तिला नको देऊस फलटणला. फलटण फार लांब आहे.'

आईचे हे उद्‌गार ऐकून यशवंतरावांना हसू फुटले. ते म्हणाले, 'आई, तुझी धाकटी सून (वेणूताई) कुठली आहे? फलटणचीच ना? मग फलटण लांब कसे? शिवाय मुलगा

होतकरू व निर्व्यसनी आहे.' अशाप्रकारे विठामातेचे मन वळवून यशवंतरावांनी आईचा होकार मिळवला. पाहुणे निघून गेले. लग्नात हुंड्याचे चार हजार रुपये कोठून द्यायचे या प्रश्नाने यशवंतराव बेचैन झाले. शेवटी त्यांना एक मार्ग दिसला. त्यांनी आपल्या भाच्याला (बाबुराव कोतवाल) बोलावले व म्हणाले,

'हे बघ बाबुराव, आपल्या शुक्रवार पेठेतील घराच्या पाठीमागची मोकळी जागा विकून आपण हुंड्याची व्यवस्था करूया. तू गिऱ्हाईक बघून ती जागा विकून टाक.' यशवंतरावांचा हा आदेश ऐकून बाबुरावला धक्काच बसला. त्याने मनात विचार केला. 'आपला मामा गेली सात वर्षे आमदार आहे. दोन वर्षापासून मंत्री आहे. पण त्याच्याकडे साधे चार हजार रुपये नसावेत? हुंडा देण्यासाठी जागा विकण्याची वेळ त्यांच्यावर यावी?' शेवटी त्याने उसनवार करून पैशांची व्यवस्था केली. जागा मात्र विकली नाही. ठरल्याप्रमाणे फलटणच्या राम मंदिरात सुधा आणि दत्ताजीरावांचा विवाह संपन्न झाला. यशवंतरावांनी कन्यादान केले.

आपल्या मंत्रीपदाचा वापर करून यशवंतराव हवे तितके पैसे मिळवू शकले असते, पण तो विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. असे होते यशवंतराव! अशी होती त्यांची 'श्रीमंती'!

# जगावेगळी संक्रांत.

सन १९५४ सालच्या जानेवारी महिन्यात यशवंतराव काँग्रेसच्या अधिवेशनासाठी हैदराबादला गेले होते. अधिवेशनातील कामकाज संपल्यावर संध्याकाळी ते शहरात फिरायला गेले. रात्री नऊ वाजता जेवणासाठी ते परत आले. जेवणाला जाण्यापूर्वी त्यांना कोणीतरी तिळगूळ दिला. मग एकदम त्यांना आठवले- आज मकरसंक्रांत आहे. कामाच्या धांदलीत त्यांना संक्रांतीची आठवणच झाली नाही. का कोण जाणे, त्यांना एकदम दहा वर्षांपूर्वीची संक्रांत आठवली.

त्यावेळी (१९४३) यशवंतराव भूमिगत झाले होते. इंग्रज सरकारचे पोलिस त्यांच्या शोधात होते. सहा महिन्यांपूर्वीच त्यांचे लग्न झाले होते आणि त्यांची पत्नी पहिल्या संक्रांतीसाठी माहेरी गेली नव्हती, तर तिला पोलिसांनी तुरुंगात नेले होते. १४ जानेवारी १९४३ रोजी संध्याकाळी यशवंतराव बबनराव गोसावींच्या घरी गेले होते. त्यांच्या घरी त्यांच्या पत्नीने संक्रांतीचा हळदी-कुंकवाचा समारंभ धामधुमीने साजरा केला होता. यशवंतरावांनी ते पाहिले, आणि त्यांचे डोळे भरून आले. ते तिथेच अश्रू ढाळू लागले. त्यांच्या रडण्याचे कारण कोणाला समजेना. सौ.वेणूताईंची ही पहिलीच संक्रांत होती. अशा मंगलप्रसंगी त्यांना जेलच्या अंधाऱ्या कोठडीत खितपत रहावे लागले याची वेदना यशवंतरावांना असह्य झाली व ती अश्रूरूपाने बाहेर पडली. बबनरावांनी व त्यांच्या पत्नीने कशीबशी त्यांची समजूत काढली. पण त्यानंतरच्या कोणत्याही संक्रांतीला यशवंतराव वेणूताईंना सोडून राहिले नाहीत. तो दिवस दोघांसाठी 'खास' होता.



# राजीनामा कशासाठी ?

सन १९५५ ची गोष्ट. मोरारजी देसाई द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. संयुक्त महाराष्ट्राची मागणी जोर धरू लागली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीने त्यासाठी विधानसभेसमोर निदर्शने केली. त्यानंतर चौपाटीवर झालेल्या मोरारजींच्या सभेतही दगडफेक झाली. दोन-तीन दिवसांनी विधानसभेवर आणखी एक मोर्चा नेण्याचा प्रयत्न झाला. तो प्रयत्न फसल्यामुळे शहरात अशांतता निर्माण झाली. पोलिसांच्या गोळीबारात दहा लोक ठार झाले. ऐंशी लोक जखमी झाले.

त्यावेळी महाराष्ट्र काँग्रेस पक्षात राजीनामे देण्याची मोहिम सुरु झाली. विधानसभेतील काँग्रेसच्या ९४ आमदारांनी राजीनामे दिले. राजीनामा देण्याची ही कल्पना शंकरराव देवांची होती व कृती भाऊसाहेब हिरे यांच्यामार्फत घडवून आणली जात होती. तसे पक्षाचे धोरण नव्हते किंवा आदेशही नव्हता. यशवंतरावांना प्रांताध्यक्ष देवगिरीकरांनी राजीनामा मागितल्यावर ते म्हणाले, 'अशा गोंधळाच्या पार्श्वभूमीवर राजीनामा देणे म्हणजे अराजकला निमंत्रण देणे ठरेल. शिवाय पक्षाचे तसे धोरणही नाही. तरीही प्रांताध्यक्षांना घाईच असेल तर त्यांनी माझ्याकडे तशी लेखी मागणी द्यावी, मी राजीनामा देण्यास तयार आहे.' यावर प्रांताध्यक्ष देवगिरीकरांनी प्रांताध्यक्ष या नात्याने राजीनामा मागण्यास नकार दिला. ते म्हणाले, 'तुमची इच्छा असेल तर राजीनामा द्या. मी फक्त राजीनामे गोळा करण्याचे काम करीत आहे.'

यशवंतरावांनी राजीनामा दिला नाही. पण नंतर ज्यांनी राजीनामे दिलेले आहेत त्यांचे राजीनामे स्वीकारावेत असा श्रेष्ठींचा आदेश आल्यावर राजीनामा देणारांची धावपळ सुरु झाली. यातून मार्ग काढण्यासाठी यशवंतरावांनाच पुढे यावे लागले. शेवटी चोवीस तासांतच या राजीनामा नाट्यावर पडदा पडला.

# तेवढी आपली ऐपत नाही !

पुरवठा मंत्री झाल्यानंतरही यशवंतरावांची राहणी एकदम साधीच राहिली. त्यांना भपकेबाजपणा मुळीच आवडत नसे. कराडमधील त्यांचे घरसुद्धा अगदी साधे होते.

१९५६ साली मुंबईमध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्यानंतर यशवंतराव काश्मिरच्या छोट्या दौऱ्यावर गेले होते. तेथून परत आल्यावर त्यांचे मित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी गप्पा मारत असताना शास्त्रीजींनी सहज विचारले, 'काश्मिरला काय खरेदी केली?'

यशवंतराव म्हणाले, 'काही विशेष सांगण्यासारखे नाही. केवळ अपवादच सांगायचा तर एक रेशमी पातळ पत्नीला आणले. आक्रोड वृक्षाच्या लाकडाचे नक्षीकाम आणले नाही, कारण ते आणल्यानंतर ठेवायचे कोठे? आपले कराडचे घर कसे आहे, ते तुम्हाला माहितच आहे. त्या नक्षीकामाचा तेथे अपमानच व्हायचा.'

थोडे थांबून यशवंतराव पुढे म्हणाले, 'भारी पश्मिना शाल खांद्यावर घेण्याइतकी आपली ऐपत नाही, तिथे बाकीच्या गोष्टी कशा घेणार? फक्त एवढे खरे की तेथील निसर्गाचे सौंदर्य व पावित्र्य मनात साठवून आणले आहे.'

भौतिक समृद्धीपेक्षा आत्मिक सौंदर्य अधिक श्रेष्ठ असते याची यशवंतरावांना पूर्ण जाणीव होती हेच वरील प्रसंगातून दिसून येते.



तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# त्याचे ज्ञान मातीमोल होता कामा नये !

शेतीला उद्योगांची जोड दिल्याशिवाय राज्याचा विकास होणार नाही, हे यशवंतरावांनी खूप लवकर ओळखले होते. राज्यात उद्योगधंदे वाढावेत यासाठी ते नेहमीच प्रयत्न करीत असत. एखादा उद्योग सुरू करण्यासाठी ते उद्योगपतींना शंभर एकर जमीन द्यायला तयार व्हायचे, पण 'किती दिवसांत कारखाना सुरू करणार, आणि किती बेकारांना काम देणार?' हे मात्र आग्रहाने विचारून घ्यायचे.

एकदा एका मराठी कारखानदाराने कागदाचा कारखाना काढायचे ठरवले. शेकडो एकर जंगल अक्षरश: पायाखाली घालून त्याने कागद निर्मितीचा कारखाना सुरू करण्याची योजना आखली. यासाठी त्याने स्वत:चे लाखभर रुपये खर्च केले, पण योजना एवढी मोठी झाली की त्याचा खर्च त्याच्या आवाक्याबाहेर गेला. कारखाना उभारणीसाठी राज्य सरकारने दिलेल्या प्राथमिक परवान्याची मुदत संपत चालली होती. शेवटी त्या कारखानदाराने आपला परवाना कलकत्त्याच्या एका भांडवलदाराला देण्याची परवानगी राज्य सरकारकडे मागितली. यशवंतराव तेव्हा मोरारजींच्या मंत्रीमंडळात वनमंत्री होते. आयता उभा राहिलेला कारखाना चालवायला मिळणार याचा त्या भांडवलदाराला आनंद झाला होता. पण एका मराठी उद्योजकाला केवळ पैशाअभावी उद्योग उभा करता आला नाही ही खंत यशवंतरावांना वाटत होती. त्यांनी त्या उद्योजकाला धीर व प्रोत्साहन दिले, पण 'कारखाना विकावाच लागेल' असे तो म्हणाला.

इकडे भांडवलदाराचे सचिवालयात हेलपाटे वाढू लागले. त्याला वाटले आपले काम सहज होईल, पण वेळ लागत चालला. एकदा या भांडवलदाराने वनमंत्र्यांची (यशवंतरावांची) भेट घेतली तेव्हा ते म्हणाले, 'हे जंगल तुडवून योजना उभी करणाऱ्याला थोडी मुदत द्यायला नको? शेवटी या सगळ्यात त्याला काय मिळाले? त्याचे कष्ट व त्याचे ज्ञान मातीमोल होता कामा नये.'

# मीही काही पालापाचोळा नाही !

१० ऑक्टोबर १९५५ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. आयोगाने मुंबईचे स्वतंत्र राज्य करण्याची शिफारस केली. यामुळे महाराष्ट्रात कमालीचा असंतोष निर्माण झाला. संयुक्त महाराष्ट्रासाठी जनतेने आंदोलन सुरू केले. यशवंतरावांना देखील संयुक्त महाराष्ट्र हवा होता, पण केंद्रीय नेतृत्वाचे मन वळवून महाराष्ट्र मिळवावा ही त्यांची भूमिका होती. पण त्यांच्या या भूमिकेचा विपर्यास करण्यात आला. विरोधकांनी त्यांना महाराष्ट्रद्रोही ठरवले. यशवंतरावांवर टीकेचे वादळ उठले. त्यांच्या राजकीय जीवनाची नौका हेलखावे खाऊ लागली. पण आश्चर्य म्हणजे याच काळात यशवंतरावांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला.

आपली भूमिका योग्य आहे याची त्यांना पक्की खात्री होती. चहूबाजूंनी होणाऱ्या टीकेला त्यांनी सांगली येथे झालेल्या जाहीर सभेत ठासून उत्तर दिले. सहसा आक्रमक भाषा न वापरणारे यशवंतराव आपल्या भाषणात म्हणाले, 'मला मुद्दाम बदनाम करायचे असेल तर तो उद्देश साध्य होईलही, पण सत्य बदनाम होणार नाही. एक वेळ अशी येईल की तुम्ही जाहीरपणे नाही पण निदान माझ्या कानात तरी कबूल कराल, की पंचावन्न-छपन्न साली तुम्ही जे सांगत होता ते बरोबर होतं. झगड्याने आणि वैराने असे रस्त्यावर भांडून मुंबई मिळणार नाही. मी जो राजकारणात आलो आहे, तो सेवेचा अधिकार घेऊन आलो आहे. मी तुम्हाला आवडत नसेन तर मला असेंब्लीत पाठवू नका, पण माझा सेवेचा अधिकार तुम्हाला हिरावून घेता येणार नाही. मीही काही पालापाचोळा नाही की विरोधाच्या फुंकाऱ्याने उडून जाईन. पंचवीस वर्षांचे माझे राजकीय जीवन लोकांच्या समोर आहे. त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास मी तयार आहे.'

या तडाखेबंद भाषणाने यशवंतरावांच्या अफाट मनोधैर्याची कल्पना विरोधकांना व जनतेलाही आली.

# ममईतलं पगारपाणी पुरते ना?



यशवंताने खूप शिकून मामलेदार व्हावं अशी त्यांच्या आईची इच्छा होती. त्या माऊलीच्या दृष्टीने 'मामलेदार' हेच जगातील सर्वोच्च पद होते. पण यशवंतराव राजकारणात ओढले गेले. तरुणपणी तुरुंगात गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते सत्तेत सहभागी झाले. संसदीय सचिव, पुरवठा मंत्री व शेवटी मुख्यमंत्री झाले. ही पदोन्नती व त्यांचे महत्त्व विठामातेला समजणे अशक्य होते.

मुख्यमंत्री असताना एकदा यशवंतराव कराडच्या घरी आले होते. साहजिकच त्यांना भेटण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमले. यशवंतरावही सर्वांशी आपुलकीने बोलत होते. त्यांच्या समस्या जाणून घेत होते. इतके सगळे लोक पहिल्यांदाच घरी आल्यामुळे विठामाता अस्वस्थ झाल्या. त्यांनी यशवंतरावांना जवळ बोलावले. यशवंतराव आज्ञाधारकपणे आईजवळ गेले. मग विठामाता हळूच म्हणाल्या, 'अरे, एवढी माणसं जमवतोस? आन् त्यांना चहापाणी करीत बसतोस. इतके पैसे हाईत का तुझ्याकडं? ममईतलं पगारपाणी पुरते ना?'

यशवंतरावांना हसू फुटले, पण आईची काळजी खरी होती. ते म्हणाले, 'आई, ही सगळी कामाची माणसे आहेत.'

मग विठामातेचे समाधान झाले. इतके सगळे लोक आपल्या मुलाला मानतात, त्याचे ऐकतात याचा त्यांना अभिमान वाटला.

# नेहरूंचे आशीर्वाद

सन १९५६ साली द्वैभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे यांच्यात चुरशीची लढत झाली. मोरारजी देसाईंनी यशवंतरावांना पाठिंबा दिल्यामुळे त्यांचे पारडे जड झाले व ते मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर साहेबांनी त्यांच्या मंत्रिमंडळाची यादी तयार केली. काँग्रेसचे नेते आणि देशाचे पंतप्रधान या नात्याने पं. नेहरूंना ही यादी दाखवावी म्हणून साहेब दिल्लीला गेले, नेहरूंना भेटले व म्हणाले, 'मी माझ्या मंत्रिमंडळाची आखणी केली आहे. आपण ती पाहून घ्यावी आणि योग्य ते बदल करावेत, ही विनंती.'

राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कारभारात नेहरु सहसा हस्तक्षेप करीत नसत. त्यांनी यादीतील एक नाव खोडले व त्याठिकाणी दुसरे नाव लिहिले. मग साहेबांना म्हणाले, 'तुम्हाला योग्य वाटले, तर हा बदल करा.'

मग आणखी काही वेळ चर्चा झाली. शेवटी नेहरुंचे आभार मानून निघताना यशवंतराव वाकून त्यांना नमस्कार करीत म्हणाले, 'पंडितजी, मला आपले आशीर्वाद द्या.' हे ऐकताच का कोण जाणे, पण पंडितजी रागावले व ताडकन म्हणाले, 'माझे आशीर्वाद इतके स्वस्त नाहीत. (My Blessings are not cheap) आणि ते उठून उभे राहिले. साहेबांना अपमानास्पद झाले. नेहरुंच्या दालनातून बाहेर पडल्यावर ते तडक विमानतळावर गेले. त्यांच्या चेहऱ्यावर उसने हसू होते पण मनात खोल जखम झाली होती. ते विचार करु लागले की पंडितजींनी मला आशीर्वाद का दिले नसतील? मग त्यांच्या लक्षात आले की मी माझ्या शक्तीवर व लोकप्रियतेवर मुख्यमंत्री झालेलो नाही. मोरारजींच्या कृपेमुळेच मी या पदावर आहे. थोडक्यात, पंडितजींच्या दृष्टीने मी वशिल्याचा मुख्यमंत्री होतो आणि हेच त्यांना आवडले नसावे. त्यादिवशी दिल्लीहून मुंबईला निघालेल्या विमानात बसूनच साहेबांनी निर्धार केला- जोपर्यंत आपण स्वत:ची कर्तबगारी सिद्ध करीत नाही तोपर्यंत नेहरुंजवळ बसायचे नाही.

पंतप्रधान राज्याच्या दौऱ्यावर आल्यावर मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याबरोबर राहिले पाहिजे



असा संकेत आहे. त्यानंतर काही दिवसांनी पंडितजी महाराष्ट्रात आले. यशवंतराव दौऱ्यात सामील झाले, पण मोटारीत बसण्याची वेळ आली की ते मुद्दाम हळू चालायचे. नेहरु व राज्यपाल यांना मागच्या सीटवर बसू द्यायचे व मग स्वत: ड्रायव्हरजवळच्या सीटवर बसायचे. त्यानंतरही अनेकवेळा नेहरु महाराष्ट्रात आले पण मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव एकदाही त्यांच्याजवळ बसले नाहीत. त्यांच्या मनात एक भळभळणारी जखम होती.

पुढच्या काळात यशवंतरावांनी बेरजेचे राजकारण केले. गुणीजनांना मान दिला. गरीबांना आधार दिला. नवनवीन योजना आखल्या. महाराष्ट्रातील वातावरण बदलले. नेहरुंच्या लक्षात हा बदल आला. असेच एकदा पंडितजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. गाडीत बसण्यासाठी सर्वजण चालले होते. नेहमीप्रमाणे यशवंतराव मागे रेंगाळू लागले, पण पंडितजींनी पटकन् त्यांचा हात धरला व त्यांना स्वत:जवळच्या सीटवर बसवले. गाडी सुरू झाल्यावर नेहरुंनी साहेबांकडे पाहिले व म्हणाले, 'Chief Minister, now you have my blessings'

# नाट्यगृहाचे नाट्यमय उद्घाटन !

संयुक्त महाराष्ट्राची मागणी जोर धरू लागली. मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी जनमताची अवहेलना केल्यामुळे आंदोलन पेटले. अशा वातावरणातच यशवंतराव द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. 'महाराष्ट्रापेक्षा मला नेहरु मोठे वाटतात' या त्यांच्या विधानामुळे त्यांच्याविरुद्ध जनक्षोभ उसळला. द्विभाषिकाचे मुख्यमंत्री असताना यशवंतराव पुणे महानगरपालिकेने बांधलेल्या नाट्यगृहाचे उद्घाटन करण्यासाठी पुण्याला आले होते. पुणे हा तर संयुक्त महाराष्ट्र समितीचा बालेकिल्ला होता. काही झाले तरी यशवंतरावांना नाट्यगृहाचे उद्घाटन करू द्यायचे नाही, असा चंग आंदोलकांनी बांधला होता.

नाट्यगृहाबाहेर संयुक्त महाराष्ट्र समितीची निदर्शने चालू होती. यशवंतराव आले. व्यासपीठावर विराजमान झाले. कमिशनर (आयुक्त) नाईक यांनी प्रास्ताविक केले व यशवंतरावांना उद्घाटनाचे भाषण करण्याची विनंती केली. यशवंतराव उठले. ते भाषणाला सुरुवात करणार इतक्यात सभागृहात आरडाओरडा सुरू झाला. पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका श्रीमती भीमाबाई दांगट धावत स्टेजवर आल्या. यशवंतरावांच्या दिशेने बांगड्या फेकत त्या ओरडल्या, 'सूर्याजी पिसाळ, चालता हो.' सभागृहात एकच गोंधळ उडाला. बाहेर पोलीस निदर्शकांना आवरीत होते. कोणीतरी जिल्हा पोलिस अधीक्षकांना बोलावून आणले. भीमाबाई व त्यांच्या सहकाऱ्यांना बाहेर नेले गेले व सभागृहात शांतता निर्माण झाली. यशवंतराव पुन्हा एकदा उद्घाटनाचे भाषण करण्यास उभे राहिले. त्यांचा घोर अपमान झाला होता. त्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील, याची आपण कल्पना करु शकतो, पण प्रचंड आत्मसंयमाच्या जोरावर त्यांनी हा अपमान पचवला व भाषणाला सुरुवात केली. हसत हसत त्यांनी पहिलेच वाक्य उच्चारले, 'इतक्या नाट्यमय पार्श्वभूमीवर जगातल्या कोणत्याही नाट्यगृहाचे उद्घाटन झाले नसेल.' त्यांच्या या वाक्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

# दादांदा मला मत देण्यास सांगा!

सन १९५७ साली महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. संयुक्त महाराष्ट्रासाठीचे आंदोलन तेव्हा ऐन भरात आले होते. शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेस पक्षासमोर कडवे आव्हान उभे केले होते. विधानसभेची निवडणूक लढविण्याची यशवंतरावांची ही तिसरी वेळ होती. पण आता ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होती. त्यांच्या नेतृत्वाखाली लढविली जाणारी ही पहिलीच निवडणूक असल्याने अर्थातच ती त्यांच्यासाठी प्रतिष्ठेची होती. कराड विधानसभा मतदार संघातून यशवंतरावांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांच्याविरोधात शेतकरी कामगार पक्षाने केशवराव पवार यांना उमेदवारी दिली. दोन्ही उमेदवारांचे प्रचारदौरे सुरू झाले. यशवंतराव आणि केशवराव दोघेही कराडमधील शुक्रवार पेठेत राहत होते. एकेदिवशी यशवंतरावांनी शुक्रवार पेठेतील मतदारांशी संपर्क साधण्यासाठी पदयात्रा काढली. पेठेतील प्रत्येक घरात जाऊन ते मतदारांना मत देण्याची विनंती करीत होते. काही अंतर चाचलल्यावर पदयात्रा केशवरावांच्या घराजवळ आली. कार्यकर्त्यांना वाटले यशवंतराव केशवरावांचे घर ओलांडून पुढे जातील. विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या घरात प्रचार कोण करेल? पण यशवंतराव अपवाद होते. ते केशवरावांच्या घराकडे वळले. कार्यकर्ते अवाक् झाले. दरवाजा बंद होता. यशवंतरावांनी दरवाजावर टकटक केली. केशवराव प्रचारासाठी सकाळीच घराबाहेर पडले होते. त्यामुळे त्यांच्या पत्नीने दार उघडले. दारात यशवंतरावांना पाहून त्याही अचंबित झाल्या. 'केशवराव दादा घरी नाहीत का?' यशवंतरावांनी विचारले.

'तुमच्यासारखेच तेही प्रचाराला बाहेर पडलेत.' वहिनींनी खुलासा केला.

'ठीक आहे. उद्याच्या निवडणुकीसाठी मी उभा आहे. तुम्ही तुमचे बहुमोल मत मला द्यावे अशी विनंती करण्यासाठी मी आलो आहे. दादा घरी आल्यावर त्यांनाही मला मत द्यायला सांगा. विसरू नका.' या जगावेगळ्या प्रचारनीतीने वहिनी थक्क झाल्या. त्यांनी यशवंतरावांना चहा घेण्याची विनंती केली. यशवंतराव थांबले. चहा घेतला आणि पुन्हा एकदा मत देण्याविषयी विनंती करून बाहेर पडले. कार्यकर्त्यांबरोबर चालू लागले.

खिलाडूवृत्तीचा राजकारणी कसा असावा याचे प्रात्यक्षिकच आज कार्यकर्त्यांना पहायला मिळाले.

# आपण थांबू नये...ताबडतोब जावे!

राज्याच्या प्रगतीसाठी शेतीबरोबरच उद्योगांचीही वाढ होणे गरजेचे आहे हे यशवंतरावांना माहित होते. म्हणूनच ते उद्योगपतींना प्रोत्साहन देत असत. पण याचा अर्थ ते उद्योगपतींचे लांगुलचालन करीत होते असा मुळीच नाही. मुख्यमंत्रीपदाची प्रतिष्ठा कमी होईल असे ते कधीही वागले नाहीत. त्यांचा मराठी बाणा दाखवणारी ही घटना.

द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतराव मलबार हिल वरील 'सह्याद्री' बंगल्यात रहायला गेले, त्याच्या दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच शिपायाने त्यांना उठवले आणि सांगितले की, प्रसिद्ध उद्योगपती आर. डी. बिर्ला आपणास भेटावयास आले आहेत. आर.डी. बाबूंचे महत्त्व आणि वय लक्षात घेऊन यशवंतराव घाईघाईने तयार झाले आणि दिवाणखान्यात येऊन त्यांना भेटले. आर.डी.बिर्ला म्हणाले, 'काही विशेष काम नव्हतं. सकाळी सहज फिरायला निघालो होतो. म्हटलं जाता जाता तुम्हाला भेटावं.' अर्धा तास गप्पा मारून आर.डी. बाबू निघून गेले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता पुन्हा हजर झाले. यशवंतरावांनी परत झोपमोड करून त्यांची भेट घेतली. निरोप घेताना बिर्ला म्हणाले, 'मी रोज सकाळी मलबार हिलवरील बागेत फिरायला येतो व जाता जाता मी मोरारजींना भेटत असे. आपली हरकत नसेल तर आपण तोच नित्यक्रम पाळत जाऊ.'

यशवंतराव पटकन म्हणाले, 'मोरारजी हे सूर्यवंशी प्रकृतीचे गृहस्थ. ते सकाळी पाचला उठतात. मी रात्री दोन वाजण्यापूर्वी झोपत नाही आणि नऊ अगोदर कोणाला भेटणे मला कठीण असते. आपण भल्या सकाळी येऊन माझी झोपमोड करू नका.'

यशवंतरावांच्या स्पष्टवक्तेपणाचा परिणाम झाला. त्यानंतर बरेच दिवस आर.डी. बाबू आले नाहीत. पण एक दिवस सकाळी ते परत हजर झाले. यशवंतराव झोपले होते. शिपायाने त्यांना उठवले. तो सांगू लागला, 'खाली आर.डी. बाबू आपली.....' त्याला मध्येच थांबवत यशवंतराव रागाने म्हणाले, 'त्यांना सांगा, मुख्यमंत्री साहेब झोपले आहेत. आपण थांबू नये, ताबडतोब जावे!'

# हजरजबाबी यशवंतराव

१ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतरावांनी द्विभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली, त्यानंतर मंत्रिमंडळ निवडीचे व खातेवाटपाचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य होते. यशवंतरावांनी गुजरात, सौराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा अशा सर्व विभागातील प्रतिनिधींना मंत्रिमंडळात स्थान दिले. मंत्रिमंडळात कार्यक्षमता व एकोपा राहील हे पाहिले. भाऊसाहेब हिरे, बियाणी, हैदराबादचे माजी गृहमंत्री दिगंबरराव बिंदू हे मातब्बर पुढारी मंत्रीमंडळात नव्हते, याचे अनेकांना आश्चर्य वाटले. पण पक्षांतर्गत मतभेदाचे प्रतिबिंब मंत्रिमंडळात उमटू नये म्हणून यशवंतरावांनी त्यांना वगळले. अर्थात याला इतरही राजकीय कारणे असतील.

एकदा विधानसभेत विरोधी पक्षाचे आमदार कांबळे म्हणाले, 'हे मंत्रिमंडळ प्रातिनिधिक नाही. १११ आमदारांचा पाठिंबा असणाऱ्या भाऊसाहेब हिरे यांचा समावेश मंत्रिमंडळात का केला नाही?'

समोर बसलेले यशवंतराव ताडकन् म्हणाले, 'विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला हवी?' या टोल्याने सभागृहात हशा पिकला व प्रश्नकर्त्या आमदाराचा चेहरा केविलवाणा झाला.

जनतेने काँग्रेसला बहुमत दिले असून मंत्रीमंडळ निवडणे हा सत्ताधारी पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे, त्यात विरोधकांनी (ज्यांचा जनतेने पराभव केला आहे) नाक खूपसू नये असे यशवंतरावांना सुचवायचे होते.

# ही माझी नीती नाही !

१९५७ च्या सुमारास महाराष्ट्र काँग्रेसमध्ये भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण असे दोन गट निर्माण झाले होते. एका वर्षापूर्वीच द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रीपदासाठी दोघांमध्ये अटीतटीची स्पर्धा झाली होती व त्यात यशवंतरावांचा विजय झाला होता. त्यानंतर काही दिवसांनी भाऊसाहेबांच्या कन्येचे लग्न ठरले. विवाह समारंभ मालेगाव येथे संपन्न होणार होता. भाऊसाहेबांनी यशवंतरावांना आग्रहाचे निमंत्रण दिले. यशवंतरावांनीही लग्नाला उपस्थित राहण्याचे ठरवले. ही बातमी वसंतराव नाईक वगैरे लोकांना समजल्यावर त्यांनी यशवंतरावांकडे धाव घेतली. सगळेजण म्हणाले, 'साहेब, काय वाट्टेल ते झाले तरी तुम्ही या समारंभाला जाऊ नका. त्याचा फायदा भाऊसाहेब हिरे जिल्ह्यातील आपले वजन वाढविण्याकरिता करतील.' पण यशवंतरावांनी या सल्ल्याकडे सरळ सरळ दुर्लक्ष केले. ते ठरल्याप्रमाणे लग्नाला गेले.

यशवंतराव आल्याने सर्वांनाच बरे वाटले. भाऊसाहेबांना खूप आनंद झाला. त्या समारंभात वि.वा. नेने नावाचे यशवंतरावांचे जुने मित्र त्यांना म्हणाले, 'तुम्ही या लग्नाला येणार नाही, असा जोरात प्रचार या बाजूस चालला होता. पण शेवटी तुम्ही आलातच तर.' साहेब म्हणाले, 'हे बघ बापू, माझे व भाऊसाहेबांचे मतभेद आहेत हे खरे, पण ते राजकीय पातळीवर आहेत. त्यांचे आणि माझे वैयक्तिक भांडण थोडेच आहे? विवाह समारंभ हा खाजगी समारंभ आहे. त्याच्यात राजकारण आणणे योग्य नाही. ही माझी नीती नाही. असे वागण्याची माझी पद्धत नाही.'

राजकीय मतभेदांमुळे वैयक्तिक संबंधात दुरावा निर्माण होऊ द्यायचा नाही, हे पथ्य यशवंतरावांनी आयुष्यभर पाळले.

# स्वराज्य सर्वांच्या कल्याणासाठी आलेय !

१ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले, त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची मागणी वाढू लागली होती. अशातच १९५७ साली विधानसभेची निवडणूक लागली. जनमत काँग्रेसला अनुकूल नव्हते. यशवंतराव स्वत: कराड मतदार संघातून उभे राहिले. गावोगाव प्रचारसभा घेऊ लागले.

एके दिवशी कराड जवळच्या शामगाव येथे प्रचारासाठी ते गेले. गावकऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. मिरवणूक काढली. पण वेशीजवळ हरिजनांचा समूह स्तब्ध उभा होता. त्यांनी प्रचार सभेवर बहिष्कार टाकला होता. यशवंतराव अस्वस्थ झाले. सभास्थानाकडे जाण्याअगोदर त्या लोकांजवळ गेले. त्यांची विचारपूस केली. त्यांचा म्होरक्या म्हणाला, 'साहेब, आम्ही तुमच्यावर खूप प्रेम करतो. मतदानसुद्धा तुम्हालाच करणार आहोत, पण तुम्ही आमची व्यथा ऐकून घ्या. आम्ही लोकांनी गावात कसे यावे? आम्हाला गावात यायला बंदी आहे, आमच्यावर गावाने बहिष्कार टाकलाय. आम्हाला आडावर पाणी भरू दिले जात नाही. शेतावर मजूरी मिळत नाही. मुलांना शाळेत बसू देत नाहीत. पोळ्याला आम्ही आमच्या बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढली म्हणून गावकरी रागावलेत. तुम्हीच सांगा, आम्ही काय करू?'

स्वतंत्र भारतातील जातीय तणाव पाहून यशवंतरावांना अपार वेदना झाल्या. त्यांनी हाताला धरून त्यांना सभास्थानी नेले. सभा सुरू झाली. आपल्या भाषणात साहेब म्हणाले, 'गावकरी बंधूंनो, तुम्ही मला मतदान करणार यात मला आनंद नाही. कारण तुम्ही तुमच्या गावात गुण्यागोविंदाने वागत नाही. जोपर्यंत तुम्ही तुमच्या एका भावाला बरोबरीची वागणूक देत नाही, तोपर्यंत तुमच्या प्रेमाचा व तुमच्या मताचा मला काय फायदा? स्वराज्य सर्वांच्या कल्याणासाठी आलेय. मोठेपणाच्या जुन्या कल्पना सोडून द्या. गांधीजींचा त्याग आठवा.'

यशवंतरावांचे हे आवाहन लोकांच्या हृदयाला भिडले. त्यांनी हरिजनांना सामावून घेतले. मते मागण्यासाठी गेलेले यशवंतराव मतदारांचीच कानउघडणी करून आले.

# प्रामाणिकपणाची मीठभाकरी

सन १९५७ च्या विधानसभा निवडणुकीनंतर यशवंतराव पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यांचे भाचे श्री बाबुराव कोतवाल हे बाळासाहेब देसाईंचे स्वीय सहाय्यक होते. बाळासाहेब तेव्हा दळणवळण, सिंचन व ऊर्जा या खात्यांचे मंत्री होते. बाबुरावांनी स्वातंत्र्यचळवळीत केलेले काम बाळासाहेबांना माहित होते, म्हणून त्यांनी कोतवालांची निवड केली होती. बाबुराव यशवंतरावांच्या 'सह्याद्री' बंगल्यावर राहू लागले. कामाच्या निमित्ताने बाबुरावांना दररोज अनेक क्षेत्रांतील व वेगवेगळ्या पक्षातील लोक भेटत असत. ते त्यांच्याशी विशेष सलगीने व आपुलकीने वागू लागले. रोज रात्री घरी गेल्यावर यशवंतराव बाबुरावांची आवर्जून चौकशी करायचे.

असेच एकदा रात्रीच्या वेळी सर्वजण जेवण करीत असताना जवळच असलेल्या बाबुरावांना उद्देशून यशवंतराव म्हणाले, 'बाबुराव, बरेच दिवस बोलेन बोलेन म्हणत होतो, तो योग आज आलाय. तू एका जबरदस्त मंत्र्याचा स्वीय सहाय्यक म्हणून काम करतो आहेस. तुमच्याकडे महत्त्वाची खाती आहेत. तू माझा भाचा आहेस हे अनेकांना माहित आहे. पण एक गोष्ट ध्यानात ठेव. तुझ्या ऑफिसमध्ये आणि ऑफिसबाहेरही अनेक लोक तुला भेटायला येतील, गोड बोलतील, हॉटेलमधे नेऊन लालूच दाखवतील, पैशाचे अमीष दाखवतील. पण तू अतिशय सावध राहिले पाहिजेस. काहीही झाले तरी तू अशा प्रलोभनाला भुलू नकोस. कारण तू फसलास की माझे नाक कापले जाईल. जी आपली प्रामाणिकपणाची मीठभाकरी आहे त्यातच खरे सुख आहे. आपल्याला तूप-साखरेची चोरी नको. सावध रहा...!'

मामाचा हा कानमंत्र बाबुरावांना खूप उपयोगी पडला. आपल्या सर्व कारकिर्दीत त्यांनी यशवंतरावांना वाईट वाटेल किंवा कमीपणा येईल असे काहीही केले नाही.

# वा गड्यांनो...अगदी हुबेहूब..!

१९५७ सालची गोष्ट. दहिवडी (जि.सातारा) येथील बाजारतळावर यशवंतरावांची प्रचारसभा आयोजित केली होती. यशवंतरावांची वेशभूषा हा एक ब्रॅण्ड बनला होता व महाराष्ट्रातील अनेक नेते त्यांचे अनुकरण करीत असत. दहिवडी शेजारच्या शिंदी भांडवली गावच्या माळावर कैकाड्यांची काही बिऱ्हाडं रहात होती. याशिवाय दरवेशी आणि बहुरूप्यांची सुद्धा काही कुटुंबे तिथे होती. तुकाराम व आत्माराम या दोघा बहुरूप्यांना यशवंतरावांच्या सभेची बातमी कळाली. त्यादिवशी आपण यशवंतरावांचे सोंग करायचे असे दोघांनी ठरवले. पण साहित्य कोठून आणायचे? तुकारामाने गावच्या पाटलाकडून पांढरं धोतर, टोपी व जाकीट आणलं. एका वृद्ध स्वातंत्र्यसैनिकाकडून चपला आणल्या. आत्मारामने इंग्रज पोलीस शिपायाचे सोंग आणायचे ठरवले होते. त्यानेही शिपायाचा पोशाख कोणाकडून तरी मागून आणला. सभेच्या दिवशी दोघेजण बाजारतळावर गेले. टोपी, जाकिट, धोतर व कोल्हापुरी चपला असा वेश करून तुकाराम सुहास्य मुद्रेने लोकांना हात जोडून नमस्कार करीत होता, तर एक पाय गुडघ्यात बांधलेल्या अवस्थेत खाकी कपडे व कमरेला पट्टा घालून आत्माराम त्याच्याशेजारी उभा होता. दुपारी यशवंतराव आले. भाषण करण्यापूर्वी त्यांना विंचू दंश झाला होता. तरीही ते तास-दीड तास बोलले. सभा संपल्यावर स्टेजवरून खाली उतरून ते गाडीकडे निघाले. विंचूदंशाच्या कळा अंगभर येत होत्या. ते गाडीत बसणार इतक्यात गर्दीत उभा असणाऱ्या 'यशवंतरावांकडे' (तुकारामकडे) त्यांचे लक्ष गेले. आपल्या पोशाखाची केलेली नक्कल बघून यशवंतराव त्यांच्याजवळ गेले व पाठीवर थाप टाकून म्हणाले, 'वा गड्यांनो, अगदी हुबेहूब..!'

खुद्द यशवंतरावांचा स्पर्श झाला या भावनेने त्या दोघांना आनंदाने रडूच आले. असे होते यशवंतराव! सामान्यातल्या सामान्य माणसाकडे जातीने लक्ष देणारे.

# जीव लावणारा नेता.



१९५७ सालची गोष्ट. महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेससमोर कडवे आव्हान उभे केले होते. यशवंतरावांचे प्रचारदौरे सुरू होते. त्यावेळी हिंगोली मतदारसंघातून नारायण गोरेगावकर उमेदवार म्हणून उभे होते. त्यांना पोटाचा विकार होता. यशवंतराव त्यांच्या प्रचारासाठी हिंगोलीला गेले, तेव्हा त्यांना म्हणाले, 'गोरेगावकर, आता मतदारसंघ पिंजून काढा.' गोरेगावकर खालच्या आवाजात म्हणाले, 'साहेब, मला पोटाचा विकार असल्याने प्रचाराची दगदग सोसवत नाही. तरीही मी जमेल तेवढा लोकसंपर्क साधतो.'

ते बोलणे तिथेच थांबले. यथावकाश निवडणुका झाल्या. गोरेगावकर निवडून आले. आमदार झाले. मुंबईला आले. काही दिवसांपूर्वी यशवंतरावांशी झालेले संभाषण ते विसरून गेले होते. पण यशवंतराव विसरले नव्हते. विधानसभेच्या बैठकीच्या पहिल्याच दिवशी यशवंतरावांनी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये त्यांच्या तपासणीची सोय केली आणि त्यांना तिथे घेऊन जाण्यासाठी आपले सचिव डोंगरे यांना पाठवले. तिथे गोरेगावकरांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्या शस्त्रक्रियेचा खर्चदेखील यशवंतरावांनी गोरेगावकरांवर पडू दिला नाही. आपल्या कार्यकर्त्यांच्या वेदना जाणणारा, त्यावर मायेने फुंकर घालणारा असा नेता विरळाच!

# महामार्ग करायला लागा !

१९५७ साली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. यशवंतराव तेव्हा द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी जनतेने आंदोलन सुरू केले होते. निवडणुकीच्या प्रचारासाठी पं. नेहरू मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले होते. यशवंतरावही या प्रचार दौऱ्यात नेहरूंबरोबर मराठवाड्यात फिरत होते. एका संध्याकाळी औरंगाबाद येथे पं.नेहरूंचे भाषण झाले. त्यादिवशी यशवंतरावांची तब्येत बरी नसल्याने ते मुक्कामाच्या खोलीतच होते. पंडितजींच्या भाषणाची टेप नंतर पोलीस अधिकाऱ्यांनी यशवंतरावांना ऐकवली. त्या भाषणात नेहरू म्हणाले होते की, 'बहुसंख्य मराठी भाषकांना जर मराठी भाषेचे वेगळे राज्य झाले पाहिजे असे वाटत असेल तर ते त्यांना मिळेलही.' महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा हा पहिला अधिकृत संकेत होता. नेहरूंचे ते भाषण ऐकून यशवंतरावांना खूप आनंद झाला. त्यावेळी सनदी अधिकारी भुजंगराव कुलकर्णी जवळच उभे होते. यशवंतराव त्यांना म्हणाले, 'तुम्ही आता औरंगाबाद-पुणे- मुंबई असा सरळ आणि कमीत कमी अंतराचा महामार्ग तयार करायला लागा. मराठी भाषिक विभागांच्या एकात्मिकरणाच्या आणखी काही कल्पना असतील तर त्याही पटापट मांडायला लागा. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आता दूर नाही.'

त्यानंतर तीन वर्षांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पण यशवंतरावांनी मराठी भाषिकांना एकत्र आणण्याची प्रक्रिया त्यापूर्वीच सुरू केली होती.



# माधवरावांचे आयुष्य वाढवा !

१९५७ साली विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. संयुक्त महाराष्ट्र समिती व शेतकरी कामगार पक्ष यांची शक्ती वाढली होती. समितीकडे आचार्य अत्रे, कॉम्रेड डांगे, एस. एम. जोशी, नाना पाटील, भाई माधवराव बागल या मैदान गाजविणाऱ्या वक्त्यांची मोठी फौज होती. सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात भाई माधवराव बागल यांनी कॉंग्रेसच्या विरोधात जोरदार प्रचार सुरू केला होता. यशवंतराव कराड मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे होते. माधवरावांनी याच मतदारसंघातील मसूर गावी प्रचारसभा घेतली. भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, 'बांधवांनो, माझे आता वय झाले आहे. पण यशवंतराव चव्हाणांना तुम्ही हरवलेले मी माझ्या डोळ्यांनी पाहीन, तेव्हाच सुखाने मी डोळे मिटेन.'

त्यानंतर दोन-तीन दिवसांनी त्याच गावात यशवंतरावांची प्रचार सभा होती. माधवराव बागल यांच्या भाषणाविषयीची व त्यांनी केलेल्या आवाहनाविषयीची माहिती काही कार्यकर्त्यांनी यशवंतरावांना दिली होती. आपल्या मुद्देसूद भाषणाच्या शेवटी यशवंतराव मिश्किलपणे म्हणाले, 'भाई माधवराव बागल मला वडीलबंधूप्रमाणे आहेत. त्यांनी एवढ्या लवकर डोळे मिटावेत असे मला वाटत नाही. म्हणून तुम्ही मला मत देऊन त्यांचे आयुष्य वाढवा.'

सभ्यता न सोडता विरोधकांना गारद करण्याचे कसब यशवंतरावांच्या अंगी होते. त्यांच्या युगप्रवर्तक नेतृत्वाचे हेच वैशिष्ट्य होते.

# स्थितप्रज्ञ यशवंतराव

सन १९५७ सालच्या विधानसभेची निवडणूक सुरू होती. दहिवडी (जि.सातारा) येथे यशवंतरावांची प्रचारसभा होती. दुपारी एकच्या सुमारास यशवंतरावांचे दहिवडी गावात आगमन झाले. त्यांच्याबरोबर श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर, आमदार भिंगारदेवे, इत्यादी नेते होते. गावकऱ्यांनी उघड्या, सजवलेल्या जीपमधून यशवंतरावांची मिरवणूक काढली. गावभर फिरून शेवटी मिरवणूक सभास्थळी आली. यशवंतराव, मालोजीराजे व इतर नेते स्टेजवर जाऊन बसले. स्वागत व सत्कार सुरू झाले. इतक्यात स्टेजवर बसलेले सगळे नेते अचानक उठले. स्टेजवरील गाद्या उचकटल्या गेल्या. हा गोंधळ पाहून समोरचे सगळे लोकही उठले. 'काय झालं? काय झालं?' असे जो तो इतरांना विचारू लागला. माईकवरून एक कार्यकर्ता लोकांना खाली बसण्याचे आवाहन करीत होता. कुणीतरी म्हणालं, 'यस्वंतरावास्नी ईच्चू चावला.' हळूहळू गोंधळ कमी झाला. मांत्रिक आणि वैद्य स्टेजकडे धावले. यशवंतराव शांतपणे उठले. त्यांनी सारे उपचार नाकारले. माईक हातात घेतला. तेवढ्यात एका माणसाने पानाचा विडा दिला. तो तोंडात टाकून काही घडलेच नाही अशा थाटात यशवंतरावांनी बोलायला सुरुवात केली. खळ्या, कोपरखळ्या व टाळ्यांनी सभा रंगली. भाषण संपल्यावर यशवंतराव खाली आले व पुढच्या सभेत भाषण करण्यासाठी निघून गेले.

त्या वेळी दहा-बारा वर्षांचे असलेले; पुढे प्रसिद्ध लेखक म्हणून मान्यता पावलेले लक्ष्मण माने त्या सभेला हजर होते. पुढे १९८० च्या दरम्यान 'उपरा' या आत्मकथनामुळे त्यांची यशवंतरावांशी ओळख झाली. एकदा त्यांच्याबरोबर गाडीतून प्रवास करताना लक्ष्मण मानेंनी त्यांना दहिवडीच्या त्या सभेची आठवण करून दिली व म्हणाले, 'साहेब, त्यावेळी तुम्हाला विंचवाच्या कळा नव्हत्या का येत?' इतका जुना प्रसंग लक्षात ठेवल्याबद्दल लक्ष्मण मानेंचे कौतुक करून यशवंतराव म्हणाले, 'अरे, शेवटी तो विंचूच ना? विष तर चढतच होते. कळाही सुरू होत्या. पण उन्हातान्हातनं आणि लांबवरनं माणसं आली होती. सभा रद्द केली असती, तर त्यांचा केवढा विरस झाला

असता? आणि विंचवानं कोणी मरत नाही. आणखी एक गंमत सांगतो, मी पोटात असताना देवराष्ट्रेत आईला विंचू चावला होता, त्यामुळे मला विंचू फारसा चढत नाही, असं आईनं मला सांगितलं होतं.'

'पण तुम्ही तर चांगलं तास-दीड तास भाषण केलंत.'

'अरे, त्याचं असं आहे, विंचू त्याचं काम करीत होता, मी माझं काम करीत होतो. सभा उधळली जाणं पक्षाला परवडणारं नव्हतं आणि विंचू चढवणारी माणसं जशी असतात, तशी तो उतरवणारी माणसंही असतातच की. राजकारणातही कुणी चढवणारे असतात, कुणी पाडणारे असतात. आपण आपलं काम करीत राहिलं पाहिजे.'



# मी जनतारूपी दुधावरची साय आहे !



सन १९५५ नंतर संयुक्त महाराष्ट्राची मागणी जोर धरू लागली. एस. एम. जोशी, सेनापती बापट इत्यादी ज्येष्ठ नेत्यांचे नेतृत्व लाभल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा बघता बघता जनतेचा लढा बनला. अशा वातावरणातच १९५७ ची विधानसभा निवडणूक झाली व यशवंतराव दुसऱ्यांदा मुख्यमंत्री बनले. संयुक्त महाराष्ट्र यशवंतरावांनाही हवाच होता, पण त्यांचा मार्ग वेगळा होता. अगोदर द्विभाषिक राज्य चांगले चालवू व नंतर नेहरूंचे मन वळवून संयुक्त महाराष्ट्र मिळवू अशी त्यांची भूमिका होती. प्रतापगडावरील छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पं.नेहरू आले असताना संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी अतिशय शांततामय पण अतिशय प्रभावी निदर्शने केली. त्यानंतर पं.नेहरूंनी यशवंतरावांशी महाराष्ट्राच्या निर्मिती विषयी गांभीर्याने चर्चा केली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती फायदेशीर असल्याचे यशवंतरावांनी नेहरूंना पटवून दिले आणि अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे श्रेय घेण्याची स्पर्धाच लागली. पण यशवंतरावांनी कधीही स्वत:च्या योगदानाची जाहिरात केली नाही. या काळात त्यांना अपार मानसिक त्रास झाला. पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे श्रेय त्यांनी जनतेला दिले. सांगलीमध्ये एका सभेत अनेक वक्त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश आणल्याबद्दल यशवंतरावांवर स्तुतीसुमने उधळली. पण त्याच सभेत बोलताना अतिशय नम्रपणे यशवंतराव म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मी सोडविलेला नाही. महाराष्ट्रातील चार कोटी जनतेचे ते श्रेय आहे. मी म्हणजे जनतारूपी दुधावरची साय आहे. दूधच नसेल तर साय कोठून येईल?'

# अभ्यासांती निर्णय..!

द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी अनेक नव्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली. यासाठी त्यांना नव्या दमाच्या नि:स्वार्थी सहकाऱ्यांची गरज होती. यशवंतरावांनी जिल्ह्याजिल्ह्यात नवे नेतृत्व उभे केले. खानदेशातील मधुकरराव चौधरींना वयाच्या २८ व्या वर्षी यशवंतरावांनी राज्यमंत्रीपद दिले आणि त्यानंतर २१ वर्षे मधुकररावांनी महाराष्ट्राची बहुमोल सेवा केली. त्या काळी राज्यमंत्र्यांकडे कोणत्याच विभागाच्या फाईली जात नसत. याबद्दल मधुकररावांनी एकदा यशवंतरावांकडे तक्रार केली. यशवंतरावांनी ताबडतोब आदेश काढला की यापुढे प्रत्येक फाईल उपमंत्र्याकडे गेली पाहिजे. पण कोणतीही फाईल आठवड्यापेक्षा अधिक काळ मंत्र्यांना आपल्याकडे ठेवता येणार नाही, असाही दंडक त्यांनी घालून दिला. त्यानंतर मधुकररावांकडे पहिली फाईल आली, ती तापी खोऱ्याच्या पाणी वाटपाची. त्यावेळी चीफ इंजिनिअर गुजराती असल्याने त्यांनी गुजरातला ६७% तर महाराष्ट्राला ३३% पाणी द्यावे, अशी शिफारस केली होती. तापीचा जलप्रवाह पाहता यापेक्षा अधिक पाणी वापरणे अशक्य आहे, असे कारण त्यांनी यासाठी दिले होते. हे पाणीवाटप महाराष्ट्रावर अन्याय करणारे आहे असे मधुकररावांना वाटले. म्हणून त्यांनी त्या विभागाचे कॅबिनेट मंत्री बाळासाहेब देसाई यांना विचारले, 'या फाईलसंबंधी अधिक विचार करण्यासाठी मला एका आठवड्यापेक्षा अधिक काळ ही फाईल माझ्याकडे ठेवण्याची परवानगी द्याल का?'

बाळासाहेब म्हणाले, 'फाईल ठेवण्याच्या कालावधीसंबंधीचा आदेश मुख्यमंत्र्यांचा असल्याने तुम्ही त्यांची परवानगी घ्यावी.' मग चौधरींनी यशवंतरावांना विचारले. त्यांनी अतिशय आनंदाने अधिक काळ फाईल ठेवण्याची परवानगी दिली व म्हणाले, 'तापी नदीचे पाणीवाटप हा महत्त्वाचा विषय आहे, त्यामुळे सविस्तर अभ्यास करून तुम्ही तुमचे म्हणणे लिखित स्वरूपात सादर करा.' अशी मोकळीक मिळताच चौधरींनी तंत्रज्ञ व पाणीवाटपाचे कायदे जाणणाऱ्या तज्ज्ञांच्या सहकार्याने या प्रकल्पाचा पूर्ण अभ्यास केला आणि महाराष्ट्राच्या वाट्याला ६६.५% तर गुजरातच्या वाट्याला ३३.५% पाणी देण्याची शिफारस केली. यशवंतरावांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मधुकररावांची शिफारस उचलून धरली व महाराष्ट्राच्या वाट्याला दोन तृतीयांश पाणी मिळाले. यामागे मधुकररावांचे कष्ट आणि यशवंतरावांची प्रेरणा होती.

# अनाकलनीय यशवंतराव.

यशवंतराव राजकारणी होते हे खरेच आहे. पण नेते मंडळी सदासर्वकाळ राजकारणच करतात हा गैरसमज तेव्हाही होता व आजही आहे. अनेकदा यशवंतरावांनी राजकारणाच्या पलिकडे जाऊन निर्णय घेतले व तशी कृती केली. असाच एक प्रसंग.

१९५७ साली प्रतापगडावरील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरणासाठी पंतप्रधान पं.नेहरू महाराष्ट्रात येणार होते. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्रासाठीचे आंदोलन पेटले होते व नेहरूंना अनावरण करू देणार नाही अशी भूमिका आंदोलकांनी सुरुवातीला घेतली होती. पण विरोधी पक्षनेते एस. एम. जोशी यांच्याशी यशवंतरावांनी चर्चा केली व समितीच्या कार्यकर्त्यांनी शांततामय मार्गाने निदर्शने करावीत असे ठरले. त्याप्रमाणे वाईपासून पसरणीच्या घाटापर्यंत रस्त्याच्या एका बाजूला संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे फलक घेऊन उभे होते, तर दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते नेहरूंच्या स्वागतासाठी उभे होते.

प्रचंड गर्दी जमली होती. थोड्याच वेळात नेहरूंचे आगमन होणार होते. रस्त्याच्या एका बाजूला यशवंतराव उभे होते तर त्यांच्या समोरच्या बाजूस आंदोलनाचे नेते आचार्य प्र. के. अत्रे व समितीचे इतर नेते उभे होते. वातावरणात प्रचंड तणाव होता. दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते परस्परविरोधी घोषणा देत होते. इतक्यात यशवंतरावांनी आपली बाजू सोडली व सहजपणे फिरत पुढे जावे तसे ते समितीच्या नेत्यांजवळ पोचले. आचार्य अत्र्यांच्या जवळ जाऊन काही न बोलता त्यांनी अत्र्यांच्या बुशकोटाचे खुले राहिलेले बटण लावून दिले, आणि जसे आले तसेच सहजपणे ते परत आपल्या जागेवर जाऊन उभे राहिले. अत्रे व समितीचे नेते अवाक् होऊन यशवंतरावांकडे पहात होते आणि यशवंतराव त्यांच्याकडे पाहून गाल्यातल्या गालात हसत होते.

# सामाजिक समतेच्या दिशेने !

महार वतने ही विसाव्या शतकातील एक प्रकारची वेठबिगारीच होती. त्यामुळे त्या समाजाच्या प्रगतीमध्ये मोठा अडथळा निर्माण झाला होता. ही वतने नष्ट होणे गरजेचे होते. कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छ.शाहू महाराजांनी २९ जून १९१८ रोजी कायद्याने आपल्या संस्थानातील महार वतने नष्ट केली होती.

महार वतने नष्ट करण्यासाठीचा ठराव प्रथम १९२७ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई राज्याच्या कौन्सिलमध्ये आणला होता. त्यावेळी हा ठराव संमत होऊ शकला नाही. त्यानंतर १९३७ ते १९५६ या काळात चार ते पाच वेळा हा ठराव विधानसभेत मांडला गेला होता. या काळात बाळासाहेब खेर व मोरारजी देसाई हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी अस्पृश्य समाजाची ही मागणी फेटाळून लावली. परंतु १९५६ साली यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्याबरोबर या धोरणात महत्त्वाचा बदल झाला. 'महार वतने म्हणजे मध्ययुगीन सरंजामशाहीचे अवशेष असून अस्पृश्य समाजाला सन्मानाने जगायचे असेल तर महार वतने नष्ट केली पाहिजेत' हा विचार शासनाने मान्य केला. इतकेच नव्हे तर ही वतने नष्ट करण्याचा आग्रह धरला. ही वतने नष्ट केली तर शासनाला दरवर्षी सुमारे १ कोटी ८ लाख रुपये जादा खर्च करावा लागेल, म्हणून शासनाने ही वतने नष्ट करू नयेत असा काही मंडळींनी आग्रह धरला. त्यावेळी यशवंतराव ठामपणे म्हणाले, 'हा प्रश्न पैशांचा नसून मानवी मूल्यांचा आहे. यासाठी शासनाला कितीही खर्च आला तरी समाजजीवनावरील हा डाग धुवून काढला पाहिजे.'

अखेर शासनाने कायदा करून महार वतने नष्ट केली. सामाजिक समतेच्या दिशेने महाराष्ट्राने एक पाऊल पुढे टाकले.

# ...तर मुख्यमंत्रीपद काय कामाचे ?

सन १९५६ च्या नोव्हेंबर महिन्यात द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यापासून यशवंतरावांनी कल्याणकारी योजनांना गती द्यायला सुरूवात केली. दलितांबद्दलची कणव आणि सामाजिक न्यायाची प्रस्थापना करणे हे तर त्यांच्या राजकीय जीवनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी दारिद्र्यामुळे ज्यांना शिक्षणापासून वंचित रहावं लागलं होतं अशा सर्व जातीधर्मांच्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावं असा प्रस्ताव समाजकल्याण विभागाच्या वतीने १९५८ साली मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडला गेला. नऊशे रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण देण्यात यावं असा हा प्रस्ताव होता. यशवंतरावांच्या प्रेरणेनेच हा प्रस्ताव तयार झाला होता. कल्याणकारी राज्याचे एक पुरोगामी पाऊल म्हणून अनेकांनी या निर्णयाचे स्वागत केले, परंतु तेवढाच कडाक्याचा विरोध काहींनी केला. त्यावेळी जीवराज मेहता द्वैभाषिकाचे अर्थमंत्री होते. ते म्हणाले,'या योजनेसाठी लागणारा पैसा सरकारकडे नाही.' इतर काही मंत्री म्हणाले की, यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावेल. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात राहणाऱ्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना क्रांतिकारक ठरणार होती आणि काहीही करून यशवंतरावांना ती मंजूर करून घ्यायची होती. त्यांनी विरोध करणाऱ्यांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला, पण या योजनेसाठी राज्याच्या तिजोरीत पुरेसा पैसा नाही, हे काहींचे तुणतुणे थांबेना. शेवटी 'गरीब बांधवांसाठी वरदान ठरणारी इतकी महत्त्वाची व पुरोगामी योजनादेखील आम्ही हाती घेऊ शकणार नसू तर हे मुख्यमंत्रीपद काय कामाचे?' असे निर्वाणीचे उद्‌गार काढून उद्‌वेगाने यशवंतराव बैठकीतून निघून गेले. वातावरण गंभीर झाले. यशवंतरावांच्या सहकाऱ्यांनी योजनेच्या विरोधकांना समजावण्याची शिकस्त केली. 'तुटेपर्यंत ताणू नका' असे परोपरीने सांगितले. शेवटी दबावाखाली का होईना पण योजनेला असणारा विरोध मावळला. यशवंतरावांना परत बैठकीत आणलं गेलं व वार्षिक नऊशे रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याची योजना (ई.बी.सी. सवलत) मंजूर झाली. आपले मुख्यमंत्रीपद पणाला लावून यशवंतरावांना ही योजना मंजूर करून घ्यावी लागली हा इतिहास आहे.

# ते मुख्यमंत्री आणि हे मुख्यमंत्री !

यशवंतरावांना त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या प्रारंभीच मोरारजी देसाई यांच्यासारख्या अनुभवी व निष्णात व्यक्तीबरोबर काम करण्याची संधी मिळाली. गृहखात्याचे उपमंत्री म्हणून काम करताना यशवंतरावांना मोरारजींकडून खूप काही शिकायला मिळाले. असे असले तरी मोरारजींचा हट्टी व हेकेखोर स्वभाव मात्र यशवंतरावांनी स्वत:मध्ये येऊ दिला नाही. मोरारजींना माणसांपेक्षा तत्त्वे अधिक प्रिय होती, तर तत्त्वे ही शेवटी माणसांसाठीच असतात अशी यशवंतरावांची धारणा होती. म्हणूनच मोरारजींनी निदर्शकांवर गोळीबार केला तर यशवंतरावांनी चातुर्याने समस्या सोडविल्या.

या दोन मुख्यमंत्र्यांच्या व्यक्तिमत्वातील फरक दर्शविणारा हा एक प्रसंग. एकदा एका प्रसिद्ध पत्रकाराने मुख्यमंत्री मोरारजी देसाईंना भेटण्यासाठी वेळ मागितली. मोरारजींनी वेळ दिली, पण तो पत्रकार ठरलेल्या वेळी येऊ शकला नाही. मोरारजी भडकले. त्यानंतर त्या पत्रकाराने अनेकदा भेटण्यासाठी वेळ मागितली, पण मोरारजी उत्तर द्यायलाही तयार नव्हते. अखेर त्या पत्रकाराने एक सविस्तर पत्र लिहून एका अनपेक्षित अडचणीमुळे आपण येऊ शकलो नाही असे सांगून माफी मागितली तेव्हा कुठे मोरारजींनी त्याला भेटीची वेळ दिली. अर्थात ही मुलाखतही 'थंड'च होती.

असाच प्रसंग मुख्यमंत्री यशवंतरावांच्या बाबतीत घडला. एका इतिहास संशोधकाने एकदा यशवंतरावांना मुलाखतीसाठी वेळ मागितली. ती तत्परतेने देण्यात आली, पण काही अडचणीमुळे ते संशोधक त्यावेळी येऊ शकले नाहीत. मग त्यांनी दुसऱ्यांदा भेटीची वेळ मागितली, तेव्हाही यशवंतरावांनी त्यांना लगेच वेळ दिली. पण त्याहीवेळी ते संशोधक गैरहजर राहिले. त्या संशोधकाने आपले पुस्तक पूर्ण करून छापायला पाठवले तरी यशवंतरावांची मुलाखत राहून गेल्याची खंत त्यांना होती. म्हणून त्यांनी आणखी एकदा भेटीसाठी वेळ मागितली आणि विशेष म्हणजे ती त्यांना मिळाली व एकदाची ती मुलाखत पार पडली. त्या दिवशी यशवंतरावांनी आपल्या दैनंदिनीत एवढीच नोंद केली- 'काय माणसे असतात !'

# आज मला कृतार्थ वाटते !

१९५६ सालच्या ऑक्टोबर महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्यानंतर पुढच्याच महिन्यात यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. बाबासाहेबांच्या धर्मांतराने देश ढवळून निघाला. पूर्वाश्रमीचे अस्पृश्य महार आता बौद्ध बनले. त्यांनी हिंदू धर्माशी असलेले संबंध तोडले. भारतीय घटनेने अनुसूचित जातींच्या विकासासाठी आरक्षण व इतरही अनेक सवलती बहाल केल्या होत्या.

साहेब मुख्यमंत्री असताना घटनेनुसार मागासवर्गीयांना अनुसूचित जाती म्हणून मिळणाऱ्या सवलती चालू ठेवायच्या, की बंद करायच्या असा प्रश्न मंत्रीमंडळासमोर चर्चेला आला. घटनेनुसार सरकारवर तसे बंधन नव्हते. बाबासाहेबांचा काँग्रेसविरोध सर्वश्रुत होता व धर्मांतरामुळे मंत्रिमंडळामध्ये त्यांच्याविषयी खूप नाराजी होती. त्यामुळे सवलती चालू ठेवण्याच्या मुद्यावर कडाक्याची चर्चा झाली. मंत्रिमंडळातील सदस्यांची मते आजमावण्यात आली, तेव्हा बहुसंख्य सदस्य सवलती चालू ठेवण्याच्या विरोधात आहेत असे दिसून आले. स्वत: साहेब आणि मधुकरराव चौधरींसारखे इतर दोन मंत्रीच फक्त सवलती चालू ठेवाव्यात या मताचे होते. कारण धर्म बदलला म्हणून मागासलेपणा जात नाही व कायदेशीर बंधन नसले तरी नैतिकदृष्ट्या सवलती चालू ठेवणे गरजेचे आहे अशी या चौघांची भूमिका होती. पण फक्त चौघांना असे वाटून काय उपयोग? या मुद्यावर मुख्यमंत्रीच अल्पमतात आले होते. असा विचित्र प्रसंग प्रथमच निर्माण झाला होता. साहेब खूप दु:खी झाले. त्यांनी अतिशय कळवळून बाजू मांडली. शेवटी बरीच चर्चा होऊन हा विषय तहकूब ठेवण्यात आला व मुख्यमंत्र्यांनी याबाबत पंतप्रधान पं.नेहरुंशी चर्चा करावी असे ठरले.

यशवंतरावांनी पंडितजींशी चर्चा करुन होकार मिळविला व त्या चर्चेचा वृत्तांत दुसऱ्या बैठकीत त्यांनी मंत्रिमंडळाला सांगितला. अखेर नवबौद्धांना अनुसूचित जातीसाठीच्या सवलती चालू ठेवण्याच्या ऐतिहासिक निर्णयाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. ती बैठक संपल्यावर यशवंतराव समाधानाने त्यांच्या सहकाऱ्याला म्हणाले, 'आज मला कृतार्थ वाटते !

# अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार चांगले!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनल्यावर यशवंतरावांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. असाच एक निर्णय होता, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत देण्याचा. ज्यांचे वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठीय शिक्षण मोफत करण्यात आले. हा निर्णय घेतल्यानंतर काही दिवसांनी पुण्यामध्ये एका चर्चासत्राचं आयोजन केलं गेलं होतं. योगायोगाने यशवंतरावही एका कार्यक्रमाच्या निमित्ताने तेव्हा पुण्यातच होते. संयोजकांनी त्यांना दहा मिनिटांसाठी चर्चासत्रास उपस्थित राहण्याची विनंती केली. यशवंतराव गेले. एका शिक्षणतज्ज्ञांनी यशवंतरावांना प्रश्न केला, 'आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मोफत करून तुम्ही कोणते संकट निर्माण करीत आहात याची तुम्हाला जाणीव आहे का?' या प्रश्नाचे उत्तरही त्यांनीच दिले. 'शिक्षणासंबंधी असले निर्णय घेऊन तुम्ही शिक्षित आणि प्रशिक्षित बेकारांची फौज निर्माण करीत आहात. हे बेकार लोक उद्या बंड करून उठतील, याचा काही विचार आपण केला आहे का?'

त्या तज्ज्ञांचे म्हणणे शांतपणाने ऐकून घेतल्यावर यशवंतराव म्हणाले, 'मी याचा जरूर विचार केलाय. माझं असं मत आहे की, अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार केव्हाही अधिक चांगले असतात आणि स्वतःचे व देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी जर उद्या त्यांनी बंड केले तर आमच्या निर्णयाचा हेतू सफल झाला असे मी मानेन.' या तोडीस तोड उत्तराने शिक्षणतज्ज्ञ निरुत्तर झाले व श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

# मुख्यमंत्री कुणासाठी थांबत नसतो !

वयाच्या अवघ्या बेचाळीसाव्या वर्षी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. वयाने त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ असणारे अनेक नेते काँग्रेसमध्ये होते. ते यशवंतरावांना मनापासून मान देत नसत, त्यांना पोरसवदा समजत. यशवंतराव मात्र त्यांना योग्य तो मान देत असत.

मुख्यमंत्री असताना एकदा ते विदर्भाच्या दौऱ्यावर गेले होते. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा हा विदर्भाचा पहिलाच दौरा होता. त्यावेळी बियाणी शेठ हे विदर्भातील मोठे नेते होते. यशवंतरावांनी त्यांना आपल्या दौऱ्यात बरोबर घेतले होते. नागपूरला मुक्काम होता. एके दिवशी सकाळी सर्वजण सर्किट हाऊसवर जमले. सकाळची मानवंदना झाली आणि मुख्यमंत्री गाडीत जाऊन बसले, पण गाडी सुटेना. यशवंतरावांनी कारण विचारले तेव्हा एक अधिकारी म्हणाला, 'शेठजींचा फोन चालू आहे.' सुमारे पाच सहा मिनिटे शेठजी फोनवर बोलत होते. तोपर्यंत सगळा ताफा जागेवरच थांबला होता. फोन संपल्यावर शेठजी आले आणि गाड्या सुरू झाल्या. यशवंतरावांना ते आवडले नाही. पण त्यांनी फारसे मनाला लावून घेतले नाही. मात्र दुसऱ्या दिवशीही तसेच झाले. मुख्यमंत्री आपल्या सहकाऱ्यांसह गाडीत बसल्यावर बियाणीशेठ स्वतःच्या गाडीतून उतरले आणि चालत जाऊन सर्किट हाऊसच्या व्हरांड्यात उभे राहून कुणाला तरी फोन लावू लागले. आता मात्र यशवंतराव संतापले. अधिकाऱ्यांना म्हणाले, 'गाड्या सुरू करा.'

कोणीतरी म्हणाले, 'शेठजींचा फोन चालू आहे.'

साहेब म्हणाले, 'त्यांना सांगा, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोणासाठी थांबत नसतो.'

आणि गाड्या सुटल्या. यशवंतरावांनी मुख्यमंत्रीपदाची शान नेहमीच राखली आणि वाढवली.

# सत्ता खाजगी कारणासाठी वापरायची नसते!

ह.रा. महाजनी हे यशवंतरावांचे मित्र आणि ज्येष्ठ पत्रकार होते. साहेबांवर आणि त्यांच्या राजकीय धोरणांवर अनेकदा ते जाहीर टीका करीत असत. अर्थात यामुळे त्यांच्या संबंधात दुरावा निर्माण झाला नाही. पण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यादरम्यान यशवंतरावांवर चहुबाजूंनी टीकेचा मारा होऊ लागला. जनता आणि पत्रकार साहेबांची भूमिका समजावून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते.

एकदा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत ह.रा. महाजनी व यशवंतरावांची भेट झाली. बोलता बोलता साहेब म्हणाले, 'तुम्ही आम्हाला मदत करा. भविष्यात आम्हीही तुम्हाला सहकार्य करू.' महाजनींनी आपल्या दैनिकामधून यशवंतरावांची संयुक्त महाराष्ट्रासंबंधीची भूमिका योग्यप्रकारे मांडावी अशी यशवंतरावांची अपेक्षा होती, पण महाजनींनी ही विनंती धुडकावून लावली आणि नंतरच्या काळात साहेबांवर स्वार्थीपणाचे आरोप करणारे पाच-सहा कठोर अग्रलेख लिहिले. खाजगीतही ते साहेबांवर टीका करीत, पण साहेब शांत होते. एकदा 'महाजनींना क्षमा का करता?' असे मित्रांनी विचारल्यावर साहेब म्हणाले, 'सत्ता ही खाजगी कारणासाठी वापरायची नसते. सर्वांनीच हे व्रत कायमचे पाळले पाहिजे.'

महाजनींची टीका कमी न होता उलट वाढली, तेव्हा साहेबांनी त्यांना फोन केला व एकच वाक्य उच्चारले, 'तुम्ही आता लढाऊ पवित्रा घेतला आहे.' आणि त्यांनी फोन ठेवला.

कितीही राग आला तरी यशवंतरावांनी आपल्या भाषेला असंस्कृतपणाचा स्पर्श होऊ दिला नाही.

# ...तर बरे झाले असते!

कै.दादासाहेब साखवळकर हे कोरेगाव (जि.सातारा) येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते. यशवंतरावांचा आणि त्यांचा चांगला स्नेह होता. स्वातंत्र्यानंतर अनेक राज्यात काँग्रेसची सरकारे आली. सत्तेच्या सोबतीने काँग्रेस पक्षात काही अपप्रवृत्ती शिरल्या. दादासाहेबांसारख्या ध्येयवादी स्वातंत्र्यसैनिकांना हे पटत नसे.

त्या काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालू होती. महाराष्ट्रातील वातावरण काँग्रेसविरोधी होत चालले होते. अशातच एकदा कोरेगाव येथे यशवंतरावांची सभा होती. दादासाहेब सभेचे अध्यक्ष होते. दादासाहेबांचे भाषण चांगले झाले. आपल्या भाषणाचा समारोप करताना त्यांनी काँग्रेसमधील अपप्रवृत्तींवर टीका केली. 'गांधी, नेहरूंची काँग्रेस आता राहिलेली नाही' असं ते म्हणाले. खरे म्हणजे काँग्रेस पक्षाच्या सभेत काँग्रेसवरच टीका करणे राजकीयदृष्ट्या चुकीचे होते. पण दादासाहेबांसारख्या निस्वार्थी देशभक्तांना याची पर्वा नव्हती. सभा संपली. पुढे पुसेगावला एक सभा घेऊन यशवंतराव मुंबईला गेले. मुंबईहून त्यांनी दादासाहेबांना पत्र पाठवले. त्या पत्रात त्यांनी लिहिले -

> 'आपण आम्हाला गुरूस्थानी आहात. काँग्रेस पक्षात आपणाला भीष्माचार्यांचा मान आहे. आमचे काही चुकत असेल तर कान धरून तसे सांगण्याचा हक्क आपणाला जरूर आहे. परंतु तो हक्क चार भिंतीच्या आत बजावला गेला असता तर बरे झाले असते.'

इतरांचा सन्मान जपूनही निषेध कसा व्यक्त करावा हे यशवंतरावांपासून शिकण्यासारखे आहे.

# यशवंतरावांची शिवनिष्ठा.



३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्‌घाटन यशवंतरावांनी पं.जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते करविले. या कार्यक्रमाच्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी मोठा मोर्चा काढायचा असे ठरविले. यशवंतरावांनी विरोधकांना आवाहन केले की, या समारंभाकडे पक्षीय दृष्टीने पाहू नका, हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. पण या आवाहनाला समितीने प्रतिसाद दिला नाही. त्यांनी शांततामय मार्गाने निदर्शने केली. यात भाई माधवराव बागल आघाडीवर होते. यशवंतरावांची छत्रपती शिवाजी महाराजांवरील निष्ठा दिखाऊ आहे अशी त्यांची समजूत होती.

हा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाल्यानंतर काही महिन्यांनी मुंबई मध्ये दादर येथील शिवाजी पार्कवर शिवछत्रपतींचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची कल्पना पुढे आली. त्यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्यकर्ते प्रयत्न करीत होते. पण निधीअभावी हे काम होत नव्हते. अशा वेळी यशवंतरावांच्या शिवनिष्ठेचा कस पहावा व अशाप्रसंगी ते स्वत: पक्षीय दृष्टी बाजूस ठेवतात का हे पहावे म्हणून माधवरावांनी यशवंतरावांना एक पत्र लिहिले व पुतळा उभारणीस सहकार्य करण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे ज्या संयुक्त महाराष्ट्र समितीने शिवरायांच्या नावाच्या घोषणा दिल्या होत्या, त्यांच्याच हातात मुंबई महानगरपालिकेची सत्ता होती. त्यांनी मनात आणले असते तर हे सहज झाले असते, पण ते होत नव्हते एवढे मात्र खरे. माधवरावांनी पत्र टाकले. उत्तराची अपेक्षा नव्हतीच. कारण ते

यशवंतरावांचे कट्टर विरोधक होते. पण यशवंतरावांनी तात्काळ उत्तर पाठवले. साहेबांनी लिहिले होते,

> 'प्रिय माधवरावजी, आपण मोकळ्या मनाने पत्र लिहून आपल्याशी पत्रव्यवहार करण्याची संधी दिलीत याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहे. ध्येयवादाला मुरड न घालता व मतभेद राखूनही सोज्ज्वळ वातावरण निर्माण करण्याचे तत्त्व हेच खरे लोकशाही तत्त्व आहे आणि याचा विजय जर महाराष्ट्रात झाला तर येथे ध्येयवादी विचारांची सुंदर बाग फुलेल असा मला विश्वास आहे. शिवाजी पार्कवरील शिवस्मारकाबाबत श्री.ठाकरे यांच्याशी मी पुष्कळ बोललो आहे. व्यक्तिश: याबाबतीत माझ्याकडून आपण सुचवाल ते सहाय्य देण्याचे मी जरूर प्रयत्न करीन.'
>
> आपला,
> यशवंतराव चव्हाण

या पत्रापाठोपाठ काही दिवसांनी केशवराव ठाकरे यांचे माधवरावांना पत्र आले. त्यात केशवरावांनी लिहिले होते की, 'यशवंतरावांनी स्मारकासाठी व्यक्तिश: पाचशे रुपये देण्याचे कबूल केले आहे' असे त्यांनी कळविले . यशवंतरावांची शिवनिष्ठा वरवरची नव्हती, ती सच्ची होती.

# मला कॉलेज जीवनाची आठवण झाली..!

समयसूचकता हे यशवंतरावांच्या वक्तृत्वाचे खास वैशिष्ट्य होते. या एका गुणाच्या बळावर त्यांनी कित्येक सभा जिंकल्या. भाषणाच्या पहिल्या एक दोन वाक्यातच श्रोत्यांना ताब्यात घेणाऱ्या महान वक्त्यांपैकी ते एक होते. सोलापूर शहरात एकदा त्यांना असेच कसोटीचे भाषण करावे लागले. शहरातील दयानंद कॉलेजमध्ये एका कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून ते गेले होते. यशवंतरावांचे भाषण ऐकायचे नाही, असे काही टारगट विद्यार्थ्यांनी ठरवले. प्रास्ताविकानंतर यशवंतराव भाषणासाठी उठले आणि विद्यार्थ्यांमधून शिट्ट्या, हशा, टाळ्या व कॉमेंटस्‌चा भडिमार सुरु झाला. साहेब शांतपणे माईकसमोर उभे होते. शिट्ट्यांनी व कर्कश्श आवाजाने सभागृह दणाणून गेले होते. जवळपास पाच मिनिटे हा प्रकार चालू होता. यशवंतराव मात्र गालातल्या गालात हसत माईकसमोर उभे होते. आवाज कमी झाल्यावर त्यांनी भाषणाला सुरुवात केली. सुरुवातीलाच ते म्हणाले, 'विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही आता जे काही केले त्यामुळे मला माझ्या कॉलेज जीवनाची आठवण झाली, आणि मी तुम्हाला सांगू इच्छितो, की तुम्ही आता जो दंगा केलात त्यापेक्षा दहापटींनी अधिक दंगा आम्ही केला होता.'

या वाक्यावर प्रचंड टाळ्यांचा गजर झाला आणि विद्यार्थ्यांनी यशवंतरावांचे पुढचे सगळे भाषण शांतपणे ऐकून घेतले.



# कलावंतांची कदर



संयुक्त महाराष्ट्रासाठीच्या आंदोलनामध्ये आचार्य अत्रे यांच्या वाणीला व लेखणीला विलक्षण धार आली. आपल्या भाषणातून आणि 'मराठा' मधून त्यांनी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांवर घणाघाती टीका केली. अनेकांचे वस्त्रहरण केले. परंतु यशवंतरावांची कुशाग्र बुद्धिमत्ता व शुद्ध चारित्र्य ते जाणून होते. त्यामुळेच यशवंतरावांना ते काहीसे दबकून असत. एकदा भाषणाच्या ओघात अत्रे म्हणाले, 'महाराष्ट्राची विधानसभा म्हणजे मासळीबाजार (मच्छीबाजार) आहे.' अत्र्यांच्या या वक्तव्यावरून विधानसभेत गोंधळ सुरू झाला. शेवटी विधानसभा अध्यक्षांनी एक समिती नेमली व तिने या प्रकाराचा सांगोपांग विचार करून निकाल द्यावा असे ठरले.

काही दिवसांनी कमिटीने आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये असभ्य व असंसदीय शब्द वापरल्या बद्दल अत्र्यांना एक महिना कैद व ५०० रु. दंड करावा अशी शिफारस केली होती. अत्र्यांना विधानसभेत बोलावून वॉरंट काढून निकाल त्यांच्या हाती द्यावा असे ठरले. त्यानुसार अत्रे विधानसभेत हजर राहिले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या टेबलावर कमिटीची शिफारस होती. त्यांनी सभागृहाला निकाल वाचून दाखवला व म्हणाले, 'खरोखरच, आचार्य अत्रे यांच्यासारख्या विद्वान माणसाने आपल्या पवित्र संसदेस असे म्हणायला नको होते. आपल्या सर्वांच्या भावना मी जाणतो. तेव्हा मला वाटते जेल शिक्षा काही करू नये, फक्त दंड करावा.'

त्याप्रमाणे ठराव करून अत्र्यांचा तुरुंगवास रद्द करण्यात आला.

# प्रश्न महाराष्ट्राच्या भावनेचा आहे !

इतर राजकीय नेत्यांमध्ये सहसा न आढळणारा एक मोठा सद्‌गुण यशवंतरावांकडे होता. तो म्हणजे सामाजिक हितासाठी व्यक्तिगत अहंकार बाजूला सारण्याची क्षमता. अनेकदा विरोधकांच्या गोटात त्यांच्या पुढाऱ्यांकडे स्वतःच अनाहूतपणे जाऊन त्यांनी सामाजिक स्वास्थ्य टिकविण्याचा प्रयत्न केला. अशीच ही एक घटना.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबईतील गोळीबारात जे १०६ क्रांतिकारक शहीद झाले त्यांचे एक स्मारक फ्लोरा फाऊंटन (हुतात्मा चौक)या ठिकाणी समितीच्या नेत्यांनी उभारले. या स्मारकाच्या अनावरण सोहळ्यासाठी यशवंतरावांनी यावे अशी समितीच्या नेत्यांची मनापासून इच्छा नव्हती, पण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना (औपचारिक का होईना) निमंत्रण देणे गरजेचे होते. मग त्यांनी एक शक्कल लढविली. यशवंतरावांना निमंत्रण पत्रिका मुद्दामच उशिरा पोचविण्यात आली. त्यांना उपस्थित रहायला अवधी मिळू नये असाच हेतू यामागे होता. निमंत्रण पत्रिका मिळाल्यावर यशवंतराव अस्वस्थ झाले. आपण कार्यक्रमाला जावे की जाऊ नये असा प्रश्न क्षणभर त्यांना पडला. दुसऱ्याच क्षणी त्यांनी निर्णय घेतला. ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली आणि थोड्याच वेळात ते समारंभस्थळी दाखल झाले. त्यांना अनपेक्षितरित्या आलेले पाहून सारेच चपापले. विरोधकांचा अंदाज चुकला. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी रक्त सांडलेल्या वीरांना अभिवादन करण्याची संधी यशवंतरावांनी चुकविली नाही. काही लोक म्हणाले, 'यशवंतरावांनी मुख्यमंत्री पदाची प्रतिष्ठा कमी केली.'



साहेब म्हणाले, 'मुख्यमंत्रीपदाची काहीएक प्रतिष्ठा आहेच. पण मराठी माणूस ही आमरण मिळालेली पदवी आहे आणि मराठी माणसांचा प्रतिनिधी म्हणूनच मी या सोहळ्यास उपस्थित राहिलो. कारण प्रश्न महाराष्ट्राच्या भावनेचा आहे.'

# मी तर भूमीहीन माणूस !

एक्काहत्तर वर्षांच्या आयुष्यातील ५४ वर्षे यशवंतराव राजकारणात होते आणि त्यापैकी ३८ वर्षे ते सत्तेत होते. पण मंत्रीपदाच्या या प्रदीर्घ काळात त्यांनी स्वत:साठी काहीच मिळविले नाही. त्यांच्या वडिलांची- बळवंतरावांची चार एकर जमीन होती, ती चुलत्यांनी स्वत:च्या नावावर करून घेतली. त्यांच्या थोरल्या बंधूंनी विकत घेतलेली दोन एकर जमीन १९५२ च्या निवडणुकीसाठी विकावी लागली. (ती परत घेणे शेवटपर्यंत जमले नाही.) कराडमधील घर भावाच्या नावावर होते. थोडक्यात, यशवंतरावांची स्वत:ची स्थावर मालमत्ता जवळपास नव्हतीच. १९५७ साली आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरू केली. यशवंतरावांनी या चळवळीला केवळ शाब्दिक नाही तर प्रत्यक्ष मदत केली. त्यांनी स्वत:ला मिळणाऱ्या मानधनातून पैसे साठवून या चळवळीला पाच हजार रुपयांची देणगी दिली. एका मित्राने त्यांना विचारले, 'विनोबांच्या कार्याला तुम्ही हातभार लावलात हे ठीक, पण त्यांच्या चळवळीमुळे भारताची प्रगती होईल असे तुम्हाला वाटते का?'

'हो, वाटते. असं पहा, त्यांनी जे कार्य चालवलंय ते वाईट आहे का ? त्यात कोणावर जुलूम आहे का? हिंसा होतेय का? जर यापैकी काही घडत नसेल तर ते कार्य चांगलं आहे, असे लोकांनी का मानू नये ? त्यांचं कार्य दानावर आधारलेलं आहे आणि दान देणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. देशात प्रचंड गरीबी आहे. विनोबांच्या कार्याने हा प्रश्न मिटेल असं जरी नसलं तरी पुष्कळ गरीबांना सुख मिळू शकेल. म्हणून एक व्यक्ती या नात्याने मी या कार्याचा पुरस्कर्ता आहेच, पण माझं सरकारसुद्धा त्यांना सर्वतोपरी मदत करील.'

'पण पाच हजार रुपये मदत करण्याऐवजी तुम्हीसुद्धा भूदान केलं असतं तर बरं झालं असतं ' यावर गालात हसत यशवंतराव म्हणाले, 'मला भूदान करता आलं असतं तर मलासुद्धा फार बरं वाटलं असतं.... पण....'

'पण काय ?'

'त्याचं असं आहे, ज्याच्याजवळ 'भू' आहे तोच ती दान करू शकतो. मी तर भूमीहीन माणूस आहे. एक आणासुद्धा सरकारी सारा मी भरत नाही. मग मी भूदान कसे करणार?' आश्चर्याने थक्क होऊन मित्र म्हणाला, 'म्हणजे ४३ जिल्ह्यांचा राज्यकारभार चालविणारा माणूस भूमीहीन आहे, असं एखाद्यानं म्हटलं तर?'

'तर ते पूर्णपणे सत्य आहे' यशवंतराव हसत म्हणाले.

# समाजपरिवर्तनाची प्रयोगशाळा.



कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या महत्कार्यासाठी कर्मवीरांनी घाम व रक्त आटवून या संस्थेच्या रोपट्याचे रूपांतर महान वटवृक्षात केले. आयुष्यभर अनवाणी राहून कर्मवीरांनी या कामासाठी उभा महाराष्ट्र पिंजून काढला, परंतु निसर्गनियमानुसार ते आत थकले होते. कधी कधी ते 'आपल्यानंतर संस्थेचे काय होईल?' या विचाराने अस्वस्थ व्हायचे. एखाद्या समर्थ व्यक्तीच्या खांद्यावर संस्थेची जबाबदारी सोपवावी असे त्यांना वाटू लागले. या कामासाठी त्यांनी मनोमन यशवंतरावांची निवड केली व त्यांना तसा निरोप धाडला. अण्णांचा शब्द प्रमाण मानून यशवंतरावांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारले व आपल्या हयातभर हे पद त्यांनी अतिशय तोलामोलाने सांभाळले. अध्यक्षपद स्वीकारताना केलेल्या भाषणात ते म्हणाले, 'मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो त्यावेळी मला जेवढा आनंद झाला, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आनंद मला कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद मिळाल्यावर झाला आहे!'

आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी संस्थेच्या कामात कधीही हस्तक्षेप केला नाही. मात्र दरवर्षी मे महिन्याच्या नऊ तारखेला अण्णांच्या पुण्यतिथीला आणि वार्षिक सर्वसाधारण सभेला ते न चुकता उपस्थित राहून संस्थेच्या कामाला दिशा देत असत. 'रयत शिक्षण संस्था ही समाजपरिर्वतनाची एक प्रयोगशाळा व्हावी' हा युगप्रवर्तक विचारही त्यांनी आवर्जून मांडला होता.

एका वार्षिक सभेत ते म्हणाले, 'रयत शिक्षण संस्थेने शहरांमधून शाळा-महाविद्यालये काढली त्याचे मला फारसे कौतुक वाटत नाही. महाराष्ट्रातील वंचित भागात शिक्षणप्रसाराचे काम संस्थेने करावे असा विचार कर्मवीर अण्णांचा होता, तेव्हा आदिवासी भागात शिक्षणप्रसाराचे काम आपल्या संस्थेने केले तर ते मला अधिक कौतुकास्पद वाटेल.'

अत्यंत कमी शब्दात अतिशय सखोल आशय मांडण्याची यशवंतरावांची वक्तृत्वशैली अद्वितीय होती.

# अगोदर विद्यापीठ, नंतर महाविद्यालये !

समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेला मराठवाडा आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मात्र मागासलेलाच राहिला होता. द्वैभाषिक मुंबई राज्यात हा मराठवाडा नुकताच सामील झाला होता. त्यापूर्वी शेकडो वर्षे हैदराबाद संस्थानच्या जुलुमी राजवटीत भरडला गेल्यामुळे हा प्रदेश सर्वांगाने खंगला होता. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीचा विचार सुरू केला.



मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार होणे आवश्यक होते. एकदा शैक्षणिक प्रगती झाली की इतर क्षेत्रातही प्रगतीचे वारे वाहू लागेल असा यशवंतरावांचा विचार होता. यासाठी मराठवाड्यास स्वतंत्र विद्यापीठ देण्याचे यशवंतरावांनी ठरवले. परंतु विद्यापीठाच्या स्थापनेसाठी किमान साठ महाविद्यालये आवश्यक होती. इतकी महाविद्यालये त्यावेळी मराठवाड्यात नव्हती. महाविद्यालयांची वाढ अगोदर झाली पाहिजे व नंतर विद्यापीठ स्थापन केले गेले पाहिजे असा विचार काही शिक्षणतज्ज्ञांनी मांडला. याच पद्धतीने पुणे, नागपूर व इतर काही विद्यापीठे स्थापन झाली होती. पण मराठवाड्याच्या बाबतीत आपण याच मार्गाने गेलो तर त्या प्रदेशाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होईल, अशी भीती यशवंतरावांना वाटत होती. त्यामुळे अपवाद म्हणून मराठवाड्यात अगोदर विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय त्यांनी घेतला व त्याप्रमाणे १९५८ साली मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. पुढील दोन-तीन वर्षांत मराठवाड्यात साठपेक्षा अधिक महाविद्यालये निघाली.

# मराठी शिका !



द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना यशवंतराव वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी त्यांना अनेक प्रश्न विचारले. आपल्या मागण्या मांडल्या. त्यावेळी एका पत्रकाराने विचारले, 'द्विभाषिक मुंबई राज्यात हिंदी भाषिक व्यक्तींची पोलीस दलात भरती केली जात नाही, हे राष्ट्रीय एकात्मतेच्या तत्त्वाविरुद्ध नाही काय? यामुळे प्रादेशिकता वाढेल असे तुम्हाला वाटत नाही काय?' यावर साहेब म्हणाले, 'पोलीस दलात हिंदी भाषिक व्यक्तींची भरती करू नये, असा शासनाचा कोणताही आदेश नाही' असे म्हणून त्यांनी शेजारी बसलेल्या डी.एस.पी.ना विचारले, असा आदेश तुम्हाला आहे काय?' डी.एस.पी. (जिल्हा पोलीस अधीक्षक) यांनी मौन पाळले. यावर दुसरा पत्रकार म्हणाला, 'आपला तसा आदेश नसेलही, पण अधिकारी मात्र असा भेदभाव करतात. कदाचित् तुमचा तसा 'गुप्त आदेश' असेल.'

यशवंतराव हसून म्हणाले, 'अरे मित्रा, कसला गुप्त आदेश? हे काय इंग्रजांचे राज्य आहे काय? आता तुमच्या साक्षीने मी असा आदेश देतो की, हिंदी भाषिक व्यक्तींना मराठी भाषिक व्यक्तीला मिळते तशीच वागणूक दिली जावी. जे अधिकारी हा आदेश पाळणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.'

थोडे थांबून यशवंतराव पुढे म्हणाले, 'पण तुम्हीसुद्धा एक काम करा.'

'कोणते काम?' पत्रकारांनी विचारले. 'तुम्ही महाराष्ट्रात राहता, तर मराठी जरूर शिका.'

# कायद्यानुसार जे योग्य आहे ते करा

द्विभाषिकाचे मुख्यमंत्री असताना १९५८ सालच्या मार्च महिन्यात यशवंतरावांवर पित्ताशयातील खडे काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर विश्रांतीसाठी यशवंतराव काही दिवस पन्हाळ्याला गेले. त्यांची राहण्याची व्यवस्था प्रसिद्ध उद्योगपती रामनिवासजी रूईया यांच्या बंगल्यात केली होती. त्यावेळी श्री.राम प्रधान हे कोल्हापूरचे जिल्हाधिकारी म्हणून काम करीत होते.

यशवंतराव पन्हाळ्यात पोहोचल्यावर जिल्हाधिकारी या नात्याने प्रधानांनी त्यांचे स्वागत केले व तेथील सर्व व्यवस्थेची त्यांना माहिती दिली. थोड्या वेळाने प्रधान कोल्हापूरला जायला निघाले तेव्हा यशवंतराव म्हणाले, 'प्रधान, तुम्ही इथे माझ्याबरोबर का रहात नाही? हा बंगला कितीतरी मोठा आहे.' प्रधानांनी नम्रपणे हे निमंत्रण नाकारले, पण त्यापाठीमागे एक कारण होते, जे यशवंतरावांना माहीत नव्हते.

त्याचे असे झाले होते की, पन्हाळा किल्ला व त्या पठारावरील काही प्लॉटस् शासनाने विकले होते. त्यावर दोन-तीन उद्योगपतींनी बंगले बांधले होते. त्यातीलच एक बंगला रूईयांचा होता. प्लॉटस् विकताना शासनाने ज्या अटी घातल्या होत्या, त्यात प्लॉटचा ताबा घेतल्यानंतर ठराविक मुदतीत बंगला बांधला पाहिजे ही अट होती. रूईयाशेटनी ती मुदत संपल्यानंतर बंगला बांधला होता. परंतु बांधकाम सुरू करण्याअगोदर शासनाची परवानगी घेतली नव्हती. ज्यावर बांधकाम झाले नव्हते ते प्लॉटस् शासनाने ताब्यात घेतले होते. प्रश्न होता फक्त रूईयांच्या बंगल्याचा. जिल्हाधिकारी या नात्याने प्रधानांनी रूईयांना 'आपली जमीन व बंगला जप्त का करू नये?' अशी नोटीसही पाठविली होती. पण आता खुद्द मुख्यमंत्रीच त्या बंगल्यात रूईयांचे पाहुणे म्हणून रहात असताना कारवाई कशी करायची हा प्रश्न होता. जप्तीच्या कारवाईचा मसुदा तयार होता, फक्त सही करणे बाकी होते.

एके दिवशी प्रधानांनी यशवंतरावांना हे सर्व सांगितले आणि म्हणाले, 'माझा नाईलाज आहे, पण आपण मुंबईला परत गेल्यानंतर मी सही करून जप्तीचा हुकुम काढीन.' यावर यशवंतराव हसले व म्हणाले, 'यात मला काही अयोग्य वाटत नाही. जे काही कायद्याप्रमाणे करायचे आहे ते तुम्ही करा. मी रूईया शेठना समजावून सांगेन.'

आपल्या पदाचा वापर करून जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव आणणे यशवंतरावांना सहज शक्य होते. रूईयांचे पाहुणे म्हणून रहात असताना सुद्धा यशवंतरावांनी शेवटी कायद्याचाच मान राखला. ते 'रूईयांना समजावतो' असं म्हणाले; 'जिल्हाधिकाऱ्यांना समजावतो' असं म्हणाले नाहीत!! कर्तव्य आणि भावना यांच्यातला हा फरक ओळखणारे यशवंतराव म्हणूनच आजही आदर्श वाटतात.

# मी न्यायबुद्धीने वागेन !



साथी एस.एम.जोशी हे महाराष्ट्राला लाभलेले एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेतला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते कामगार, दलित, आदिवासी आणि इतर उपेक्षित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी सरकारशी भांडत राहिले. यशवंतरावांना त्यांच्याविषयी नितांत आदर होता. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळे एसेम व यशवंतराव यांच्यातील राजकीय मतभेद टोकाला गेले होते, तरी दोघांच्याही मनात एकमेकांविषयी तिळमात्र कटुता नव्हती.

१९५७ सालची विधानसभेची निवडणूक अटीतटीची झाली. जनमत काँग्रेसच्या विरोधात होते. प्रचारासाठी यशवंतराव जिथे जिथे जायचे तिथे काळ्या झेंड्यांनी त्यांचे स्वागत व्हायचे. काही ठिकाणी चपलांच्या माळादेखील लावलेल्या असायच्या. काही मत्सरी माणसे यशवंतरावांविषयी बेजबाबदारपणे बोलायची.

पुढे यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ज्यांनी आपली बदनामी केली त्यांच्याबद्दल यशवंतरावांनी मनात कसलीही कटुता बाळगली नाही. आपला तोल ढळू दिला नाही. एस.एम.जोशी विरोधी पक्षनेते झाल्यावर यशवंतरावांनी त्यांना चहाला बोलावले व सांगितले, 'आण्णा, मी आता काँग्रेस पक्षाचा मुख्यमंत्री नाही. मी आता महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे. तेव्हा कधीही माझ्याकडे या. मी तुमचाच आहे. मी न्यायबुद्धीने राहण्याचा प्रयत्न करेन.'

# मी येतोय !

१९५६ साली यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले याचा सर्वांनाच आनंद झाला, पण कराडकरांना विशेष आनंद झाला. काम-धंद्याच्या निमित्ताने कराड परिसरातील काही लोक महाराष्ट्रभर विखुरले होते. १९५८ साली पुण्यात राहणाऱ्या कराडकरांचे एक संमेलन घेण्याचा विचार पुढे आला आणि अध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण यांना बोलवायचे ठरले. त्यासाठी विद्याधर गोखले, आप्पासाहेब इनामदार, रामभाऊ गोगटे यशवंतरावांना भेटले. मुख्यमंत्र्यांनी तारीख दिली व त्याप्रमाणे सर्वजण तयारीला लागले. पण संमेलन दहा दिवसांवर आल्यावर यशवंतरावांच्या पी.ए. ची तार आली, की मुख्यमंत्री संमेलनाला येऊ शकत नाहीत. निमंत्रणपत्रिका तर वाटल्या गेल्या होत्या. आता काय करायचे? शेवटी सर्वांच्या वतीने विद्याधर गोखलेंनी मुंबईला जाऊन यशवंतरावांशी समक्ष चर्चा करावी असे ठरले. त्याप्रमाणे गोखले मलबार हिलवरील यशवंतरावांच्या बंगल्यावर गेले, पण सचिव श्रीपाद डोंगरे यांनी त्यांना आत सोडले नाही. शेवटी गोखलेंनी एक चिठ्ठी लिहिली,

'प्रिय साहेब, २२ सप्टेंबरचा पुण्यातला कार्यक्रम तुमच्या अध्यक्षतेखालीच व्हावा या उत्कट इच्छेने आलो होतो, पण भेट होऊ शकली नाही. संमेलन ठरलेल्या तारखेलाच होईल. तुम्ही आल्यास तुमच्या अध्यक्षतेखाली, न आल्यास अध्यक्षाविना.'

डोंगरेंकडे ही चिठ्ठी देऊन निराश मनाने गोखले पुण्याला परतले. मित्रांना काय आणि कसे सांगायचे ही चिंता त्यांना सतावत होती. पण ते घरी पोहोचताच संयोजन समितीचे सदस्य त्यांचे अभिनंदन करू लागले. गोखलेंनी गोंधळून विचारले, 'अरे कशाबद्दल अभिनंदन करताय?'

'कशाबद्दल म्हणजे? तू साहेबांचा होकार मिळविल्याबद्दल. '२२ तारीख पक्की समजा' अशी साहेबांच्या पी.ए. ची तार आत्ताच आम्हाला मिळालीय.' गोखलेंना सुखद धक्का बसला. ठरल्याप्रमाणे यशवंतराव संमेलनाला आले. त्यादिवशी डोंगरे गोखलेंना म्हणाले, 'तुमची व साहेबांची एवढी ओळख आहे हे अगोदर नाही का सांगायचे? तुम्ही गेल्यावर साहेब माझ्यावर किती भडकले? बाबुराव गोखलेंचा मुलगा आपल्याकडे आला होता आणि तो आपल्या भेटीविना परत गेला, ही गोष्ट साहेबांच्या मनाला फार लागली. त्यांनी ताबडतोब मला होकाराची तार करायला सांगितली.'

# केशवरावांच्या कॉलेजचे लग्न करायचे आहे!



भाई केशवराव धोंडगे

भाई केशवराव धोंडगे हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. १९५८ साली यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना केशवरावांनी कंधार तालुक्यात श्री शिवाजी मोफत विद्यालय सुरू करायचे ठरवले व या विद्यालयाच्या उद्घाटना साठी त्यांनी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना बोलाविले. खरे तर शे.का.प. आणि काँग्रेस हे दोन पक्ष तेव्हा परस्परांचे कट्टर विरोधक होते. म्हणून केशवरावांच्या विद्यालयाच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री येणार नाहीत असेच अनेकांना वाटत होते, पण यशवंतराव आले. स्वपक्षीयांच्या विरोधाला न जुमानता आले.

उद्घाटन समारंभात आपले मनोगत व्यक्त करताना केशवराव म्हणाले, 'आज हे विद्यालय सुरू होतेय. पण एवढ्यावर मी समाधानी नाही. गोरगरीबांच्या आणि वाडी-तांड्यावरच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी शिवाजी महाविद्यालय सुरू करण्याचा माझा निर्धार आहे. आधी लग्न करेन ते शिवाजी महाविद्यालयाचे, नंतर माझे.' ही जगावेगळी प्रतिज्ञा ऐकून यशवंतराव स्तब्ध झाले. केशवरावांच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, 'केशवराव, तुमच्या या महाविद्यालयासाठी मी सुद्धा हातात झोळी घेऊन फिरेन.' त्यानंतर काही महिन्यांनी यशवंतराव नांदेडच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांना केशवरावांची प्रतिज्ञा आठवली. त्यांनी नांदेडच्या विश्रामगृहावर केशवरावांना बोलावून घेतले. केशवराव गेले. यशवंतरावांबरोबर जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक होते. यशवंतराव त्यांना म्हणाले, 'केशवरावांच्या कॉलेजचे लग्न करायचे आहे.' केवळ असे म्हणून न थांबता, त्यांनी कॉलेजला मंजुरी मिळवून दिली. १६ जून १९५९ रोजी शिवाजी कॉलेज सुरू झाले व १५ ऑगस्ट १९६३ रोजी केशवरावांनी लग्न केले. केशवरावांसारखे झपाटलेले शिक्षण प्रसारक व यशवंतरावांसारखे खंबीर नेतृत्व लाभल्यामुळेच महाराष्ट्राच्या शिक्षणाची 'यत्ता' उंचावली, हा इतिहास आहे.

# रसिक वाचक यशवंतराव !

कवी सुधांशु यांनी मराठी भाषेत अनेक सुंदर भावकविता लिहिल्या. १९५८ साली त्यांचा 'जलवंती' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्या कवितासंग्रहाची एक प्रत त्यांनी यशवंतरावांना भेट म्हणून पाठवली. त्यानंतर काही दिवसांनी घडलेला हा प्रसंग. यशवंतराव तेव्हा द्विभाषिकाचे मुख्यमंत्री होते.

एकदा लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. सरोजिनी बाबर सचिवालयात यशवंतरावांना भेटण्यासाठी गेल्या होत्या. सरोजिनीताई केबिनमध्ये शिरल्या तेव्हा यशवंतराव एक छोटेसे पुस्तक वाचत होते. त्यांनी ताईंना बसायला सांगितले आणि ते पुस्तक वाचनात गढून गेले. अधुनमधून ते थांबत होते, खुणा करीत होते, हसत होते तसेच गंभीरही होत होते. काही वेळाने त्यांनी आपले वाचन थांबवले आणि सरोजिनीताईंना म्हणाले, 'आता बोला.' ताई म्हणाल्या, 'तुम्ही काय वाचत होता, ते अगोदर सांगा.' साहेब म्हणाले, 'कवी सुधांशुंच्या कवितांचे पुस्तक वाचत होतो. फार सुंदर कविता आहेत. मला फार आवडल्या. आईविषयीच्या कविता तर अंत:करणाला भिडणाऱ्या आहेत. त्या वाचून मला माझ्या आईची आठवण होते.' राज्याच्या मुख्यमंत्रीपदी असताना, कामाचा व्याप सांभाळून वाचनाचा छंद जोपासणारे यशवंतराव इतर राजकारणी व्यक्तींपेक्षा वेगळे वाटत असत ते अशा छंदांमुळे. असे होते यशवंतरावांचे वाचन!



डॉ. सरोजिनी बाबर यांचेसोबत यशवंतराव

# सामान्य जनतेचा मुख्यमंत्री

दीर्घकाळ सत्तेत राहूनही यशवंतराव सामान्य जनतेपासून दूर गेले नाहीत, याचे कारण 'सत्ता ही जनतेमुळे मिळते व जनतेसाठीच ती राबवायची असते' याचे पक्के भान त्यांना होते. राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर सुद्धा त्यांच्या साध्या राहणीत फरक पडला नाही.

१९५८ साली डिसेंबरमध्ये एकदा यशवंतराव मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी मधुकरराव चौधरी यांच्या खिरोदा या गावी गेले होते. संस्थेच्या अतिथीगृहात त्यांच्या मुक्कामाची सोय केली होती. कुठलाही बडेजाव न करता अत्यंत साधेपणाने यशवंतराव तिथे राहिले. त्या रात्री गावातल्या एका घराला आग लागली. आग लागल्याचे कळताच यशवंतराव स्वत: घटनास्थळी धावून गेले व आग विझवण्यासाठी मदत करू लागले. बादल्या भरून माती व पाणी ओतून आग आटोक्यात आणली जात होती. काही वेळा तर स्वत: यशवंतरावच हातात बादली घ्यायचे. आग पूर्णपणे आटोक्यात येईपर्यंत ते तिथेच थांबून होते. आग पूर्ण विझल्यानंतर गावकऱ्यांना धीर देऊन व त्यांचे आभार मानूनच ते झोपायला गेले. एका विशाल राज्याचा मुख्यमंत्री एका छोट्या गावातल्या एका छोट्या घराला लागलेली आग स्वत: पाणी ओतून विझवतोय हे चित्र किती दिलासादायक आहे!



# ...म्हणून मी 'मराठा' वाचीत नाही..!

संयुक्त महाराष्ट्रासाठीचे आंदोलन ऐन भरात आले होते. आचार्य अत्रे त्यांच्या 'मराठा'तून सरकारवर व यशवंतरावांवर टीकेचा भडिमार करत होते. बऱ्याचदा ही टीका सभ्यतेच्या मर्यादा ओलांडीत असे. यशवंतराव मात्र या टीकेकडे दुर्लक्ष करून आपले काम करीत होते.

एकदा अत्र्यांनी 'मराठा' दैनिकात यशवंतरावांवर अत्यंत जहाल टीका केली. दुसऱ्या दिवशी कॉ.दत्ता पाटील यांनी सभागृहात याविषयी चर्चा उपस्थित केली. सभागृहात गदारोळ सुरू झाला. गोंधळ थांबेना, तेव्हा विधानसभा अध्यक्षांनी यशवंतरावांच्या दिशेने हात करून त्यांना निवेदन करायला सांगितले. यशवंतराव उठले. सभागृहात शांतता पसरली. यशवंतराव म्हणाले, 'घराबाहेर', 'मोरूची मावशी', 'कऱ्हेचे पाणी', 'झेंडूची फुले', 'साष्टांग नमस्कार' अशी एकापेक्षा एक सरस पुस्तके लिहिणारे आचार्य अत्रे, 'श्यामची आई' सारखा अप्रतिम चित्रपट दिग्दर्शित करणारे आचार्य अत्रे यांच्याबद्दल माझ्या मनात अपार आदर आहे. त्यांची एक विशिष्ट प्रतिमा माझ्या पिढीच्या मनात निर्माण झाली आहे. या प्रतिमेला तडा जाऊ नये म्हणून आजकाल मी 'मराठा' वाचीत नसतो.'

या मार्मिक टोल्याने सभागृह हास्यात बुडून गेले.




# जनता जनार्दन हाच माझा परमेश्वर !

सन १९५९ सालातील मे महिन्यातला हा प्रसंग. नगर जिल्ह्याच्या पाथर्डी तालुक्यातील भगवानगडावर थोर संत ह.भ.प. श्री.भगवानबाबा महाराज यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा आयोजित केला होता. श्री बाळासाहेब भारदे हे भगवानगडाचे ट्रस्टी होते. त्यांच्या आग्रहास्तव यशवंतराव या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून बाबांचे हजारो भक्त आले होते. यशवंतरावांच्या हस्ते विठ्ठल- रुक्मिणीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आणि भगवान विद्यालयाची कोनशिलाही त्यांच्या हस्ते बसवली गेली. त्यानंतर मोठी सभा झाली. आपल्या प्रास्ताविक भाषणात भगवानबाबा म्हणाले, 'यशवंतराव हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहेत. पांडुरंगाच्या कृपेने ते पृथ्वीराज चव्हाण व्हावेत.' टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. त्यानंतर बाबांनी पांडुरंगाच्या नैवेद्याची तरतूद यशवंतरावांनी करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

बाबांच्या भाषणानंतर यशवंतराव भाषणासाठी उठले. ते म्हणाले, 'बाबांनी मला पृथ्वीराज चव्हाण व्हावे असा आशीर्वाद दिला. परंतु तो मला अपेक्षित नाही. या देशातून व जगातल्या अनेक देशातून राजे गेले. लोकशाहीमध्ये माझ्यासमोर असलेली जनता सर्वोच्च आहे. ही जनताच राजसत्तेची धनी आहे. जनताजनार्दन हाच माझा परमेश्वर आहे. एकवेळ मंदिरातील देव नैवेद्यावाचून उपाशी राहिला तरी चालेल, परंतु माझ्यासमोर बसलेली ही जनता उपाशी राहता कामा नये.'

यशवंतरावांना राजेशाहीपेक्षा लोकशाही अधिक प्रिय होती आणि देवाच्या भक्तीपेक्षा जनतेची सेवा महत्त्वाची वाटत होती, हेच वरील प्रसंगावरून लक्षात येते.

# आम्हाला विकासासाठी सत्ता हवी आहे

यशवंतरावांच्या राजकीय जीवनात त्यांना प्रथमपासूनच अधिकारपदाची जागा मिळत गेली. अडतीस वर्षांच्या त्यांच्या संसदीय राजकारणात जवळपास बत्तीस वर्षे ते सत्तेत होते. त्यामुळे ते सत्तालोलुप आहेत असे काही लोक म्हणत. या आरोपात काही तथ्य नव्हते. यशवंतराव काम करत गेले आणि त्यांना पदे मिळत गेली. सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी कधी वाममार्गाचा वापर केला नाही. पण विकास करायचा असेल तर त्यासाठी सत्ता हवी अशी त्यांची भूमिका होती. एकदा पत्रकार नरूभाऊ लिमयेंनी यशवंतरावांना विचारले, 'सत्तेसाठी अनेकदा तडजोडी कराव्या लागतात. एस.एम. जोशी, शेकापचे मोरे, कॉ.डांगे यांना सत्ता नसली तरी जनमानसात किंमत आहे. कारण ते तत्त्वासाठी अल्पमतात राहतात.'

यावर यशवंतराव म्हणाले, ' तुम्ही म्हणता ते खरे आहे. त्यांना समाजात किंमत आहे. राजसत्तेवर अंकुश ठेवण्याइतपत त्यांचे महत्त्व आहे. ते राज्यकर्ते झाले नाहीत तरी त्यांचे काही नुकसान होणार नाही आणि राज्यकर्ता झाल्याशिवाय मी बहुजन समाजाला न्याय देऊ शकणार नाही. मी जातीयवादी नाही किंवा काही जातींचा द्वेष्टाही नाही, पण ज्या बहुजन समाजात मी जन्माला आलो, मोठा झालो त्यांना पुढे घेऊन जायचे असेल तर सत्ता गरजेची आहे. शेकडो वर्षांतून आत्ता कुठे बहुजन समाजाला विकासाचा मार्ग खुणावतो आहे आणि या विकासाच्या मार्गाने जाण्यासाठी आम्हाला सत्ता हवी आहे.'



# ... मी दिलगिरी व्यक्त करतो!

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एस. एम. जोशींचे मोठे योगदान होते. १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत ते पुण्याच्या शुक्रवार पेठ मतदारसंघातून निवडून आले होते. या पेठेत वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या जास्त होती. आपल्या प्रचार दौऱ्यात एसेम त्या महिलांनाही भेटले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक सत्शील नेते म्हणून त्या महिलांनीही एसेम जोशींना मते दिली होती.

एकदा विधानसभेत एका विषयावर चर्चा सुरू असताना काँग्रेसचे एक सदस्य उपहासाने म्हणाले, 'एसेम 'त्या' महिलांच्या मतावरच निवडून आलेत!' सभागृहातील काही सदस्य कुत्सितपणे हसले. एसेम लगेच उठून उभे राहिले व म्हणाले, 'तुम्ही म्हणता ती गोष्ट खरी आहे. त्या भगिनींनी मला मते दिली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या आपल्या समाजात पोट भरण्यासाठी त्यांना हा व्यवसाय करावा लागतो, याबद्दल मात्र मी शरमिंदा आहे.'

हा सगळा प्रसंग घडला तेव्हा यशवंतराव सभागृहात नव्हते. थोड्या वेळाने ते आले आणि त्यांना ही हकीकत कळाली. आपल्या पक्षाच्या एका सदस्याने असे बेजबाबदार आणि संवेदनाशून्य विधान करावे याचे त्यांना मनस्वी दुःख झाले. त्यांनी त्या सदस्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला आणि सभागृहाला उद्देशून ते म्हणाले, 'आत्ताच या ठिकाणी त्या सदस्यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल सभागृहाचा नेता म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो.' नंतर त्यांनी त्या सदस्याला कडक भाषेत समज दिली.

ही घटना लहान असली तरी त्यातून यशवंतरावांची संवेदनशीलता दिसून येते. स्वतः एसेम जोशी यांनीच ही आठवण नोंदवून ठेवली आहे.

# हे मी वाचले आहे !




यशवंतरावांनी आयुष्यभर काही छंद जोपासले, काही श्रद्धा जपल्या. वाचनाचा छंद त्यांनी कायम जपला. वेगवेगळ्या विषयासंबंधीचे आपले ज्ञान अद्ययावत् करण्यासाठी तर कधी साहित्यकृतींचा आस्वाद म्हणून ते वाचन करीत. अशा चौफेर वाचनामुळेच त्यांच्या भाषेला एक डौलदारपणा आला होता. एखाद्या साहित्यिकाला लाजवेल असा यशवंतरावांचा व्यासंग होता. पण या व्यासंगाचे प्रदर्शन त्यांनी कटाक्षाने टाळले. त्यांच्या सहज बोलण्यातून मात्र ते सारे संदर्भ जाणकाराला जाणवायचे.

ज्येष्ठ नेते कै.वसंतदादा पाटील यांनी सांगितलेली अशीच एक आठवण. एकदा मिरज संस्थानच्या राजेसाहेबांनी यशवंतरावांना चहाला बोलावले. राजांना वाचनाचा छंद होता आणि आपल्या बहुश्रुतपणाचा एक वेगळा अभिमानही होता. आपल्या सखोल व्यासंगाची यशवंतरावांना माहिती व्हावी म्हणून गप्पांच्या ओघात ते त्यांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी बोलू लागले. आपण किती पुस्तके वाचली याची एक प्रकारे यादीच ते सांगू लागले. 'अलिकडेच मी हे नवीन पुस्तक वाचले' असे म्हणून ते यशवंतरावांकडे प्रतिसादासाठी पहात. पण गंमत म्हणजे यशवंतरावांनीही ते पुस्तक त्याही अगोदर वाचलेले असायचे आणि त्या पुस्तकाविषयी यशवंतरावांचे विश्लेषण अधिक सखोल असायचे. दोघांची अशी जुगलबंदी बराच वेळ चालली. राजांनी एखाद्या पुस्तकाचे नाव सांगावे आणि यशवंतरावांनी त्या ग्रंथाचे सार थोडक्यात सांगावे आणि त्यावर आपला अभिप्राय नोंदवावा असे बराच वेळ चालले. शेवटी राजांना कळून चुकले की आपण सांगितलेली सर्व पुस्तके यशवंतरावांनी वाचलेली आहेत. उलट त्याहून अधिक वाचली आहेत.

# विद्वानांचा विनम्र सत्कार

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. सातारा येथे त्यांच्या हस्ते वयोवृद्ध विद्वानांचा सत्कार आयोजित केलेला होता. अनेक विद्वान जमले होते. समारंभ सुरू व्हायला अवकाश होता. सत्कारमूर्ती विद्वान मंडळी गप्पा मारीत होते. टिंगलटवाळीच्या स्वरूपात सवंग भाष्य चालू होते. एक विद्वान म्हणाले, 'चव्हाणांना केवळ जातीच्या जोरावर मुख्यमंत्रीपद मिळाले. त्यांचा विद्वत्तेशी काय संबंध?' दुसरे विद्वान म्हणाले, 'अशा माणसाच्या हस्ते आपला सत्कार म्हणजे एकप्रकारे विद्वत्तेची चेष्टाच आहे.'

थोड्याच वेळात यशवंतराव आले. समारंभ सुरू झाला. विद्वानांचा सत्कार आता होणार होता. समारंभाचे सूत्रसंचालन करणाऱ्याने सूचना दिली की नावे जाहीर होतील त्याप्रमाणे संबंधित विद्वानांनी आपला सत्कार स्वीकारावा. ही सूचना संपताच यशवंतराव लगेच उठले आणि त्यांनी माईकवरून सांगितले, 'कृपया विद्वानांनी आपापल्या जागेवरच थांबावे. मीच त्यांच्याजवळ जाऊन त्यांना सन्मान प्रदान करीन.' त्याप्रमाणे यशवंतरावांनी अतिशय विनम्रपणे जागेवर जाऊन सर्व विद्वानांचा यथोचित गौरव केला आणि त्यानंतर सुमारे वीस मिनिटे विद्वान आणि विद्वत्तेविषयी इतके उत्कृष्ट भाषण केले की टिंगल टवाळी करणारे तथाकथित शहाणे सर्दच झाले. यशवंतरावांची उंची त्यांच्या लक्षात आली आणि त्यांना ती मान्यही करावी लागली.



# असा प्रकार होणार नाही !

गाजावाजा न करता शांतपणे समाजकार्य करणे हा यशवंतरावांचा स्वभाव होता आणि अशाप्रकारे सेवा करणारे लोक त्यांना आवडत असत. मात्र कणभर समाजसेवा करून मणभर प्रसिद्धी मिळविणाऱ्या लोकांचा त्यांना तिटकारा वाटत असे. शेठ चांदमल कठारिया हे यशवंतरावांचे जुने मित्र होते. दोघांचा एकमेकांवर खूप विश्वास होता, पण व्यक्तिगत संबंध कितीही जवळचे असले तरी सार्वजनिक हिताचे भान यशवंतरावांना नेहमीच असे. त्याबाबतीत ते कसलीही तडजोड करीत नसत.

एकदा सेवासदन संस्थेच्या समारंभासाठी पं.नेहरूंना आणावे म्हणून शेठ चांदमल, श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर यांच्याबरोबर यशवंतरावांकडे गेले. यशवंतराव म्हणाले, 'पंडितजींचा होकार मिळविण्यासाठी मी व्यक्तीशः प्रयत्न करेन.' शेठ चांदमल म्हणाले, 'मी या संस्थेला थाळीभर रुपये देऊ इच्छितो. ही देणगी पंडितजींच्या हस्ते त्या समारंभातच देण्यात यावी, असे मला वाटते.'

यशवंतरावांना शेठ चांदमल यांचा प्रसिद्धीचा हव्यास आवडला नाही. ते ताडकन् म्हणाले, 'शेठजी, लाखो रुपयांच्या देणग्या देणारे देखील असे म्हणत नाहीत. तुमची ही अपेक्षा बरोबर नाही. असा प्रकार होणार नाही.'

# मी खाऊ आणायला हवा होता !

यशवंतरावांचे नेतृत्व त्यांना वारसाहक्काने लाभले नव्हते. स्वत:च्या कर्तृत्वाने ते अगोदर महाराष्ट्राचे व नंतर देशाचे नेते बनले होते. अगदी सामान्य परिस्थितीतून त्यांचे नेतृत्व पुढे आले होते आणि याच कारणामुळे 'सामान्य माणूस' हाच शेवटपर्यंत त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला. त्यांचे सगळे नातेवाईकही साधेच होते आणि ही नाती जपण्यात यशवंतरावांनी कधीच कमीपणा मानला नाही.

विटा तालुक्यातील हणमंतवाडी या गावात यशवंतरावांची मावशी रहात होती. मुख्यमंत्री असताना यशवंतराव त्या भागाच्या दौऱ्यावर गेले असताना, वेळात वेळ काढून मावशीच्या घरी गेले. एकेकाळी ज्याला आपण अंगाखांद्यावर खेळवलं तो यशवंता आज महाराष्ट्राची धुरा आपल्या खांद्यावर पेलतोय, हे पाहून मावशीचा ऊर अभिमानाने भरून आला. घरात शिरलेल्या यशवंतरावांच्या कानशिलावरुन बोटे फिरवत मावशी म्हणाली 'कोण, येशा हाये व्हय? लोकं म्हणत्यात तू राजा झालास म्हून?' इतक्यात मावशीचा सहा सात वर्षांचा नातू धावत बाहेर आला. मळक्या कपड्यातल्या, शेंबूड आलेल्या त्या मुलाने लाडाने यशवंतरावांना मिठी मारली. त्यांचे शुभ्र कपडे मळले. ते पाहून मावशीने नातवाला शिव्या देऊन दोन चापट्या मारल्या. तिला अडवत यशवंतराव म्हणाले, 'मावशी, अगं का मारतेस त्याला? उलट माझंच चुकलं, येताना मी त्याच्यासाठी खाऊ आणायला हवा होता. देवराष्ट्रेमध्ये असताना मी का कमी घाण करीत होतो? त्यावेळी तू मला अंगाखांद्यावर घेऊन खेळवत होतीस ना?' आणि त्या मुलाला खाऊसाठी पैसे देऊन यशवंतराव जायला निघाले.

# त्यांची जाण ठेवायला नको?

निष्ठावान कार्यकर्त्यांची यशवंतरावांनी नेहमीच कदर केली. त्यांच्या गुणांचा व कौशल्यांचा संघटनेला व समाजाला उपयोग व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना व पुढे दिल्लीत गेल्यावरसुद्धा, प्रदेश काँग्रेसवर यशवंतरावांची घट्ट पकड होती. उमेदवारांना तिकिटवाटप करताना त्यांच्या शब्दाला मान होता.

एकदा विधानसभेच्या निवडणुकीसाठी यशवंतरावांनी मामासाहेब मोहोळ, नामदेवराव मते व नामदेवराव जगताप यांना पक्षातर्फे उमेदवारी दिली. तिघेही स्वातंत्र्यसैनिक होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी हालअपेष्टा सोसल्या होत्या. जनतेला याची जाण होती आणि म्हणूनच हे तीघेही प्रचंड मतांनी विजयी झाले, विधानसभेत गेले. पण यशवंतरावांनी या अशिक्षित (?) व कायद्याचे ज्ञान नसलेल्या उमदेवारांना तिकिटे दिल्याचे अनेकांना आवडले नाही. त्यांनी नाके मुरडली. एका शहरी, विद्वान नेत्याने तर थेट यशवंतरावांनाच प्रश्न विचारला! 'यशवंतराव, जगताप, मते आणि मोहोळ यांचा तुम्हाला असेंब्लीत काय उपयोग होणार आहे? त्यांचे शिक्षण व संसदीय कामाचा आवाकाही बेताचाच आहे.'

यशवंतराव म्हणाले 'काँग्रेसच्या दोनशे आमदारांत असे पाच-दहा नामदेव मला सहज चालतील. ज्या कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास भोगला, संघटनेसाठी खस्ता खाल्ल्या, लोकांच्या अडीअडचणींना जे धावले, ज्यांच्याबरोबर लोक आहेत त्यांची जाण ठेवायला हवी की नको? शिक्षणानेच माणूस शहाणा होतो असे नाही.'

यशवंतरावांचे शिक्षणाविषयीचे वरील निरीक्षण किती अचूक होते! खरंच शिक्षणाने माणूस शहाणा होतोच असे नाही!

# शिक्षकांचा सन्मान राखा!

सन १९४५ मध्ये कराड येथील श्री.कळंबेकर व इतर सहकाऱ्यांनी एकत्र येऊन श्री शिवाजी शिक्षणसंस्थेची स्थापना केली. संस्थेच्या वतीने १९५८ साली कराड येथे सायन्स कॉलेज सुरू करण्यात आले. या कॉलेजच्या नवीन भव्य इमारतीचे उद्‌घाटन १९६० साली तत्कालिन राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते होणार होते. यशवंतराव संस्थेचे अध्वर्यू असल्याने त्यांनीच हा योग जुळवून आणला होता. त्यावेळी डॉ. आर. डी. शिंगटे हे महाविद्यालयाचे प्राचार्य होते. कराड शहरात राष्ट्रपतींनी येण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे प्रचंड गर्दी जमणार हे गृहित धरूनच समारंभाची तयारी चालू होती. कॉलेजचे व संस्थेचे लोक अहोरात्र झटत होते. उद्‌घाटन समारंभाच्या कार्यक्रमात प्राचार्यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. उद्‌घाटन समारंभ संपन्न झाल्यानंतर कॉलेज प्राचार्यांच्या ताब्यात सुपूर्त होते, या भावनेने व्यवस्थापनाने त्यांचा कार्यक्रमपत्रिकेत समावेश केला नव्हता, याची माहिती प्राचार्यांना होती आणि त्याबद्दल त्यांची काही तक्रारही नव्हती.

समारंभाच्या आदल्या दिवशी यशवंतराव मुंबईवरून आले. संध्याकाळी कॉलेजवर येऊन सर्व व्यवस्था तपशीलवार तपासून ती ठीक असल्याची खात्री करून ते सर्कीट हाऊसवर गेले. रात्री उशिरा उद्याच्या समारंभासाठी तयार केलेल्या कार्यक्रम पत्रिकेवर नजर टाकल्यावर त्यात प्राचार्यांचा समावेश नाही, ही गोष्ट त्यांना खटकली. त्यांनी ताबडतोब एका माणसाला प्राचार्यांकडे पाठवले. रात्री अकरा वाजता तो माणूस प्राचार्यांकडे गेला आणि 'उद्याच्या कार्यक्रमात तुम्ही पाच मिनिटे प्रास्ताविक भाषण करावे' असा यशवंतरावांचा निरोप आहे, हे सांगितले. यशवंतरावांनी आपली दखल घेतली या जाणिवेने प्राचार्यांचा ऊर भरून आला.

शिक्षकांना सन्मानाने वागवले पाहिजे असा यशवंतरावांचा कटाक्ष होता व प्रत्येक व्यक्तीला 'तुला मानाचे स्थान आहे' याची जाणीव प्रत्यक्ष कृतीने करून देण्याची त्यांची कार्यपद्धती होती.

# मथुरेचा बाजार

यशवंतरावांनी त्यांच्या आयुष्यात अक्षरशः हजारो भाषणे दिली. कधी विद्वानांच्या सभेत तर कधी अशिक्षित शेतकऱ्यांच्या मेळाव्यात. कधी विधीमंडळात तर कधी प्रचारसभेत अशा अनेक प्रसंगी त्यांना भाषण करावे लागे. प्रसंग कोणताही असला तरी यशवंतरावांचे भाषण मात्र काही नवीन विचार देणारे व समयोचित असे. श्रोतृवर्ग बदलला म्हणून यशवंतरावांचे भाषण पडले असे कधीच घडले नाही. याचे सर्वात महत्वाचे कारण पाहिजे यशवंतरावांना श्रोत्यांचे मानसशास्त्र पूर्णपणे अवगत होते. श्रोत्यांना समजेल अशा भाषेत ते बोलायचे व त्यांना चटकन् समजतील व पटतील अशी उदाहरण ते द्यायचे.

सन १९६० सालच्या ऑक्टोबर महिन्यात महाबळेश्वर येथे काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित केले होते. देशासमोरील समस्यांची जाणीव कार्यकर्त्यांना व्हावी व त्यावरील उपाययोजनांची चर्चा व्हावी या हेतूने यशवंतरावांच्या पुढाकारानेच हे शिबीर भरले होते. या शिबीरात भाषण करताना यशवंतरावांनी भारतीय शेतीच्या दुरवस्थेविषयी विवेचन केले. आपली शेती मागासलेली आहे हे सांगताना त्यांनी शेतीला मथुरेच्या बाजाराची उपमा दिली. ते म्हणाले, 'आजही महाराष्ट्रात साडेतीन कोटी एकर जमीन अशी आहे जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण नदीला पाणी भरून डोक्यावर माठ घेऊन निघते, पण घरी येऊन पाहते तर माठात पाणीच नसते. तसेच आमच्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रांपर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये बिचारी आमची शेती डोक्यावर माठ घेऊन जाते खरी, पण त्यात शेवटी काहीच शिल्लक राहत नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा असा हा मथुरेचा बाजार झालेला आहे.'

प्रतिभावान साहित्यिकांनाच फक्त सुचू शकते अशी ही उपमा यशवंतरावांना सहज सुचली आणि महाराष्ट्राच्या शेतीचे खरे दुखणे त्यांनी लोकांसमोर मांडले. महाराष्ट्रासमोरच्या मूलभूत प्रश्नांचे त्यांचे आकलन किती सखोल होते हेच यातून दिसून येते.

# लोककलेचा गौरव

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. नवमहाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी यशवंतरावांनी कंबर कसली. त्यावेळी महाराष्ट्रभर उत्साहाचे व आनंदाचे वातावरण होते. कृषी, उद्योग, सहकार आणि कलेच्या क्षेत्रात चैतन्य संचारले होते.

यशवंतराव मुख्यमंत्री असताना १९६० साली जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे भव्य कृषी प्रदर्शन व शेतकरी मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात राधाबाई बुधगावकर आणि त्यांच्या कुटुंबियांचा लोकनाट्याचा प्रयोग झाला. अस्सल मराठमोळे लोकनाट्य आणि खड्या आवाजातल्या लोकसंगीतातल्या रचना यशवंतरावांना प्रभावित करून गेल्या. या कलावंतांच्या प्रतिभेची यशवंतरावांनी मनोमन नोंद घेतली. त्यानंतर दोन वर्षे निघून गेली. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा पं.नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीला बोलावले. यशवंतराव संरक्षणमंत्री बनले. बर्फाळ प्रदेशात शत्रूशी लढणाऱ्या जवानांचे मनोधैर्य टिकून रहावे यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले, तेव्हा यशवंतरावांना राधाबाईंच्या लोकनाट्याची आठवण झाली. त्यांनी राधाबाई बुधगावकर व त्यांच्या कुटुंबियांचे घरंदाज मराठमोळं लोकनाट्य जवानांच्या रंजनासाठी आठवणीनं पाठवलं आणि नंतर त्यांचा योग्य तो गौरव केला.

# मी कोणाला टोपी घातली नाही!

महाराष्ट्राच्या जनतेने ज्यांची भाषणे आवडीने ऐकली, अशा वक्त्यांमध्ये यशवंतरावांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. हजरजबाबीपणा हा त्यांच्या वक्तृत्वाचा महत्त्वाचा विशेष होता. शिवाय सभेच्या सुरुवातीसच वातावरणनिर्मिती झाली तर पुढील भाषणातून श्रोत्यांना बांधून ठेवता येते ही वक्त्याच्या दृष्टीने उपयुक्त असणारी बाब ते चांगलीच जाणून होते.

यशवंतराव मुख्यमंत्री असताना १९६१ साली इस्लामपूर (जि.सांगली) येथील काँग्रेस कमिटीच्या वतीने राजारामबापू पाटील यांच्या सत्काराची मोठी सभा भरली होती. त्या सभेमध्ये अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यावेळी सांगलीचे श्री.कडलास्कर कुठूनतरी एक गांधी टोपी घेऊन आले व म्हणाले,

'मी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत आहे. साहेबांनी मला टोपी घालावी.' त्यावेळी यशवंतराव म्हणाले, 'मी आजवर कधीच कुणाला टोपी घातली नाही.'

या त्यांच्या वाक्यावर सगळी सभा हास्यात बुडून गेली.



# फक्त पदव्या मिळवू नका; शहाणे व्हा!

द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर यशवंतरावांनी अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याचा निर्णय हा अशाच निर्णयापैकी एक होता. शेतकऱ्यांची मुले शिकावीत हे यशवंतरावांचे आवडते स्वप्न होते. या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अनेकांचा विरोध पत्करून त्यांनी हा निर्णय घेतला. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार होता. साहजिकच या निर्णयाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य संचारले. त्यांना हुरूप आला. परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपेक्षा अधिक होते त्यांचे काय? कायद्यानुसार त्यांना या सवलतीचा लाभ घेता येणार नव्हता. तांत्रिकदृष्ट्या ते या सवलतीचा लाभ घेण्यास अपात्र ठरत असले तरी त्यांनाही मदतीची गरज होतीच. हा निर्णय जाहीर झाल्यानंतर काही दिवसांनी यशवंतराव कराडला आले असताना तेथील सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे काही विद्यार्थी त्यांना भेटले. ई.बी.सी. सवलतीबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानून भीत भीत ते म्हणाले, 'साहेब, समजा आम्ही ई.बी.सी. सवलत मिळण्यासाठीचा फॉर्म भरला आणि नंतर आमच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले तर आमचे नुकसान तर होणार नाही ना?' विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचा रोख यशवंतरावांच्या लक्षात आला. त्यांच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, 'बाळांनो, तुमच्यावर खटले भरण्यासाठी आम्ही ही योजना काढलेली नाही. निर्धास्तपणे जा, फॉर्म भरा आणि शिक्षण घ्या. फक्त पदव्या मिळवू नका, तर शहाणे व्हा!'

साहेबांच्या या आश्वासक बोलण्याने विद्यार्थ्यांची चिंता मिटली. त्यांनी सवलतीसाठी अर्ज केला आणि अभ्यासाला सुरुवात केली. ग्रामीण महाराष्ट्राचा शैक्षणिक चेहरा बदलू लागला. सत्ता कोणासाठी राबवायची असते याचा ठाम निर्णय यशवंतरावांनी मनाशी घेतला होता. आणि प्रसंगी नियमांना मुरड घालुनसुद्धा ते त्या निर्णयाशी प्रामाणिक राहिले.

# राजकारणात कधी कधी दोन घोडे लागतात!

यशवंतरावांनी आयुष्यात असंख्य भाषणे दिली. त्यांचे भाषण अतिशय मुद्देसूद व विचार प्रवर्तक असे. मात्र विरोधकांचे हल्ले परतावून लावण्याचे सामर्थ्यही त्यांच्या भाषणात होते. अर्थात हे करीत असताना त्यांनी सभ्यता आणि सुसंस्कृतपणा कधी सोडला नाही.

एकदा 'नवाकाळ' दैनिकाच्या रोटरी मशीनच्या उद्‌घाटन समारंभासाठी नामदार यशवंतराव, एस.एम. जोशी आणि कॉम्रेड श्रीपाद डांगे हे तिघे दिग्गज नेते एक व्यासपीठावर आले होते. अगोदर कॉ.डांगेंचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले, 'आज हा 'नवाकाळ' दैनिकाच्या रोटरीचा उद्‌घाटन समारंभ आहे म्हणून मी आलोय. पण जर हा बिर्लांच्या रोटरीचा उद्‌घाटन समारंभ असता तर मी आलो नसतो. एस.एम. ही कदाचित आले नसते, पण यशवंतरावजी नक्की आले असते.' यावर हशा व टाळ्या झाल्या. डांगे पुढे म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्र लढून आणला महाराष्ट्रातील जनतेने. मंगल कलश ज्यांनी आणायचा त्यांनी आणला. आमची तक्रार नाही. हा शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. पण इतिहासातील शिवाजी महाराज एका घोड्यावर स्वार होते. आता एकाचवेळी दोन घोड्यांवर स्वार होणारे शिवाजी आले आहेत. त्यांना समाजवादही हवा आणि भांडवलदारही हवा.' हे वाक्य अर्थातच यशवंतरावांना उद्देशून होते. पुन्हा एकदा हशा व टाळ्यांचा गजर झाला.

नंतर यशवंतराव भाषणाला उभे राहिले. डांगेंनी काढलेल्या चिमट्यांना ते काय प्रत्युत्तर देतात याची उत्सुकता सर्वांना लागली होती. भाषणाच्या सुरुवातीलाच साहेब हसत हसत म्हणाले, 'आमचे असू द्या. पण केरळमध्ये पहिले कम्युनिस्टांचे सरकार आले तेव्हा मुख्यमंत्री नंबुद्रीपाद यांनी बिर्लांना केरळमध्ये कारखाने काढायला बोलावले, हे लक्षात असू द्या.' श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड गजर केला. साहेब पुढे म्हणाले, 'राजकारणात कधी कधी माणसाला दोन घोडे लागतात. आमचे काही कम्युनिस्ट मित्र नाही का, रशिया व चीन या दोन घोड्यांवर स्वार होत?' या मार्मिक टोल्याने हशा व टाळ्यांनी सभागृह अक्षरशः दणाणून गेले. ज्या मैदानावर डांगेनी चौकार ठोकले त्याच मैदानावर साहेबांनी षट्कार खेचले. असे होते त्यांचे वक्तृत्व! असा होता त्यांचा हजरजबाबीपणा!!

# बंगल्यांची इंग्रजी नावे बदलू या !

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी अनेक निर्णय घेतले. काही निर्णय मोठे होते तर काही छोटे होते. पण आपला प्रत्येक निर्णय हा महाराष्ट्राला चार पावले का होईना पण पुढे घेऊन जाणारा असला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता.

मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव ज्या बंगल्यात रहात होते त्या बंगल्याचे रिव्हेरा हे नाव इंग्लंडमधील परंपरेशी निगडित होते. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील सामान्य माणसाला ते इंग्रजी नाव उच्चारणेसुद्धा अवघड वाटत होते. यशवंतरावांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित केला. मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांनी आपल्या बंगल्यांची इंग्रजी नावे बदलावीत व महाराष्ट्राच्या संस्कृतीशी निगडित अशी नावे द्यावीत असे सुचविले आणि आपण आपल्या बंगल्याला 'सह्याद्री' हे नवीन नाव देत आहोत असे जाहीर केले. महाराष्ट्राच्या भावविश्वात 'सह्याद्री' या शब्दाला वेगळे महत्त्व आहे. 'सह्याद्री' हा मराठी माणसाच्या स्वभावाचे प्रतिक आहे, म्हणून यशवंतरावांनी आपल्या बंगल्यासाठी हे नाव निवडले. त्यानंतर मग 'देवगिरी', 'रामटेक', 'रायगड' अशी मराठवाडा, विदर्भ व कोकणातील सांस्कृतिक जीवनाशी निगडित नावे पुढे आली. या नावातूनही महाराष्ट्राची अस्मिता जोपासली गेली. असे निर्णय छोटे असले तरी त्यांचे सांस्कृतिक परिणाम दूरगामी असतात आणि अशा छोट्या छोट्या निर्णयातूनच राज्याची अस्मिता जोपासली जात असते याचे पूर्ण भान यशवंतरावांना होते.

# सह्याद्री सर्वांचा आहे!

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. या नव्या राज्यासाठीची प्रतिके ठरविण्यात आली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी लिहिलेले 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा !' हे गीत साहेबांनी महाराष्ट्रगीत म्हणून स्वीकारले. त्यावेळी काही लोकांचा या गीताला 'महाराष्ट्रगीत' म्हणून मान्यता देण्यास विरोध होता. या गीतासंबंधी चर्चा करण्यासाठी साहेबांनी एकदा खानदेशातील थोर कवी सोपानदेव चौधरी यांना बोलावून घेतले. सोपानदेव सचिवालयात गेले तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या दालनासमोर बरीच गर्दी जमली होती, पण साहेबांनी सोपानदेवांना लगेच आत बोलावून घेतले व बराच वेळ त्यांच्याशी चर्चा केली. सोपानदेवांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर साहेब म्हणाले, 'विदर्भाप्रमाणे मराठवाड्यातील काही लोकसुद्धा या गीताबद्दल एक अढी घेऊन बसले आहेत की, या गीतात विदर्भ आणि मराठवाडा यांचा उल्लेख नाही. वास्तविक हे गीत लिहिणारे कोल्हटकर विदर्भातीलच आहेत. त्यांना हे जाणवले नसते का? या गीतात महाराष्ट्राची शक्ती आणि आकांक्षा सामावल्या आहेत. 'मर्यादा पौरूषासि जेथ दु:सहा, आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे' ही शक्ती आहे. यात भूगोलाला स्थान नाही, तर इतिहासाला आहे. त्यातील तेजाला, शौर्याला आहे. सह्याद्री हा महाराष्ट्राचा, म्हणजे सर्वांचा आहे. सह्याद्रीचा उल्लेख अस्पृश्य होऊन कसा चालेल? कारण याच सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातून क्रांती स्फुरलेली आहे.'

सह्याद्रीविषयी साहेबांना किती आत्मियता होती हे जसे वरील प्रसंगातून दिसून येते, तसेच जनतेच्या किंचित् नाराजीची देखील साहेब किती गंभीर दखल घेत होते हेही यातून दिसून येते.

# मला टीका हवी आहे!

भाई माधवराव बागल हे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व लढवय्ये नेते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी यशवंतरावांवर जहाल टीका केली होती, पण १ मे १९६0 रोजी संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यावर ते काँग्रेस पक्षात आले. त्यांनी कोणत्याही अपेक्षेने पक्षप्रवेश केला नव्हता, तर काँग्रेस आणि यशवंतराव यांच्याविषयीचे त्यांचे मत बदलले, नवा महाराष्ट्र घडविण्याचे सामर्थ्य या पक्षात व या नेत्यामध्ये आहे असे त्यांना वाटले. पक्षप्रवेशाच्या वेळी साहेब गंमतीने त्यांना म्हणाले होते, 'माधवरावजी, तुम्ही बाहेर राहूनच काँग्रेसची जास्त सेवा कराल. आत येऊन टीका करण्याचे स्वातंत्र्य का गमावता?'

असेच एकदा साहेब कराडला मुक्कामी असताना माधवराव त्यांना भेटायला गेले. आता ते थकले होते. यशवंतरावांना ते म्हणाले, 'माझा काळ संपत आल्याच्या जाणिवेने मी तुमच्या भेटीला आलो आहे. मी काही मागायला आलो नाही. कुणाबद्दल चांगलं वाईट सांगायला आलो नाही. अलीकडे तुमची गाठ पडत नाही. माझीही प्रकृती बरी नसते. मी आलो आहे, फक्त म्हाताऱ्याचा आशीर्वाद द्यायला. जातो.' या त्यांच्या बोलण्यावर त्यांच्या हाताला धरून त्यांना खाली बसवीत यशवंतराव म्हणाले,

'बसा, असं म्हणू नका. मला लिहित जा, तुम्हाला जे वाटेल ते लिहित जा. तुमच्यासारख्या निस्वार्थी माणसानं लिहिलं नाही, तर मला तरी खरी वस्तुस्थिती कशी कळणार? माझ्यावरही टीका करीत जा. मला टीका हवी आहे.'

सत्ताधाऱ्यांना टीका आवडत नाही हा जगाचा अनुभव आहे, पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना यशवंतराव ज्येष्ठांना सांगत होते, 'माझे चुकले तर सांगत जा. मला टीका हवी आहे.'

# सवलत म्हणजे उपकार नव्हे...!

द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना यशवंतरावांनी घेतलेल्या अनेक निर्णयांपैकी सर्वाधिक महत्वाचा व क्रांतीकारक निर्णय होता तो म्हणजे ई.बी.सी. सवलतीचा निर्णय. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांची फी शासनाने माफ केली. राज्याची आर्थिक स्थिती नाजुक असताना यशवंतरावांनी हा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे सरकारचा शिक्षणावरचा खर्च एकदम सत्तर टक्क्यांनी वाढला. या निर्णयावर तेव्हा काही विद्वानांनी टीका केली.

१६ फेब्रुवारी १९६१ रोजी विधानपरिषदेत ईबीसी सवलती संदर्भात चालू असलेल्या चर्चेत भाग घेताना शकुंतलाबाई नावाच्या एक सदस्या म्हणाल्या, 'आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फी माफी देऊन सरकार त्यांच्यावर उपकारच करीत असते. परंतु त्यावर आपण काहीतरी मर्यादा घातली पाहिजे माझी अशी सूचना आहे की पहिल्या तीन अपत्यांनाच ही सवलत मिळावी. चौथ्या अपत्याला ती देण्यात येऊ नये. यामुळे लोकसंख्यावाढीला आळा बसेल आणि सरकारचाही खर्च वाचेल.'

मुख्यमंत्री या नात्याने या चर्चेला उत्तर देताना शकुंतलाबाईंच्या सूचनेचा उल्लेख करून यशवंतराव म्हणाले, 'मी हे स्पष्ट करू इच्छितो की सरकार जी आर्थिक सवलत देते ती कोणावर उपकार करण्यासाठी देत नाही; तर एक कर्तव्य म्हणून देते. दुसरी गोष्ट म्हणजे, पहिल्या तीन अपत्यांसाठीच ही सवलत देऊन चौथ्या अपत्याला ही सवलत नाकारणे बरोबर ठरणार नाही. कारण एखाद्या घरात चार-पाच मुले असली तर तो दोष आई-बापाचा आहे, मुलांचा नाही. मग आईबापाच्या चुकीबद्दल मुलांना शिक्षा करणे कसे योग्य होईल? असे करणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी दिल्यासारखे होईल.'

यशवंतरावांचा युक्तिवाद सभागृहाला पटला आणि अर्थातच ती सूचना मंजूर झाली नाही. गोरगरीब शेतकऱ्यांची मुले शिकावीत यासाठी राज्याची तिजोरी यशवंतरावांनी किती खुली केली होती हेच या चर्चेतून दिसून येते. यशवंतरावांना नवमहाराष्ट्राचे शिल्पकार म्हणतात ते उगीच नाही!

# लोकांना नाराज कशासाठी करायचे ?

मुख्यमंत्री असताना यशवंतराव आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी सातारा जिल्ह्याला भेट द्यायचे. विभागीय आयुक्त व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला सोबत घेऊन ग्रामीण भागाचा दौरा करायचे. त्यावेळी एस.राजगोपाल हे सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांना जिल्ह्याची उत्तम माहिती होती व त्यांचे ड्रायव्हिंगही चांगले होते. त्यांना सोबत घेऊनच साहेब दौऱ्यावर जात असत. दिवसभरात ५-६ खेड्यांचा दौरा असे. यशवंतराव स्वत: लोकांशी बोलत, कार्यकर्त्यांची निवेदने स्वीकारीत. अधिकाऱ्यांना तात्काळ कामासंबंधी सूचना देत. यशवंतराव सहजपणे लोकांत मिसळत. लोकांच्या भाषेतच त्यांच्याशी बोलत. रात्री दहानंतर वेगवेगळ्या खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत. कामाबाबत आढावा घेत. अधिकाऱ्यांनी सांगितलेली माहिती आणि गावकऱ्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती तपासून बघत. त्यामुळे अधिकारी तयारी करूनच बैठकीस येत असत. ज्या गावात यशवंतरावांचा दौरा असे, त्या प्रत्येक ठिकाणी लोक मांसाहारी जेवणाचा बेत करीत असत. यशवंतराव प्रत्येक ठिकाणी जेवण करीत. एकदा राजगोपाल त्यांना म्हणाले, 'साहेब, प्रत्येक ठिकाणी जेवू नका, प्रकृतीच्या दृष्टीने हे योग्य नाही.'

यशवंतराव म्हणाले, 'ग्रामीण भागातील गोरगरीब जनता मोठ्या प्रेमाने आपल्याला जेवायला बोलावते. आपण जेवलो तर त्यांना बरे वाटते, नाही जेवलो तर त्यांना तो अपमान वाटतो. मग लोकांना नाराज का करायचे?'

यावरून त्यांची प्रत्येक कृती ही लोकाभिमुख होती हे वरील प्रसंगातून लक्षात येते.

# हे शासनाला परवडणार नाही !

मुख्यमंत्री असताना यशवंतराव एकदा सेवाग्रामला भेट देण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी वर्धा जिल्ह्यातील पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारल्या. मुख्यमंत्री उत्साही, पुरोगामी व उदार आहेत हे माहित असल्यामुळे पत्रकार मोकळेपणाने प्रश्न विचारीत होते. यशवंतरावही दिलखुलासपणे त्या प्रश्नांची उत्तरे देत होते. इतक्यात एक पत्रकार म्हणाला, 'साहेब, ज्याप्रमाणे प्रत्येक आमदाराला एस.टी. ने मोफत प्रवास करण्याची सवलत आहे, तशीच सवलत पत्रकारांनाही मिळाली पाहिजे.' यावर साहेब पटकन म्हणाले, 'ते मुळीच शक्य नाही. शासनाला हे परवडणार नाही.' साहेबांच्या स्पष्ट नकारामुळे वातावरण काहीसे गंभीर झाले. एक ज्येष्ठ पत्रकार हसत म्हणाले, 'साहेब, तुम्ही आमचा प्रश्न एका मिनिटातच निकालात काढलात. इतर मंत्र्यांप्रमाणे 'तुमच्या मागणीचा विचार करतो' असेही म्हणाला नाहीत. निदान तुम्ही तसे म्हणाला असतात तरी आम्हाला बरे वाटले असते.'

यावर साहेब म्हणाले, 'हे बघा मित्रांनो, प्रत्येक प्रश्नावर 'बघू', 'विचार करू' असे म्हणत राहिलो तर मग नक्की कोणते प्रश्न सोडवायचे असा प्रश्न निर्माण होतो. सवंग घोषणा करून लोकांना खूश करण्यापेक्षा पाय जमिनीवर ठेवून योजना आखणे जास्त फायद्याचे आहे, असे मी मानतो. राज्य करणाऱ्याने जबाबदारीने आश्वासने दिली पाहिजेत आणि एकदा दिलेली आश्वासने कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केली पाहिजेत.'

त्या दिवशी उपस्थित पत्रकारांना यशवंतरावांमधील प्रशासकाचे दर्शन झाले.

# भजी खाताना दादांची आठवण येते !

सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या कुटुंबासाठी फारसा वेळ देता येत नाही. यशवंतराव तर वयाच्या सतराव्या वर्षापासून सार्वजनिक जीवन जगत होते. वेणूताईंना व कुटुंबियांना त्यांचा सहवास फार कमी लाभायचा. यशवंतरावांनाही या गोष्टीचे वाईट वाटायचे. पण जेव्हा शक्य असेल तेव्हा सर्व वेळ ते कुटुंबियांसमवेत घालवायचे.

अशाच एका उन्हाळ्याच्या सुट्टीत यशवंतरावांचा मुक्काम महाबळेश्वरला होता. सोबत वेणूताई होत्या. थोरल्या बंधूंची लहान मुलेही यशवंतरावांनी आणली होती. त्या सुट्टीत यशवंतरावांनी राजकीय भेटी पूर्णपणे टाळल्या. कुटुंबातील सर्वांशी गप्पागोष्टी करण्यातच त्यांचा दिवस जायचा. प्रत्येकाची ते आपुलकीने चौकशी करायचे. संध्याकाळी वेणुताईंसमवेत फिरायला जायचे. अशाच एका संध्याकाळी वेणूताई आणि यशवंतराव फिरायला निघाले होते. कुठूनतरी तळलेल्या भज्यांचा खमंग वास आला. नकळत यशवंतराव उद्‌गारले, 'व्वा ! काय मस्त वास आहे!' वेणूताई काहीच बोलल्या नाहीत. काही वेळाने दोघेही बंगल्यावर परत आले. हातपाय धुवून यशवंतराव बंगल्यासमोर खुर्च्या टाकून बसले आणि इतक्यात त्यांच्यासमोर एका ताटात गरम भजी आणली गेली. यशवंतराव कौतुकाने म्हणाले, 'हे वेणूबाईंचेच काम असणार! .'

वेणूताई स्मितहास्य करीत म्हणाल्या, 'तुम्ही भज्यांची आठवण काढलीत, म्हणून मग त्या हॉटेलमधून मागवून घेतली.'

मग भजी खात खात यशवंतराव सांगू लागले, 'लहानपणी मी शाळेत असताना दादा (थोरले बंधू) कोर्टात बेलिफ होते. माझी शाळा सुटली की मी सरळ दादांकडे जायचो. मग दादा मला जिरंग्याच्या हॉटेलमध्ये नेऊन भजी देत असत. मला भजी खायची सवयच लागली होती. त्यामुळे भजी तळतानाचा वास आला की माझ्या तोंडाला पाणी सुटते आणि दादांची आठवण येते.'

# हे अश्रू 'त्या' दु:खाचे आहेत !

२ जून १९४२ रोजी यशवंतरावांचा विवाह झाला. दिव्यासारख्या लखलखणाऱ्या तेजस्वी डोळ्यांच्या वेणूताई सोनपावलांनी त्यांच्या आयुष्यात आल्या. लग्नानंतर तीन वर्षांनी वेणूताईंनी एका कन्येला जन्म दिला. पण दुर्दैवाने अपत्यजन्माचा हा आनंद चव्हाण कुटुंबाला फार काळ साजरा करता आला नाही. ते बाळ अल्पायुषी ठरले.

सन १९४५ मध्ये वेणूताईंना क्षयाची बाधा झाली. त्यांची तब्येत प्रमाणाबाहेर खालावली. डॉक्टरांनी सांगितले की, यापुढे वेणूताईंना अपत्यसंभव नाही. त्यामध्ये त्यांच्या जीवाला धोका आहे. चव्हाण कुटुंबियांवर जणू वीजच कोसळली. भरल्या गोकुळाचे स्वप्न पाहणाऱ्या वेणूताईंना आणि यशवंतरावांना समोर फक्त अंधार आणि अंधारच दिसू लागला, पण त्यांनी एकमेकांना सावरले. काळ हळू पावलांनी पुढे सरकत राहिला. यशवंतरावांच्या अनेक हितचिंतकांनी त्यांना दुसरा विवाह करण्याचा सल्ला दिला. एकदा तर खुद्द वेणूताईंनीच त्यांना दुसरा विवाह करण्याचा आग्रह केला. पण यशवंतरावांनी स्पष्ट सांगितले, 'दुसऱ्या विवाहाची कल्पना सुद्धा मी करू शकत नाही.'

त्यानंतरही अनेक वर्षे निघून गेली. एकदा महाबळेश्वरला कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे शिबीर भरले होते. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांचे दोन जीवलग मित्र-किसन वीर आणि वसंतदादा पाटील यांनी या विषयावर यशवंतरावांशी बोलायचे ठरविले. एका संध्याकाळी खोलीत फक्त तिघेच असताना वसंतदादा व किसन वीर यांनी दुसऱ्या विवाहाचा विषय काढला. 'भविष्याचा विचार करून भावनाप्रधान न होता साहेबांनी दुसऱ्या लग्नाचा गांभीर्याने विचार करावा' असे मत त्यांनी मांडले. यशवंतराव खिडकीजवळ बसले होते. शून्यात दृष्टी लावून ते बराच वेळ शांत बसून राहिले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वहात होते. काही वेळाने ते म्हणाले, 'मित्रांनो, तुम्हाला तुमचा मित्र समजला नाही याचं मला दु:ख आहे. हे अश्रू त्या दु:खाचे आहेत.'

यानंतर पुढे कधीही त्या दोघांनी साहेबांसमोर दुसऱ्या लग्नाचा विषय काढला नाही.

# मनाचा मोठेपणा



आपल्या विरोधकांविषयी कटू उद्गार न काढणे व इतरांना योग्य तो मोठेपणा देणे हे यशवंतरावांच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य होते.

लोकनायक डॉ.मा.श्री. अणे हे स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते होते हे सर्वांनाच माहित आहे. डॉ. अणे यांची एखाद्या प्रश्नाबाबतची भूमिका काहीही असली तरी त्यांची श्रेष्ठता वादातीत होती. एकदा लोकनायक अणे यांच्याच गावी वणी येथे साहेबांची सभा होती. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. अणेंचा गौरव केला आणि 'संयुक्त महाराष्ट्राला त्यांचा आशीर्वाद मिळविण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करू' असे भावपूर्ण उद्गार काढले.

असाच आणखी एक प्रसंग. विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन बुलढाणा जिल्ह्यातील सावरगाव इथे भरले होते. श्री.ना.रा.शेंडे हे अधिवेशनाचे उद्घाटक होते. उद्घाटन समारंभाच्या वेळी आयोजक सुरुवातीला यशवंतरावांचा सत्कार करू लागले, तेंव्हा ते आयोजकांना म्हणाले, 'अहो, आज शेंडे यांचा मान व्हावयास पाहिजे, माझा नव्हे.'

लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीचा सन्मान जपला गेला पाहिजे ही यशवंतरावांची धारणा होती.

# चंद्रपूरमध्ये कारखाना काढा!

विख्यात कथाकार प्रा.रंगनाथ पठारे यांनी सांगितलेली ही आठवण. शंकर गुहा नियोगी यांच्या कामाचा अभ्यास करण्यासाठी ते छत्तीसगड राज्यात गेले होते. पूर्वी हे राज्य मध्यप्रदेश या राज्याचाच एक भाग होते. मध्यप्रदेश व महाराष्ट्र ही दोन राज्ये एकमेकांच्या सीमेला लागून आहेत. उद्योगधंद्याविषयी चर्चा चालू असताना एक वयोवृद्ध व्यक्ती पठारे सरांना म्हणाली, 'आमच्या लोखंडाच्या खाणीचा दल्ली-राजहरा आणि बाकी बराच भाग तुमच्या चंद्रपूर जिल्ह्याला लागूनच आहे. भिलाईला हा पोलाद कारखाना होण्याच्या कैक आधी तुमचे यशवंतराव चव्हाण नावाचे जे मुख्यमंत्री होते, त्यांनी केंद्र सरकारला चंद्रपूरकडे पोलाद कारखाना काढण्यासाठीचा प्रस्ताव सादर केला होता. जमीन, जागा, वीज आणि इतर सगळ्या पायाभूत सुविधा तातडीने पुरविण्याची हमी त्यांनी दिली होती. खाणीतून बाहेर काढलेल्या खनिजांची वाहतूक करण्यासाठी चांगले रस्ते तयार करून देऊ, रेल्वेचं काही काम करण्यात महाराष्ट्राचे सरकार सहभागी होईल, शिवाय वाहतुकीचं अंतरही कमीच आहे' असं सगळं सांगत या प्रकल्पाचा एक आराखडाच त्यांनी केंद्राकडे सादर केला होता. पण या प्रकल्पाची कुणकुण लागल्यावर आमचे माधोचरण, श्यामाचरण आणि विद्याचरण शुक्ला खडबडून जागे झाले. त्यांनी हा प्रकल्प मध्यप्रदेशात व्हावा यासाठी दिल्ली दरबारी प्रयत्न केले व शेवटी त्यांना त्यात यशही आले. पोलादाचा हा कारखाना मध्यप्रदेशात सुरू झाला. जर हा प्रकल्प महाराष्ट्रात झाला असता तर फार मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली असती.

यशवंतरावांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारा हा प्रसंग दूरदेशी जाऊन ऐकल्यावर पठारे सरांचा ऊर भरून आला.

# शेतकऱ्यांवर अन्याय कशासाठी?

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांनी शपथ घेतली. समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र स्थापन करण्याची प्रतिज्ञा करून ते कामाला लागले. या प्रतिज्ञेला अनुसरून काही कायदेही त्यांनी केले. असाच एक कायदा होता कमाल जमीनधारणेसंबंधीचा कायदा. हा कायदा साखर कारखान्यांकडील जमिनींना लागू करू नये असे नियोजन आयोगाचे मत होते. त्यावेळी गुलझारीलाल नंदा हे नियोजनमंत्री होते आणि त्यांचेही मत तसेच होते. यशवंतराव आणि त्यांचे सहकारी वसंतराव नाईक यांनी अनेकवेळा दिल्लीला जाऊन याबाबत नियोजन मंडळाशी चर्चा केली, पण आयोगाचा एकच आग्रह होता की, कारखान्यांच्या जमिनीला हा कायदा लागू करू नये. याउलट यशवंतरावांचे (महाराष्ट्र सरकारचे) म्हणणे असे होते की, जर कारखान्याच्या जमिनी सिलींगखाली येणार नसतील तर केवळ गरीब शेतकऱ्यांच्या जमिनीवर हा कायदा लावण्यात काहीच अर्थ नाही. त्यांच्यावर अन्याय कशासाठी?

असेच एकदा नियोजन आयोगाशी चर्चा करण्यासाठी यशवंतराव दिल्लीला गेले होते. दोन तास चर्चा केल्यानंतरही आयोगाने आपली भूमिका बदलायला नकार दिला, तेव्हा यशवंतरावांनी पंतप्रधान पं. नेहरूंची भेट घेतली. (भारताचे पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात) यशवंतरावांनी आपली भूमिका नेहरूंना समजावून सांगितली. नेहरू म्हणाले, 'तुम्ही परत गेल्यावर मला एक पत्र पाठवा.' त्याप्रमाणे मुंबईत आल्याबरोबर यशवंतरावांनी नेहरूंना पत्र पाठविले. चौथ्या दिवशी नेहरूंचे उत्तर आले. दोनच वाक्यांच्या या पत्रात त्यांनी लिहिले होते, 'मी तुमच्याशी सहमत आहे. नियोजन मंडळाशी बोलणी करण्यासाठी दिल्लीला या.' दुसऱ्या दिवशी यशवंतराव दिल्लीला गेले. पंडितजींनी आपले मत आयोगाला कळवले होतेच. त्यामुळे दीड मिनिटात चर्चा संपली. महाराष्ट्र सरकारचा प्रस्ताव आयोगाने स्वीकारला. जो प्रश्न दीड वर्षे रेंगाळला होता तो दीड मिनिटात निकाली निघाला. नेहरूंच्या पाठिंब्याने महाराष्ट्र सरकारने आणखी एक पुरोगामी पाऊल टाकले.

# मला निष्पक्षपाती चौकशी हवी आहे!

१२ जुलै १९६१ रोजी पुण्याजवळचे पानशेत धरण फुटले आणि पुणे शहर जलमय झाले. या महापुरामुळे शहरातील स्थावर मालमत्तेचे अपरिमित नुकसान झाले. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. लोकांना धीर दिला, अनेकांचे पुनर्वसन केले.

या आपत्तीसाठी विरोधी पक्षांनी सरकारलाच जबाबदार धरले व धरणफुटीची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्याचा निर्णय सरकारने घेतला. या समितीच्या अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती करावी हा महत्त्वाचा प्रश्न होता. यशवंतरावांना न्या. गजेंद्रगडकरांची आठवण झाली. न्या. गजेंद्रगडकर हे तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते, म्हणून अर्थातच ते हे पद स्वीकारू शकत नव्हते. एके रात्री यशवंतरावांनी न्या. गजेंद्रगडकर यांना फोन केला व चौकशी समितीच्या अध्यक्षपदासाठी नाव सुचविण्याची विनंती केली. न्या. गजेंद्रगडकर आणि यशवंतराव यांचे मैत्रीचे संबंध असले तरी ते निर्भिड आणि स्पष्टवक्ते होते. त्यांनी यशवंतरावांना फोनवरच विचारले, 'तुम्हाला शासनाला अनुकूल अहवाल देणारी समिती पाहिजे की खरोखरच त्या दुर्घटनेचा वस्तुनिष्ठ अहवाल देणारी समिती पाहिजे? कारण मग अशा समितीचा अहवाल कदाचित शासनाला दोषी ठरविणाराही असू शकतो.'

यावर यशवंतराव तात्काळ म्हणाले, 'मला या आपत्तीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणारी समिती हवी आहे.'

'तसं असेल तर न्या. बावडेकर या कामासाठी योग्य व्यक्ती आहेत.' न्या. गजेंद्रगडकरांनी सुचविलेले हे नाव ऐकून यशवंतरावांना आनंद झाला. ते म्हणाले, 'माझ्या नजरेसमोर देखील हेच नाव होते, पण मला तुमचा अभिप्राय हवा होता. धन्यवाद ..!'

स्वतः न्या. गजेंद्रगडकर यांनीच 'To the best of my memories' या आपल्या आत्मचरित्रात वरील आठवण नोंदवून ठेवली आहे. स्वतःला म. गांधीजींचा नम्र अनुयायी समजणारे यशवंतराव सत्याला सामोरे जायला कचरले नाहीत.

# ...म्हणून त्या वाटेला आम्ही जात नाही!

यशवंतराव हे उत्कृष्ट संसदपटू होते. सभागृहातील त्यांची भाषणे याची साक्ष देतात. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनकाळात आचार्य अत्रेंच्या वाणीचा आणि लेखणीचा वारू चौफेर उधळला होता. विधीमंडळात हा वारू रोखण्याचे काम यशवंतरावांनी अनेकदा केले. अत्रेंच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'मराठा' दैनिकाची पाने सरकारवरील टीकेने भरून वहात असत. आपल्या धारदार लेखणीने त्यांनी सरकारला पुरते घायाळ केले होते. साहजिकच 'मराठा' दैनिकाला सरकारकडून फारशा जाहिराती मिळत नव्हत्या. यासंदर्भात २८ जून १९६२ रोजी आचार्य अत्रेंनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला की 'महाराष्ट्र सरकार विविध वृत्तपत्रांत ज्या जाहिराती देत असते त्या देताना कोणते निकष लावले जातात हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करावे.' अत्र्यांच्या प्रश्नाचा रोख यशवंतरावांच्या लगेच लक्षात आला. उत्तरादाखल केलेल्या भाषणात ते म्हणाले, 'जाहिराती देण्याच्या बाबतीत एक ॲप्रूव्हड लिस्ट (मान्यता यादी) आहे यात शंका नाही. एखाद्या वर्तमानपत्रात जाहिराती देताना आम्ही त्या वर्तमानपत्राचा खप, त्याचा वाचकवर्ग आणि संबंधित वर्तमानपत्राचा दृष्टिकोन कितपत वास्तवववादी आहे या गोष्टींचा विचार करतो. केवळ निंदाव्यंजक मजकूर छापणारे, कुचेष्टा करणारे ते वर्तमानपत्र नाही ना? याचाही विचार जाहिराती देताना केला जातो.' शेवटचे वाक्य अर्थातच 'मराठा' दैनिकाला उद्देशून होते.

यावर उठून अत्र्यांनी आणखी एक सूचना मांडली की आम्ही ज्या गोष्टी वर्तमानपत्रात छापतो त्या जोपर्यंत सरकारकडून फेटाळल्या जात नाहीत तोपर्यंत त्या खऱ्याच आहेत असे मानले गेले पाहिजे. खोट्या बातम्या छापल्या तर त्या फेटाळण्याचा अधिकार सरकारला आहेच.

या सूचनेवर यशवंतरावांनी फार मजेशीर उत्तर दिले. ते म्हणाले, 'आम्ही शक्यतो शहानिशा करण्याचा प्रयत्न करीत असतो, पण त्यालाही काही मर्यादा आहेत. 'मराठा'मधील किती बातम्या आम्ही दुरुस्त करणार? म्हणून त्या वाटेला आम्ही जात नाही.' सभागृहात हशा पिकला. यशवंतराव पुढे म्हणाले, 'याचा अर्थ ते जे लिहितात ते सगळेच खोटे असते असे मी म्हणत नाही.' व थोडे थांबून पुढे मिश्किलपणे म्हणाले, 'कधी कधी ते खरेही असते!' या वाक्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला व अत्र्यांसह सगळे सभागृह हास्यकल्लोळात बुडून गेले.

# कवीचे स्वागत



कवी सुशांधू यांनी सांगितलेली ही आठवण. एकदा आकाशवाणीच्या काही कामानिमित्त ते मुंबईला गेले होते. मुंबईला आलोच आहोत तर यशवंतरावांना भेटावे असा विचार त्यांनी केला आणि यशवंतरावांना भेटण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर गेले. एखाद्या मंत्र्याच्या बंगल्यावर जाण्याचा पहिलाच प्रसंग असल्याने ते काहीसे बावरले होते. त्यांनी त्यांच्या नावाची चिठ्ठी आत पाठवली आणि बोलावणे येण्याची वाट पहात बसून राहिले आणि काय आश्चर्य! स्वत: यशवंतरावच त्यांच्या स्वागतासाठी दाराशी आले. त्यांनी त्यांचे प्रेमाने स्वागत केले. आत घेऊन गेले. आपल्या शेजारी बसवले आणि आत जाऊन वेणूताईंना कविराज आल्याचे सांगितले. वेणूताई बाहेर आल्या व सुधांशूना पाहताच, 'अगं बाई... ! साक्षात् दत्त दिगंबरच आले की !' असे म्हणून नम्रतेने त्यांना नमस्कार केला. सुधांशु औदुंबरचे होते आणि 'दत्त दिगंबर दैवत माझे' हे त्यांचे गाणेही प्रसिद्ध होते. पण साक्षात् मुख्यमंत्र्यांच्या घरी झालेल्या या अनपेक्षित स्वागताने सुधांशू भारावून गेले.

# कॉन्फरन्स चांगली झाली पाहिजे !

यशवंतराव मुख्यमंत्री असताना घडलेला हा प्रसंग. १९६२ साली गंगाधर गाडगीळ व त्यांचे सहकारी 'ऑल इंडिया रायटर्स कॉन्फरन्स' आयोजित करणार होते. या परिषदेसाठी राज्य सरकार काही मदत करेल का, हे पाहण्यासाठी ते एकदा मंत्रालयात यशवंतरावांना भेटायला गेले. यशवंतरावांनी त्यांना ताबडतोब अपॉईन्टमेंट दिली. गाडगीळांनी दोन मुख्य मागण्या केल्या. पहिली मागणी म्हणजे यशवंतरावांनी स्वागताध्यक्ष बनून उद्‌घाटनासाठी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन किंवा पंतप्रधान पंडित नेहरूंना बोलवावे. दुसरी अपेक्षा अशी होती की, राज्याबाहेरून येणाऱ्या प्रतिनिधींना उतरण्यासाठी आमदार निवास (एम.एल.ए. होस्टेल) विनामूल्य उपलब्ध करून द्यावे. यशवंतरावांनी दोन्ही मागण्या तात्काळ मान्य केल्या आणि विचारले, 'खर्चाची व्यवस्था काय केली आहे ?' गाडगीळ म्हणाले, 'आम्ही स्मरणिकेसाठी जाहिराती गोळा करणार आहोत. प्रतिनिधींच्या जेवणाची जबाबदारी काही संस्थांवर सोपवणार आहोत.' साहेबांनी पुन्हा विचारले, 'तुमच्या कॉन्फरन्सला अंदाजे किती खर्च येईल ?' गाडगीळ म्हणाले, 'साधारण पंचवीस हजार रुपये खर्च येईल, असा माझा अंदाज आहे.' 'फक्त पंचवीस हजार ? अहो कॉन्फरन्सला पुष्कळ खर्च येतो. पन्नास-साठ हजार सहज लागतात.' त्यावर गाडगीळ पूर्ण आत्मविश्वासाने म्हणाले, 'माझी पूर्ण खात्री आहे की पंचवीस हजारांपेक्षा अधिक खर्च येणार नाही.' यावर यशवंतराव म्हणाले, 'असे असेल तर ते पंचवीस हजार मीच देतो. तुम्ही पैसे गोळा करण्याच्या खटपटीत वेळ घालविण्यापेक्षा कॉन्फरन्सच्या नियोजनाकडे लक्ष द्या. कॉन्फरन्स चांगली झाली पाहिजे.' या अनपेक्षित मदतीने गाडगीळ चकीतच झाले.

चर्चा संपल्यावर जाताना त्यांनी हळूच यशवंतरावांना विचारले, 'या पैशासाठी काही अर्ज वगैरे करायला हवा का ? कोणाला भेटावे लागेल ?' साहेब म्हणाले, 'तुम्ही मला फक्त एक पत्र लिहून द्या. हे पैसे मी मुख्यमंत्री निधीतून देईन म्हणजे उगीच नियम आणि फॉरमॅलिटीजचा त्रास तुम्हाला व्हायला नको.' त्याप्रमाणे गाडगीळांनी लेखी पत्र लिहून दिले. त्यावेळीही अविश्वासाने त्यांनी विचारले, 'मी पुन्हा कधी येऊ? पत्राची आठवण करून द्यायला हवी का? कोणाला भेटू?' साहेब म्हणाले, 'काही गरज नाही. चेक तुमच्याकडे येईल.' आणि तसंच झालं. थोड्याच दिवसात गाडगीळांना पंचवीस हजार रुपयांचा चेक मिळाला.

# लोक वाट पहात असतील !

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी पंचायत राज विधेयक मंजूर करून घेतले आणि महाराष्ट्रात जिल्हा परिषदांची निर्मिती झाली. मुख्यमंत्री म्हणून राज्याचा कारभार करीत असताना सुद्धा त्यांचे स्वतःच्या मतदारसंघाकडे बारीक लक्ष असे. आठवड्यातून एकदा तरी ते सातारा जिल्ह्याच्या भेटीवर यायचे. शनिवारी आणि रविवारी असा त्यांचा दौरा असायचा. सर्कीट हाऊसवर मुक्काम करायचा आणि दिवसभर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात फिरायचे असा त्यांचा कार्यक्रम असे. त्यांच्याबरोबर पुण्याचे आयुक्त व सातारा जिल्हा परिषदेचे तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी एस.राजगोपाल असत. दिवसभरात पाच-सहा खेड्यांचा दौरा असे. हजारो कार्यकर्ते भेटत. निवेदने देत. सामान्य लोक आपले गाऱ्हाणे मांडत. यशवंतराव स्वतः अधिकाऱ्यांशी बोलून कामाबाबत आदेश देत. एकदा एका खेड्यात यशवंतरावांचा कार्यक्रम होता. यशवंतराव वेळेवर तयार झाले पण त्या गावचे कार्यकर्तेच आले नव्हते. राजगोपाल जीप घेऊन तयार होते. यशवंतराव गाडीत बसले. राजगोपालना म्हणाले, ‘कुणाची वाट बघता? चला.’

राजगोपाल म्हणाले, ‘कार्यकर्त्यांची वाट बघतोय.’

त्यावर यशवंतराव म्हणाले, ‘चला निघूया. ज्यांचा कार्यक्रम आहे त्यांनी अगोदर यायला नको का? आता थांबायला नको. लोक वाट पहात असतील.’

वेळेच्या व कामाच्या बाबतीत यशवंतराव फार काटेकोर होते.

# असं कधी बोलू नये !

सन १९६२ सालची गोष्ट. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. प्रसिद्ध कथालेखक गंगाधर गाडगीळ 'ऑल इंडिया रायटर्स कॉन्फरन्स' च्या आयोजनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना भेटले. परिषदेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन यशवंतरावांनी दिले. उद्घाटक म्हणून कोणाला बोलवावं याबद्दल चर्चा चालली होती. यशवंतराव परिषदेचे स्वागताध्यक्ष होते व गाडगीळ निमंत्रक होते.

चर्चेच्या ओघात राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् किंवा पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यापैकी कोणाला तरी बोलवावे असे ठरले. यावर गाडगीळ काहीशा उतावीळपणाने म्हणाले, 'नेहरू मोठे आहेत, पण ते नको बुवा, ते चटकन् चिडतात. त्यांना सांभाळणं मला जमायचं नाही. आपण आपले राधाकृष्णनना बोलवूया.'

अशाप्रकारे बोलणं खरंतर अनुचित होतं. त्यामुळे उगीच गैरसमज झाले असते. यशवंतरावांना गाडगीळांचं हे बोलणं आवडलं नाही. ते थोडावेळ त्यांच्याकडे बघतच राहिले आणि मग म्हणाले, 'गाडगीळ, असं 'अमका नको', 'तमका नको' असं कधी बोलू नये. 'अमका हवा' इतकच म्हणावं.'

साहित्यिकांना सुद्धा शिष्टाचार शिकविण्याइतका यशवंतरावांचा नैतिक अधिकार मोठा होता.

# साहित्यिक आणि अभियंते

मराठी साहित्यिकांना त्यांच्या लिखाणाचा पुरेसा मोबदला मिळत नाही. अनेक साहित्यिक आर्थिक विवंचनेत दिवस कंठत असतात. साठच्या दशकातही हीच स्थिती होती. विख्यात लघुनिबंधकार अनंत काणेकर तेव्हा विरारला रहात होते. एकदा मुंबईत एका कार्यक्रमात ते आणि यशवंतराव एकत्र होते. काणेकरांना त्या कार्यक्रमाला यायला थोडा उशीर झाला. यशवंतरावांनी सहज कारण विचारले तेव्हा काणेकर म्हणाले, 'विरारहून यायला नेहमीच उशीर होतो. अनेकांची अवस्था माझ्यासारखीच आहे.' यशवंतराव मनाशी काही ठरवत होते. ते काणेकरांना म्हणाले, 'तुम्ही मला मराठी साहित्यिकांची यादी द्या. आपण त्यांना मुंबईत मध्यवर्ती ठिकाणी घरे देऊ.' यशवंतराव असे फक्त म्हणाले नाहीत तर थोड्याच दिवसात 'साहित्य सहवास' ही सुंदर वसाहत शासनाने निर्माण केली. अनेक साहित्यिक तिथे राहू लागले. एकदा यशवंतराव काणेकरांना म्हणाले, 'साहित्य सहवासमधील एक फ्लॅट शासनाचे मुख्य अभियंता दुर्गादास बोरकर यांच्यासाठी राखीव असू द्या.'

काणेकर म्हणाले, 'आम्हा साहित्यिकांमध्ये इंजिनिअर कशाला?'

यशवंतराव हसून म्हणाले, 'अहो, साहित्यिक आणि अभियंत्यांमध्ये विशेष फरक नाही. तुम्ही साहित्यिक मंडळी शब्दावर शब्द मांडता. वेलांटीवर वेलांटी देता आणि अभियंता वीटेवर वीट रचतो, दगडावर दगड मांडतो. शेवटी दोघेही नवनिर्मितीच करतात ना?' मग अचानक गंभीर होऊन यशवंतराव म्हणाले, 'या दुर्गादास बोरकरांनी सचिवालयाची इमारत आराखड्यापेक्षा (बजेटपेक्षा) छपन्न लाख रुपये कमी खर्चात बांधून दिली आहे. ही त्यांनी जनतेची केलेली सेवाच नव्हे काय?'

काणेकरांना यशवंतरावांचे म्हणणे पटले व बोरकरांना 'साहित्य सहवास' मध्ये फ्लॅट देण्यात आला. आपल्या बुद्धिकौशल्याचा वापर समाजाच्या हितासाठी करणाऱ्या लोकांना यशवंतरावांनी नेहमीच प्रोत्साहन व आधार दिला.

# विकेंद्रीकरण की विघटन ?



१ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायत राज कायदा लागू झाला. हा कायदा करण्यापूर्वी त्याचा स्थूल आराखडा यशवंतरावांनी पंतप्रधान पंडित नेहरूंना सादर केला होता. नेहरूंनी तो कायदा काळजीपूर्वक वाचला होता, पण त्यांची पहिली प्रतिक्रिया अनुकूल नव्हती. त्यांनी ताबडतोब मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून विचारले,

'हे डिसेंट्रलायजेशन आहे की डिस्इंटिग्रेशन ?' (हे विकेंद्रीकरण आहे की विघटन ?)

यशवंतरावांना हे पत्र मिळाल्यावर ते अस्वस्थ झाले. त्यांनी लगेच मंत्रालयातील जिल्हा परिषदांचे सचिव श्री. डी. डी. साठे यांना बोलावले आणि त्यांच्यासमोर पंतप्रधानांचे ते पत्र टाकले. पत्र वाचून झाल्यावर साठे म्हणाले, 'पंडितजींना आपण लगेच पत्र लिहूया. तुम्ही त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन महाराष्ट्राची भूमिका स्पष्ट करावी, म्हणजे बऱ्याच गोष्टींचा उलगडा होईल.'

त्याप्रमाणे पं.नेहरूंना भेटण्यासाठी यशवंतराव दिल्लीला गेले. तेथे त्यांनी सत्तेच्या या व्यापक विकेंद्रीकरणामागील भूमिका स्पष्ट केली. आपले म्हणणे नेहरूंना पटवून दिले आणि मगच नेहरूंनी यशवंतरावांना हा प्रयोग महाराष्ट्रात करण्यास हिरवा कंदील दाखवला. पुढचा इतिहास सर्वांनाच माहित आहे. विकेंद्रीकरणाचा हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला.

नंतर एकदा १९७१ साली दिल्ली येथे भारतातील सर्व जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांची बैठक झाली त्यावेळी केंद्रीय ग्रामविकासमंत्री एस. के. झा म्हणाले, 'महाराष्ट्राची विकेंद्रीकरणाची पद्धती भारतात सर्वोत्तम आहे.'

यशवंतरावांच्या दूरदृष्टीला मिळालेली ही दाद होती. त्यांनी लावलेल्या रोपट्याला आलेले ते मधुर फळ होते.

# मला नेमाडेंना भेटायचंय !

सन १९६३ साली भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' कादंबरी प्रकाशित झाली आणि मराठी साहित्यविश्वात खळबळ उडाली. फडके आणि खांडेकरांच्या कादंबऱ्यातील अतिरंजित व स्वप्नाळू जगात रमलेल्या मराठी वाचकांना 'कोसला'ने एका फटक्यात जमिनीवर आणले. मराठी समीक्षकांना कादंबरीची व्याख्याच बदलावी लागली. यशवंतराव तेव्हा नुकतेच संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेले होते. 'कोसला' त्यांनीही वाचली. त्यातील उपहास आणि दांभिकतेबद्दलची चीड त्यांना भावली. नेमाडेंविषयी त्यांना औत्सुक्य व आत्मियता निर्माण झाली.

अशीच काही वर्षे निघून गेली. नेमाडे लिहित राहिले. यशवंतराव राजकारणात आणि लोकांत रमत राहिले. पुढे एकदा यशवंतराव औरंगाबाद जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना त्यांना नेमाडेंची आठवण झाली. मराठी कादंबरीला नवे वळण देणाऱ्या या युगप्रवर्तक कादंबरीकाराला आपण भेटावे असे त्यांना वाटले. ते सोबत असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना म्हणाले, 'भालचंद्र नेमाडे सध्या औरंगाबादमध्येच आहेत ना? मला त्यांना भेटायचंय.'

नेमाडे तेव्हा मराठवाडा विद्यापीठाच्या परिसरातच रहात होते. तो काळ अशांततेचा होता. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठीची चळवळ उग्र बनत चालली होती. विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या मागणीसाठी आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली होती. अशा अवस्थेत यशवंतरावांनी विद्यापीठ परिसरातील नेमाडेंच्या घरी जाणे सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे असे जिल्हाधिकाऱ्यांना वाटले. पण यशवंतरावांना तर नेमाडेंना भेटायचेच होते. शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी नेमाडेंना निरोप पाठविला की यशवंतरावजी तुम्हाला विद्यापीठ परिसरातील तुमच्या घरी येऊन भेटू इच्छितात. परंतु सुरक्षा व्यवस्थेवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने आपण शासकीय विश्रामगृहावर आलात तर फार बरे होईल. नेमाडेंनी जिल्हाधिकाऱ्यांची ही विनंती मान्य केली व ते शासकीय विश्रामगृहावर गेले. यशवंतरावांनी त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले. त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. काही वेळाने नेमाडे जायला निघाल्यावर त्यांना निरोप देण्यासाठी यशवंतराव विश्रामगृहाच्या बाहेरच्या फाटकापर्यंत आले. एक राजकारणी एका लेखकाला इतक्या सन्मानाने वागवतो हे पाहून उपस्थित अधिकारी व राजकीय कार्यकर्ते चकित झाले. साहित्यिकांचा सन्मान यशवंतरावांनी नेहमीच जपला. कारण ते स्वतः सुद्धा एक उच्च दर्जाचे साहित्यिकच होते. शब्दांचे सामर्थ्य त्यांनी पुरेपूर ओळखले होते.

# तो वेडा कुंभार !

यशवंतरावांच्या जीवनावर त्यांच्या आईचा-विठामातेचा मोठा प्रभाव पडलेला जाणवतो. यशवंतराव मातृभक्त होते.

मुख्यमंत्री झाल्यावर ते मुंबईला 'सह्याद्री' बंगल्यावर राहू लागले. विठामाता सुद्धा काही दिवस मुंबईत साहेबांजवळ राहिल्या. पण तिथे त्यांचा जीव रमेना. त्या पुन्हा कराडला राहू लागल्या. पण एकदा त्यांची तब्येत फारच बिघडली, तेव्हा यशवंतराव त्यांना मुंबईला घेऊन आले. दवाखान्यातून घरी सोडल्यावर त्यांच्यावर 'सह्याद्री'वरच उपचार चालू होते. आई अत्यवस्थ असल्यामुळे यशवंतराव अस्वस्थ झाले होते. अनेक मान्यवर मंडळी विठाईमातेची विचारपूस करण्यासाठी येत होती. एकेदिवशी साहेबांचे मित्र आणि विख्यात गीतकार ग. दि. माडगूळकर मातोश्रींच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी 'सह्याद्री' बंगल्यावर गेले होते. माडगूळकरांनी पाहिले- यशवंतराव एकटेच गॅलरीत खुर्ची टाकून बसले होते. माडगूळकरांना पाहून ते म्हणाले, 'या आण्णा, बसा'

'कसं काय आईचं ?' माडगूळकरांनी विचारले,

'बरं आहे, पण तो 'वेडा कुंभार' काय करील ते खरं.' आभाळाकडे खिन्नपणे हात करून यशवंतराव म्हणाले.

क्षणभर माडगूळकरांना काहीच समजले नाही. पण लगेच त्यांच्या लक्षात आले की, आपल्याच एका गीतात आपण देवाला वेड्या कुंभाराची उपमा दिलीय.

*'फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार, विठ्ठला, तू वेडा कुंभार'*

हे माडगूळकरांचे गाणे प्रसिद्ध होते. पण मनाच्या अशा उदास अवस्थेतसुद्धा यशवंतरावांनी ती उपमा यथार्थपणे वापरून दिलेली दाद पाहून माडगूळकरांना सुखद धक्काच बसला. यशवंतरावांमधला रसिक असा कायमच सजग राहिला.

# मीच यशवंतराव, आई...!

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. बीड जिल्ह्यात त्यांचा दौरा चालू होता. त्यांच्या गाड्यांचा ताफा रस्त्याने चालला होता. एका पुलाजवळ एक म्हातारी आपल्या नातवंडांना घेऊन निर्धाराने उभी होती. ती मंत्र्यांच्या गाड्यांना धीराने हात दाखवून थांबविण्याचा प्रयत्न करीत होती. तिला न जुमानता एक-दोन गाड्या पुढे गेल्या. ती म्हातारी आपल्याला भेटण्यासाठीच थांबली आहे हे यशवंतरावांनी अचूक ओळखले. त्यांनी गाडी थांबवायला सांगितली. ते डोंगरेंना म्हणाले, 'श्रीपादराव, त्या वृद्ध स्त्रीचं म्हणणं काय आहे बघा.'

डोंगरे खाली उतरून म्हातारीजवळ गेले. तिची अडचण विचारली. म्हातारी हुशार व धाडसी होती. ती आपल्या रांगड्या भाषेत म्हणाली, 'तुम्हापैकी यशवंतराव म्हन्तेला कोन? त्येला म्होरं घ्या.'

डोंगरेंनी म्हातारीचा हा निरोप (अर्थातच स्वत:च्या भाषेत) यशवंतरावांना सांगितला. यशवंतराव खाली उतरले. त्या म्हातारीसमोर जाऊन दोन्ही हात जोडून वाकून अत्यंत नम्रपणे म्हणाले, 'मीच यशवंतराव, आई.... बोला काय गाऱ्हाणं आहे ?'

म्हातारीनं क्षणभर यशवंतरावांना निरखलं आणि म्हणाली, 'गाऱ्हाणं न्हाई लेकरा माझं काई! ह्यो तुझ्या लेकराबाळास्नी खाऊ द्यायसाटी उभी हाय कवाधरनं,' असं म्हणून म्हातारीने कमरेजवळ खोचलेली कापडी पिशवी बाहेर खेचून तिच्यातून बंदा रुपाया काढला. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या हातावर ठेवला. त्यांची आलाबला घेतली. कानशिलाजवळ आपली बोटं मोडली. या जगावेगळ्या भेटीनं यशवंतराव थरारले. स्तब्ध झाले. काहीच न बोलता गाडीत येऊन बसले. एका अनाम वृद्धेकडून संतांच्या भूमीत तो रुपाया त्यांनी स्वीकारला होता. त्यांच्यासाठी हा एक कृपाप्रसादच होता!

# तू गडावर जाऊन दार उघड !

माजी सनदी अधिकारी व सिक्किम राज्याचे विद्यमान राज्यपाल मा. श्रीनिवास पाटील यांनी सांगितलेली ही आठवण!

पाटण तालुक्यातील मारूल हवेली हे त्यांचे गाव. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर श्रीनिवास पाटील यांनी एलएल.बी. पूर्ण केले. दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षाही दिली. योगायोगाने एलएल.बी.चा निकाल आणि लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल एकाच दिवशी लागला. श्रीनिवास पाटील यांची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली होती आणि आता ते वकीलीही करू शकत होते. सर्वांनाच खूप आनंद झाला. त्यावेळी यशवंतराव कराडमध्येच होते. ही आनंदाची बातमी त्यांना सांगण्यासाठी पेढे घेऊन श्रीनिवास पाटील यशवंतरावांच्या घरी गेले. साहेबांनी त्यांचे विशेष कौतुक केले. वेणूताईंनी त्यांचे औक्षण केले. श्रीनिवासजी पेढे देऊ लागल्यावर यशवंतराव म्हणाले, 'तू डेप्युटी कलेक्टर होणार असशील तरच मी तुझे पेढे घेतो. पण तू वकीली करणार असशील तर मला डायबिटीस आहे !' या अनपेक्षित प्रश्नाने पाटील गोंधळले. कारण त्यांनी तसा काही विचार केलेलाच नव्हता. यशवंतराव म्हणाले, 'हे बघ, तानाजीने कोंढाणा किल्ला कसा घेतला, हे तुला माहितच असेल.'

'हो, आपल्या निवडक मावळ्यांच्या मदतीने रात्रीच्या वेळी तानाजी कड्यावरुन गडावर चढला.'पण सगळे मावळे कड्यावरून गडावर गेले नव्हते, तर अगोदर चार-पाच शूर मावळे कड्यावरून वर गेले आणि त्यांनी गडाचे दरवाजे उघडले, खरं ना ?'

'हो, अगदी बरोबर.'

'मग तुला तेच करायचे आहे. तू हुशार आहेस. महाराष्ट्राच्या प्रशासनात तू कड्यावरून आत आलास. पण खेड्यापाड्यातील गरीबांच्या, मागासवर्गीयांच्या मुलांना आत येण्यासाठी आता तू प्रशासनाचा दरवाजा उघड. जर आपल्याला शेतकऱ्यांसाठी राज्य करायचे आहे, तर शेतकऱ्यांची मुलं प्रशासनात नकोत का?'

या उदाहरणाने श्रीनिवास पाटील खूपच प्रभावित झाले आणि त्यांनी डेप्युटी कलेक्टर होण्याचा निर्णय घेतला. थोर पुरुषांची दृष्टी काळाच्या किती पुढे असते हेच या प्रसंगातून दिसून येते.

# ज्याचं पोट दुखतं, तोच ओवा मागतो !

मुख्यमंत्रीपदाच्या अल्प कारकिर्दीत यशवंतरावांनी अनेक नवीन प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली. राज्याची सिंचन क्षमता वाढविण्यासाठी अनेक धरणे बांधली. धरणे बांधत असताना त्या क्षेत्रातील लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण व्हायचा. यातूनच धरणग्रस्तांची संघटना निर्माण झाली. डॉ.बाबा आढाव या संघटनेचे नेतृत्व करीत होते. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते एकदा येडगाव येथे कुकडी धरणाचे भूमिपूजन होणार होते. पण डॉ.बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली धरणग्रस्तांनी तो भूमिपूजन समारंभ उधळून लावला. काँग्रेसची महाराष्ट्रात एकहाती सत्ता असताना व राज्यात विरोधी पक्ष नाममात्र असताना हे घडले होते. संपूर्ण महाराष्ट्राला हा जोरदार धक्का होता. पण यशवंतरावांची या आंदोलनाबद्दलची प्रतिक्रिया संतप्त नव्हती. त्यांनी राजकीय मौनही धारण केले नाही. ते म्हणाले, 'ज्याचं पोट दुखतं तोच ओवा मागतो.' धरणग्रस्तांचे प्रश्न त्यांनी मान्य केले. नंतरच्या काळात त्यांना 'ओवा' द्यायचे कामही केले. पुढे महाराष्ट्र सरकारने धरणग्रस्तांसाठी स्वतंत्र कायदा केला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. सत्ताधारी संवेदनशील असले, तर काय घडते याचे हे उदाहरण आहे.



# अगोदर लोकमातेचं दर्शन घेऊया !



कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची गंगा गरीबाच्या झोपडीपर्यंत नेली. सन १९१९ साली एका बोर्डिंगच्या रूपाने सुरू झालेल्या या संस्थेचे हळूहळू विशाल वटवृक्षात रूपांतर झाले.

शिक्षण प्रसारासाठी आपला पहाडासारखा देह झिजविणारे कर्मवीर आण्णा आता थकले होते. आपल्यानंतर या संस्थेची धुरा समर्थपणे कोण पेलेल याचा विचार करीत असताना त्यांच्या डोळ्यासमोर नाव आले- यशवंतराव चव्हाण. आण्णा त्यांना भेटले. संस्थेचे अध्यक्ष होण्याची विनंती केली. त्या महापुरुषाचा शब्द हीच आज्ञा मानून यशवंतरावांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना एकदा यशवंतराव सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. विश्रामगृहावर असताना त्यांना कोणीतरी सांगितले की, आण्णांच्या मातोश्री आजारी आहेत. साहेब अस्वस्थ झाले. बरोबरच्या लोकांना म्हणाले, 'चला, आपण आण्णांच्या घरी जाऊ आणि त्यांच्या मातोश्रींचे दर्शन घेऊ.' तेवढ्यात यशवंतरावांचा स्वीय सहाय्यक (पीए) म्हणाला, 'पण साहेब, आता आपले राजमाता सुमित्राराजेंना भेटायला जायचं नियोजन आहे.'

यावर साहेब म्हणाले, 'राजमातांकडे तर जायचंच आहे, पण तत्पूर्वी लोकमातेचं दर्शन घेतलं तर दुधात साखरच पडेल.'

मातेची महती काय असते हे यशवंतरावांना माहित होते. ते स्वत: एक श्रेष्ठ मातृभक्त होते म्हणूनच कर्मवीरांची आई त्यांना लोकमातेसमान वाटली.

# केसेस काढता येणार नाहीत !

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. त्यावेळी श्री. बी. जे. खताळ - पाटील हे नगर जिल्ह्याचे संपर्कमंत्री होते. त्यांनी सांगितलेली ही आठवण.

यशवंतराव वर्षातून एकदा प्रत्येक जिल्ह्याला भेट देत असत. दिवसभरात जिल्ह्यात कार्यक्रम करून रात्री जिल्ह्याच्या ठिकाणी मुक्काम करून कार्यकर्त्यांशी चर्चा करायची अशी त्यांची पद्धत होती. अशाच एका भेटीत नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील काही नेत्यांनी त्यांच्या भागातील काही कार्यकर्त्यांवरील फौजदारी केसेस माघारी घ्याव्यात असा आग्रह यशवंतरावांकडे धरला. यशवंतरावांनी लगेच उत्तर दिले नाही. रात्री बंगल्यावर त्यांनी खताळ पाटलांना एकट्यालाच बोलावून घेतले आणि सांगितले, 'उद्या सकाळी तुम्ही जिल्हा पोलीस अधिक्षक आणि कलेक्टर यांच्याशी बोला. केसेस काढता येतील की नाही याची चर्चा करा, आणि तुमचे मत मला कळवा.' त्यानुसार खताळ पाटलांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून यशवंतरावांना सल्ला दिला की केसेस काढणे कठीण आहे. आपण प्रशासनाच्या कामात हस्तक्षेप करू नये.' कार्यकर्ते सांभाळायचे की प्रशासनाची बुज राखायची असा पेच यशवंतरावांपुढे होता. शेवटी त्यांनी संबंधित कार्यकर्त्यांना बोलावून घेतले आणि सांगितले, 'केसेस काढणे शक्य होणार नाही. प्रशासनाला त्याचे काम करू द्या. त्यात हस्तक्षेप करणे योग्य नाही.'

राजकारण करीत असतानासुद्धा यशवंतरावांनी प्रशासनाचा मान सांभाळला, म्हणूनच ते राज्याला व देशाला नेतृत्व देऊ शकले.

# ही रात्र मी कधीच विसरणार नाही !

मुख्यमंत्री असताना यशवंतराव एकदा नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले. दिवसभर जिल्ह्यात भरगच्च कार्यक्रम होते. रात्री साडेबाराच्या अजंठा एक्सप्रेसने मुख्यमंत्री औरंगाबादला जाणार होते. योगायोगाने त्याच दिवशी नांदेड येथील कलामंदिरात उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांचा शहनाईवादनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. कार्यक्रम रात्री दहाला सुरू होणार होता. कलामंदिराचे विश्वस्त यशवंतरावांना निमंत्रण द्यायला विश्रामगृहावर गेले तेव्हा यशवंतराव म्हणाले, 'मी कार्यक्रमाला येईन, थोडा वेळ थांबेन. तुम्ही कार्यक्रम वेळेत सुरू करा, म्हणजे मला मध्यरात्रीची गाडी पकडता येईल.' मुख्यमंत्री येणार म्हणून बिस्मिल्ला खाँ यांनाही आनंद झाला. कार्यक्रम बरोबर दहाला सुरू झाला. बिस्मिल्ला खाँ यांनी शहनाईला नमस्कार करून ती ओठात धरली व पहिला सूर बाहेर पडला. इतक्यात यशवंतराव आत आले. उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांचा आदाब त्यांनी हात जोडून स्वीकारला. शहनाईतून पुन्हा सुरांची बरसात होऊ लागली.

श्रोत्यांची व यशवंतरावांची तंद्री लागली. ती तंद्री मोडण्याची कोणाची इच्छा होईना. 'अजंठा एक्सप्रेस' आली आणि गेली. मध्यंतर झाला. अधिकाऱ्यांनी जवळ जाऊन गाडी गेल्याचे सांगितले, पण यशवंतराव खूश होते. ते म्हणाले, 'गाडी गेली तर गेली. मोटारीने जाता येईल. गाडीनेच गेलो असतो तर अशा दिव्य आनंदाला मुकलो असतो व ती खंत आयुष्यभर राहिली असती.' उत्तररात्र सुरू झाली. बिस्मिल्लांनी पुन्हा एकदा सुरांची जादूगिरी सुरू केली. पहाटे तीन वाजता कार्यक्रम संपला. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी सर्वांची अवस्था झाली होती.

यशवंतराव उठून तडक ग्रीनरूममध्ये गेले. त्यांनी बिस्मिल्ला खाँ यांचे हात प्रेमाने हातात घेतले ते लवकर सोडलेच नाहीत. बऱ्याच वेळाने ते म्हणाले, 'खाँ साहेब, आजची रात्र मी कधीच विसरणार नाही. परमेश्वर तुम्हाला उदंड आयुष्य देवो.' असे म्हणून ते बाहेर पडले. आता खाचखळग्यांनी भरलेल्या रस्त्यावरून मोटारीने त्यांना औरंगाबादला जायचे होते.

# खेड्यापाड्यातला तरुण ज्ञानसंपन्न झाला पाहिजे

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ते कराडला आले होते. विश्रामगृहात थांबले होते. साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या संदर्भात त्यांना समाजभूषण बाबुराव गोखले यांच्याशी चर्चा करायची होती. त्यांनी बाबुरावांना तसा निरोप दिला होता. बाबुराव आले, दोघांची चर्चा सुरू झाली. यशवंतराव म्हणाले, 'स्वातंत्र्योत्तर पिढीतील तरुण लेखकांना प्रकाशनाची संधी मिळावी, प्रोत्साहन मिळावे हाच साहित्य आणि संस्कृती मंडळाचा हेतू आहे.' गोखले म्हणाले, 'हेतू चांगला आहे, पण नवीन लेखकांचे लेखन फारच उथळ असते.'

मध्येच साहेब म्हणाले, 'तसे असेलही. पण त्यांच्यापुढे ज्ञानभांडार खुले व्हावे यासाठी तर या मंडळाकडे 'मराठी विश्वकोश' आणि 'ज्ञानकोश' निर्मितीचे काम आपण सोपवले आहे.'

'पण हे ज्ञानभांडार आणि नवनवे ग्रंथ लोकांपर्यंत जायला हवेत.' गोखले म्हणाले.

'अहो, त्यासाठी तर मी तुम्हाला चर्चेसाठी बोलावले आहे. काय करता येईल? काही मार्ग आहे का?' यशवंतरावांच्या या प्रश्नावर विचार करुन बाबुरावजी म्हणाले, 'त्यासाठी नवनवीन ग्रंथालये निर्माण करुन त्यांच्याद्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत हे ज्ञानभांडार पोहोचविता येईल.'

'आपण अगदी माझ्या मनातले बोललात. त्यासाठी तुम्ही ज्या ग्रंथालय संघटना निर्माण केलेल्या आहेत, त्या सर्वांशी चर्चा करा. एकत्रित येऊन राज्य ग्रंथालय संघ निर्माण करता येईल. त्या माध्यमातून नवीन प्रकाशने गावोगाव नेण्यासाठी सरकारने काय केले पाहिजे ते सांगा. तुमच्या सूचनांचा जरूर विचार होईल. खेड्यापाड्यातला तरुण सुशिक्षित आणि ज्ञानसंपन्न झाला, की आपोआप विकासाच्या कामांचा विचार करील.'

बाबुरावांनी 'मी प्रयत्नाला लागतो' असे वचन दिले व त्यांच्या प्रयत्नातून १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ स्थापन झाला. पुढे या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला.

# त्याचा प्रेस उभा राहिला पाहिजे !

श्री.राम निसळ हे अहमदनगरच्या 'आझाद हिंद' दैनिकाचे संपादक होते. यशवंतराव मुख्यमंत्री असताना एकदा नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले होते. आपण साहेबांना भेटावे असे निसळ यांना वाटले. ते कलेक्टरशी भेटीबद्दल बोलले पण कलेक्टर म्हणाले, 'साहेबांना वेळ नाही. सर्व कार्यक्रम निश्चित झालेला आहे.' संगमनेर तालुक्यातील एका पाझर तलावाचे भूमीपूजन मुख्यमंत्र्याच्या हस्ते होणार होते. निसळ त्या कार्यक्रमाला गेले. गर्दीत उभे राहिले. खरे तर साहेबांचा व निसळांचा जुजबीच परिचय होता आणि यापूर्वीही एक-दोनदा निसळांनी साहेबांना छापखान्यास भेट देण्याची विनंती केली होती. गर्दीत उभ्या असलेल्या निसळांना पाहून साहेब त्यांना म्हणाले, 'हे बघ, मी आलोय. तुझ्याकडं कधी यायचं बोल.'

'केव्हाही या, पण कलेक्टर साहेब म्हणतात, साहेबांना वेळ नाही.' यावर शेजारीच उभ्या असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील कार्यक्रमांची यादी वाचून दाखवली. पण साहेब निश्चयी सुरात म्हणाले, 'नाही, आपल्याला वेळ काढलाच पाहिजे. उद्या सकाळी पहिली भेट रामकडे.' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी साहेबांनी 'आझाद हिंद' चा छापखाना पाहिला. निसळांच्या धडपडीचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर चार वर्षांनी नगरला मुसळधार पाऊस झाला. निसळांच्या छापखान्याची इमारत पडली. त्यांनी साहेबांना पत्र लिहिले, 'तुम्ही ज्या छापखान्याला भेट दिली होती, ती इमारत पावसाने पडली आहे.' पण या पत्राचे उत्तर साहेबांकडून आले नाही. असेच एकदा साहेब नगरच्या दौऱ्यावर आले असताना निसळ त्यांना भेटले. त्यांना पाहताच साहेब म्हणाले, 'तुझ्या छापखान्याची इमारत पडली आहे. मग तुझं काय म्हणणं आहे?'

'मला दहा हजारांचे कर्ज मिळवून द्या.' यावर साहेब हसले, जवळच्या एका सहकाऱ्याला म्हणाले, 'हा राम मोठा सत्याग्रही माणूस आहे. त्याच्याजवळ कमालीची जिद्द आहे. तो माझ्याविरुद्ध लिहील-त्याचा विचार करायचा नाही. त्याचा प्रेस उभा राहिला पाहिजे.'

यशवंतरावांच्या एका वाक्याने निसळांचे काम झाले. त्यांचा प्रेस पुन्हा सुरु झाला.

# मी कुणाच्या पायाशी बसणार नाही !

यशवंतरावांनी त्यांच्या राजकीय जीवनात विविध क्षेत्रातील विद्वानांचा नेहमीच मान राखला. ते स्वतः व्यासंगी व अभ्यासू राजकारणी होते. साहित्य, राजकारण, सहकार, इतिहास व समाजजीवन हे त्यांच्या आवडीचे विषय होते. अर्थात त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करण्यात त्यांनी कमीपणा मानला नाही. पण पुण्यातील काही स्वयंघोषित विद्वानांना साहेबांची बुद्धिमत्ता दिखाऊ वाटे. आपल्या मार्गदर्शनाशिवाय यशवंतरावांनी काही करू नये अशी त्यांची अपेक्षा असे. याविषयी बोलताना एका मित्राने साहेबांना प्रश्न केला, 'यशवंतराव, तुमच्या बुद्धिमत्तेचा दरारा केसरी कंपूपासून परांजपे, जयकर यांच्यासारख्या विद्वानांनाही वाटतो. इतकं असूनही तुमच्याबद्दल त्यांना प्रेम का वाटत नाही?'

यावर गंभीर होऊन साहेब म्हणाले, 'पुण्याच्या विद्वान मंडळींना असे वाटते की दुसऱ्यांनी नेहमी आपल्या पायाशी बसून आपला आशीर्वाद घ्यावा. मला आयुष्यात असा कुणाचा आशीर्वाद घेण्याची सवय नाही. माझी मते चुकीची असतील तर एकमेकांत मित्रत्वाने होणाऱ्या खुल्या चर्चेनंतर मी ती दुरुस्त करतो. पण मी कुणाच्या पायाशी बसून आशीर्वाद घेणार नाही. परंतु एका बैठकीवर बसून मोकळेपणाने कोणत्याही गोष्टीची खुली चर्चा करण्यात मला आनंद होईल.'

आदर आणि लाचारी यातला फरक यशवंतरावांना चांगलाच माहित होता. त्यांचा आत्मविश्वास अभेद्य होता हेच वरील प्रसंगातून दिसून येते.

# कारखान्यात मंत्री कशाला ?

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात, विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळीने मूळ धरले. तात्यासाहेब कोरे यांनी वारणा सहकारी साखर कारखाना सुरु केला तर रत्नाप्पा कुंभार यांनी पंचगंगा सहकारी साखर कारखाना सुरु केला. यशवंतराव तेव्हा मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळात पुरवठामंत्री होते. कारखान्याची उभारणी करताना अनेक अडचणी यायच्या. त्यासाठी हे दोघे वारंवार मुंबईला जाऊन यशवंतरावांना भेटत असत. साहेबांनी या दोन्ही कारखान्यांच्या उभारणीसाठी खूप सहकार्य केले. कारखान्याची उभारणी पूर्ण झाली. संचालक मंडळ निवडण्याची वेळ आली तेव्हा तात्यासाहेब आणि रत्नाप्पा पुन्हा मुंबईला साहेबांकडे गेले. साहेब तेव्हा चित्रकूट बंगल्यावर रहात होते. रात्र बरीच झाली होती. इतक्या अवेळी या दोघांना पाहून साहेबांना आश्चर्य वाटले. त्या दोघांनी साहेबांपुढे प्रस्ताव मांडला.

'या दोन्ही कारखान्यांचे चेअरमनपद तुम्ही स्वीकारावे अशी आमची विनंती आहे.' साहेबांना आश्चर्याचा धक्काच बसला. सहकारी चळवळीचे एक हितचिंतक म्हणून त्यांनी या कारखान्यांच्या उभारणीसाठी सहकार्य केले होते. त्यातून त्यांना कसल्याच लाभाची अपेक्षा नव्हती. ते म्हणाले, 'तुम्हा दोघांच्या भावना मी समजू शकतो. माझ्यावरील प्रेमापोटीच तुम्ही असे म्हणताय. मंत्री या नात्याने मी तुम्हाला सर्वतोपरी सहकार्य करेन, पण कारखान्याच्या दैनंदिन कामकाजात कोणा मंत्र्याने सामील व्हावे ही गोष्ट मला मंजूर नाही.'

पण दोघांचाही आग्रह कायम होता. साहेबांनी त्यांची समजूत काढली. त्यांना थांबवून घेतले व सकाळी परत पाठवून दिले. सहकारी चळवळीला निरपेक्ष भावनेने मदत करण्याची यशवंतरावांची भूमिका होती. पदाचा लोभ त्यांना कधीच नव्हता.

# न्यायाधीशांचा सन्मान

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. एकदा साताऱ्यात त्यावेळचे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश गजेंद्रगडकर व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा एकत्र कार्यक्रम होता. साताऱ्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा न्यायाधीश यांच्यात या दौऱ्याच्या निमित्ताने वाद सुरु झाला. सर्किट हाऊस (विश्रामगृह) मधील एक नंबरचा सूट (कक्ष) हा न्यायमूर्तींना दिला पाहिजे असा जिल्हा न्यायाधीशांचा आग्रह होता, तर एक नंबरचा सूट हा सदैव मुख्यमंत्र्यांसाठीच राखीव असतो, असे जिल्हाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. न्या. गजेंद्रगडकर यांच्या अगोदरच यशवंतराव साताऱ्यात आले. विश्रामगृहावर आल्याबरोबर त्यांनी जिल्हाधिकांऱ्याकडे 'न्या. गजेंद्रगडकर कोठे उतरणार आहेत' अशी चौकशी केली. जिल्हाधिकारी उत्साहाच्या भरात म्हणाले, 'एक नंबरचा सूट आपल्यासाठी राखून ठेवलाय. दोन नंबरच्या सूटमध्ये न्यायमूर्तींची व्यवस्था केली आहे.' हे ऐकल्यावर यशवंतराव म्हणाले, 'एक नंबरच्या सूटमध्ये न्यायमूर्तींची व्यवस्था करा' आणि अधिक काही न बोलता ते जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या निवासस्थानी निघून गेले. या त्यांच्या अनपेक्षित वागण्याने सारेच चकित झाले.

न्यायाधीशपदाचा मान यशवंतरावांनी आपल्या कृतीतून नेहमीच राखला. शेवटी तेसुद्धा एक वकीलच होते!



# मला गेले पाहिजे !

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. सौ. वेणूताईंची प्रकृती बिघडली होती. मुंबईतील साहेबांच्या निवासस्थानीच त्यांच्यावर उपचार चालू होते. यशवंतराव सकाळी लवकर बाहेर पडले ते दिवसभर बाहेरच होते. सचिवालयातील कामे संपली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. त्यानंतर लगेच साडेनऊ वाजता विधीमंडळातील काँग्रेस आमदारांची सभा होणार होती. शिवाय काही भेटीगाठी व्हायच्या होत्या. घड्याळात नऊचे ठोके वाजले आणि अचानक साहेबांना आठवले - वेणूताई रात्री नऊलाच झोपतात. ते मारोतराव कन्नमवार यांना म्हणाले, 'कन्नमवारजी, तुम्ही आजची बैठक सांभाळा, मी आत्ताच घरी जातो. आज दिवसभरात पाच मिनिटेदेखील माझ्या पत्नीचा कुशल समाचार घ्यायला मला वेळ मिळाला नाही. ती आत्ता झोपेल. नऊ वाजल्यानंतर ती जागत नाही. मला गेले पाहिजे' आणि यशवंतराव निवासस्थानाकडे निघाले. राजकारणामुळे आपण आपल्या पत्नीला पुरेसा वेळ देऊ शकत नाही, ही खंत त्यांना कायम वाटत असे. पण जेव्हा पत्नीबरोबर थांबणे गरजेचे असायचे तेव्हा समोरची सगळी कामे बाजूला सारून ते वेणूताईंकडे धाव घ्यायचे.



# महिलांचा मान राखलाच पाहिजे !

यशवंतराव मुख्यमंत्री असतानाचा हा प्रसंग. नागपूरला विधानसभेचे अधिवेशन चालू होते. अधिवेशन आता अंतिम टप्प्यात होते. एके दिवशी सर्व महिला आमदारांनी यशवंतरावांना आपल्या निवासस्थानी जेवायला बोलावले. हे जेवण दुपारी बारा वाजता ठेवले होते. यशवंतरावांचे काम त्यादिवशी साडेबारा वाजेपर्यंत उरकू शकले नाही. त्यांना काही महत्त्वाचे निवेदन विधानसभेत करायचे होते. निवेदन केल्यावर साहेब मारोतराव कन्नमवार यांना म्हणाले, 'मी महिलांच्या भोजन समारंभास उपस्थित राहून लगेच परत येतो.' कन्नमवार म्हणाले, 'आपण जेवण आटोपून अर्ध्या तासात असेंब्लीत कसे येऊ शकाल? जेवणाच्या कार्यक्रमास न गेल्यास काय हरकत आहे?'

साहेब म्हणाले, 'नाही नाही, हा महिलांचा कार्यक्रम आहे. मला त्यांचा मान राखलाच पाहिजे, मी लगेच जातो आणि वेळेवर परत येतो.'

साहेब गेले आणि सांगितल्याप्रमाणे बरोबर एक वाजायला तीन मिनिटे कमी असताना विधानसभेत येऊन पोचले. कन्नमवारांनी आश्चर्याने विचारले, 'एवढ्या लवकर आपले जेवण कसे आटोपले?' साहेब म्हणाले, 'मी महिलांच्या बरोबर पाटावर बसलो, घाईघाईने वरवर थोडा भात घेतला आणि त्यांची क्षमा मागून लगेच येथे आलो!'

कामाच्या व्यापात असतानासुद्धा यशवंतरावांनी आपला शब्द पाळला याचा महिला आमदारांना आनंद झाला.

# प्रेमाने माणसे कायमची जोडली जातात

भाई माधवराव बागल यांनी सांगितलेली ही एक आठवण. यशवंतराव मुख्यमंत्री असताना वाईमध्ये केवलानंद स्मारक मंदिराचा उद्घाटन समारंभ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी आयोजित केला होता. या समारंभास राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद, मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, राज्यपाल श्री.श्रीप्रकाश उपस्थित होते.

शास्त्रीजींच्या आग्रहावरुन भाई माधवराव बागल सुद्धा या समांरभाला आले होते. ते संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते व यशवंतरावांचे विरोधक होते. एक सामान्य नागरिक म्हणून ते या कार्यक्रमाला गेले होते. लांबच्या एका कोपऱ्यात बसले होते. व्यासपीठावर सर्व मान्यवर स्थानापन्न झाले. यशवंतरावांचे लक्ष कसे गेले कोणास ठाऊक, पण त्यांनी भाई माधवरावांना पाहिले. त्यांनी लगेच तेथे उभ्या असलेल्या कलेक्टरला माधवरावांकडे पाठवून त्यांना व्यासपीठावर बोलावून घेतले व राष्ट्रपती डॉ. राजेंद्रबाबूंशी त्यांची मुद्दाम ओळख करून दिली. खरे म्हणजे या गोष्टीचे काहीच प्रयोजन नव्हते, पण अशा छोट्या छोट्या गोष्टींनीच साहेबांनी अनेकांची मने जिंकली होती.



# हे थांबले पाहिजे !

प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. लोकशाही राष्ट्रात प्रसारमाध्यमांची भूमिका खरोखरच महत्त्वाची असते. जनतेच्या समस्या काय आहेत, हे राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचविणे आणि राज्यकर्ते जनतेसाठी काय करीत आहेत हे जनतेला सांगणे ही माध्यमांची जबाबदारी आहे. अन्यायाला वाचा फोडणे हे माध्यमांचे कर्तव्य असते पण जेव्हा सत्ताधारी आणि पत्रकार यांची अभद्र युती होते तेव्हा जनता बेवारस होते. पत्रकार आणि सत्ताधारी व्यक्ती एकमेकांच्या नको इतके जवळ आले की त्यामुळे राज्यकर्त्यांचा बौद्धिक व पत्रकारांचा नैतिक ऱ्हास होण्याची दाट शक्यता असते.

राजकीय दूरदृष्टी लाभलेल्या यशवंतरावांना याची जाणीव होती, म्हणूनच अनेक पत्रकार त्यांचे मित्र असले तरीही त्यांनी सरकार चालविताना जाणीवपूर्वक विशिष्ट अंतर राखले. पण यशवंतरावांच्या मंत्रीमंडळातील एक मंत्री पत्रकारांचे फार लाड करीत असत. काही पत्रकार तर मुंबईत त्या मंत्र्यांच्या बंगल्यावर राहतात असे साहेबांना समजले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत साहेबांनी कोणाचेही नाव न घेता हा विषय काढला. पत्रकारांना मंत्र्यांनी बंगल्यावर ठेवून घेणे गैर असल्याचे साहेबांनी सूचित केले. संबंधित मंत्री बोध घेतील असे साहेबांना वाटले, पण तसे घडले नाही. त्या मंत्र्याने साहेबांच्या सूचनांची दखलच घेतली नाही. पत्रकारांचे मुक्काम सुरूच राहिले. शेवटी मंत्रिमंडळाच्या एका बैठकीत साहेबांनी संबंधित मंत्र्याला सर्वांसमक्ष खडसावत ताकीद दिली. 'हे प्रकार थांबले नाहीत, तर मंत्रिमंडळात एकतर तुम्ही रहाल किंवा मी!' असे साहेबांनी सुनावले.

एरवी शांत स्वभावाच्या यशवंतरावांमध्ये लपलेला कठोर प्रशासक इथे दिसून येतो.

# त्याला इंग्लंडला जाऊ द्या !

शाळेत शिकत असताना लहानग्या यशवंताला आपण संस्कृत शिकावे असे वाटले. त्याने संस्कृतच्या शिक्षकांना विचारले, 'तुम्ही मला संस्कृत शिकवाल का?' शिक्षक म्हणाले, 'तू मराठा आहेस, ब्राह्मण नाहीस. त्यामुळे तुला शिकविता येणार नाही.' संस्कृत शिकण्याची यशवंताची इच्छा अशाप्रकारे अपूर्णच राहिली. जातीयतेचा त्याला जाणवलेला हा पहिला चटका होता. पुढे यशवंताने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. स्वातंत्र्य मिळाले, साहेब यशवंताचे यशवंतराव झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. राज्याच्या सर्वांगिण उन्नतीसाठी अहोरात्र झटू लागले.

एक दिवस आपल्या दालनात बसून ते साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करीत होते. चर्चा चालू असताना एक चिठ्ठी आली. ती चिठ्ठी कोणी पाठवली होती? तर लहानपणी साहेबांना संस्कृत शिकवायला ज्यांनी नकार दिला त्या शिक्षकांनी! साहेबांनी रयतच्या पदाधिकाऱ्यांना बाहेरच्या हॉलमध्ये बसायला सांगितले आणि त्या शिक्षकांना आत बोलावले. ते शिक्षक आपल्या मुलासह आत आले. साहेबांना म्हणाले, 'हा माझा मोठा मुलगा. आता इंजिनियरिंगची परीक्षा उत्तम गुणांनी पास झाला आहे. त्याला पुढच्या शिक्षणासाठी इंग्लंडला जायची इच्छा आहे. त्यासाठी मदतीची आवश्यकता आहे, म्हणून आलो होतो.'

यशवंतरावांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मग त्यांना बाहेर बसायला सांगितले आणि रयतच्या लोकांना आत बोलावले. साहेब त्यांना म्हणाले, 'आपण परदेशी जाण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करतो, त्यावेळी त्याची जात बघतो का? तो अमुक जातीचाच असावा अशी आपली अट असते का?' त्या काळात कर्मवीर भाऊराव पाटलांनी संस्थेमार्फत अनेक मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवले होते. त्यासाठी जातीचे बंधन मुळीच नव्हते. त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी म्हणाले, 'नाही, अशी आपली मुळीच अट नाही.' त्यावर लगेच साहेब म्हणाले, 'मग बाहेर बसलेल्या गृहस्थाचे काम करून टाका. आपल्या संस्थेमार्फत त्यांच्या मुलाला शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवा.'

ज्यांनी विद्यादान करायला नकार दिला त्यांच्या मुलाला विद्यार्जनासाठी परदेशात जायला यशवंतरावांनी मदत केली. अशी ही जगावेगळ्या उपकाराची (?) जगावेगळी परतफेड!

# वाहनयोग

कवी आणि कवितांवर यशवंतरावांनी नेहमीच प्रेम केले, पण त्यातही प्रतिभावंत मराठी कवी ग. दि. माडगूळकरांवर त्यांचा विशेष लोभ होता. माडगूळकरांना ते 'आण्णा' म्हणत असत. यशवंतराव चव्हाण आणि ग. दि. माडगूळकर म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाची मानचिन्हेच होती. दोघे अनेकदा गप्पांची मैफिल रंगवीत असत. एकदा असेच साहेब, गदिमा व इतर चार-पाच साहित्यिक गप्पा मारत बसले होते. काव्य, शास्त्र, विनोदाची मुक्त उधळण चालू होती. वेळ कसा निघून गेला हे कोणाला कळलेच नाही. मध्यरात्र उलटून गेल्यावर कुणीतरी म्हणाले, 'चलू या आता.' गदिमा जायला उठले. साहेब त्यांना म्हणाले, 'जाणार कसे आण्णा ?'

गदिमा म्हणाले, 'तो एक प्रश्नच आहे, माझ्याकडे मोटार नाही. आमच्या कुंडलीत वाहनयोग नाही.'

यशवंतरावांनी त्यांच्या ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितले व मिश्किलपणे गदिमांना म्हणाले,

'आण्णा, आता असं करा, एक वाहन घ्या आणि त्यात तुमची कुंडली लावून ठेवा.'

'का हो, असं का ?' सर्वांनी विचारले.

'कुंडलीत वाहन नाही, तर निदान वाहनात कुंडली असू द्या' साहेब मिश्किलपणे म्हणाले. सारे खळाळून हसले.



# कसोटीचे भाषण

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तेव्हाचा हा प्रसंग. करंजवणे धरणाच्या पायाभरणीचा समारंभ होता. पायाभरणीनंतर त्यांचे भाषण होते. श्रोत्यांमध्ये सगळे धरणग्रस्त लोक होते. ज्यांच्या जमिनी, गावे पाण्याखाली जाणार होती, त्यांच्यासमोर भाषण करायचे होते. प्रसंग बाका होता. धरणग्रस्त प्रचंड संख्येने जमले होते. निषेधाच्या घोषणेपासून ते दंगलीपर्यंत काहीही घडणे शक्य होते. यशवंतरावांनी भाषण सुरू केले.... 'पिढ्यानपिढ्या आपण रहात असलेली गावे सोडून जात असताना, आपली कुलदैवते, वास्तू, आपण लावलेली झाडे, त्या भोवतालच्या वातावरणात रमलेले आपले मन काय म्हणत असेल याचा विचार केला की मन कष्टी होते. आपल्याला नवीन जागा मिळेल, जमिनी मिळतील, घरांची भरपाई मिळेल. परंतु पिढ्यान्‌पिढ्यांच्या सहवासानंतर आपली मातृभूमी सोडून जाताना तुम्हाला होणाऱ्या वेदना मी समजू शकतो.'

वातावरण भावविवश झाले. वृद्ध शेतकऱ्यांचे डोळे पाणावले. यशवंतराव बोलत होते, 'नवमहाराष्ट्राच्या उभारणीसाठी तुम्ही मंडळी मोठा त्याग करीत आहात, याची आम्हाला जाणीव आहे. तुमचे पुनर्वसन ही आमची जबाबदारी आहे.'

एका सरकारचा प्रमुख आपल्याशी बोलतोय असे लोकांना वाटलेच नाही. आपली वेदना जाणणारा आपल्याच घरातील कोणी थोरला भाऊ आपले सांत्वन करतोय असे लोकांना वाटले आणि सभेत गोंधळ घालण्याच्या तयारीने आलेले लोक नवीन आशा मनात वागवत घरी गेले.



# आमचे बोट सर्वसामान्यांच्या नाडीवर!

जनतेचे समाधान ही यशस्वी राज्यकारभाराची पहिली कसोटी आहे अशी यशवंतरावांची धारणा होती. सामान्यातील सामान्य माणसाला सरकार आपले वाटले पाहिजे, हा त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या कारकिर्दीत काँग्रेस पक्ष बहुमताने सत्तेत येत होता, याचे कारण त्यांनी काँग्रेसची नाळ सामान्य जनतेपासून तुटू दिली नाही, हे होते.

एकदा सात्रळ (जि.अहमदनगर) येथे एका जाहीर सभेत विरोधी पक्षाचे एक नेते गमतीने यशवंतरावांना म्हणाले, 'नेहमी तुम्हीच सत्तेवर येता. आमचं नक्की चुकतं कुठं?'

या प्रश्नाचं उत्तर यशवंतरावांनीही मिश्किलपणे दिलं. ते आपल्या भाषणात म्हणाले, 'पुन्हा पुन्हा आम्ही सत्तेत कसे येतो याचं कारण तुम्हीच शोधा. कारण आम्ही तुम्हाला ते रहस्य सांगितले तर आम्ही सत्तेवर कसे येणार? आमचे बोट नेहमी सर्वसामान्यांच्या नाडीवर असते. ती नाडी जे सांगते तसे आम्ही जनतेशी वागतो. जोपर्यंत विरोधकांना ही नाडी सापडत नाही, तोपर्यंत आम्हीच सत्तेवर येणार. नियतीनेच आम्हाला राज्य चालविण्याची आणि तुम्हाला प्रश्न सुटेपर्यंत विरोध करण्याची जबाबदारी दिली आहे. ती आपण सर्व मिळून अचूक पार पाडू.'

या उत्तरावरून यशवंतरावांची समयसूचकता लक्षात येते.

# हे पक्षवाढीचेच काम आहे!

यशवंतराव मुख्यमंत्री होते तेव्हाची गोष्ट. त्यावेळी आबासाहेब निंबाळकर अहमदनगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते एकदा यशवंतरावांना भेटण्यासाठी मुंबईला गेले होते. त्यांच्याबरोबर त्यावेळचे काँग्रेसचे तरुण कार्यकर्ते बाळासाहेब विखे-पाटील होते. कार्यकर्त्यांना नावाने आणि एकेरी हाक मारणे हे चव्हाण साहेबांच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य होते. बाळासाहेबांना त्यांनी विचारले, 'एकनाथ, जिल्ह्यात काय चाललंय ?'

बाळासाहेब म्हणाले, 'जिल्ह्यात विरोधी पक्षांचा मोर्चा आहे. ते मुळा धरणाचं पाणी मागत आहेत. पण साहेब, त्यांना कोणी साथ देणार नाही. लोक त्यांच्याबरोबर नाहीत. तुम्ही मोर्चाची काळजी करू नका.'

यावर यशवंतराव गंभीरपणे म्हणाले, 'मी वाचलंय वर्तमानपत्रात. कॉम्रेड दत्ता देशमुखांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय मोर्चा निघतोय. एकनाथ, दत्ताला निरोप दे. खूप मोठा मोर्चा काढ म्हणावं. मी मोर्चाला सामोरे जाऊन स्वागत करणार आणि पाणी देण्याची घोषणा करणार.' यशवंतरावांचे हे धोरण कार्यकर्त्यांना समजेना. ते बुचकळ्यात पडले. विरोधी पक्ष मोर्चा काढणार, मुख्यमंत्री त्या मोर्चाला सामोरे जाणार आणि त्यांच्या मागण्या तात्काळ मान्य करणार. मग पक्ष कसा वाढणार? कार्यकर्त्यांमध्ये कुजबूज सुरू झाली. यशवंतरावांनी कार्यकर्त्यांच्या मनात चाललेला गोंधळ ओळखला. ते म्हणाले, 'हे बघा, घोषणा मी करणार. मी म्हणजे कोण? तर मुख्यमंत्री. मुख्यमंत्री कोणाचा? तर तुमचा, म्हणजेच काँग्रेसचा, म्हणजे घोषणा कोण करणार? तर काँग्रेस. मग भीती कशाला बाळगता? आपला पक्षच घोषणा करणार आहे हे पक्षवाढीचे काम आहे.' यशवंतरावांनी दिलेले स्पष्टीकरण ऐकून सगळे निरुत्तर झाले.

आजपर्यंत त्यांनी यशवंतरावांच्या मुत्सद्देगिरीविषयी ऐकले होते. आज त्यांना तिचे प्रत्यक्ष दर्शन घडले.

# आपण अधिक 'डावं' होऊया!



यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानाची गोष्ट. राहुरी (जि.अहमदनगर) येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे तीन दिवसांचे शिबीर होते. त्यावेळी नगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य असणारे बाळासाहेब विखे-पाटील या शिबीराला निमंत्रित म्हणून हजर होते. कार्यकारिणीच्या बैठकीसाठी आणि शिबीरासाठी मुख्यमंत्री चव्हाणसाहेब आले होते. शिबीरात अनेक ठराव मांडण्यात आले. राजकीय ठराव कार्यकारिणीने मंजूर करण्यापूर्वी चव्हाणसाहेबांनी त्यावर नजर फिरविली. साहेब म्हणाले, 'ठराव अप्रतिम आहे. त्यात नावं ठेवण्यासारखं काहीच नाही. फक्त एक छोटीशी दुरुस्ती सुचवावीशी वाटते. ती सर्वांना मान्य असेल तर स्वीकारावी.'

पदाधिकाऱ्यांनी विचारलं, 'काही चुकलंय का साहेब ?'

'काही चुकलं नाही. फक्त छोटीशी दुरुस्ती आहे. ठरावात म्हटलं आहे की जनसंघाची शक्ती वाढतेय. याचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेसने अधिक 'उजवं' झालं पाहिजे. यामध्ये फक्त एका शब्दाची दुरुस्ती आहे. काँग्रेसने 'उजवं' ऐवजी 'डावं' व्हायला पाहिजे असं मी सुचवतो.'

चव्हाण साहेबांनी सुचविलेली ही एका शब्दाची दुरुस्ती सर्वांच्या वर्मी बसली. अक्षरश: एका शब्दात त्यांनी आपल्याला काय म्हणायचं आहे ते सांगितलं. जर काँग्रेसचे कार्यकर्ते गरीबांच्या व समाजाच्या अधिक जवळ गेले आणि त्यांनी पुरोगामी विचारांचा प्रसार केला तर जातीयवादी शक्ती वाढणारच नाहीत असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होता. साहेबांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह तो ठराव एकमताने मंजूर झाला. तोच ठराव खुल्या अधिवेशनातही एकमताने मंजूर झाला.

या प्रसंगाचे साक्षीदार असणाऱ्या बाळासाहेब विखे पाटील यांनीच ही आठवण सांगितली आहे.

# समाजाने त्यांचे ऋण मानले पाहिजे!

समाजासाठी आयुष्य वेचणाऱ्या थोर कार्यकर्त्यांविषयी यशवंतरावांना खूप आदर वाटत होता. डॉ.दादासाहेब घोगरे हे धुळे जिल्ह्यातील असेच एक समर्पित कार्यकर्ते होते. त्यांनी श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत त्यांनी १९५६ साली धुळ्यात पहिले कॉलेज सुरू केले. या कॉलेजच्या मंजुरीसाठी त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या यशवंतरावांनी भरपूर सहकार्य केले होते.

त्यानंतर काही वर्षांनी पुण्यात गांधी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ यशवंतरावांच्या शुभहस्ते झाला. मुख्यमंत्री आल्यामुळे साहजिकच कार्यक्रमाला खूप गर्दी होती. दादासाहेब देखील जनसमुदायात हजर होते. व्यासपीठावर शंभर-सव्वाशे पुढारी बसले होते. दादासाहेबांना प्रसिद्धीचा हव्यास नव्हता. ते साध्या कार्यकर्त्याप्रमाणे सामान्य माणसांच्या गर्दीत बसून कार्यक्रम पहात होते, पण साहेबांच्या चाणाक्ष नजरेने दादासाहेबांना हेरले. इतक्यात आयोजकांनी यशवंतरावांना भाषण करण्याची विनंती केली. आपल्या भाषणात यशवंतरावांनी थोर समाजसेवक म्हणून म.फुले, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबरच खानदेशचे डॉ.दादासाहेब घोगरे यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आणि पुढे म्हणाले, 'आजच्या या समारंभात डॉ.दादासाहेब घोगरे हजर असूनही त्यांची दखल कोणी घेऊ नये हे आश्चर्य आहे. दादासाहेबांसारखी माणसे निष्ठेने, श्रद्धेने व त्यागाने समाजाच्या हितासाठी काम करीत असतात. त्यांना मानमरातबाची अपेक्षा नसते व त्याची ते पर्वाही करीत नाहीत. समाज कोणाच्या मागे असतो, याची त्यांना पूर्ण जाणीव असते. असे असले तरी समाजाने अशा कार्यकर्त्यांचे ऋण मानले पाहिजे, नव्हे ते समाजाचे कर्तव्यच आहे.'

यशवंतरावांच्या या उद्‌गारांनी आयोजक ओशाळले. गर्दीमध्ये दादासाहेबांना शोधू लागले. खरेतर समारंभ सुरू होण्यापूर्वी यशवंतरावांची व दादासाहेबांची भेट झाली नव्हती. असे असूनही यशवंतरावांनी थोर समाजसेवकांच्या बरोबर आपले नाव घेतले, याविषयीची कृतज्ञता कायम त्यांच्या मनात राहिली. त्या एका वाक्याने यशवंतरावांनी दादासाहेबांना कायमचे जिंकले.

# तिळगूळ घ्या, गोड बोला!!

यशवंतरावांचे भाषण म्हणजे बुद्धिमत्ता, ममता आणि कल्पकता यांचा अनोखा संगम असायचा. पर्वताने पठाराशी बोलावे तसे ते उपस्थित जनसमुदायाशी बोलायचे. त्यांच्या सभांना लोकांची प्रचंड गर्दी व्हायची.

एकदा नाशिकला त्यांची प्रचारसभा रात्री नऊ वाजता आयोजित करण्यात आलेली होती. दिवसभरात दहा-बारा सभा आटोपून ते शेवटच्या सभेसाठी नाशिकला येणार होते. तो दिवस होता १३ जानेवारी. गोल्फ क्लबसमोरील भव्य मैदानावर सभा होती. रात्री नऊच्या सभेसाठी सायंकाळी सात वाजल्यापासूनच लोक सभास्थळी येऊ लागले. नऊ वाजेपर्यंत सुमारे पन्नास हजार लोक जमले. आपल्या आवडत्या नेत्याचे दर्शन घेण्यासाठी, त्यांचे विचार ऐकण्यासाठी लोक आतुर झाले होते. सभेची वेळ झाली. पण यशवंतरावांचे आगमन झाले नव्हते. त्यांना उशीर होणार होता, पण नक्की किती उशीर होणार होता हे कोणालाच माहित नव्हते. दहा वाजून गेले. अकरा वाजले. शेवटी रात्रीचे बारा वाजून गेले तरी यशवंतराव आले नाहीत. इतर छोट्या मोठ्या नेत्यांची भाषणे सुरू होती. यशवंतरावांना यायला उशीर होणार आहे, पण ते नक्की येणार आहेत, अशा सूचना अधूनमधून दिल्या जात होत्या. एवढा उशीर होऊनही लोक हलायला तयार नव्हते. रात्री सव्वाबारा वाजता यशवंतराव आले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. अतिशय उत्साहात ते भरभर स्टेजवर आले. दिवसभरात अनेक सभा घेऊनही आणि खूप प्रवास करूनही त्यांचा चेहरा प्रसन्न आणि हसरा होता. ते भाषण करण्यासाठी उठले. माईकजवळ आले व सर्व जनसमुदायाला नम्रपणे हात जोडून म्हणाले, 'तिळगूळ घ्या व गोड गोड बोला' (कारण एव्हाना १४ जानेवारी हा दिवस सुरू झाला होता व त्यादिवशी संक्रांत होती.)

हे वाक्य ऐकल्याबरोबर पुन्हा एकदा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला व त्यानंतर सुमारे चाळीस मिनिटे सर्वांनी आपल्या लाडक्या नेत्याचे भाषण शांतपणे ऐकले. अचूक वेळ साधून यशवंतराव पहिल्याच वाक्यात श्रोत्यांना जिंकायचे ते असे !

# आपली मैत्री ही मैत्रीच राहू दे!

पत्रकार नरूभाऊ लिमये हे यशवंतरावांचे जवळचे मित्र होते. नरूभाऊंच्या जीवनात एक काळ असा आला होता की, ते कर्जबाजारी झाले होते. त्यांच्या सगळ्या कर्जाला यशवंतराव जामीनदार झाले होते. व्यक्तिगत आयुष्यात नरूभाऊ खूप वैतागले होते. डॉ.सरोजिनी बाबर यांनी यशवंतरावांच्या कानावर ही गोष्ट घातली. त्या म्हणाल्या, 'तुम्ही नरूभाऊकडे लक्ष द्या. तो खूप अडचणीत आहे.' यशवंतरावांनी ताबडतोब नरूभाऊला मुंबईला बोलावून घेतले. नरूभाऊ गेले. यशवंतरावांनी त्यांना घरी नेले. वेणूताईंनी त्यांना आग्रहाने जेऊ घातले. यशवंतरावांनी त्यांची सगळी चौकशी केली. मग म्हणाले, 'तुझ्यासाठी मी काय करू ते सांग.'

'मला कुठेतरी नोकरी द्या' नरुभाऊ म्हणाले.

'तुला पुण्यात माझा जनसंपर्क अधिकारी म्हणून नोकरी देतो, चालेल?'

'फार बरं होईल' असे म्हणून व यशवंतरावांचे आभार मानून नरूभाऊ जायला निघाले. यशवंतरावांनी ड्रायव्हरला त्यांना स्टेशनवर पोचवायला सांगितले. नरूभाऊ गाडीत बसणार इतक्यात यशवंतराव म्हणाले, 'नरूभाऊ, जरा इकडे ये.'

नरूभाऊ जवळ आल्यावर साहेब म्हणाले, 'नरूभाऊ, मी तुला पुण्याला नोकरी देऊ शकत नाही. मी नंतर विचार केला, मी मुख्यमंत्री आहे. मी पुण्याला मुख्यमंत्री म्हणून आलो की तू माझ्यासमोर जनसंपर्क अधिकारी म्हणून उभे राहणे ही कल्पनाच मला नकोशी वाटते. तू पुण्याला जाऊ नकोस. इथेच रहा. उद्या आपण बोलू.' त्यादिवशी यशवंतरावांनी नरूभाऊंना ठेवून घेतले. नंतर नोकरी न करता पैसे मिळतील असे भाषांतराचे काम दिले. या कामाचे नरूभाऊंना त्या काळात चौदा हजार रुपये मिळाले. त्यांची आर्थिक अडचण दूर झाली. त्यानंतर आयुष्यात ते कधीच आर्थिक अडचणीत आले नाहीत. मित्राला मदत करतानासुद्धा यशवंतरावांनी मैत्रीचा सन्मान जपला.

म्हणूनच अनेकांच्या हृदयात त्यांना अढळ स्थान लाभले.

# तुम्ही आमची पंचाईत केलीत!

१९६२ सालची गोष्ट. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. श्री.शांतीलाल शहा हे यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात विधी, न्याय व सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री होते. प्रश्नोत्तरांच्या तासाला ते विरोधी पक्षातील सदस्यांच्या प्रश्नांना 'होय', 'नाही', 'हा प्रश्नच उद्भवत नाही', 'मला या प्रश्नाची पूर्वसूचना द्यायला हवी होती' इत्यादी चार-पाच तुटक वाक्यातच उत्तर देत असत. थोडक्यात, ते सदस्यांचे प्रश्न उडवून लावीत असत. यामुळे विरोधी पक्षातील आमदार त्यांच्यावर नाराज होते.

या शांतीलाल शहांना सभागृहात बसून फाईली हातावेगळ्या करण्याची सवय होती. त्यामुळे त्यांना अडचणीत आणण्यासाठी एकदा आमदार त्र्यं. सी. कारखानीस यांनी विधानसभेत एक हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, 'अध्यक्ष महोदय, या सभागृहात कित्येक मंत्री महाशय आपापल्या खात्याच्या फाईली हाताळत आहेत. सभागृहाचा उपयोग मंत्र्यांना त्यांच्या चेंबर (कार्यालय) प्रमाणे करता येणार नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. या मुद्यावर कृपया आपण निर्णय द्यावा.' गंमत म्हणजे सभागृहात बसून फाईली हाताळण्याची सवय यशवंतरावांनाही होती. विधानसभेचे अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांनी सर्वांगीण विचार करता यावा म्हणून त्यांचा निर्णय राखून ठेवीत असल्याचे जाहीर केले.

सायंकाळी सभागृहाचे कामकाज संपल्यावर यशवंतराव अध्यक्षांच्या दालनात गेले. तिथे त्यांनी कारखानीसांना बोलावून घेतले व म्हणाले, 'हरकतीचा मुद्दा मांडून तुम्ही आमची पंचाईत केलीत.' कारखानीस म्हणाले, 'तुम्ही किंवा तुमचे सहकारी मंत्री यांची अडचण करण्याचा माझा मुळीच उद्देश नव्हता. माझा रोख शांतीलाल शहा यांच्यावर होता. विरोधी पक्षातील सदस्यांचे प्रश्न उडवून लावण्याची त्यांची सवय गेली पाहिजे.' यावर शांत स्वरात यशवंतराव म्हणाले, 'आम्हाला भेटायला येणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे तुम्हा मंडळींच्या भाषणातील महत्त्वाचा भाग ऐकत ऐकत महत्त्वाच्या फायली हातावेगळ्या करण्याचे काम आम्ही सभागृहात निवांतपणे करू शकतो. त्याला प्रतिबंध झाला तर आमची गैरसोय होईल. शांतीभाई आम्हा सर्वांमध्ये ज्येष्ठ मंत्री आहेत. त्यांना नीट उत्तरे देण्याची रीत काळजीपूर्वक सुचवावी लागेल. त्यासाठी थोडा अवधी लागेल. तोपर्यंत तुम्ही तुमच्या हरकतीच्या मुद्यांचा पाठपुरावा करू नये अशी माझी विनंती आहे.' कारखानीसांनी यशवंतरावांच्या शब्दाला मान दिला आणि विशेष म्हणजे पुढे काही दिवसांनी शांतीलाल शहांची सभागृहात उत्तरे देण्याची पद्धत बरीच सुधारली.

# आपण निश्चिंत असा!

गो.नी. दांडेकर उर्फ आप्पा हे एक थोर कादंबरीकार, साहित्यिक म्हणून महाराष्ट्रास परिचित आहेत. त्यांनी अनेक सुंदर ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. पंजाब राज्यात सतलज नदीवर बांधलेल्या भाक्र-नानगल धरणाच्या उभारणीवर आधारित एक कादंबरी लिहिण्याचा त्यांचा मानस होता. त्यासाठी दांडेकर प्रत्यक्षात पंजाबात जाऊन त्या धरणाच्या परिसरात फिरले. त्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या 'आम्ही भगीरथाचे पुत्र' या कादंबरीची एक प्रत यशवंतरावांना देण्यासाठी ते त्यांच्या कार्यालयात गेले. तेथील शिपायाजवळ त्यांनी चिठ्ठीवर आपले नाव आणि काम लिहून दिले. थोड्या वेळाने शिपाई बाहेर येऊन म्हणाला, 'अहो पुस्तकवाले, चला.' आत गेल्यावर गोनीदांना यशवंतराव म्हणाले, 'या..! काय आणलेत? बसा.' यावर दांडेकरांनी त्यांना कादंबरी दिली. साहेबांनी कादंबरी हातात पडताच ती हाताळली व म्हणाले, 'अरे व्वा, पंजाबात गेला होतात वाटतं.., तिथं किती दिवस राहिलात?' मग दांडेकरांनी कादंबरीची जन्मकथा सांगितली. यशवंतरावांनी ती कुतूहलपूर्वक व लक्ष देऊन ऐकली. शेवटी दांडेकर म्हणाले, 'सवड होईल तेव्हा पुस्तक वाचून एखादी ओळ लिहाल?'

यावर साहेब म्हणाले, 'अवश्य! आपण निश्चिंत असा, आणखी काय?'

'आणखी असे की एकदा मला कोयना धरणाचे काम लक्षपूर्वक पाहायचे आहे.'

'जरूर. केव्हा जाता तिकडं? जाण्यापूर्वी मला लिहा, न विसरता.'

या प्रेमळ सूचनेनंतर दांडेकर खूष होऊन बाहेर पडले. त्यानंतर सुमारे एका वर्षानंतर कोयनानगर परिसरातील एका शाळेच्या वार्षिक समारंभानिमित्त कोयनानगर जाण्याची संधी दांडेकरांना मिळाली. त्यांनी यशवंतरावांना पत्राने तसे कळविले. त्यानंतर चौथ्या दिवशी दांडेकरांना कोयनानगरच्या कार्यकारी अभियंत्याचे पत्र आले. त्यात लिहिले होते, 'कृपया आपण किती तारखेला येणार आहात ते कळवा, म्हणजे आपल्या निवासाची व धरण पाहण्याची व्यवस्था करता येईल.' त्याप्रमाणे दांडेकरांनी भेटीचा दिनांक व वेळ सांगितली. पुढे त्या संबंधित शाळेतील कार्यक्रम संपण्यापूर्वीच धरणाच्या अभियंत्याची अलिशान गाडी शाळेत पोहोचली. समारंभ संपल्यानंतर त्यांना त्या गाडीने कोयनानगरला नेण्यात आले व धरणाचा संपूर्ण परिसर प्रत्यक्ष हिंडून दाखविण्यात आला.

एक वर्षापूर्वी दिलेला शब्द यशवंतरावांनी तंतोतंत पाळला होता. दांडेकर आप्पांच्या मनात कृतज्ञता दाटून आली.



विभाग तिसरा

# यमुनाकाठ
# (१९६२ - १९८४)



# एका व्यक्तीला विचारले पाहिजे!

६ नोव्हेंबर १९६२ रोजी यशवंतराव सचिवालयात बसून फायली हातावेगळ्या करीत होते. इतक्यात त्यांच्या सहाय्यकाने घाईघाईने येऊन सांगितले, 'पंतप्रधानांना तुमच्याशी बोलायचे आहे. लवकरच त्यांचा फोन येईल.' लगेच फोन वाजला. यशवंतरावांनी फोन उचलला. पंडितजींचे शब्द त्यांच्या कानावर आले, 'मी जवाहरलाल बोलतोय. आजूबाजूला कोण बसलेले नाही ना?'

'कोणीही नाही.'

'एक महत्त्वाची गोष्ट तुम्हाला विचारायची आहे. तिची वाच्यता कुठेही होऊ देऊ नका. मला फक्त 'हो' किंवा 'नाही' एवढेच उत्तर द्या.' यशवंतरावांनी गुप्ततेची हमी दिल्यावर पंडितजी म्हणाले, 'तुम्ही आता दिल्लीला आले पाहिजे असे मला वाटते. येणार का तुम्ही?'

या अनपेक्षित प्रश्नाने साहेब स्तब्ध झाले. यशवंतरावांचे मौन ओळखून नेहरू म्हणाले, 'तुम्ही आत्ताच उत्तर द्या, असा आग्रह नाही. विचार करून दोन दिवसांत सांगितले तरी चालेल पण कोणाशीही या विषयी बोलू नका.'

यशवंतराव म्हणाले, 'निदान एका व्यक्तीशी तरी मला बोलले पाहिजे.'

किंचित रागावलेल्या स्वरात पंडितजी म्हणाले, 'अशी कोणती व्यक्ती आहे, जिच्याशी तुम्हाला याबद्दल बोलावेच लागेल?'

'मुंबई सोडून दिल्लीला यायचे, तर मला निदान माझ्या पत्नीशी तरी बोलले पाहिजे.' नेहरू खळखळून हसले व म्हणाले, 'बरोबर आहे, सौ.चव्हाणांशी तुम्ही जरूर बोला व मग मला कळवा. मी तुमच्या फोनची वाट पहात आहे.'

यशवंतरावांनी वेणूताईंशी चर्चा केली देशावर संकट आलेले असताना नेहरूंच्या मदतीला जायला हवे असा सल्ला त्यांनी दिला आणि संरक्षणमंत्री पदाची सूत्रे स्विकारण्यासाठी यशवंतराव दिल्लीला गेले.

# मी तुमचा भाऊ आहे!

कृतज्ञता हा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव होता. 'गावात गेल्यानंतर मोठमोठ्या हवेल्या पाहिल्या तरी ज्या वेशीतून गावात शिरलो ती वेस कधी विसरायची नसते' असे त्यांनीच एके ठिकाणी लिहून ठेवले आहे. त्यांच्या कृतज्ञतेचे दर्शन घडविणारा हा प्रसंग.

१९६२ साली पंतप्रधान पं.नेहरूंनी यशवंतरावांना संरक्षणमंत्री पद स्वीकारण्यासाठी फोन करून बोलावून घेतले. देशाच्या इतिहासातील कठीण काळात पंतप्रधानांच्या हाकेला ओ देवून यशवंतराव दिल्लीला गेले. घटनेनुसार संरक्षणमंत्री पद स्वीकारल्यापासून सहा महिन्याच्या आत त्यांना लोकसभा किंवा राज्यसभेचे सदस्य होणे बंधनकारक होते. त्याचवेळी नाशिकचे खासदार देशपांडे यांच्या निधनामुळे नाशिक लोकसभा मतदार संघात पोटनिवडणूक होऊ घातली होती. यशवंतरावांनी तेथूनच निवडणूक लढवायचे ठरवले. राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी आपला उमेदवार उभा न करता यशवंतरावांना बिनविरोध निवडून देण्याचा निर्णय घेतला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी यशवंतराव नाशिकमध्ये आले तेव्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडे जाण्यापूर्वी त्यांनी दिवंगत खासदार देशपांडे यांच्या घरी जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पत्नी राधाबाई देशपांडे यांची भेट घेतली व म्हणाले, 'ताई, मी तुमचा भाऊ आहे. काही अडचण आल्यास अवश्य सांगा.'

या छोट्या कृतीतून त्यांच्या सुसंस्कृतपणाचे दर्शन तर घडतेच, पण त्यांच्या कर्तृत्वाइतकीच त्यांच्या संस्काराची उंचीसुद्धा सह्याद्रीएवढी आहे हेही स्पष्ट झाले.

# कधीतरी मीही 'माजी' होणार आहे!

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाची सुरक्षा व सार्वभौमत्व धोक्यात आले. पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरूंनी यशवंतरावांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला बोलावले. अगोदरचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्या कारभाराविषयी जनतेत प्रचंड नाराजी होती. संरक्षणमंत्रीपदाची सूत्रे हाती घेताच यशवंतरावांनी सेनेचा विस्तार, हवाई दलाचे आधुनिकीकरण, संरक्षण सामग्रीचे पुरेसे उत्पादन आणि वाहतुकीच्या सुविधांची निर्मिती ही चतु:सूत्री समोर ठेवून काम सुरू केले. एकदा चिनी आक्रमणासंबंधी संसदेत चर्चा सुरू असताना काही सदस्य म्हणाले, 'सरकार नेत्रहीन आहे. गुप्तचर यंत्रणा ढिसाळ आहे, मोक्याच्या ठिकाणी विमानतळे नाहीत.'

अर्थातच या टीकेचा रोख माजी संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्यावर होता. कारण यशवंतरावांनी संरक्षणमंत्रीपदाचा कारभार स्वीकारून काही दिवसच उलटले होते. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे खापर कृष्ण मेनन यांच्यावर फोडणे त्यांना सहज शक्य होते. कारण त्या चुकांची जबाबदारी यशवंतरावाची नव्हतीच. पण दुसऱ्याला दोष देणे हा यशवंतरावांचा स्वभाव नव्हता. कृष्ण मेनन यांच्याविषयी टिप्पणी करण्याचे त्यांनी टाळले व स्मितहास्य करीत ते म्हणाले, 'मीही कधीतरी 'माजी' (मंत्री) होणार आहे. एकमेकांचे उणे काढण्यासारखे हे आहे. काही गोष्टी आपल्याही जीवावर बेतू शकतात हे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. आपला उत्तराधिकारी आला की आपणही 'माजी' होणार आहोत,'

या वाक्यावर सभागृहात हास्याची लाट पसरली.

# रक्ताने लिहिलेले महाकाव्य!

१९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले. संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी प्रभावी कामगिरी केली. चीनने युद्धबंदी घोषित केली. पण १९६५ साली पाकिस्तानने पुन्हा कुरापत काढली. पण यावेळी भारत गाफील नव्हता. यशवंतरावांनी तीन वर्षे अथक मेहनत घेऊन संरक्षण खात्याची केलेली पायाभरणी कामाला आली. भारताने पाकिस्तानला धडा शिकवला. अर्थात या युद्धात अनेक भारतीय जवानही शहीद झाले. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांविषयी यशवंतराव खूप हळवे होते.

पाकिस्तानविरुद्धचे युद्ध चालू असताना दिल्लीच्या लाल किल्ल्यात एका कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शहीदांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या या कवी संमेलनात श्रीमती रमा जैन यांनी मेजर जनरल चौधरी यांना शंभराच्या नोटांची माळ घातली. त्या रात्री जमलेल्या प्रचंड समुदायापुढे भाषण करताना यशवंतराव म्हणाले, 'मी कोणी कवी नाही की महाकवी नाही. आजच्या प्रसंगी बोलण्याचा मला अधिकार नाही, पण आज सीमा क्षेत्रातील रणांगणावर आपल्या जवानांनी आणि शहीदांनी रक्ताने जे महाकाव्य लिहिले आहे, त्यांना मी वंदन करतो.'

यशवंतरावांच्या या वाक्यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सतत पाच मिनिटे टाळ्या वाजत होत्या. एका वाक्यात सभा जिंकण्याची यशवंतरावांची स्वत:ची अशी खास पद्धत होती, तिचे दर्शन या भाषणातून घडले.



# तुम्हीच माझी पसंती आहात!

१९६२ सालच्या नोव्हेंबर महिन्यात यशवंतरावांच्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली. चीनने भारतावर आक्रमण केले. तत्कालिन संरक्षणमंत्री व्ही.के. कृष्णमेनन या आव्हानाचा सामना समर्थपणे करू शकले नाहीत. त्यांना राजीनामा द्यावा लागला. यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेले. पंतप्रधान पं.नेहरूंनी साहेबांवर पूर्ण विश्वास टाकला होता. पण यशवंतराव संरक्षणमंत्री झाल्यामुळे बिजू पटनाईक व टी.टी. कृष्णम्माचारी नाराज झाले होते. कारण यशवंतराव दिल्लीला जाण्यापूर्वी ते दोघे संरक्षणखात्याचा बराचसा कारभार पहात होते. यशवंतरावांच्या नेमणुकीनंतर त्या दोघांना संरक्षण विभागात काहीच काम उरले नाही. पटनाईक ओरिसाचे मुख्यमंत्री होते आणि कृष्णम्माचारी अर्थसमन्वय खात्याचा कारभार पहात होते. यशवंतराव संरक्षणमंत्री झाल्यावर पी.व्ही.आर. राव यांची नवे संरक्षणसचिव म्हणून नेमणूक करण्यात आली होती. खरं म्हणजे एखाद्या अधिकाऱ्याची विशिष्ट खात्याचा सचिव म्हणून नेमणूक करण्यापूर्वी संबंधित खात्याच्या मंत्र्याशी चर्चा करण्याचा संकेत होता. पण राव यांच्या नियुक्तीबद्दल यशवंतरावांशी कसलीही चर्चा करण्यात आलेली नव्हती. शिवाय राव हे अगोदर कृष्णम्माचारी यांच्या अर्थसमन्वय खात्यातच काम करीत होते. याचा अर्थ उघड होता. राव यांची नियुक्ती यशवंतरावांवर जणू नजर ठेवण्यासाठीच झाली होती. त्या नियुक्तीची योजना कृष्णम्माचारी यांचीच होती. पण स्वत: राव या नियुक्तीमुळे अस्वस्थ झाले होते. ते स्वत: यशवंतरावांना भेटले व म्हणाले, 'सर, तुमच्याशी विचारविनिमय न करता, तुमची मान्यता न घेता मला या खात्याकडे बदलले गेले आहे याची मला कल्पना आहे. आज देशाची सुरक्षा धोक्यात आहे आणि अशा नाजूक प्रसंगी संरक्षणमंत्र्यांचा सचिव त्यांच्या पसंतीचा असावा असेच मला वाटते. आपणास अशा एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक करावीशी वाटल्यास जरूर करावी. मी रजेवर जाईन.'

रावांचा प्रामाणिकपणा यशवंतरावांना आवडला. ते म्हणाले, 'तुम्हीच आता माझी पसंती आहात. काही काळापूर्वी माझे मन द्विधा होते.'

या चार शब्दांनी पी.व्ही.आर. जिंकले गेले व 'यशवंतरावांचा माणूस' झाले.

# निवृत्त अधिकारी सेवेत !

देशाचे संरक्षणमंत्री म्हणून काम करीत असताना हुशार व कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांचा उपयोग करून घ्यायचा हे यशवंतरावांचे धोरण होते. पूर्वीचे संरक्षणमंत्री कृष्णमेनन हे पक्षपाती होते. त्यांच्या मर्जीतल्या अधिकाऱ्यांना ते झुकते माप द्यायचे. याउलट एखाद्या अधिकाऱ्यावर त्यांची वक्रदृष्टी पडली की त्याला ते अतोनात त्रास द्यायचे. भारतीय वायुदलाचे एअर व्हाईस मार्शल प्रतापचंद लाल हे मेनन यांच्या नाराजीचा बळी ठरले होते. खरं म्हणजे लाल यांनी दुसऱ्या महायुद्धात चांगली कामगिरी केली होती. १९५७ ते १९६२ या कालावधीत त्यांनी इंडियन एअरलाईन्सच्या व्यवस्थापकपदाची जबाबदारी सांभाळली होती. देशासाठीचे त्यांचे योगदान उल्लेखनीय होते, पण सप्टेंबर १९६२ मध्ये मेनन यांनी त्यांना वायुदलातून मुक्त करण्याचा आदेश काढला. प्रतापचंद लाल यांना इच्छेविरूद्ध निवृत्त व्हावे लागले. त्यानंतर लगेच चीनने भारतावर आक्रमण केले. कृष्णमेनन यांनी संरक्षणमंत्रीपद सोडावे अशी मागणी देशभरातून होऊ लागली. नेहरूंनी त्यांचा राजीनामा घेतला. यशवंतराव संरक्षणमंत्री झाले. प्रतापचंद लाल यांच्यावरील अन्यायाची माहिती त्यांना कळाली. अशा अनुभवी व पराक्रमी अधिकाऱ्याची देशाला नितांत गरज होती. यशवंतरावांनी त्यांना वायुदलाच्या सेवेत परत घेण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी पंतप्रधानांशी चर्चा केली. नेहरूंनी होकार दिला, पण तांत्रिकदृष्ट्या अडचण येऊ नये यासाठी अर्थमंत्र्यांची परवानगी आवश्यक होती. त्यावेळी मोरारजी देसाई अर्थमंत्री होते. यशवंतरावांचे व त्यांचे चांगले संबंध होते. ते त्यांच्याशी बोलले. मोरारजींनी यशवंतरावांचा शब्द मानला आणि निवृत्तीनंतर तीन महिन्यांनी प्रतापचंद परत सेवेत रूजू झाले.

पेन्शनच्या बाबतीत भविष्यात अडचण निर्माण होऊ नये म्हणून तीन महिन्यांची त्यांची बिनपगारी रजा मानली गेली. निवृत्त अधिकाऱ्याला परत सेवेत घेण्याचा भारतातील हा पहिलाच प्रसंग होता. एका प्रामाणिक अधिकाऱ्याला न्याय देण्यासाठी आणि देशाच्या हितासाठी यशवंतरावांनी हा निर्णय घेतला.

# माणसे आहेत तशीच स्वीकारायला नकोत का?

संरक्षणमंत्रीपद हे यशवंतरावांसाठी एक आव्हानच होते. एक तर देशाची सुरक्षितता धोक्यात होती. दिल्लीत यशवंतराव नवीन होते, शिवाय त्या खात्यातील अधिकाऱ्यांमध्ये सुसंवाद उरला नव्हता. त्यांना एकमेकांविषयी असूया व अविश्वास वाटत होता. जनरल चौधरी आणि पी.व्ही.आर. राव हे दोघेही कर्तबगार अधिकारी होते, पण त्यांचे एकमेकांशी मुळीच पटत नसे. एकदा जनरल चौधरी यशवंतरावांच्या केबिनमध्ये शिरले. त्यांनी पी.व्ही.आर. राव यांच्याविषयीच्या तक्रारींचा पाढा वाचायला सुरूवात केली. खरं म्हणजे राव हे कठोर परिश्रम करणारे, कर्तव्यनिष्ठ व बुद्धिमान अधिकारी होते. पण चौधरी म्हणाले, 'लष्करातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांशी ते तुसडेपणाने वागतात. समोरच्या माणसाला तुच्छ समजतात.' चौधरींची बडबड चालू असतानाच यशवंतरावांनी त्यांना थांबवले आणि विचारले, 'जनरल, सेनादलात तुमची किती वर्षे सेवा झाली आहे ?'

'गेली चाळीस वर्षे मी या खात्यात काम करतोय' जनरल म्हणाले.

'मग मी जर तुम्हाला सांगितले की, तुमच्या वागण्या-बोलण्याच्या पद्धती व चेहऱ्यावरच्या भावभावना बदलून माझ्याशी बोला, तर तुम्हाला ते जमेल का?' यशवंतरावांनी विचारले.

या अनपेक्षित आणि वेगळ्या प्रश्नाने चौधरी चक्रावले. यशवंतरावांना काय म्हणायचे आहे हे त्यांना लवकर कळालेच नाही. मग यशवंतरावच समजावणीच्या सुरात पुढे म्हणाले, 'चौधरी, मी जर पी.व्ही.आर. ना सांगितले की तुमची बोलण्याची पद्धत बदला, चेहऱ्यावरच्या भावना आवरा, तर मला सांगा, पी.व्ही.आर. हे 'पी.व्ही.आर.' राहतील का? आज ज्या कामाला आपण हात घातला आहे त्याच्या पूर्तीसाठी पी.व्ही.आर. जसे आहेत तसेच आपण स्वीकारायला नकोत का?'

चौधरी हसले. त्यांना सर्व काही समजले. तावातावाने यशवंतरावांच्या केबिनमध्ये घुसलेले चौधरी हसत हसत बाहेर पडले. जाताना स्वत:शीच म्हणाले, 'मी किती खुळा होतो!'

# ते तुम्हाला नाही कळायचं !

गुरूजनांविषयी यशवंतरावांच्या मनात अपार आदर होता. केंद्रीय मंत्री असताना ते एकदा विश्रांतीसाठी कराडला आले होते. कराडमधीलच एका मित्राच्या घरी माडीवर राजकीय चर्चा करीत बसले होते. त्यावेळी यशवंतराव सिगारेट ओढीत असत. गप्पांच्या ओघात त्यांनी सिगारेट पेटविली. तक्क्याला टेकून त्यांनी एक झुरका मारला. इतक्यात एक माणूस निरोप घेऊन आला. 'खाली जोशी म्हणून कोणी एक माणूस आलाय, साहेबांना भेटायचं म्हणतोय.'

'त्यांना वर पाठव', यशवंतराव म्हणाले. थोड्याच वेळात एक गृहस्थ माडीवर आले. त्यांना पाहताच साहेबांनी ताबडतोब हातातील सिगारेट तक्क्यामागील भिंतीवर दाबून, विझवून टाकून दिली. भेटीला आलेले गृहस्थ यशवंतरावांचे गुरूजी होते. यशवंतरावांनी त्यांना आदराने नमस्कार केला व काम विचारले. गुरूजींनी आपली समस्या मांडली. यशवंतरावांनी काम करण्याचे वचन दिले. चहा घेऊन गुरूजी निघून गेले. गुरूजींना पाहिल्यावर सिगारेट विझविण्याची यशवंतरावांची धडपड त्यांच्या मित्रांनी पाहिली होती. त्यापैकी एक मित्र म्हणाला, 'साहेब, इतक्या गडबडीने सिगारेट विझवायची गरज नव्हती.' त्यावर हसून यशवंतराव म्हणाले, 'ते तुम्हाला नाही कळायचं ! या जोशी गुरूजींनीच माझे कान धरून मला 'ही पूर्व, ही पश्चिम' अशा दिशा शिकविल्या आहेत. म्हणून तर आज मी समोरच्या माणसाची दिशा अचूक ओळखू शकतो. मित्रांनो, माणूस कितीही मोठा झाला, तरी त्याच्या गुरूसमोर त्याने नतमस्तक व्हायलाच पाहिजे.'

संरक्षणमंत्र्यांचे हे सिगारेट प्रकरण त्यानंतर कितीतरी दिवस त्यांच्या मित्रांमध्ये चर्चेचा विषय बनले होते.

# माझा तुमच्यावर विश्वास आहे!

यशवंतराव केंद्रात संरक्षणमंत्री असताना एकदा सरकारी कामानिमित्त हेलिकॉप्टरने गंगोत्रीला गेले होते. हिमालय पर्वतरांगांमधील दऱ्यांमधून हेलिकॉप्टर निघाले होते. पाऊस पडत होता. अर्ध्या पाऊण तासाच्या प्रवासानंतर काही अंतरावर काळे ढग दिसू लागले. पायलटने आपल्या शेजारील सहकाऱ्यास विचारले, 'पुढे काही दिसतेय का?' सहकाऱ्याने 'नाही' म्हणून सांगितल्यावर लगेचच पायलटने हेलिकॉप्टर मागे वळवले. शेजारी यशवंतराव बसले होते. हेलिकॉप्टर माघारी फिरले आहे याची त्यांना कल्पना आली. पण का वळले ते लक्षात आले नाही. त्यांनी शेजारच्या पायलटला कारण तर विचारले नाहीच, पण त्याच्याकडे बघितलेसुद्धा नाही. यशवंतराव आपणास परत का फिरला असे विचारतील म्हणून पायलट त्यांच्याकडे पहात होता. पण यशवंतराव मात्र समोर पहात होते. काही वेळाने एका शाळेच्या पटांगणावर पायलटने हेलिकॉप्टर उतरवले तेव्हासुद्धा यशवंतरावांनी काही विचारले नाही. शेवटी पायलटच म्हणाला, 'सर, पुढे खराब हवा असण्याची शक्यता होती. ढगातून प्रवास करणे जोखमीचे होते म्हणून परत आलो.' यशवंतराव म्हणाले,

'हेलिकॉप्टरच्या संबंधीचे तुमचे ज्ञान माझ्यापेक्षा जास्त आहे आणि माझ्यापेक्षा तुमची जबाबदारी मोठी आहे. माझा तुमच्यावर विश्वास आहे आणि तुम्ही योग्य तोच निर्णय घ्याल अशी मला खात्री होती, म्हणून मी बोललो नाही.'

गेल्या काही वर्षांत हेलिकॉप्टर अपघातग्रस्त होण्याच्या अनेक घटना घडल्या. याला पायलटच्या चुकांबरोबरच नेत्यांची घाई आणि अनावश्यक सल्लेही जबाबदार होते. या पार्श्वभूमीवर यशवंतरावांचा संयम आणि विवेक अनुकरणीय आहे.

# बेडीमित्र!

तरुण यशवंतरावांनी १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत भाग घेतला. इंग्रज सरकारने त्यांना राजकैदी बनवून तुरूंगात टाकले. या काळात कोल्हापूरच्या बळवंतराव माने व कराडच्या यशवंतराव चव्हाणांना काही दिवस एकाच बेडीत जोडकैदी म्हणून राहण्याचा प्रसंग आला. दोघांची मैत्री जुळली. पुढे तुरुंगातून सुटल्यानंतर दोघांच्या वाटा वेगळ्या झाल्या. स्वातंत्र्यानंतर बळवंतराव माने संस्थानांच्या विलीनीकरणाच्या चळवळीत उतरले. धडाडीने काम करू लागले. लोक त्यांना 'वीर माने' म्हणू लागले. कोल्हापूर संस्थानात त्यांचा दबदबा होता. पण संस्थानांच्या विलीनीकरणानंतर त्यांचे दिवस बदलले. अत्यंत मौनी व अबोल स्वभावामुळे त्यांनी कधीच कोणाकडे स्वत:साठी काही मागितले नाही. शिक्षण कमी असल्यामुळे त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्यात मुकादम म्हणून नोकरी स्वीकारावी लागली. यशवंतराव सक्रीय राजकारणात उतरले. मंत्री, मुख्यमंत्री व नंतर देशाचे संरक्षणमंत्रीही झाले. संरक्षणमंत्री असताना एकदा यशवंतराव कोल्हापूर भागात दौऱ्यावर आले होते. मागे पुढे पोलीसांच्या गाड्या व मध्ये साहेबांची गाडी असा त्यांचा ताफा चालला होता. ज्या रस्त्याने त्यांच्या गाड्या चालल्या होत्या, त्याच रस्त्यावर योगायोगाने वीर माने यांची ड्युटी होती. पुढे चाललेली पोलीसांची गाडी भरधाव निघून गेली. वीर माने रस्त्याच्या कडेला उभे राहून गाड्या निघून जाण्याची वाट पहात होते. यशवंतरावांची गाडीही पुढे निघून गेली, मात्र पन्नासेक मीटर अंतरावर जाऊन ती थांबली. यशवंतराव आपल्या सचिवांना; श्रीपाद डोंगरे यांना म्हणाले, 'वीर माने दिसतात बहुतेक, गाडी मागे घ्या.'

त्या निर्जन रस्त्यावर संरक्षणमंत्र्यांची गाडी परतून आली. गाडीचा दरवाजा स्वत:च उघडून यशवंतराव झपाझपा चालत रस्त्याच्या कडेला गेले. वीर मानेंना कडकडून भेटले. बेचाळीसच्या मंतरलेल्या दिवसांच्या आठवणी जागवल्या. वीर मानेंची आपुलकीने चौकशी केली. दोघांनाही आनंद झाला आणि काही वेळाने दोघेही आपापल्या मार्गाने निघून गेले. जवळपास २२ वर्षांनी भेटूनही यशवंतरावांनी आपल्याला कसे ओळखले याचे वीर मानेंना नवल वाटले.

# माझ्या विचारांचा केंद्रबिंदू सामान्य माणसे आहेत!

संरक्षणमंत्री असताना यशवंतराव एकदा नगर जिल्ह्यात एका कार्यक्रमासाठी आले होते. आण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर इत्यादी नेते त्यांच्याबरोबर होते. कार्यक्रम सुरू झाला. सभेला प्रचंड गर्दी जमली होती. सर्वांना बसण्यासाठी जागा अपुरी पडत होती. अनेक लोक टाचा उंचावून यशवंतरावांना पहात होते. त्यांचे विचार कानात साठवत होते. कार्यक्रम संपल्यावर यशवंतराव निघाले. मंडपातील अफाट गर्दी रस्त्याच्या दुतर्फा उभी राहिली. गर्दीला अभिवादन करीत यशवंतराव गाडीकडे निघाले होते व सामान्य माणसांची ती गर्दी यशवंतरावांना नमस्कार करीत होती. अनेकांना यशवंतरावांचा चेहराही दिसत नव्हता, पण त्यांना पाहण्यासाठी सर्वांची धडपड चालू होती. गाडीत बसल्यावर आण्णासाहेब शिंदेनी यशवंतरावांना विचारले, 'साहेब, तुम्ही दिसणार नाही हे माहित असूनही लोक तुम्हाला पाहण्यासाठी गर्दी करतात, असे का?'

यशवंतराव अंतर्मुख होऊन म्हणाले, 'आण्णासाहेब, तुम्ही फार मूलभूत प्रश्न विचारला आहे. त्या माणसांना मी दिसणार नाही, पण ती माणसे माझ्या विचारांचा केंद्रबिंदू आहेत. त्यांचे आणि माझे विचार मिळते जुळते आहेत. ते जे विचार करतात, त्यांच्या ज्या आशा-आकांक्षा आहेत त्या, आणि मी जो विचार करतो त्यात साम्य आहे. आणि म्हणूनच मी दिसत नसलो तरी ती माणसे माझ्यासाठी उभी आहेत.'

नेता आणि जनता यांच्या संबंधाविषयी यशवंतरावांनी अत्यंत मार्मिक शब्दांत व्यक्त केलेला हा अभिप्राय त्यांच्या कुशाग्र बुद्धीचेही दर्शन घडवितो. यशवंतरावांचा हात सदैव जनतेच्या नाडीवर होता हेच यातून दिसून येते.

# माझ्या घरी चहाला याल का ?

यशवंतराव कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे विद्यार्थी होते. आपल्या गुरुजनांविषयी त्यांच्या मनात अपार कृतज्ञता होती. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना प्रोफेसर डॉ.बोस हे त्यांना इंग्रजी शिकवत असत. बी.ए. च्या वर्गात असताना डॉ.बोस यांनी शिकविलेल्या इंग्रजी कविता यशवंतरावांच्या आयुष्यभर लक्षात राहिल्या. डॉ.बोस यांच्यामुळे त्यांना इंग्रजी साहित्याची गोडी निर्माण झाली. डॉ.बोस यांची शिकविण्याची शैली वैशिष्ट्यपूर्ण होती.

पुढे १९६२ मध्ये यशवंतराव संरक्षणमंत्री झाले. दिल्लीमध्ये त्यांचे वास्तव्य असताना डॉ.बोस हे देखील सध्या दिल्लीमध्ये राहतात असे त्यांना कोणीतरी सांगितले. आपल्या या थोर गुरूची भेट घ्यावी असे यशवंतरावांना वाटले. त्यांनी डॉ.बोस यांना फोन केला व म्हणाले, 'सर, मी तुमचा राजाराम कॉलेजचा विद्यार्थी आहे. तुम्ही माझ्या घरी चहाला याल का?'

आपल्या एका माजी विद्यार्थ्याने व देशाच्या विद्यमान संरक्षणमंत्र्याने अगत्याने दिलेले निमंत्रण डॉ.बोस यांनी आनंदाने स्वीकारले. ते आणि त्यांचा मुलगा (जो दिल्ली युनिव्हर्सिटीत प्राध्यापक होता) यशवंतरावांच्या घरी आले. चहा घेतला, गप्पा मारल्या. कोल्हापुरातील आठवणींना उजाळा दिला व निघून गेले. आपल्या आवडत्या शिक्षकाची भेट घडल्यामुळे यशवंतरावांनाही आनंद झाला. आपल्या गुरुजनांविषयी यशवंतरावांच्या मनात अपार श्रद्धा होती आणि जेव्हा जेव्हा संधी मिळत असे तेव्हा तेव्हा ते ही कृतज्ञता व्यक्त करीत असत.

# भीमसेनचं गाणं ही जाता जाता ऐकण्याची गोष्ट नाही!



स्वरभास्कर पं.भीमसेन जोशी यांचे आणि यशवंतरावांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. यशवंतराव त्यांच्या गायनाचे चाहते होते. पंडितजींचा पहाडी आवाज आणि यशवंतरावाचे पहाडी नेतृत्व यांचे कुठेतरी सूर जुळले होते. महाराष्ट्रातून दिल्लीला गेल्यानंतरही यशवंतराव वेळ मिळेल तेव्हा आणि प्रसंगी वेळ काढून पंडितजींचे गाणे ऐकत असत.

एकदा पंडितजी दिल्लीला गेले होते, त्यांनी यशवंतरावांना फोन करून विचारले, 'काय करताय?'

'कामं चालली आहेत.'

'गाणं ऐकायचं का?'

या प्रश्नाचं नेहमीच 'हो' असं उत्तर देणारे साहेब यावेळी मात्र म्हणाले, 'नको, आज वेळ नाही. भीमसेनचे गाणे ही जाता जाता ऐकण्याची गोष्ट नाही. त्यासाठी किमान तीन-चार तासांची सवड हवी.'

एकप्रकारे पंडितजींच्या गायनाला दिलेली ती दादच होती. त्यावेळी पंडितजींच्या गायनाची मैफील झाली नाही. त्यानंतर काही वर्षे निघून गेली आणि १ जून १९८३ रोजी वेणूताई यशवंतरावांना सोडून गेल्या. त्यांच्या मृत्यूने पुरते खचलेल्या यशवंतरावांनी त्यांच्या पहिल्या स्मृतीदिनी कराडला पं.भीमसेन जोशी यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित केला. 'विरंगुळ्या' वर भरलेल्या मैफिलीत पं.भीमसेन जोशी संतवाणी गात होते, तर यशवंतराव समोर बसून उदास मनाच्या सुन्या सुन्या मैफिलीत वेणूताईंचे गीत गात होते.

# आपण खास मोहिमेवर जात आहोत!

यशवंतराव हे श्रेष्ठ दर्जाचे रसिक होते. त्यांची रसिकता कृत्रिम नव्हती, तर तो त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच एक भाग होता. एखाद्या नवीन चांगल्या पुस्तकाविषयी ऐकले की यशवंतराव ते पुस्तक आवर्जून खरेदी करायचे. नवीन आणि कलात्मक चित्रपट ते आवर्जून पहायचे.

संरक्षणमंत्री असताना यशवंतराव एकदा पुण्याला आले होते. विनायकदादा पाटील यांना सोबत घेऊन यशवंतराव त्यांचे स्नेही माधवराव आपटे यांच्याकडे गेले. बोलता बोलता माधवरावांनी रिगल चित्रपट गृहात सुरू असलेल्या एका इंग्रजी चित्रपटाचा उल्लेख केला आणि यशवंतरावांनी तो चित्रपट आवर्जून पहावा असे सुचवले. पण देशाचे संरक्षणमंत्री एका साध्या नागरिकाप्रमाणे थिएटरमध्ये जाऊन सिनेमा कसा पाहणार? सुरक्षा व्यवस्था व लोकांच्या गर्दीमुळे अनेकदा इच्छा असूनही ते शक्य नसते. पण यशवंतरावांना ही संधी दवडायची नव्हती. शिवाय त्या दिवशी ते जरा निवांतही होते. त्यांनी कुणालाही न सांगता दुपारच्या तीनच्या  खेळाची दोन तिकीटे मागवली. पावणेतीन वाजता ते विनायकदादांना म्हणाले, 'विनायकराव, आपण एका खास मोहिमेवर जात आहोत!'

सुरक्षा अधिकारी व अन्य कुणालाही न सांगता चित्रपट सुरू झाल्यानंतर अंधारात ते दोघे चित्रपटगृहात जाऊन बसले. आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून यशवंतरावांनी डोक्यावरील टोपी काढून ठेवली होती. दोघांनी चित्रपटाचा आनंद घेतला, पण चित्रपट संपल्यावर लोकांच्या लक्षात आले की यशवंतराव आले आहेत. मग साहजिकच लोकांची गर्दी झाली. देशाचे संरक्षण करणारा माणूस, कोणतेही संरक्षण न घेता सामान्य नागरिकाप्रमाणे थिएटरमध्ये येऊन चित्रपटाचा आस्वाद घेतो याचे लोकांना कौतुक वाटले.

# सभा संपल्यावर घरी येईन!

ॲड.एकनाथ साळवे हे चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे दहा वर्षे आमदार होते. त्यांनी सांगितलेली ही आठवण.

यशवंतराव तेव्हा संरक्षणमंत्री होते. एकदा चंद्रपुरात त्यांची मोठी सभा झाली. तेव्हा आमदार म्हणून साळवेंना सभा-मंचावर एका बाजूला पाठीमागच्या रांगेत स्थान मिळाले होते. यशवंतरावांनी आपल्या घरी यावे ही साळवेंची तीव्र इच्छा, पण त्यांना विचारायचे कसे? मग साळवेंनी सभा सुरू असतानाच यशवंतरावांना एक चिठ्ठी पाठवली. चिठ्ठीत लिहिले होते, 'आदरणीय साहेब, आपण माझ्या घरी चहाला येऊ शकलात तर आम्ही धन्य होऊ.'

त्याच चिठ्ठीवर यशवंतरावांनी उत्तर पाठवले, 'तू पुढे चल. सभा संपल्यावर मी घरी येईन.' आपल्या झोपडीवजा घरात यशवंतराव येणार म्हणून साळवे सुखावले. पण त्यांचे घर इतके लहान होते, की एवढी माणसे त्यात कशी बसणार? घरात खुर्च्याही नव्हत्या. पूर्वसूचना नसल्याने घरच्या मंडळींची तारांबळ उडाली. इकडे अत्यंत व्यस्त दौरा असूनही यशवंतरावांनी सभा संपल्यावर ड्रायव्हरला गाडी साळवेंच्या घराकडे घ्यायला सांगितली. जिल्ह्यातले इतर नेते संतापले. पोलीस अधिकारीही वैतागले. 'आमदार असले म्हणून काय झाले? पूर्वसूचना द्यायला हवी होती' असे म्हणाले. पण यशवंतराव आले. मग अधिकारी, नेतेही आले. आमदारांच्या झोपडीवजा घरापुढे गर्दी झाली. एकदोन मोठ्या नेत्यांसह यशवंतराव घरात शिरले. एका मोडक्या खुर्चीवर बसले. इतर नेते बाकड्यावर बसले. चहा बिस्कीटांची व्यवस्था करण्यात गुंतलेल्या सौभाग्यवतींना खूप लाजल्यासारखे झाले. पण यशवंतराव सर्वांशी आपुलकीने बोलले. अगदी अनौपचारिकपणे वागले. जणू आपल्या आजोळी देवराष्ट्रेतच आले आहेत! ते पंधरा-वीस मिनिटे थांबले, प्रेमाचा पाहुणचार घेतला व निघून गेले. ॲड.साळवे धन्य झाले. एवढा मोठा नेता, देशाचा संरक्षणमंत्री, पण या गरीबाच्या निमंत्रणाला मान देऊन आपल्या घरी आला. आणखी काय हवे? यशवंतराव नेहमी गर्दीत राहिले, पण या गर्दीच्या पलिकडे उभ्या असलेल्या सामान्य माणसाकडे त्यांचे नेहमीच लक्ष असे.

# फसवू नका आणि फसूही नका !

पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदरगडावर शिवकाळातील शूर किल्लेदार मुरारबाजी देशपांडे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याचा समारंभ पुणे जिल्हा परिषदेने निश्चित केला. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतरावांना निमंत्रित केले. यशवंतराव तेव्हा केंद्रात मंत्री होते. दिल्लीहून ते येणार असल्याने गडावर मोठ्या संख्येने लोक जमा झाले. समारंभ सुरू झाला. प्रास्ताविक आणि त्यानंतर काही वक्त्यांची भाषणे झाली. या भाषणातून मुरारबाजींची शौर्यकथा ऐकायला मिळेल अशी श्रोत्यांची अपेक्षा होती. पण वक्त्यांनी मुरारबाजींचा नाममात्र उल्लेख करून यशवंतरावांवरच स्तुतीसुमने उधळायला सुरुवात केली. ते बिचारे दुसरे काय करणार? मुरारबाजीविषयी त्यांना काही माहितीच नसेल तर त्यांनी काय सांगावे? ते वारंवार यशवंतरावांचा उल्लेख 'प्रतिशिवाजी' असा करीत राहिले. यशवंतराव मात्र या स्तुतीमुळे अस्वस्थ झाले. नंतर त्यांचे भाषण सुरू झाले. आपल्या भाषणात त्यांनी मुरारबाजी देशपांडे या शूर किल्लेदाराच्या कामगिरीचा इतिहास सांगितला. तो उद्‌बोधक तर होताच, पण प्रेरणादायीही होता. भाषणाच्या शेवटी ते स्तुतीपाठकांकडे वळले. ते म्हणाले, 'भोंगळ स्तुती करणारी भाषणे देण्याची सवय आपण सोडली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांसारखा 'प्रतिशिवाजी' कोणी असू शकत नाही. टिळकांना 'प्रतिटिळक' किंवा महात्मा गांधींना 'प्रतिगांधी' असू शकत नाही, शकणार नाही. मुघलांना पिटाळून लावण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. आता प्रतिशिवाजी म्हणून कोण उदयाला येणार असेल तर अगोदर महाराष्ट्रावर पुन्हा मुघलांचे राज्य यावे लागेल. स्तुती करताना आपण इतिहास विसरतो हे योग्य नाही. स्तुतीने फसणाऱ्यांपैकी मी नाही. तुम्ही फसवू नका आणि फसूही नका असे माझे सांगणे आहे. आपण एका स्वतंत्र देशाचे नागरिक आहोत. देशाच्या संरक्षणाची प्रेरणा मुरारबाजींच्या मूर्तीपासून आपण घ्यावी आणि सर्व शक्तीनिशी आपला स्वतंत्र देश सुरक्षित राखावा, हे सांगण्यासाठी हा अवघड गड चढून मी आलो आहे. स्तुती विसरून आणि प्रेरणा घेऊन मी तुमचा आणि या गडाचा निरोप घेत आहे.'

# सामान्य जनतेचं न्यायालय !

महाराष्ट्राच्या सर्व भागातील व सर्व थरातील जनतेला यशवंतराव हे आपलं मन मोकळं करण्याचं हक्काचं ठिकाण वाटे. आपली कैफियत इथे ऐकून घेतली जाईल व त्यावर काहीतरी तोडगा निघेल अशी त्यांना खात्री वाटे. संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेल्यानंतरही महाराष्ट्राच्या मातीशी व जनतेशी असलेली त्यांची नाळ तुटली नाही. या अनोख्या नात्याची साक्ष देणारा एक प्रसंग घडला.

बागलाण भागातील एक साधी भोळी, अशिक्षित शेतकरी स्त्री गाठोडं बांधून थेट दिल्लीलाच गेली. तिच्या जमिनीवर भावकी टपून होती. अनेक वर्षे वाद चालू होता. बिचारी म्हातारी हतबल झाली. आपण एकटे ही लढाई किती दिवस लढणार हा प्रश्न तिला पडला. शेवटचा उपाय म्हणून तिने दिल्लीतील यशवंतरावांचे घरच गाठले. एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले यशवंतराव आपल्याला नक्कीच न्याय देतील अशी आशा तिला वाटत होती. तिने आपल्या जमिनीचा कायदेशीर गुंता यशवंतरावांच्या कानावर घातला. त्यांनी शांतपणे तिचे म्हणणे ऐकून घेतले. मग नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून तिची अडचण समजावून सांगितली. सौ.वेणूताईंनी तिच्यासाठी छानसा स्वयंपाक केला. तृप्त मनाने ती वृद्धा जेवली. थोड्या वेळाने जेव्हा ती जायला निघाली तेव्हा दोघांनीही आग्रहाने तिला '१, रेसकोर्स' या निवासस्थानी एक दिवस मुक्काम करायला लावला. दुसऱ्या दिवशी वेणूताईंनी तिला साडीचोळी केली व यशवंतरावांनी आपल्या सचिवास तिच्यासोबत स्टेशनपर्यंत पाठवले. सचिवांनी रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे तिकीट काढून तिला बसवून दिले. आपल्या लाडक्या नेत्याला भेटण्यासाठी थेट दिल्लीपर्यंत आलेली ती वृद्धा सुखरूप घरी परतली, हे ऐकून यशवंतरावांना समाधान वाटले.

# कसा आहेस बाळू ?

यशवंतरावांची स्मरणशक्ती अद्‌भुत होती. विशेषत: माणसांना व कार्यकर्त्यांना नावाने हाक मारण्यावर त्यांचा कटाक्ष होता. हे ते मुद्दाम करीत होते असे नव्हे, तर एकूणच माणसांविषयी त्यांना मनापासून आस्था होती. संरक्षणमंत्री असताना एकदा ते रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. रशियाची राजधानी असलेल्या मॉस्कोमध्ये त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. स्वागत आणि मानवंदना स्वीकारीत उघड्या मोटारीतून यशवंतराव पुढे निघाले होते. सोबत रशियाचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह होते. अचानक भोवतालच्या गर्दीतील एका मराठमोळ्या माणसाकडे यशवंतरावांचे लक्ष गेले. साहेबांनी ओळखीचे स्मितहास्य केले. नंतर काही वेळाने ती व्यक्ती यशवंतरावांना भेटली. त्या व्यक्तीने आपली ओळख करून द्यायला सुरुवात करताच यशवंतराव म्हणाले, 'अरे, तू मामा खंडकरांचा बाळू ना? मी ओळखतो तुला. कसा आहेस?' हे ऐकून बाळासाहेब खंडकर थक्कच झाले. कराडच्या आपल्या नेत्याने रशियाच्या राजधानीत आपल्याला 'बाळू' म्हणून हाक मारली हे ते कधीच विसरू शकले नाहीत. साधारण अनुभव असा येतो की, उच्चपदावर असलेली व्यक्ती जुन्या सहकाऱ्यांना ओळख देत नाही. ओळख सांगितली तरी त्यांना आठवत नाही. पण यशवंतराव वेगळे होते.

रूदयार्ड किप्लींगने एका कवितेत म्हटले आहे- 'If you can walk with kings, not lose the common touch.'

यशवंतराव हा कॉमन टच कधीच विसरले नाहीत.



# चहा घेतल्याबिगर जाऊ देणार नाही!

यशवंतरावांची राहणी साधी होती. घरही साधेच होते, पण भेटीला येणाऱ्या पाहुण्यांच्या आतिथ्यामध्ये ते कधी कमी पडले नाहीत. वेणूताई तर मूर्तिमंत आतिथ्यशीलताच होत्या. आतिथ्यशीलतेचा हा संस्कार यशवंतरावांना आईकडून लाभला होता.

एकदा पुणे जिल्ह्यातील काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांची सहल चिपळूण, कोयनानगर या भागात गेली होती. एकूण ४५ महिला या सहलीत सामील झाल्या होत्या. प्रवासात त्यांनी कराडचा कृष्णा-कोयनेचा प्रीतीसंगम पाहिला. यशवंतराव तेव्हा केंद्रात मंत्री होते. अनायासे कराडमध्ये आलोच आहोत, तर कराडमधील यशवंतरावांचे घरही पाहूया असा विचार सर्वांनी केला आणि थोड्याच वेळात त्यांची बस सोमवार पेठेतील यशवंतरावांच्या घरासमोर थांबली. अचानक इतके लोक आलेले पाहून शेजारी गोळा झाले. तब्येत बरी नसल्यामुळे विठामाता झोपूनच होत्या. घरात यशवंतरावांच्या थोरल्या बंधूंची सून होती. साधेच पण स्वच्छ घर पाहून त्या महिला कार्यकर्त्यांना यशवंतरावांच्या साध्या राहणीचे रहस्य समजले. त्यांनी विठामातांना आपली ओळख करून दिली. त्यांच्याशी गप्पा मारल्या आणि थोड्या वेळाने त्यांचे आशीर्वाद घेऊन सगळ्याजणी जायला निघाल्या. तेव्हा विठामाता म्हणाल्या, 'कुठे निघालात सगळ्याजणी? चहा घेतल्याबिगर मी जाऊ देणार नाही.' काहीजणी म्हणाल्या, 'आज्जी, आम्ही ४०-५० जणी आहोत आणि पूर्वसूचना न देता आलो आहोत. त्यामुळे तुम्ही चहा वगैरे करू नका. विश्रांती घ्या. आम्ही निघतो.' पण विठामाता ऐकेनात. त्या म्हणाल्या, 'मी तशी सोडणार नाही. सरबत तरी घ्यायला पाहिजेच.' मग त्यांनी त्या महिलांना घरातलं मोठ्ठं पातेलं घ्यायला सांगितलं. साखर, लिंबू दिलं व म्हणाल्या, 'आता तुम्हीच करून घ्या बायांनो.' त्याप्रमाणे महिलांनी सरबत घेतलं. विठामातेला समाधान वाटलं. ही हकीकत कोणी तरी यशवंतरावांना सांगितली, तेव्हा ते हसून म्हणाले, 'माझी आई वात्सल्यदेवता आहे.'

# सगळा खर्च सरकारतर्फे करा!



बालगंधर्व

बालगंधर्व म्हणजे मराठी रंगभूमीला पडलेले सुंदर स्वप्नच! आपल्या सहजसुंदर अभिनयाने त्यांनी अनेक भूमिका अजरामर केल्या. पण या थोर कलावंताची अखेरच्या काळात फार दयनीय अवस्था झाली. आर्थिक विवंचनेने ते त्रस्त झालेले असतानाच त्यांना आजाराने गाठले. उपचारासाठी त्यांच्याकडे पैसेच नव्हते. शेवटी आजार वाढल्यावर काही जवळच्या मित्रांनी त्यांना दवाखान्यात भरती केले. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात बालगंधर्वांच्या आजाराची बातमी छापून आली. यशवंतराव तेव्हा केंद्रात मंत्री होते. कशी कोण जाणे, पण यशवंतरावांच्या वाचनात ती बातमी आली आणि ते अस्वस्थ झाले.

मराठी रंगभूमीची बहुमोल सेवा करणाऱ्या या थोर कलाकाराला भेटण्यासाठी यशवंतराव स्वत: दवाखान्यात गेले. बालगंधर्वांची विचारपूस केली. बाहेर आल्यावर त्यांनी डॉक्टरांना विचारले, 'खर्च कोण करतंय?'

डॉक्टर म्हणाले, 'त्यांचे काही जवळचे मित्र वर्गणी काढून खर्चाचा भार उचलत आहेत.' इतक्या थोर कलावंताची अशी परवड झालेली पाहून यशवंतरावांना अपार वेदना झाल्या. त्यांनी तात्काळ मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना फोन केला व म्हणाले, 'वसंतराव, बालगंधर्वांच्या उपचारांचा सगळा खर्च राज्य सरकारतर्फे करा.'

कलेचा आस्वाद घेणारे अनेक असतात पण कलावंतांची काळजी घेणारे यशवंतरावांसारखे कला रसिक विरळाच.

# यशवंता, टांग्याला पैसे कोठून दिलेस?

यशवंतराव केंद्रात मंत्री झाल्यापासून त्यांचे वास्तव्य दिल्लीलाच होते. त्यांच्या आईचे-विठामातेचे वास्तव्य मात्र कराडलाच होते. वृद्धापकाळामुळे त्या बऱ्याचदा आजारी असायच्या. कामाच्या व्यापातून सवड काढून यशवंतराव अनेकदा, दिल्लीहून आईला भेटण्यासाठी कराडला येत असत.

एकदा आईची तब्येत जास्तच बिघडली. यशवंतरावांना निरोप मिळाल्यावर ते ताबडतोब दिल्लीहून मुंबईला आले व तेथून विख्यात सर्जन डॉ.ग्रॅण्ट यांना घेऊन कराडला आले. विठामाता अत्यवस्थ होत्या. डॉक्टरांनी त्यांना तपासले. प्रकृती चिंताजनक होती. स्मृती आणि विस्मृतीच्या सीमारेषेवर त्या रेंगाळत होत्या. यशवंतराव जवळच बसले होते. अचानक विठाईने यशवंतरावांचे हात धरले. क्षीण आवाजात त्या म्हणाल्या, 'यशवंता, टांग्याला पैसे कोठून रे दिलेस?' यशवंतरावांचे डोळे पाणावले. विठाईच्या या प्रश्नांचा अर्थ कोणालाच कळेना. थोड्या वेळाने संभाजीबाबा थोरात व यशवंतराव घराबाहेर आल्यावर संभाजीबाबांनी विचारले, 'साहेब, विठाई टांग्याच्या पैशाचे काय म्हणत होत्या?'

यशवंतराव गंभीर होऊन म्हणाले, 'संभाजीराव, अनेक वर्षांपूर्वी मी कोल्हापूरला कॉलेज शिक्षणासाठी रहात होतो. घरची अत्यंत गरीबी होती. त्यामुळे कोल्हापूरहून कराडला येताना मी मुद्दाम रात्री उशिरा येत असे. कारण टांग्याला पैसे नसायचे आणि स्टॅण्डवर उतरल्यावर सर्व सामान डोक्यावर घेऊन पायी चालत घरी जात असे. लोकांना हे दिसू नये म्हणून मी मुद्दाम अंधार पडल्यावरच कराडमध्ये पोचू या बेताने कोल्हापूरहून निघत असे. पण एकदा सामान खूपच जास्त होते. डोक्यावरून नेणे कठीण होते. म्हणून मी टांगा केला व घरी आलो. आईने दारात उभा राहिलेला टांगा पाहिला आणि काळजीने मला विचारले, 'यशवंता, टांग्याला पैसे कोठून रे दिलेस?' या आठवणीने यशवंतराव पुन्हा गंभीर झाले.

तरुणपणी यशवंतरावांची परिस्थिती हलाखीची होती. पुढे ते आमदार झाले. मंत्री झाले, मुख्यमंत्री झाले तरीही स्मृती आणि विस्मृतीच्या सीमारेषेवर असलेल्या विठाईमातेला वाटले की, कदाचित यशवंताकडे टांग्यासाठी पैसे नसतील, म्हणून हेलिकॉप्टरने कराडला आलेल्या यशवंतरावांना त्यांनी काळजीने विचारले, 'यशवंता, टांग्याला पैसे कोठून रे दिलेस?'

# तुमचा कान कसा आहे ?

१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात मेजर शिवाजीराव शेळके राजस्थान सीमेवरील एका विमानतळावर कर्तव्य बजावत होते. विमानतळावर होणारे शत्रूचे हल्ले विमानविध्वंसक तोफा डागून परतवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. शत्रूच्या एका हल्ल्यात मेजर शेळके जबर जखमी झाले. त्यांचा डावा कान कामातून गेला. यशवंतराव तेव्हा भारताचे संरक्षणमंत्री होते.

एक दिवस शेळकेंना तळावरुन हुकूम आला, 'भारताचे संरक्षणमंत्री आज अकरा वाजता तळाला भेट देतील. तसेच अकरा वाजून ५५ मिनिटांनी विमान विध्वंसक तोफेपैकी एका तोफेला भेट देतील व संरक्षण सज्जतेची पहाणी करतील. तुम्ही ठीक ११ वा. ३५ मिनिटांनी तोफ नं. ए-५ वर हजर रहा.' संरक्षणमंत्री आपल्याला कोणते प्रश्न विचारतील या विचाराने शेळके घाबरून गेले. भेटीच्या दिवशी साहेब आले. पुढे पायलट कार व त्याच्यामागे डौलदार झेंडा फडकावत एक जीप तोफेजवळ येऊन थांबली. मेजर शेळके पुढे गेले. एक लष्करी सलाम केला. साहेब खाली उतरले. मेजर कमांडर श्रीहरींनी साहेबांना शेळकेंची ओळख करून दिली. साहेबांनी हस्तांदोलन केले आणि जवळ येऊन प्रेमाने म्हणाले, 'कसं काय शेळके? तुमचा कान कसा आहे? लढाईचा अनुभव कसा काय वाटतो? सर्व जवान कसे आहेत?'

साहेबांनी अस्सल मराठीत विचारलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांनी शेळकेंच्या मनावरचा ताण दूर झाला. त्यांनी साहेबांच्या प्रश्नांना मनमोकळी उत्तरे दिली. तेथून निघताना पुन्हा एकदा मेजर शेळकेंचा हात हातात घेऊन साहेब म्हणाले, 'ठीक आहे शेळके, आम्ही चलतो, काळजी घ्या.'

# गो अहेड !

सन १९६५ साली भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले. यशवंतराव तेव्हा संरक्षणमंत्री होते. आणि पंतप्रधान होते लालबहादूर शास्त्री. वेळ फार आणीबाणीची होती. १९६२ च्या पराभवातून देश नुकताच कुठे सावरू लागला होता. अशावेळी देशवासियांचा आत्मसन्मान जपण्याची व सैन्याचे मनोबल वाढविण्याची जबाबदारी यशवंतरावांवर होती. पंतप्रधानांचा त्यांना संपूर्ण पाठिंबा होता. यशवंतराव धैर्याने व चातुर्याने युद्धाची आघाडी सांभाळत होते.

एकेदिवशी संध्याकाळी ते आपल्या कार्यालयात बसलेले असताना हवाईदलाचे व सेनादलाचे अधिकारी घाईघाईने त्यांच्याकडे आले. त्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती. ते म्हणाले, 'साहेब, काश्मिर आघाडीवर परिस्थिती गंभीर झालीय. शत्रु पुढे सरकतोय. शत्रूचा वेगही चिंताजनक आहे. शत्रूला थोपविण्याचा आता एकच मार्ग आहे, तो म्हणजे विमानातून बॉम्बफेक सुरू करणे. त्यासाठी आम्हाला तुमची व पंतप्रधानांची परवानगी हवी आहे.'

यशवंतरावांनी क्षणभर विचार केला. निर्णय घेणे तर आवश्यक होते. त्यासाठी काही मिनिटांचाच अवधी होता. पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात अर्धा तास तरी गेला असता. यशवंतराव ठाम स्वरात सेनापतींना म्हणाले, 'गो अहेड!' त्याप्रमाणे भारतीय हवाईदलाने कारवाई सुरू केली. रात्री उशिरा यशवंतराव पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींना भेटले व हवाई दलाला बॉम्बफेकीचे आदेश दिल्याचे सांगितले. शास्त्रीजी म्हणाले, 'अच्छा किया!' या प्रोत्साहनपर शब्दांनी यशवंतरावांना अर्थातच बरे वाटले. पंतप्रधानांच्या संमतीविना त्यांनी एक फार मोठा निर्णय घेतला होता आणि तो अचूक ठरला होता. यशवंतरावांना मनावरचे ओझे हलके झाल्यासारखे वाटले.

# मी वाद खेळण्यासाठी दिल्लीला गेलो नाही

सन १९६२ साली संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव दिल्लीला गेले. राजधानीत वाद-प्रतिवाद, शह-काटशह या गोष्टी नेहमीच सुरू असतात. साहेब त्यात फारसे लक्ष घालत नसत. ऊठसूठ बोलत राहणे हा त्यांचा स्वभाव नव्हता.

एकदा महाराष्ट्र काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित केले होते. त्या शिबीरात आपले मनोगत व्यक्त करताना एक कार्यकर्ता म्हणाला, 'साहेबांनी दिल्लीत चालणाऱ्या अशा वादात मागे न राहता त्यात हिरीरीनं भाग घ्यावा. आपले साहेब मागे राहतात. त्यामुळे दिल्लीत महाराष्ट्राची प्रतिमा उठून दिसत नाही.'

त्या कार्यकर्त्याचे भाषण संपेपर्यंत यशवंतराव शांतपणे बसून होते. समारोपाचं भाषण करताना पक्षाची ध्येयधोरणे, कार्यकर्त्यांकडून अपेक्षा वगैरेसंबंधी विवेचन करीत यशवंतराव शेवटी या वादाच्या मुद्यापर्यंत पोहोचले. दिल्लीतील वादांसंदर्भात साहेबांची काय भूमिका आहे हे जाणून घेण्यासाठी कार्यकर्ते सरसावून बसले. साहेब म्हणाले, 'दिल्लीला मी जो गेलो, तो वाद खेळण्यासाठी किंवा वाद वाढविण्यासाठी गेलो नाही. देशाच्या ज्येष्ठ नेत्यांनी, पं. नेहरुंनी काम करण्यासाठी मला दिल्लीला बोलावले म्हणून मी दिल्लीला गेलो. त्यांनी नेमून दिलेलं काम सर्वशक्तीनिशी व प्रामाणिकपणाने करणे हेच मी माझे कर्तव्य समजतो. याचा अर्थ वाद खेळण्याची मला माहिती नाही असा नव्हे आणि जेव्हा वाद करण्याची वेळ येईल तेव्हा 'वाद करू का' म्हणून विचारण्यासाठी आता ज्यांनी सूचना केली त्यांच्याकडे जाणार नाही हे मात्र निश्चित.'

आवाज न चढवता आणि सभ्यता न सोडता समोरच्याला गारद करण्याचे अद्‌भुत सामर्थ्य यशवंतरावांच्या वाणीत होते. या अर्थाने ते एक समर्थ भाषाप्रभूच होते.

# पु.लं. चे भाषण ऐकू द्या!

१९ जानेवारी १९६५ रोजी नांदेडला पाचवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन आयोजित केले गेले होते. अध्यक्ष होते पु.ल. देशपांडे, आणि उद्घाटक होते केंद्रीय संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण. उद्घाटन समारंभासाठी यशवंतराव आणि पु.ल. मंचावर येताच साहेबांच्या सचिवाने आयोजकांच्या कानात सांगितले, 'लवकर आटपा, साहेबांना कंधारला जाऊन तिथल्या कार्यक्रमांना उपस्थित रहायचंय.' बिचारे आयोजक नाराज झाले. त्यांचा हिरमोड झाला. खरं तर या संमेलनाच्या उद्घाटनासाठीच यशवंतराव खास दिल्लीहून आले होते. त्यांनी उद्घाटनाचे सुंदर भाषण केले. त्यानंतर पु.लं.चे अध्यक्षीय भाषण सुरू झाले. ते उत्तरोत्तर रंगत गेले. साहेब तल्लीनतेने भाषण ऐकत होते, इतक्यात त्यांचे सचिव त्यांच्याजवळ जाऊन हळूच म्हणाले, 'आपल्याला पुढे कंधारला....'

त्याचे वाक्य मध्येच तोडत साहेबांनी त्यांना खुणेनेच गप्प बसवले. त्यांच्यातला रसिक उठायला तयार नव्हता. त्या धुंद वातावरणाचा भंग करणे त्यांच्या रसिक मनाला मानवेना. ते शेवटपर्यंत बसून राहिले. तन्मयतेने ऐकत राहिले.



# नेहमी धूळ चारणाराने.....!

नांदेड येथे आयोजित केलेल्या याच पाचव्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंम्मेलनास विख्यात नाटककार आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात यशवंतरावांवर जहाल टीका करणारे आचार्य प्र.के.अत्रे देखील उपस्थित होते. उद्घाटक आणि अध्यक्षांच्या भाषणापूर्वी आचार्य अत्रे यांचे भाषण झाले. अत्र्यांचे भाषण म्हणजे हशा आणि टाळ्यांचा अनोखा संगम. शिवाय आज एकाच व्यासपीठावर दोन दिग्गज नेत्यांची भाषणे ऐकायला मिळणार याचा श्रोत्यांना आनंद झाला होता. आचार्य अत्रे आपल्या भाषणाच्या सुरुवातीला म्हणाले, 'मुंबईहून एवढा मोठा प्रवास करून मी आलो. रस्ते दगडधोंड्यांनी भरलेले. धूळ तर अवर्णनीय होती. मराठवाड्यातल्या रस्त्यांवरील धूळ खात खात इथपर्यंत येऊन पोहोचलो... यशवंतरावांच्या राज्यात रस्त्यांची ही स्थिती.....' असे म्हणून त्यांनी साहेबांकडे पाहिले. श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. त्यानंतर उद्घाटनपर भाषणासाठी साहेब उभे राहिले. हसत हसत म्हणाले, 'आचार्य अत्रेंनी धुळीची तक्रार केली, पण नेहमी दुसऱ्याला धूळ चारणाराने एकदा तरी स्वत: धूळ खावी ना!' या मार्मिक टोल्याने अत्र्यांसह सगळे श्रोते हास्याच्या कल्लोळात बुडाले.



# अन् शरद पवार आमदार झाले..!



तरुणांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातून नवे नेतृत्व पुढे आणणे हे यशवंतरावांच्या राजकारणाचे मुख्य सूत्र होते. एकदा पुण्यात एका कॉलेजमध्ये कार्यक्रमासाठी गेले असता त्यांचे लक्ष स्वागताची जबाबदारी स्वीकारलेल्या तरुण शरद पवारांकडे गेले. शरदरावांचा आत्मविश्वास व संघटनकौशल्य यांनी ते प्रभावित झाले. कार्यक्रम संपल्यावर त्यांनी अगत्याने त्यांची विचारपूस केली, त्यांना प्रोत्साहन दिले. नंतरच्या काळात राज्यातील युवक काँग्रेसची जबाबदारी यशवंतरावांनी शरद पवारांवर सोपविली.

१९६६ च्या अखेरीस विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. शरद पवारांनी अर्ज करावा असे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सुचविले. शरदरावांचीही तशी इच्छा होती, पण पुणे जिल्ह्यातील काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांचा त्यांच्या उमेदवारीला विरोध होता. 'बारामती विधानसभा मतदारसंघातून पक्षातर्फे आपल्याला उमेदवारी मिळावी' असा अर्ज शरदरावांनी पक्षाकडे केला होता. उमेदवार निवडीसाठी पक्षाच्या कार्यकारिणीची जेव्हा बैठक झाली तेव्हा बहुतेक सर्व नेत्यांनी 'या तरुणाकडे अनुभव व निवडून येण्याची क्षमता नाही म्हणून त्याला तिकीट देऊ नये', असं मत मांडलं.

या बैठकीला उपस्थित असणाऱ्या यशवंतरावांच्या मनात मात्र वेगळंच होतं. त्यांनी मनाशी निर्णय घेतला होता. विरोध करणाऱ्या काँग्रेसजनांना त्यांनी विचारले, 'या निवडणुकीत काँग्रेसला किती जागा मिळतील? निवडणुकीनंतर राज्यात काय चित्र असेल?'

कोणी म्हणाले, २८८ पैकी २०० जागा मिळतील, तर कोणी म्हणाले, २२५ जागा मिळतील. मग यशवंतराव म्हणाले, 'याचा अर्थ साठ ते सत्तर मतदारसंघात आपला पराभव होणार अशी स्थिती दिसते. या पराभवात आपण एका जागेची भर घालू व शरदला संधी देऊ.'

अशाप्रकारे शरदरावांना उमेदवारी मिळाली. यशवंतराव त्यांच्या प्रचारासाठी देखील आले. सर्वांनी मिळून प्रचार केला आणि विशेष म्हणजे त्या निवडणुकीत पुणे जिल्ह्यात सर्वाधिक मतांनी शरद पवार विजयी झाले.

# मी गाणे संपल्यावर येईन!

यशवंतराव केंद्रीय गृहमंत्री होते तेव्हाची गोष्ट. संसदेचे अधिवेशन चालू होते. पण किशोरी आमोणकर यांचे गाणे दिल्लीत कमानी ऑडिटोरियमला आयोजित केलेले आहे हे कळाल्यावर यशवंतराव बेचैन झाले. दुसऱ्या दिवशी यशवंतरावांना संसदेत खूप काम होते. उद्याच्या भाषणाची तयारी करावी की गाणे ऐकायला जावे असा प्रश्न त्यांना पडला. किशोरीताईंचे गाणे रात्री साडेदहानंतर सुरू होणार होते. मैफल ऐकण्यासाठी जावे, तर तिथून परत आल्यावर कामासाठी रात्रभर जागावे लागणार होते. शेवटी त्यांनी वेणूताईंचा सल्ला घेतला, तेव्हा वेणूताई म्हणाल्या, 'आपण असं करू, गाणे ऐकायला जाऊ आणि एक राग ऐकून परत येऊ.' साहेबांना हा विचार पटला. ते दोघे मोटारीने गाणे ऐकायला गेले. पहिला राग रात्री बाराच्या सुमारास संपला. वेणूताई जायला उठल्या. यशवंतरावांना म्हणाल्या, 'आता जाऊया का ?' साहेब म्हणाले, 'तुम्ही असं करा, तुम्ही घरी जा आणि गाडी परत पाठवून द्या. मी पूर्ण गाणे संपल्यावर येईन.' त्याप्रमाणे वेणूताई घरी गेल्या आणि मैफल संपल्यावर रात्री दीडच्या सुमारास यशवंतराव घरी आले व रात्रभर ऑफिसचे काम करीत बसले.



# आम्ही काळे झेंडेवाले!

यशवंतराव केंद्रीय मंत्री असताना बिहारमधील पाटणा शहरात एकदा त्यांची सभा होती. सभेसाठी जमलेल्या गर्दीत काही गरीब महाराष्ट्रीयन माणसे होती. त्यांना यशवंतरावांची भेट घ्यायची होती, पण पोलीस अधिकारी त्यांना भेटू देत नव्हते. डोक्यावर पागोटे असणारी काही माणसे पोलीसांशी बोलत आहेत हे स्टेजवरून यशवंतरावांनी पाहिले. त्यांनी लगेच आपले सचिव श्रीपाद डोंगरे यांना सांगितले की, त्या माणसांना भेटून त्यांची काय अडचण आहे ते मला सांगा. डोंगरे त्या माणसांना भेटले. तेव्हा त्या माणसांनी आपली अडचण सांगितली. 'आम्ही तीर्थयात्रेला इकडे आलो होतो. आमचे पैसे चोरीला गेले. पोलीसांनी चोर पकडला पण आमचे पैसे पोलीसच आम्हाला देत नाहीत. कारण पोलीसांना देण्यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत.'

डोंगरे म्हणाले, 'मी साहेबांना सांगतो.

तेव्हा ती माणसे म्हणाली, 'आम्हाला साहेबांनाच भेटायचे आहे.

डोंगरेंनी त्यांचे म्हणणे यशवंतरावांच्या कानावर घातले. सभा संपल्यावर यशवंतराव त्यांना भेटले. त्यांची अडचण ऐकली. ते लोक म्हणाले, 'साहेब, आम्हाला प्रवासासाठी पाचशे रुपये उसने द्या.'

यशवंतराव गंमतीने म्हणाले, 'पण तुम्ही कुठले ? तुमची माझी तर ओळख नाही.'

तेव्हा त्यांच्यातला एक माणूस पुढे येऊन म्हणाला, 'साहेब, तुम्ही आम्हाला ओळखत नाही, पण आम्ही तुम्हाला ओळखतो. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात तुम्ही आमच्या भागात सभेला आला होता, तेव्हा आम्ही तुम्हाला काळे झेंडे दाखवले होते!'

मराठी माणसांचा हा मुलुखावेगळा प्रामाणिकपणा पाहून यशवंतरावांना हसू फुटले. त्यांनी त्या लोकांना पाचशे रुपये दिले व पोलीसांना त्यांचे पैसे परत द्यायला सांगितले.

# 'त्या' झाडाशी आमच्या भावना गुंतलेल्या आहेत!

यशवंतराव राजकारणी होते. राजकारणी लोक सहजासहजी भावनावश होत नाहीत. शह-काटशहांच्या लढाईत भावना दुर्लक्षिल्या जातात, पण यशवंतराव नेमके याला अपवाद होते. अत्यंत संस्कारसंपन्न व संवेदनशील असे मन त्यांना लाभले होते. माणसांवर तर त्यांनी प्रेम केलेच, पण निसर्गाचे सुद्धा त्यांना आकर्षण होते. त्यांच्या हळव्या मनाची ओळख करून देणारा हा प्रसंग.

१९३२ सालच्या २६ जानेवारीस यशवंतरावांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कराडच्या टिळक हायस्कूलसमोरील एका कडुनिंबाच्या झाडावर पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार तिरंगा फडकावला व पं.नेहरूंनी लाहोर काँग्रेसमध्ये सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्यदिन साजरा केला. 'वंदे मातरम'च्या घोषणा दिल्या. या कृत्याबद्दल इंग्रज सरकारने त्यांना अटक केली व अठरा महिने तुरूंगवासाची शिक्षा दिली. पुढे स्वातंत्र्याची चळवळ वाढतच राहिली. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. यशवंतराव मंत्री झाले. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व यशवंतराव राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले.

पुढे देशाचे गृहमंत्री असताना १९६७ साली एका कार्यक्रमासाठी ते टिळक हायस्कूलमध्ये आले होते. त्यावेळी भाषण करताना ते म्हणाले, 'या समोरच्या लिंबाच्या झाडावर आम्ही मुलांनी तिरंगा फडकावला होता. त्या झाडाकडे पाहिल्यावर मला स्वातंत्र्यचळवळीचे ते रोमहर्षक दिवस आठवतात. शाळा चालकांना माझी विनंती आहे की, कृपया ते झाड पाडू नका. त्या झाडाशी आमच्या भावना गुंतलेल्या आहेत.'

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी...' हा संत तुकारामांचा अभंग आळविणारे अनेकजण आहेत, पण साहेब तो अभंग प्रत्यक्ष जगत होते.

# ज्ञानेश्वरांच्या नावानेच कॉलेज निघाले पाहिजे !



१९६७ ची गोष्ट. यशवंतराव केंद्रीय गृहमंत्री होते. एकदा नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना नेवासे येथे एका कार्यक्रमासाठी ते आले होते. त्यावेळी यशवंतराव गडाख नेवासा पंचायत समितीचे सभापती होते. नेवाशात महाविद्यालय काढायचे ठरले होते. या संदर्भात नेवाशाला ज्ञानेश्वर मंदिरातच एक बैठक आयोजित केली होती. बैठकीला यशवंतराव, आण्णासाहेब शिंदे व इतर नेते उपस्थित होते. कॉलेजसाठी जागा, इमारत, मंजूरी इत्यादी विषयांवर चर्चा झाल्यावर शेवटी कॉलेजला कोणाचे नाव द्यायचे हा प्रश्न चर्चेला आला. जो कोणी सर्वाधिक देणगी देईल त्याचे नाव कॉलेजला द्यावे असे कोणीतरी सुचवताच यशवंतराव तात्काळ म्हणाले, 'कुणी कितीही पैसे दिले तरी, इथे ज्ञानेश्वरांच्या नावानेच कॉलेज निघाले पाहिजे.' या कॉलेजसाठी व्यक्तिगत एक हजार रुपयांची देणगीही त्यांनी लगेच दिली.

यशवंतरावांचा पुढचा कार्यक्रम श्रीरामपूरला होता. तिथे आण्णासाहेब शिंदे यांनी डाकले यांना महाविद्यालयास एक लाख रुपयांची देणगी देण्याची गळ घातली. नाव देता येणार नाही हेही स्पष्ट केले. नेवाशातील बैठकीचा वृत्तांतही सांगितला. डाकले यांनीही उदार मनाने एक लाखाची देणगी दिली. नेवासा इथे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सुरू झाले.

संतपरंपरेविषयी यशवंतरावांना अपार आदर होता. म्हणूनच मराठी मनाची मशागत करणाऱ्या संतांविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याची ही संधी त्यांनी दवडली नाही.

# कसोटीला उतरणारा वक्ता

१९६८ सालची गोष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे अनंतराव कुलकर्णी यांनी कवी यशवंतांनी लिहिलेले 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य पुण्यात प्रकाशित करायचं ठरवलं. बालगंधर्व रंगमंदिरात यशवंतरावांच्या शुभहस्ते प्रकाशनाचा कार्यक्रम होणार होता. या सोहळ्यासाठी अनेक मान्यवर व नामांकित वक्ते उपस्थित होते. व्यासपीठावर कुसुमाग्रज, वि. स. खांडेकर, कवी यशवंत आणि अध्यक्ष म्हणून यशवंतराव बसले होते, तर प्रेक्षकांत पहिल्या रांगेत पु. ल. देशपांडे, ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, द. र. कवठेकर असे भाषाप्रभू बसले होते.

'छत्रपती शिवराय' या महाकाव्याबद्दल कुसुमाग्रज फारच छान बोलले. त्याअगोदर वि. स. खांडेकरांचेही अत्यंत दुर्मिळ संदर्भ देणारं रंगतदार भाषण झालं होतं. शेवटी अध्यक्ष म्हणून यशवंतराव काय बोलतात याची उत्सुकता श्रोत्यांमध्ये शिगेला पोचली. एका अर्थाने ती यशवंतरावांच्या वक्तृत्वाची कसोटीच होती.

यशवंतराव बोलायला उठले. सभागृहात स्तब्धता पसरली. नेहमीचे सर्व प्रास्ताविक आपल्या ऐटदार ढंगात करून यशवंतराव म्हणाले, *'मैतरणी बिगी बिगी चाल'* असं म्हणत महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात भटकणारे रांगडे कवी यशवंत, आज शिवप्रभूंच्यावर हे समर्थ महाकाव्य रचून महाकवींच्या दालनात जाऊन बसलेत, याचा त्यांचा एक चाहता म्हणून मला अतिशय आनंद होत आहे.'

त्यांच्या या सहज, रास्त व पल्लेदार वाक्याने सलामीलाच टाळ्या घेतल्या. ती सुरुवातच अगदी अनपेक्षित होती. *'न्याहरीचा वकुत व्हईल, मैतरणी बिगी बिगी चाल'* या कवी यशवंतांच्याच एका गाजलेल्या जुन्या गीताची आठवण त्यांनी रसिकांना करून दिली व श्रोत्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद लाभला. आपल्या जवळजवळ विस्मृतीत गेलेल्या गीताचा एवढा वाजवी व रोकडा प्रत्यय प्रत्यक्ष यशवंतरावांनी दिलेला पाहून कवी यशवंतांनी सद्गदित होऊन चष्मा काढून आपले डोळे पुसले. यशवंतरावांनी ती कसोटीची सभा सहज जिंकली.

# तुमच्यासाठी एवढे तरी करू द्या!

क्रांतिसिंह नाना पाटील हे थोर देशभक्त आणि महान समाजसुधारक होते. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीमध्ये प्रतिसरकारची स्थापना करून त्यांनी इंग्रज सरकारला जेरीस आणले होते. यशवंतराव आणि नाना पाटील हे दोघेही सातारा जिल्ह्यातलेच होते, पण स्वातंत्र्यानंतर त्यांचे मार्ग बदलले. यशवंतराव काँग्रेसमध्ये राहिले व मुख्यमंत्री झाले तर नाना पाटील कम्युनिस्ट पक्षात गेले व अखेरपर्यंत कष्टकऱ्यांच्या लढ्याचे नेतृत्व करीत राहिले. १९५७ ते १९६२ व नंतर १९६७ ते १९७१ पर्यंत अशी एकूण ९ वर्षे नाना पाटील लोकसभेचे सदस्य होते. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात यशवंतराव केंद्रीय गृहमंत्री होते.

नाना पाटील दिल्लीत असल्यावर, यशवंतराव त्यांची अधूनमधून भेट घेत असत. पंतप्रधान इंदिरा गांधींनी लोकसभा बरखास्त करण्याचा निर्णय घेतल्यामुळे १९७२ ऐवजी १९७१ लाच मुदतपूर्व निवडणुका जाहीर झाल्या. त्या काळात एके दिवशी लोकसभेचे कामकाज संपल्यावर आण्णांना (क्रांतीसिंहांना) आगाऊ निरोप पाठवून यशवंतराव त्यांच्या भेटीला गेले. गप्पांच्या ओघात यशवंतराव म्हणाले, 'आण्णा, तुम्ही गोरगरीब जनतेसाठी आणि देशासाठी अहोरात्र केलेले काम अलौकिक असेच आहे. त्याची बरोबरी कोणीही करू शकणार नाही. वेणूताई तुमची नेहमी आठवण काढते. तुम्हाला भेटण्याची व तुमचे दर्शन घेण्याची तिची इच्छा आहे. तुम्ही एकदा तरी आमच्या घरी आले पाहिजे.' त्याप्रमाणे क्रांतिसिंह दिल्लीतील यशवंतरावांच्या घरी गेले. वेणूताईंनी व यशवंतरावांनी त्यांचे अगत्यपूर्वक स्वागत केले. त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. क्रांतीसिंह तेव्हा मधुमेहाने आजारी होते व आर्थिक व कौटुंबिकदृष्ट्या ते अगदी एकाकी बनले होते. बोलता बोलता यशवंतराव म्हणाले, 'आण्णा, भारत देशाचे तुम्ही थोर स्वातंत्र्यसैनिक आहात. भारत सरकार तुम्हाला स्वातंत्र्यसैनिकाचे मानधन द्यायला तयार आहे. ते आपण घ्यावे अशी माझी नम्र विनंती आहे. तुमच्यासाठी एवढे तरी करण्याची संधी मला द्या.' वेणूताईंनीही क्रांतिसिंहांना मानधन स्वीकारण्याची विनंती केली. क्रांतिसिंहांनी हसत मौन पाळले. त्यांचे मौन म्हणजेच होकार असे समजून तेवढ्या एका आधारावर कसल्याही फॉर्मवर सही न घेता त्यांनी भारत सरकारच्या वतीने क्रांतिसिंहांना दरमहा पाचशे रुपये मानधन सुरू केले.

शेवटी कृष्णेकाठी वाढलेले हे दोन थोर नेते यमुनेकाठी असतानाही एकमेकांना विसरले नाहीत.

# प्रसंगी अखंडित वाचीत जावे!

डॉ.माधव गोडबोले हे भारतीय प्रशासन सेवेतील एक बुद्धिमान अधिकारी होते. त्यांनी प्रशासकीय सेवेचा राजीनामा दिला असून सध्या ते सामाजिक व राजकीय विषयांवर उद्‌बोधक लेखन करीत असतात. प्रशासनात काम करीत असताना यशवंतरावांचे खाजगी सचिव म्हणून काम करण्याची संधी त्यांना लाभली होती. दररोज रात्री आठ वाजता गोडबोले सगळ्या फाईली पेटीत घालून ती पेटी यशवंतरावांच्या निवासस्थानी स्वाक्षरीसाठी पाठवत असत. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजण्यापूर्वी त्या फाईली योग्य त्या शेऱ्यांसह गोडबोले यांच्या टेबलावर परत येत असत. यशवंतराव रात्री अकरानंतर सलग २-३ तास काम करीत असत. एखाद्या महत्त्वाच्या फाईलसंबंधी अधिक चर्चा करायची असेल, तर ती फाईल ते ठेवून घ्यायचे. फाईलींचा तातडीने निपटारा करणे ही यशवंतरावांची सवय होती. त्यांचे ऑफीस मधील टेबल नेहमी स्वच्छ व चकचकीत असे. भेटीसाठी लोक आलेले नसतील, तेव्हा ते एखादे चरित्र अगर कादंबरी वाचत बसायचे.

एके दिवशी सकाळी आठ वाजून गेले तरी साहेबांकडून फाईली परत आल्या नाहीत. असे कधी होत नसे. गोडबोलेंना वाटले, बहुतेक यशवंतरावांची तब्येत बरी नसेल. त्यांनी यशवंतरावांचे स्वीय सहाय्यक डोंगरेंकडे चौकशी केली. डोंगरे म्हणाले, 'साहेब ठीक आहेत.' तरीही यशवंतराव ऑफिसात आल्यावर गोडबोले म्हणाले, 'साहेब, तुमची तब्येत ठीक आहे ना?' यशवंतरावांना हा प्रश्न अनपेक्षित होता. ते म्हणाले, 'ठीक आहे, पण असे का विचारताय?' 'काही नाही, रात्री सहीसाठी पाठविलेल्या फाईली सकाळी परत आल्या नाहीत म्हणून विचारलं!'

गोडबोलेंच्या प्रश्नाचा रोख लक्षात आल्यावर यशवंतराव हसून म्हणाले, 'प्रसिद्ध लेखक ना.सी. फडके यांनी त्यांचे आत्मचरित्र मला पाठवले आहे आणि त्यांना माझी प्रतिक्रिया हवी आहे. रात्री जेवणानंतर मी ते वाचायला सुरुवात केली आणि त्यात इतका रंगून गेलो की पहाटे पाच वाजता ते वाचून संपले, तेव्हा फिरायला जाण्याची वेळ झाली होती ! त्यामुळे फाईली पहायचे राहूनच गेले.' दिवसभराच्या श्रमाने थकून विश्रांती घेण्याऐवजी अख्खी रात्र जागून वाचन करणारे यशवंतराव एक श्रेष्ठ वाचक होते.

# मला घाई झालेली नाही!

सन १९६९ सालचे काँग्रेसचे बंगळूर अधिवेशन गाजले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे मोरारजी देसाई, स. का. पाटील, अतुल्य घोष, निजलिंगप्पा इत्यादींशी तीव्र मतभेद झाले. काँग्रेस पक्षात फूट पडली. 'इंडिकेट' व 'सिंडीकेट' अशी काँग्रेसची दोन शकले झाली. त्यानंतर काही दिवसांनी राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत संजीव रेड्डी हे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार होते. पण इंदिरा गांधींनी त्यांचा पराभव करून ग्यानी झैलसिंग यांना निवडून आणले. मग त्यांनी मोरारजींचे अर्थखाते काढून घेतले. यशवंतरावांनी आणि महाराष्ट्र काँग्रेसने निवडणुकीत रेड्डींना पाठिंबा दिला होता. हा राग मनात धरून इंदिरा गांधींनी यशवंतरावांच्या खात्यातील काही विभाग काढून घेतले व पुढे तर त्यांचे खातेच बदलले. अशा वातावरणात सिंडीकेटने यशवंतरावांना ऑफर दिली की त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारण्यास संमती द्यावी. इंदिरा गांधींच्या जागी त्यांना पंतप्रधानपदी बसविण्यास सिंडीकेट काँग्रेसची नेतेमंडळी तयार आहेत. यशवंतरावांच्या काही निकटवर्तीयांकडून यासाठी थोडाफार दबावही आणण्यात आला. पण यशवंतराव आपल्या सहकाऱ्यांना ठामपणे म्हणाले, 'उजव्या विचारसरणीच्या लोकांच्या पाठिंब्यावर मला या देशाचे पंतप्रधान व्हायचे नाही. ही मंडळी आज वर चढवतील आणि थोड्या दिवसांनी खाली ओढतील. मला पंतप्रधानपदाची घाई झालेली नाही. व्यक्तिगत मोठेपणापेक्षा देशाच्या भल्याच्या विचाराला आपण प्राधान्य देतो.'

यशवंतरावांच्या या भूमिकेमुळे अनेकांना आश्चर्य वाटले. काहीजणांनी 'साहेब कचखाऊ आहेत' अशी टीकाही केली. यशवंतरावांचे मित्र व पत्रकार अनंतराव कुलकर्णी यांनी त्यांना लोकांची ही प्रतिक्रिया सांगितली तेव्हा ते म्हणाले, 'पंतप्रधानपद आपसात भांडून मिळविले तर हा देश नीट चालविणे अशक्य होईल. विरोधकांना काँग्रेसमध्ये फूट हवी आहे. मी माझ्या हाताने फूट पडू देणार नाही. औट घटकेच्या पंतप्रधानपदाची मला हौस नाही. माझ्यावर सोपविलेल्या खात्याची जबाबदारी मी उत्तम रितीने पार पाडत आहे. त्यात मला समाधान आहे.'

# बाळ वाढतंय याचा आनंद आहे !

यशवंतराव केंद्रात अर्थमंत्री असताना पुण्यातील शनिवारवाड्यासमोर एकदा त्यांची सभा होती. त्यावेळी देशात महागाई वाढली होती आणि नेहमीप्रमाणे लोक त्यासाठी अर्थमंत्र्यांना जबाबदार धरत होते. यशवंतरावांचे भाषण चालू असताना व्यासपीठावर बसलेले एक पुणेकर खोचकपणे म्हणाले, 'वाढत्या महागाईवर बोला.'

यशवंतराव म्हणाले, 'हो..., मी बोलतो.'

पुढे ते भाषणात म्हणाले, 'महागाई वाढल्यामुळे सामान्य माणसाला झळ बसते हे खरे आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत अधिक भांडवली गुंतवणूक केली व समाजाच्या हातामध्ये अधिक रक्कम गेली की क्रयशक्ती वाढते व त्यामुळे आवश्यक वस्तूंची मागणी वाढते. पण त्या वस्तूची कमतरता असेल तर तिची किंमत वाढते. आपण एक उदाहरण घेऊ. नुकतंच लग्न झालेलं एक जोडपं होतं. लग्नाला पाच-सहा वर्षे झाली तरी त्यांच्या घरात पाळणा हलला नाही. नवससायास झाले. कर्मधर्मसंयोगाने त्या माऊलीला दिवस गेले आणि वर्षभरातच घरामध्ये एक गोंडस बाळ आलं. सर्वांना आनंद झाला. बघता बघता एक वर्ष निघून गेलं. आपल्या बाळाचा पहिला वाढदिवस साजरा करायचा असं दोघांनी ठरवलं. पण घरात तर पैसे नव्हते. मग त्या शेतकऱ्याच्या बायकोने गळ्यातील मंगळसूत्रामध्ये असलेला सोन्याचा एक लहान तुकडा मोडला व बाळासाठी एक सिल्कचं (रेशमी) झबलं घेतलं. घरात गोडधोड करून त्यांनी बाळाचा वाढदिवस साजरा केला. गरीबी तर होतीच. मग तिने ते कपडे पेटीत जपून ठेवले. पुढच्या वर्षी उपयोगाला येतील म्हणून. एका वर्षानंतर बाळाचा दुसरा वाढदिवस आला. नवरा म्हणाला, 'आता आपल्याकडं मोडायला काही नाही. तू गेल्यावर्षी पेटीत ठेवलेलं झबलं काढ. तेच बाळाला घालूया.' त्याप्रमाणे बायकोने पेटीतून झबलं काढलं, पण बाळाचं अंग त्यात मावेना. शेतकरी नाराज झाला, पण बायको मात्र खूश झाली. ती म्हणाली, 'हे झबलं बाळाला बसत नाही, याचं मला दु:ख नाही. बाळाच अंग वाढतंय, याचा मला आनंद आहे.' हे उदाहरण सांगून यशवंतराव पुढे म्हणाले, 'देशाच्या अर्थव्यवस्थेतसुद्धा असंच होत असतं. भांडवली गुंतवणूक जास्त प्रमाणात केल्यावर त्यासोबत काही गोष्टी येत असतात. पण त्याची चिंता समाजाने करायची नसते.'

या चपलख उदाहरणाने प्रश्नकर्ता व समोर बसलेल्या पुणेकरांचे समाधान झाले.

# बघू या काय करता येईल!

साहेब केंद्रीय अर्थमंत्री असताना एका कार्यक्रमासाठी पुण्यात आले होते. त्याच कार्यक्रमात अर्थतज्ज्ञ डॉ. वि.म. दांडेकर हेदेखील उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर कठोर टीका केली. केंद्र सरकारमधील अर्थमंत्र्यांच्या उपस्थितीत अशी टीका करणे अनुचित आणि औचित्याला सोडून होते. कारण तो कार्यक्रमाचा विषय नव्हता. दांडेकरांच्या या अनपेक्षित टीकेमुळे वातावरणात काहीसा तणाव निर्माण झाला. यशवंतरावांनाही वाईट वाटले, पण त्यांनी संयमपूर्वक दांडेकरांनी उपस्थित केलेल्या शक्य त्या मुद्द्यांची उत्तरे दिली. कार्यक्रम संपला. यशवंतराव दिल्लीला गेले. पुढे काही महिन्यांनी दांडेकरांच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेपुढे काही प्रश्न निर्माण झाले. संस्था अडचणीत आली. अर्थमंत्री या नात्याने हे प्रश्न सोडविणे यशवंतरावांच्या हातात होते. पण नुकतीच त्यांच्यावर उघड टीका केल्यामुळे दांडेकरांना साहेबांकडे जावेसे वाटेना. शेवटी ते साहेबांचे व त्यांचेही मित्र असलेल्या पत्रकार गोविंद तळवलकरांकडे गेले. आपली अडचण सांगितली, व म्हणाले, 'पुण्याच्या सभेत माझ्याकडून जरा जास्तच टीका झाली. आता ही अडचण आमच्यासमोर आहे. यशवंतरावांकडे कसा जाऊ?'

तळवलकर म्हणाले, 'काम तुमचे नाही तर तुमच्या संस्थेचे आहे. यशवंतराव ते निश्चितपणे करतील.'

असे म्हणून तळवलकरांनी साहेबांना फोन लावला. दांडेकरांच्या संस्थेचे काम आहे म्हणून सांगितले. यशवंतराव फोनवर म्हणाले, 'दांडेकरांना संकोच करण्याचे काही कारण नाही. त्यांना म्हणावे दिल्लीला या. आपण बघूया, काय करता येईल ते.'

याप्रमाणे दांडेकर दिल्लीला गेले. संस्थेपुढील अडचण चुटकीसरशी दूर झाली. स्वतः दांडेकर कृतज्ञतेने अनेकांना हा प्रसंग सांगत व म्हणत, 'यशवंतराव माझ्याशी सूडबुद्धीने वागले नाहीत.'

# कोंडी तोडणे हेच आपले काम!

'नवाकाळ' चे संपादक नीळकंठ खाडीलकर यांनी सांगितलेली ही आठवण. आपल्या वृत्तपत्राच्या अधिक प्रती छापता याव्यात म्हणून खाडिलकरांनी नवीन रोटरी मशीन विकत घ्यायचे ठरवले. पण हे मशीन जर्मनीहून मागवायचे असेल तर केंद्र सरकारचा परवाना आवश्यक होता. त्यासाठीचा अर्ज घेऊन खाडिलकर दिल्लीला गेले. संबंधित अधिकाऱ्याला तो अर्ज दिला. अधिकारी म्हणाला, 'तुमचा सध्याचा खप दहा हजारच आहे. तुम्ही अजून एक फ्लॅटबेड मशीनच घ्या.'

खाडिलकर म्हणाले, 'आमच्याकडे रोटरी मशीन नाही, म्हणून आमचा खप दहा हजार आहे. पण मशीन आल्यावर आमचा खप वाढेल.' अधिकाऱ्याला हे उत्तर पटेना. खाडिलकरांचा आत्मविश्वास त्यांना अनाठायी वाटला. ते म्हणाले, 'तुम्ही अर्ज करा, पण मी तो मंजूर करणार नाही.' खाडिलकरांचा हिरमोड झाला. त्यांनी अर्ज दिला व दुसऱ्या दिवशी सकाळी यशवंतरावांना फोन लावला. साहेब तेव्हा केंद्र सरकारमध्ये अर्थमंत्री होते. खाडिलकर फोनवर म्हणाले, 'यशवंतरावजी, मी फार अडचणीत आहे. मला तुम्ही पंधरा मिनिटे वेळ द्याल का?'

'जरुर, जरुर! आत्ताच या, मी आहे तास दीड तास!'

खाडिलकर साहेबांच्या दिल्लीतील घरी गेले. साहेबांचे सचिव श्रीपाद डोंगरे बाहेरच होते. ते म्हणाले, 'या, पाचच मिनिटांत तुम्हाला साहेबांकडे नेतो. त्यांनी मला तसे सांगून ठेवले आहे.' थोड्याच वेळात खाडिलकर आत गेले. मोठ्या कष्टाने त्यांनी अश्रू आवरले आणि सर्व हकिकत सांगितली. पुढे म्हणाले, 'शाळा-कॉलेजमधील स्कॉलरचे करियर सोडून मी पत्रकारितेत आलो आहे. जगायचे असेल तर, चांगल्या खपाच्या वृत्तपत्राचा प्रमुख म्हणून जगायचे असा माझा निर्धार आहे. यामध्ये माझा सर्वनाश झाला तरी मला चालेल. या अधिकाऱ्याने त्याची काळजी का करावी?'

यशवंतराव शांतपणे ऐकत होते. खाडिलकरांचे बोलणे थांबल्यावर त्यांनी काही मिनिटे विचार केला व कोणाला तरी फोन लावला. फोनवर साहेब म्हणत होते, 'ही अशी कोंडी आहे. त्या अधिकाऱ्याचे म्हणणे त्याच्यापरीने ठीक असेलही, पण एका बुद्धिमान आणि

धाडसी तरुणाची अशी कोंडी झालेली मला चालणार नाही. शिवाय हा मुलगा त्याच्या सर्वनाशालाही तयार आहे. मग त्याला अडथळा का करायचा? आपल्या समाजात ही अशीच कोंडी आहे. ती कोंडी फोडणे हेच आपले काम. कृतज्ञता तर आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत.' मग फोन ठेवून साहेब खाडिलकरांना म्हणाले, 'यंग मॅन, गो अहेड. आजच दुपारी बारा वाजता जा आणि त्या अधिकाऱ्याला भेट.'

त्याप्रमाणे दुपारी खाडिलकर पुन्हा त्या अधिकाऱ्याला भेटले. तो म्हणाला, 'मी तुमचा अर्ज मंजूर करेन पण मला ठराविक रक्कम द्यावी लागेल.' खाडिलकरांचा चेहरा पडला. लाच देणे त्यांच्या तत्त्वात बसत नव्हते. दुसऱ्या दिवशी पुन्हा ते साहेबांकडे गेले. साहेबांनी सगळी हकिकत ऐकली व म्हणाले, 'गो अहेड ! काही कोणाला द्यायचे नाही. दोन तीन दिवस थांब आणि परवाना घेऊनच मुंबईला जा.'

तिसऱ्या दिवशी खाडिलकरांना डोंगरेंचा फोन आला. 'तुमचा परवाना तयार आहे. ऑफिसमध्ये जाऊन ताब्यात घ्या.'



# 'हा मुलगा तुम्ही आमच्यासाठी द्या..!'

यशवंतराच चव्हाण आणि शरद पवार या महाराष्ट्राच्या दोन महान नेत्यांमध्ये आढळून येणारे समान वैशिष्ट्य कोणते? तर दोघांनाही महाराष्ट्राची जनता 'साहेब' म्हणून ओळखते हे तर आहेच; पण दोघांनीही निवडणुकीमध्ये आपल्या पक्षासाठी आपल्या थोरल्या बंधूंच्या विरोधात काम केले होते हे ते वैशिष्ट्य होय! पवार साहेबांचे कुटुंब खरंतर शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांचे होते. अपवाद फक्त शरदरावांचा. त्यांना पहिल्यापासूनच काँग्रेसपक्षाचे आकर्षण होते. त्यांनी मनोमन यशवंतरावांना आपले नेते मानले होते.

सन १९५९ साली केशवराव जेधेंचे निधन झाल्यामुळे विधानसभेच्या एका जागेसाठी पोटनिवडणूक झाली. काँग्रेसने केशवरावांचे पुत्र गुलाबराव जेधे यांना उमेदवारी दिली तर शेतकरी कामगार पक्षाने पवारसाहेबांचे ज्येष्ठ बंधू ॲड. वसंतराव पवार यांना उमेदवारी दिली. शरदरावांसमोर मोठाच पेच निर्माण झाला. पक्षाचे काम करावे की भावाचा प्रचार करावा? असा प्रश्न त्यांना पडला. शेवटी त्यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार करावयाचे ठरविले. आपल्या बंधूच्या विरोधात काम करण्यासाठी लागणारे उच्चकोटीचे मनोधैर्य त्यांनी प्रकट केले. हा विरोध अर्थातच तात्त्विक होता आणि याचा त्या दोघा बंधूंच्या परस्परसंबंधांवर काहीही परिणाम झाला नाही. पण शरदरावांच्या या पक्षनिष्ठेमुळे यशवंतराव खूपच प्रभावित झाले. पुढे काही वर्षांनी शरदरावांनी बारामतीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एक शिबीर आयोजित केले. यशवंतराव तेव्हा संरक्षणमंत्री होते. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्रात ते आले असताना शरदरावांनी त्यांची भेट घेऊन शिबीराची माहिती दिली व म्हणाले, 'तुम्ही या शिबीरास संबोधित करावे अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे.'

यशवंतरावांनी हे निमंत्रण स्वीकारले व शरदरावांच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, 'मी आनंदाने येईन. तुम्ही तयारी सुरू करा.' यशवंतरावांनी आपला शब्द पाळला. एका छोट्याशा गावातल्या शिबीरासाठी ते दिल्लीहून आले. दिवसभर मुलांसोबत रमले. त्यांच्यासोबत आबासाहेब निंबाळकर व विनायकराव पाटील हेही होते. शिबीर संपल्यानंतर सर्वजण शरदरावांच्या घरी गेले. आबासाहेब निंबाळकर साहेबांना म्हणाले, 'या मुलामध्ये मला स्पार्क दिसतोय. तुम्ही त्याच्याकडे लक्ष ठेवले पाहिजे.'

यशवंतराव म्हणाले, 'त्यासाठी तर मी आलोय. मला सगळं दिसतंय.' आणि शरदरावांच्या

वडिलांना म्हणाले, 'तुमचे सगळे घराणे सत्यशोक चळवळीमध्ये गेले आहे. हा मुलगा तुम्ही आमच्यासाठी द्या.' यावर शरदरावांच्या मातोश्री शारदाबाई म्हणाल्या, 'त्याचा निर्णय त्यानेच घ्यायचा आहे. पहिल्यापासूनच तो तुमच्या विचारांचा आहे.' शरदरावांचा निर्णय तर अगोदरच झालेला होता. पुढे काही दिवसांनी यशवंतरावांनी युवक काँग्रेसची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील 'शरदयुग' सुरू झाले.

यशवंतरावांची माणसांची पारख किती अचूक होती याचे हे मूर्तीमंत उदाहरण होय



# गैरसमज वेळीच दूर करावा!

दिल्लीतील मराठी पत्रकारांना यशवंतरावांचा मोठा आधार वाटायचा. अनेक पत्रकारांचे साहेबांशी जिव्हाळ्याचे नाते होते. अनंतराव पाटील अशांपैकीच एक पत्रकार होते. एकदा त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींसंबंधी दोन लेख लिहिले. त्या लेखासंबंधी महाराष्ट्रातील एका खासदाराने इंदिराजींकडे चुकीचा अहवाल दिला, आणि यामागे यशवंतरावांची प्रेरणा असावी असेही त्यांना सांगितले. सेंट्रल हॉलमध्ये यावर बरीच चर्चा झाली. काही लोकांनी अनंतरावांना विचारले, 'मॅडमबद्दल तू काय लिहिलेस ?'

ते म्हणाले, 'काही विशेष किंवा गैर लिहिलेले नाही.' त्यांनी या चर्चेकडे एकप्रकारे दुर्लक्षच केले. एके दिवशी यशवंतरावांनी त्यांना आपल्या ऑफिसात बोलावून घेतले आणि विचारले, 'पंतप्रधानांची भेट घेऊन तुम्ही त्यांचा गैरसमज दूर का करीत नाही ?'

मग अनंतराव इंदिराजींना भेटले. त्या हसून म्हणाल्या, 'तुमच्या मराठी लेखाचे इंग्रजी भाषांतर करून माझ्याकडे कुणीतरी मराठी खासदाराने पाठविले आहे. पण मी दोन्हीही भाषेतील लेख वाचलेले नाहीत. त्यामुळे गैरसमजाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तुम्ही संपादक आहात आणि कुणाचे चारित्र्यहनन होईल असे लिहू नये, एवढीच माझी अपेक्षा आहे.'

पंतप्रधानांचे आभार मानून अनंतराव थेट यशवंतरावांच्या कचेरीत गेले. त्यांना वृत्तांत सांगितला. यशवंतरावांना बरे वाटले. ते म्हणाले, 'हितशत्रू अफवा उठवतात आणि गैरसमज पसरवितात. आपण दुर्लक्ष केले की लोकांना त्या अफवा खऱ्या वाटू लागतात, म्हणून आपली सत्य बाजू वेळीच समजावून सांगितली पाहिजे.'

# यांचं अन्न खाल्लंय, विसरणार कसे?

यशवंतरावांचे जवळचे मित्र पत्रकार रामभाऊ जोशी यांनी सांगितलेली ही आठवण. यशवंतराव तेव्हा केंद्रात मंत्री होते. त्यांचा कोल्हापूर दौरा चालू होता. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर रात्री विश्रामगृहात मुक्काम करून, सकाळी सहा वाजता विमानाने मुंबईला जायचे आणि तेथून दिल्लीस प्रयाण करायचे असे दौऱ्याचे नियोजन होते. या दौऱ्यात रामभाऊ त्यांच्या बरोबर होते. सकाळी सहाच्या विमानाने जायचे असल्याने यशवंतरावांचे स्वीय सहाय्यक डोंगरे व रामभाऊ यांची उजाडल्याबरोबर लगबग सुरू झाली. यशवंतराव सव्वापाच वाजता तयार होऊन बाहेर आले. सामान मोटारीत गेले. सर्वजण व्हरांड्यात आले. गाडी पोर्चमध्ये उभी होती. व्हरांड्याच्या पायऱ्या उतरत असताना मोटारीच्या पलिकडे झाडाखाली दोन खेडूत उभे असल्याचे यशवंतरावांना दिसले. खांद्यावर घोंगडे असलेली माणसे पाहून यशवंतराव थबकले. त्यांनी त्या दोघांना क्षणभर निरखून पाहिले, आणि मग त्यांना नावानिशी हाक मारली. हाक ऐकताच दोघेही समोर आले. नमस्कार केला. 'अरे, इतक्या सकाळी तुम्ही इथे कसे?' यशवंतरावांनी विचारले. 'या, आत या' म्हणत त्यांच्यासह ते आत येऊन बसले. दोघांच्याही कुटुंबाची चौकशी केली. 'मुलं काय करतात?' यशवंतरावांनी विचारले. 'त्यासाठीच तर आलोय' एकजण म्हणाला. 'आमची दोघांची मुलं सात बुकं शिकलीत. शेतात कामाला जायला टाळत्यात. त्यास्नी कुठंतरी चिकटवा म्हणून सांगायला आलोय. पोरं हिंडत राहिली तर जगायचं कसं?'

यशवंतरावांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि मग ते डोंगरेंना म्हणाले, 'या दोघांचे नाव-पत्ते आणि त्यांच्या मुलांची नावे लिहून घ्या. त्या दोघांना 'काय करता येईल ते पाहतो' असं म्हणून यशवंतराव जाण्यासाठी उठले. मोटारीत बसल्यावर रामभाऊ जोशी साहेबांना म्हणाले, 'कोण कुठले ते खेडूत, पण त्या दोघांची, त्यांच्या बायकामुलांची नावे घेऊन तुम्ही चौकशी केली, हे कसे काय?' साहेब हसले. म्हणाले, 'त्याचं काय आहे, भूमिगत असताना आम्ही दऱ्याखोऱ्यात, शेतातील पिकांत लपून रहात होतो. ज्यांच्या शेतात आमचा ठिय्या असायचा तो शेतकरी आमचा मित्र बनायचा. कुठं लपून

रहायचं याची माहिती तो देत असे. त्याची बायको घरातून भाकरी आणून गुपचूप द्यायची. या शेतकरी मित्राला काही चाहूल लागली तर आम्हाला निघून जाण्याचा इशारा मिळायचा. अहो, आम्ही यांचं अन्न खाल्लयं, यांना विसरणार कसे?'

त्यानंतर दोन-तीन महिने असेच निघून गेले. एकदा रामभाऊंनी डोंगरेंना (साहेबांचे निजी सचिव) सहज विचारले, 'साहेबांनी कोल्हापूरच्या मुक्कामात भल्या सकाळी त्या दोन शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाचे काय झाले?' डोंगरे म्हणाले, 'ती दोन्ही तरुण मुले तगडी आणि उंचीपुरी असल्याने पोलीसात भरती झाली आहेत.'

असे होते यशवंतराव...! केलेली मदत न विसरणारे! दिलेला शब्द न बदलणारे !!



# ते तुझे नोकर नाहीत!

यशवंतरावांनी कुटुंब आणि राजकारण यांच्यात उत्तम संतुलन साधले होते. आपल्या कुटुंबियांसाठी त्यांनी राजकारण राबवले नाही. ते दिल्लीत असताना त्यांचे अनेक नातेवाईक त्यांच्याकडे रहायला जात असत. पण यशवंतरावांनी त्यांना सरकारी कामकाजात कधीच हस्तक्षेप करू दिला नाही. आपल्याबरोबर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा, अगदी निजी सहाय्यकाचाही योग्य तो मान कुटुंबियांनी राखलाच पाहिजे असा त्यांचा दंडक होता. पायाला अपघात झाला म्हणून एकदा यशवंतरावांचा एक पुतण्या दिल्लीत दोन-तीन महिने त्यांच्या घरी राहण्यासाठी आला होता. एकदा ऑफिसमध्ये त्याच्यासाठी फोन आला. त्यावेळी ऑफिसमध्ये श्री.डोंगरे (साहेबांचे स्वीय सहाय्यक) यांच्यासोबत तीन-चार प्रतिष्ठित मंडळी बसली होती.

डोंगरे त्या पुतण्याला म्हणाले, 'बाळ, तू आतल्या खोलीत जाऊन बोल.' पण त्याने ते ऐकले नाही. उलट चार लोकांसमोर आपल्याला येथे बसून बोलण्यास विरोध केला म्हणून तो रागावला. त्याला आपला अपमान झाल्यासारखे वाटले व तो तेथूनच बोलण्याचा प्रयत्न करु लागला. शेवटी डोंगरेंनी त्याच्या हातून रिसिव्हर काढून घेतला. त्यामुळे पुतण्या आवाज चढवून बोलू लागला. साहेब आतल्या खोलीत होते. त्यांच्या कानावर ही वादावादी गेली. साहेबांनी पुतण्याला थोडे आत बोलावले आणि मागचा पुढचा विचार न करता खाडकन् त्याच्या थोबाडीत मारली आणि ते ओरडले, 'ते तुझे नोकर नाहीत!' मग डोंगरेंकडे वळून साहेब म्हणाले, 'उद्या सकाळचे याचे पहिल्या गाडीचे तिकिट काढून याला परत पाठवून द्या.'

हा गोंधळ ऐकून वेणुताई बाहेर आल्या. साहेबांच्या चेहऱ्यावरील राग आणि त्यांचे थरथरणारे शरीर पाहून त्या खालीच बसल्या. कोणालाच काही सुचेना. कारण यशवंतरावांचा असा रुद्रावतार आत्तापर्यंत कोणीच पाहिला नव्हता, अनुभवला नव्हता. पण नखशिखान्त सुसंस्कृत असणाऱ्या यशवंतरावांना अशिष्ट आणि उद्धट वर्तन सहन होणे शक्यच नव्हते.

# सर्व काही दिल्या घेतल्याचे नसते!

'नवाकाळ' दैनिकाचे संपादक निळकंठ खाडिलकर हे अग्रलेखांचे बादशहा म्हणून प्रसिद्ध आहेत. १९७० च्या सुमाराची गोष्ट. त्याकाळी एक उमदे व निर्भीड पत्रकार म्हणून खाडीलकरांची ख्याती होती. यशवंतरावांचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. साहेब आपल्याला एवढे प्रेमाने का वागवतात हे खाडीलकरांना समजत नसे. ते तर सातत्याने सरकार आणि काँग्रेस पक्षावर टीकेची झोड उठवित होते, पण यशवंतराव त्यांना खूप मायेने वागवत. एकदा साहेब एकटे बसलेले असताना खाडीलकर त्यांच्या जवळ गेले व म्हणाले, 'साहेब, एक गोष्ट विचारू का?' साहेब हसून म्हणाले, 'विचार ना. अरे तू मला केव्हाही आणि काहीही विचारायला हरकत नाही.'

'साहेब, मला एक कुतुहल आहे. 'नवाकाळ' चा खप तो किती? पंचवीस हजारही नाही. तुम्ही मुख्यमंत्री आहात. तरीसुद्धा तुम्ही मला इतक्या आपुलकीने का वागवता? मोठमोठ्या खपाच्या वृत्तपत्रातील बातमीदारांनाही तुमची अशी आपुलकी लाभत नाही.'

साहेब हसू लागले. आपले काहीतरी चुकले असे वाटून खाडिलकर म्हणाले, 'माझा तुम्हाला काही उपयोग नाही हेही मला समजते. हे जग आणि त्यातही राजकारण, हे दिल्याघेतल्याचे असते. मग माझ्याकडे देण्यासारखे काही नसताना तुम्ही मला इतक्या प्रेमाने का वागवता? पण मला फार आधार वाटतो तुमच्या आपुलकीचा..! नाहीतर कोण विचारतो खप नसताना?'

साहेब गंभीर होऊन म्हणाले, 'हे बघ, सर्वकाही दिल्याघेतल्याचे नसते. मी काही कुटुंबे आणि काही व्यक्ती मनाने निवडल्या आहेत. मी त्यांना खास आपुलकीनं वागवत असतो. जणू महाराष्ट्राने त्यांची जबाबदारीच माझ्यावर सोपविली आहे.'

चकित होऊन खाडिलकर म्हणाले, 'म्हणजे आपले आमच्याशी असलेले संबंध आपुलकीचे आहेत?'

'हो, हे संबंध आपुलकीचे आहेत, पण ते आपोआप निर्माण झाले नाहीत. मी ते जाणीवपूर्वक जोपासले आहेत.

# नव्या पिढीला संधी दिली पाहिजे!

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्यभर फिरून यशवंतरावांनी पक्ष व सरकार यांच्याविषयी जनतेत विश्वास निर्माण केला. राज्याच्या कानाकोपऱ्यात कार्यकर्त्यांचे जाळे विणले. हे करताना नवे कार्यकर्ते घडविण्याचे त्यांचे काम सुरूच होते. १९६६ च्या विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांचा विरोध असतानासुद्धा त्यांनी शरद पवार यांना बारामती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आणि विशेष म्हणजे त्यावेळी पुणे जिल्ह्यात सर्वाधिक मतांनी शरद पवार विजयी झाले. त्यानंतर १९७२ च्या विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळाची यादी तयार करून ती काँग्रेस अध्यक्षांना सादर करून तिला मान्यता घेतली. त्या यादीत शरद पवार यांचे नाव नव्हते व त्यांची तशी अपेक्षाही नव्हती. पण दिल्लीमध्ये जेव्हा वसंतरावांनी इंदिराजींकडून मान्यता घेतलेली यादी यशवंतरावांना दाखवली तेव्हा शरद पवार यांचे नाव न दिसताच यशवंतरावांनी फोनवरून इंदिराजींशी संपर्क साधला व 'नव्या पिढीला संधी देण्यासाठी शरदचं नाव यादीत असलं पाहिजे' असं सांगितलं. त्या सूचनेला इंदिराजींनी मान्यता दिली व मग गृह व सामान्य प्रशासन या मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या खात्यात काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

अशाप्रकारे पवार साहेबांना प्रथम आमदार व नंतर मंत्रीपद मिळण्यामध्ये यशवंतरावांचे मोलाचे योगदान होते. त्यांनी दाखविलेला विश्वास शरदरावांनी नंतरच्या काळात सार्थ ठरवला व यशवंतरावांची निवड किती अचूक होती हे दाखवून दिले.

# मी टोकाची भूमिका घेऊ शकत नाही!

१९७२ साली पुण्यात साहित्यसम्राट न.चिं.केळकर यांची जन्मशताब्दी साजरी झाली. या जन्मशताब्दीच्या कार्यक्रमासाठी साहेब दिल्लीहून प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते. केळकरांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी बोलताना साहेब म्हणाले, 'तात्यासाहेब एकांतिक विचाराचे नव्हते. ते व्यवहारी व मध्यममार्गी होते. अशी माणसे टोकाची भूमिका घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांना उदंड लोकप्रियता मिळत नाही. अशा माणसांना आपल्या विरोधकाच्या म्हणण्यातही काही तथ्य आहे असे वाटते. आणि म्हणून टोकाची भाषा वापरुन ते टीका करु शकत नाहीत.' खरं तर तात्यासाहेबांविषयी बोलताना यशवंतराव नकळत स्वत:बद्दलच बोलून गेले. कारण वरील वाक्यांचा अनुभव ते स्वत:च घेत होते.

आणीबाणीनंतर झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. जनता पक्ष सत्तेवर आला. यशवंतराव विरोधी पक्षनेते झाले. सरकारने इंदिरा गांधींच्या विरोधात अनेक खटले दाखल केले व चौकशी सुरू केली. याचा परिणाम म्हणजे इंदिरा गांधींनी संसदेबाहेर सरकारविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. यशवंतरावांनीसुद्धा संसदेत असाच आक्रमक पवित्रा घ्यावा असे त्यांना वाटत असे, पण संसदेच्या पातळीवरील विरोधाला काही मर्यादा असतात आणि असाव्यात अशी साहेबांची धारणा होती. यशवंतरावांच्या एका मित्राने - (पत्रकार जयंत लेले) याविषयी विचारले असता ते म्हणाले, 'मी अनेक सरकारे सांभाळली आहेत आणि म्हणून जनता सरकारमधील एखादा मंत्री जेव्हा काही सांगतो किंवा एखादे विधेयक मांडतो, तेव्हा तो तसे का करतो हे मी समजू शकतो. त्यात सुधारणेला वाव असू शकतो, पण म्हणून त्याचे विधेयक पूर्णपणे झिडकारणे मला गैर वाटते. ही संसदीय वृत्ती नाही.'

'तुमची वृत्ती व राजकीय क्षेत्रातील कार्यपद्धती पाहिल्यास तुम्हाला इंग्लंडसारख्या प्रगत संसदीय लोकशाही असलेल्या देशात वावरणे अधिक सुलभ झाले असते असे वाटून जाते.'

यशवंतराव म्हणाले, 'बरोबर आहे. आपली संसदीय लोकशाही अजून तितकी परिपक्व व्हायची आहे.'

# या पैश्यांचं काय करू ?

यशवंतराव केंद्रात मंत्री होते तेव्हाची गोष्ट. एकदा ते मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले होते. संत एकनाथांच्या पैठण जवळून निघाले होते. रस्त्याच्या एका बाजूला दहा-बारा घरांची छोटी वस्ती होती. रस्त्यावर आठ-दहा माणसे उभी होती. काही तरुण तर काही वयोवृद्ध लोक गाडीकडे पहात उभे होते. यशवंतरावांनी ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितली. गाडी गर्दीजवळ जाऊन थांबली. 'मंडळी का थांबला आहात?' यशवंतरावांनी विचारले. गर्दीतून दोन म्हातारी माणसे पुढे आली. त्यांनी विचारले, 'चव्हाण साहेबांची गाडी हीच काय?'

यशवंतरावांना वाटले लोकांना तक्रार किंवा निवेदन द्यायचे असेल. ते गाडीतून खाली उतरले. त्यांना म्हणाले, 'हो, मीच यशवंतराव चव्हाण. बोला काय अडचण आहे ?'

'अडचण काही नाही' असे म्हणून एका वृद्धाने हातातल्या पिशवीतून एक रुपयांच्या नोटांचा हार बाहेर काढला आणि त्यांच्या गळ्यात घातला. भोवती उभे असलेल्या लोकांनी नकळत टाळ्या वाजवल्या. या अनपेक्षित व अकृत्रिम स्वागताने यशवंतराव भारावले. ते म्हणाले, 'बाबा, या पैश्यांचं मी काय करू ?'

'तुला खाऊ घे. तुझ्यासारखा पुत्र व्हावा अशी खूप इच्छा होती. म्हणून तुला खाऊला हे पैसे आणले आहेत. सुखी रहा' असे म्हणून त्या वृद्धाने यशवंतरावांच्या पाठीवर हात ठेवला.

यशवंतरावांनी वाकून नमस्कार केला. प्रेमाने त्यांना आलिंगन दिले व गाडीत जाऊन बसले. सर्वांनी हात वर करून त्यांना निरोप दिला. गाडी निघाली. यशवंतरावांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ते चार वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. पण आज त्यांना वडिलांची भेट झाल्यासारखे वाटले.

# भायेरील भानगडीचो मंत्री!

केंद्र सरकारमध्ये अर्थमंत्री असताना यशवंतराव एकदा रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. मॉस्को शहरातील एका आलिशान हॉटेलात त्यांचा मुक्काम होता. त्यावेळी पुण्याचे नरेंद्र सिंदकर मॉस्कोत रहात होते. यशवंतरावांनी आपल्या घरी जेवायला यावं अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी फोन करुन साहेबांना जेवणाचे निमंत्रण दिले. साहेब म्हणाले, 'खरं तर आज रशियातील भारताचे राजदूत शेलवणकर यांनी आम्हा सर्वांसाठी भोजन समारंभ आयोजित केला आहे. पण मला तुमच्याकडे यायला आवडेल. फक्त एक करा, तुम्ही राजदूत शेलवणकरांनाही तुमच्याकडे भोजनाचे निमंत्रण द्या.'

त्याप्रमाणे दुपारी साहेब लवाजाम्यासह सिंदकरांच्या घरी गेले. दिवाणखान्यात सोफ्यावर बसल्यावर साहेब सिंदकरांच्या पत्नीला-सलूताईंना म्हणाले 'काय मिसेस सिंदकर? कसं काय वाटतं मॉस्को?'

'छान वाटतंय. आता सवय झाली.'

'तुम्हाला रशियन भाषा येते की नाही? ' साहेबांनी हसून विचारले.

'येतं की, पण कामापुरतं. शॉपिंग मलाच करावं लागतं.'

'सिंदकर, तुम्ही मदत करता की नाही शॉपिंग करायला?'

नंतर मग साहेबांनी सलूताईंची रशियन भाषेची परीक्षा घेतली. त्यांनी विचारलं, 'कोबीला रशियनमध्ये काय म्हणतात?'

'का पुस्ता'

'म्हणजे 'का विचारता' या अर्थाने नाही ना?' सगळे हसू लागले. साहेब म्हणाले, 'आपल्याला हसू येतंय, पण भाषेतील शब्द चमत्कारिक असतात. मी परराष्ट्रमंत्री असताना एका कार्यक्रमासाठी गोव्याला गेलो होतो. तेव्हा ओळख करून देणारा वक्ता म्हणाला, 'हे मिस्टर वाय.बी.चव्हाण, भायेरील भानगडीचो मंत्री.' मी दचकलोच, पण नंतर समजले की 'मिनिस्टर ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स' चे ते कोकणी भाषांतर होते'

असे हलके फुलके किस्से सांगून साहेबांनी ती दुपार अविस्मरणीय बनविली.

# तुमच्या सूचना काय आहेत?

सन १९७० ची गोष्ट. यशवंतराव तेव्हा केंद्रात अर्थमंत्री होते. त्यांचे स्वीय सहाय्यक श्री.डोंगरे यांची कन्या ज्योत्स्ना हिचा विवाहसोहळा मुंबईत होता. लग्नाच्या आदल्या दिवशी खास निमंत्रितांची एक पंगत झाली. त्यामध्ये यशवंतराव, शरद पवार, महाराष्ट्र टाईम्सचे संपादक गोविंद तळवलकर, नरूभाऊ लिमये आणि पाच सहा इतर निवडक मंडळी होती. ॲड. ग. नी. जोगळेकर हे डोंगरे यांचे मेहुणे, अर्थातच तेही पंगतीला उपस्थित होते. डोंगरे घरातील पाहुण्यांची यशवंतरावांना ओळख करून देत होते. ॲड.जोगळेकरांची ओळख करून देताना ते यशवंतरावांना म्हणाले, 'हे माझे मेहुणे, पुण्यातच इन्कमटॅक्स कन्सल्टंट (कर सल्लागार) आहेत.' साहेबांनी लगेच जोगळेकरांना विचारले, 'आमच्या खात्याबद्दल तुमच्या काय सूचना आहेत ?'

जोगळेकर स्पष्टवक्ते होते. ते परखडपणे म्हणाले, 'करदात्याला तुमचे खाते शत्रू समजते. एखाद्याची संपत्ती चार लाख असेल तर त्याला दीड दोन हजार रुपये वेल्थ टॅक्स (संपत्ती कर) भरावा लागतो. पण रिटर्न भरायला उशीर झाला तर दर महिन्याला एकूण संपत्तीच्या दोन टक्के म्हणजे आठ हजार रुपये दंड करतात. नगरपालिका दरवर्षी व्हीलटॅक्स म्हणून एकशेवीस रुपये घेते. पण तो भरायला उशीर झाला तर मोटारीच्या किंमतीवर दरमहा दोन टक्के दंड आकारते. त्यातलाच हा प्रकार झाला.' हे ऐकून सारेजण माफक हसले.

यशवंतराव मात्र गंभीरपणे म्हणाले, 'तुमचे म्हणणे लिहून पाठवा, म्हणजे चौकशी समितीला देतो.' हा विषय तिथेच संपला. पण आश्चर्य म्हणजे त्यानंतर काही दिवसातच कायद्यात बदल करून ही जाचक तरतूद रद्द केली गेली. प्रत्येक माणसाकडून नवे काही शिकण्याची, त्यानुसार धोरणात योग्य तो बदल करण्याची यशवंतरावांची ही नीती, आदर्श प्रशासक कसा असावा हेच सांगून जाते.

# अजून लोकांची कृपा आहे!

अर्थमंत्री असताना १९७२ साली एका परिषदेत भाग घेण्यासाठी यशवंतराव लंडनला गेले होते. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ज्यांच्या विरोधात आपण लढलो त्या इंग्रजांच्या भूमीला एका स्वतंत्र देशाचा मंत्री म्हणून भेट देताना यशवंतरावांना विशेष आनंद वाटत होता. गंमत म्हणजे ज्यांनी यशवंतरावांना शोधण्यासाठी बक्षिस जाहिर केले होते, त्यांनीच खास निमंत्रण देऊन त्यांना परिषदेसाठी बोलावले होते.

परिषदेच्या आदल्या दिवशी सर्व निमंत्रितांसाठी खास मेजवानी आयोजित केली होती. या भोजन समारंभात यशवंतरावांच्या शेजारी इंग्लंडच्या अर्थखात्याचे राज्यमंत्री मि. नॉफ बसले होते. यशवंतराव भारताचे प्रतिनिधी म्हणून परिषदेस आले आहेत हे कळल्यावर नॉफ काहीसे अवघडले. त्यांच्या पूर्वजांनी भारतातील ब्रिटीश सैन्यात अधिकारी म्हणून काम केले होते. भारतीयांवर जुलूम करण्यात आपल्या कुटुंबाचा प्रत्यक्ष सहभाग होता या भावनेने त्यांना अपराधी वाटत होते. त्यांच्या या अवघडलेपणाचे कारण कळाल्यावर यशवंतराव म्हणाले, 'मि. नॉफ, तो इतिहास आता जुना झाला आहे. आज तशी वैयक्तिक कटुता आमच्या मनात राहिलेली नाही.' मग नॉफ साहेबांची कळी खुलली. दोघांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. नॉफ यांच्या मतदारसंघात साठ हजार मतदार होते. 'माझ्या मतदार संघात सहा ते सात लाख लोक आहेत असे यशवंतरावांनी सांगितल्यावर नॉफ यांना आश्चर्याचा एवढा मोठा धक्का बसला की काही वेळ त्यांना बोलताच येईना.

'एवढेच नाही तर तुमच्याप्रमाणे आमचे मतदारसंघ राजधानीच्या आसपास नाहीत. माझा मतदारसंघ दिल्लीपासून एक हजार मैल दूर आहे.' यशवंतरावांनी नॉफना माहिती पुरवली.

'अहो मग एवढ्या मोठ्या मतदारसंघाशी तुम्ही कसा संपर्क ठेवता? मंत्रीपदावर असताना जनतेच्या प्रश्नांचा पाठपुरावा तुम्ही कसा करता आणि मुळात तुम्हाला निवडून येणे कसे जमते?' नॉफनी विचारले.

'अजून लोकांची कृपा आहे म्हणून जमते!' यशवंतराव हसून म्हणाले.

# मॉस्कोत आहात की पुण्यात?

यशवंतराव रशियाच्या दौऱ्यावर गेले असताना त्यावेळी मॉस्को शहरात राहणाऱ्या व मूळचे पुण्याचे असलेल्या नरेंद्र सिंदकरांनी साहेबांना आपल्या घरी जेवायला बोलावले. खरं तर त्यादिवशी रशियातील भारताचे राजदूत श्री.शेलवणकर यांनी साहेबांच्या सन्मानार्थ भोजन समारंभ आयोजित केलेला होता, पण तो रद्द करायला लावून साहेब शेलवणकरांना घेऊन सिंदकरांच्या घरी जेवायला गेले. थोडा वेळ गप्पा मारल्यानंतर सर्वजण जेवणासाठी डायनिंग टेबलाजवळ आले. टेबलांच्या दोन्ही बाजूंना खुर्च्यांच्या दोन रांगा होत्या. मध्यभागी एक खुर्ची खास साहेबांसाठी ठेवली होती. सिंदकरांनी साहेबांना त्या खुर्चीवर बसण्याची विनंती केली. त्यांच्या उजव्या हाताला पहिल्या खुर्चीवर राजदूत शेलवणकर बसले व डाव्या हाताला स्वतः सिंदकर बसले. साहेबांनी टेबलावरील पदार्थांकडे नजर टाकली व म्हणाले, 'अरे व्वा ! चिकन आणि श्रीखंड? चैन आहे. पण मिसेस सिंदकर कुठयंत?'

त्यावर आतून बाहेर येत सलूताई म्हणाल्या, 'साहेब, आपण सुरुवात करा. मी नंतर बसेन.'

साहेब लटक्या रागाने म्हणाले, 'मिसेस सिंदकर, मॉस्कोत आहात की पुण्यात? सगळ्यांच्या नंतर बायकांनी बसयाचं, ही पद्धत इथे तरी सोडा की. या, बसा माझ्या शेजारी.'

मग शेजारी बसलेल्या नरेंद्र सिंदकरांना साहेब म्हणाले, 'सिंदकर, तुम्ही उठा. लेडीज फर्स्ट. बायकोला असंच वागवता वाटतं! मॉस्कोत येऊन काही सुधारलेले दिसत नाही!' नंतर सलूताई साहेबांच्या शेजारी जेवायला बसल्या. गप्पा मारत छान जेवण झाले; साहेब म्हणाले, 'कराडहून जेवण आणल्यासारखं वाटतंय. छान झालंय. सिंदकर, तुम्हाला पोटाची काळजी नाही. एवढी सुगरण बायको मिळाल्यावर दोन घास जास्तच खात असाल.'

अशा अनौपचारिक गप्पांमधून साहेबांमधील कुटुंबवत्सलता व स्त्रियांविषयीचा सहृदयतेचा दृष्टिकोन दिसून येतो.

# तुमच्या मुखात ही भाषा नको!

केंद्रीय अर्थमंत्री असताना यशवंतराव एका कार्यक्रमासाठी पुण्यात आले होते. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे अनेक महत्त्वाचे नेते या कार्यक्रमाला हजर होते. याच काळात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना बदलण्याची मागणी जोर धरू लागली होती. मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळाले पाहिजे अशी मागणी उघडपणे होऊ लागली होती. पुण्यातील यशवंतरावांची सभा संपल्यानंतर मराठवाड्यातील युवक कार्यकर्त्यांचा एक गट 'मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळाले पाहिजे' या मागणीचं निवेदन घेऊन यशवंतरावांना भेटला. निवेदन स्वीकारत असताना यशवंतराव सहजपणे म्हणाले, 'मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ ही भाषा, बाळांनो, आमच्या पिढीपुरतीच संपू द्या. तुमच्या पिढीच्या मुखात ही भाषा नको. मराठवाड्याचा मुख्यमंत्री पाहिजे' असं कशाला म्हणता? मराठवाड्याचं नाही, महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद मागा. हे प्रादेशिक भेद तुमच्या पिढीने विसरले पाहिजेत.'

यशवंतरावांनी ही अपेक्षा व्यक्त केली त्याला आता चाळीस वर्षे होत आली. त्यानंतर अनेक पिढ्या आल्या आणि गेल्या, पण हा प्रश्न शिल्लकच आहे. खरोखरच आपण प्रादेशिक भेद विसरलो का?



# हे आमचे दुर्दैव होय!

स.का.पाटील हे काँग्रेस पक्षाचे मुंबईतील महत्त्वाचे नेते होते. यशवंतरावांचे आणि त्यांचे विशेष सख्य नव्हते. यशवंतरावांना गृहमंत्रीपद देण्याचा निर्णय तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी घेतला, तेव्हा स.का.पाटील यांनी या निर्णयाला विरोध केला होता. पण आता ते थकले होते. त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. ते अत्यवस्थ होते. भेटीला आलेल्या लोकांना ओळखू शकत नव्हते. स.का. पाटलांची भेट घ्यावी असे यशवंतरावांना वाटले. एके रात्री त्यांनी पाटलांसोबत असणाऱ्या रमेश भोगटेंना फोन केला व म्हणाले, 'नगरला आण्णासाहेब शिंदेंच्या मुलीचे लग्न आहे. मी उद्या पहाटे विमानाने तेथे जाऊन येतो. परवा सकाळी आठ वाजण्यापूर्वी तू 'रिव्हिएरा'मध्ये ये. आपण तेथूनच बॉम्बे हॉस्पिटल मध्ये जाऊ.' त्याप्रमाणे भोगटे गेले. त्यांना घेऊन यशवंतराव बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेले. अंथरुणाला खिळलेल्या पाटलांना पाहून यशवंतरावांना गहिवरुन आले. काही वेळ इकडे तिकडे फिरुन त्यांनी पाटलांना न्याहाळले. बाहेर आल्यावर ते आपला हुंदका आवरू शकले नाहीत. 'महाराष्ट्राचा सिंह आज, असा अगतिक होऊन पडावा हे आमचे दुर्दैव होय.' या शब्दात त्यांनी आपले दु:ख व्यक्त केले व दरवाजाबाहेर जमलेल्या लोकांना भेटून ते परत गेले.



स.का.पाटील आणि यशवंतराव चव्हाण

# धीर धरा, सुखाने रहा!

एकदा पुणे जिल्ह्यात शिरुरला यशवंतरावांची सभा होती. यशवंतराव येणार असल्याने सभेला प्रचंड गर्दी होती. भाषणाच्या सुरुवातीलाच साहेबांनी श्रोत्यांना जिंकले. ते म्हणाले, 'शिरुर गाव मला नवीन नाही. या गावात मी आठ-पंधरा दिवस राहिलो आहे. बेचाळीसच्या आंदोलनात भूमीगत असताना शिरुरला आम्ही कोठे राहता येईल याचा अंदाज घेण्यासाठी दोन-तीन वेळा रस्त्यावर फेरफटका मारला. एका छोट्याशा घराच्या ओट्यावर शिलाई मशिनवर एक शिंपीदादा काम करीत बसले होते. त्या घरासमोरुन मी दोन-तीन वेळा ये-जा केल्यावर त्यांनी विचारले,'कोण पाहिजे बाळा तुला? मग मी त्यांना हळूहळू माझी माहिती सांगितली. त्या ओट्याजवळ मागील बाजूस एक रिकामी खोली होती. शिंपीदादांनी सांगितले, 'आत खोलीत जा. खुशाल रहा. इथे कोणी येणार नाही.' त्या खोलीत मी आठ-दहा दिवस निश्चिंतपणे राहिलो.'

एवढे बोलून यशवंतराव म्हणाले, 'ते शिंपीदादा आता आहेत की कसे, ते मला माहित नाही. असतील तर त्यांची भेट घ्यायला मला आवडेल.' साहेबांनी असे म्हणताच सभेत भिंतीला पाठ लावून बसलेली एक वृद्ध व्यक्ती उभी राहिली आणि म्हणाली,

'मी इथं हाय. जिता हाय.'

सगळी सभा त्या वृद्ध शिंपीदादाकडे बघू लागली. भाषण संपल्यावर साहेब विश्रामगृहावर गेले आणि त्यांनी डोंगरेंना सांगितले, 'सभेत उभा राहून बोलणाऱ्या त्या शिंपीदादाला शोधून काढा आणि घेऊन या.' डोंगरे रवाना झाले आणि थोड्याच वेळात मोटारीतून शिंपीदादाला सोबत घेऊन आले. त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगाही आला होता. यशवंतरावांनी शिंपीदादांची आपुलकीने चौकशी केली. शिंपीदादा म्हणाले, 'आता दोन्ही डोळ्यांनी दिसत नाही. शिलाई धंदा बंद पडलाय.'

'मुलगा काय करतो?' साहेबांनी विचारले. 'तो शाळेत जात व्हता. शिलाईधंदा शिकला नाही. नोकरी करावी म्हणतोय, पण आजकाल नोकरी फुकट मिळतीय व्हय?'

त्यावेळी शिरुरचे नगराध्यक्ष साहेबांजवळच बसले होते. त्यांच्याकडे पाहून साहेब

म्हणाले, 'या मुलाला सोबत घेऊन जिल्हा परिषदेत जा. त्याला शिपायाची असो अगर दुसरी कुठलीही असो, नोकरी द्यावी असा माझा निरोप सांगा.'

मग डोंगरेंना ते म्हणाले, 'यांची काहीतरी व्यवस्था करायला पाहिजे.' डोंगरेंच्या खिशात तेव्हा चारशे रुपये होते. साहेबांनी ते सगळे पैसे त्या वृद्धाला दिले आणि त्यांचे हात हातात घेवून प्रेमाने म्हणाले, 'धीर धरा, सुखाने रहा.' अडचणीच्या काळात मदत करणाऱ्यांना साहेब कधीच विसरले नाहीत.



# व्होल्गा ते कृष्णा

कृष्णा-कोयनेच्या संगमावर वसलेल्या कराड शहरात यशवंतराव वाढले. त्यामुळेच असेल कदाचित; पण नदीकाठ आणि नद्यांचा संगम पाहिला की, यशवंतरावांचे मन उल्हासित व्हायचे. तासन्‌तास ते संगम पहात रहायचे आणि विचारांच्या तंद्रीत हरवून जायचे.

पुढे संरक्षणमंत्री झाल्यावर १९६३ साली यशवंतराव रशियाच्या दौऱ्यावर गेले. युरोपातील लोकांचे नद्यांविषयीचे प्रेम आणि नदीकाठचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न पाहून यशवंतरावांना अपार समाधान वाटले. याच दौऱ्यात स्लाव्हाकियाची राजधानी असलेल्या ब्राटीस्लाव्हा या शहरात त्यांचा मुक्काम असताना घडलेला हा प्रसंग.

त्यादिवशी शहराबाहेरील एका रम्य ठिकाणी संध्याकाळी फिरायला जाण्याचा आणि तिथेच जेवण घेण्याचा बेत ठरला होता. त्यानुसार कार्पेथियन पर्वतराजीच्या कुशीत वसलेल्या 'झोकशेके' नावाच्या सुंदर रेस्टॉरंटमध्ये सर्वजण जेवायला गेले. त्यांच्या स्वागतासाठी रशियन तरुणांचा एक कलावृंद तिथे सज्ज होता. त्या तरुण गायक कलाकारांनी एक सुरेख गीत गायला सुरुवात केली. यशवंतराव लक्षपूर्वक ऐकू लागले. ते गीत रशियन भाषेत असल्यामुळे यशवंतरावांना त्याचा अर्थ समजला नाही. परंतु त्यातील स्वरांची आर्तता, नादबद्धता आणि तरलता यांनी यशवंतराव एकदम हळवे झाले. त्या गीताने त्यांच्या हृदयाची तार छेडली. गीतगायन संपल्यावर त्यांनी त्या गाण्याविषयी चौकशी केली तेव्हा त्यांना समजले की, त्या गायकांनी सादर केलेले गीत व्होल्गा नदीवर आधारित आहे. यशवंतरावांनी लगेच एका अनुवादकाच्या मदतीने त्या गीताचे इंग्रजी भाषांतर करून घेतले आणि आपल्या डायरीत ते टिपून ठेवले.

व्होल्गा नदीविषयीच्या गीतकाराच्या भावना आणि कृष्णा-कोयनेविषयीच्या यशवंतरावांच्या भावना सारख्याच होत्या. त्या गीताने यशवंतरावांच्या नजरेसमोर कृष्णाकाठ उभा केला. त्या दौऱ्यावरून परत आल्यावर यशवंतरावांनी दोन पत्रे लिहिली. एक कराडचे नगराध्यक्ष पी.डी.पाटील यांना आणि दुसरे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना! नगराध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी कृष्णा-कोयनेच्या प्रीतीसंगमावर एक सुंदर उद्यान तयार करण्याची सूचना केली, तर मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी पानशेतच्या प्रलयानंतर पुणे शहराजवळून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांचे युरोपातील नद्यांप्रमाणे सुशोभीकरण व बांधबंदिस्ती करावी अशी विनंती केली. नदीकाठ आणि यशवंतराव यांच्यातील हा अनोखा भावबंध विलोभनीय आहे.

# मी तुझ्या घरी येणार आहे!

छोट्यातल्या छोट्या कार्यकर्त्यांची आपुलकीनं विचारपूस करणं, त्याला आपलसं करणं ही यशवंतरावांची एक खास शैली होती. यासंदर्भात उल्हासदादा पवार यांनी सांगितलेली आठवण नमूद करण्याजोगी आहे.

पुण्यात नाना पेठेतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी यशवंतराव येणार होते. उल्हास पवार त्यावेळी त्याच भागात भाड्याच्या खोलीत रहात होते. त्यावेळी ते काँग्रेसचे एक सामान्य युवक कार्यकर्ते होते. चव्हाण साहेबांसारखा थोर नेता आपल्या घरी पाच मिनिटांसाठी तरी यायला हवा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. यासाठी त्यांनी दहा पैश्याच्या साध्या पोस्टकार्डवर साहेबांना पत्र लिहिले.

'पुतळा अनावरण समारंभासाठी आपण पुण्याला येणार आहात. माझं घर कार्यक्रम स्थळापासून जवळच आहे. त्यावेळी पाच मिनिटांसाठी आपण माझ्या घरी आलात तर माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला खूप बरं वाटेल.'

असा मजकूर लिहून त्यांनी पत्र टाकलं. कार्यक्रमाचा दिवस उजाडला. साहेबांच्या स्वागतासाठी विमानतळावर इतर नेत्यांबरोबर पवारही गेले. तिथे साहेबांच्या स्वागतासाठी अनेक दिग्गज पुढारी पुष्पहार घेऊन रांगेत उभे होते. पवारांचा नंबर सर्वात शेवटी. त्यांच्याकडे ना हार, ना गुच्छ, ना फूल. साहेब आले. रांगेतील प्रत्येकाचं स्वागत स्वीकारत पुढे निघाले. एक नेते म्हणाले, 'चिरंजीवाचा साखरपुडा आहे.' तेवढ्यात दुसरे एक पुढारी म्हणाले, 'आम्ही कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. थोडावेळ का होईना पण तुम्ही येऊन जा.' अशा प्रकारे अनेक पुढारी साहेबांना निमंत्रण देत होते. पण साहेब नम्रपणे सर्वांना सांगत होते की, कार्यक्रमाच्या व्यस्ततेमुळे शक्य नाही. रांगेच्या शेवटी पवार उभे होते. मोठमोठ्या पुढाऱ्यांची निमंत्रणे साहेबांनी नाकारल्यामुळे पवारांना निमंत्रण देण्याचे धाडस होईना. इतक्यात साहेबच पवारांजवळ आले व म्हणाले, 'तुझं पत्र मिळालं मला, मी तुझ्या घरी येणार आहे.' हे ऐकून इतर नेते थक्क झाले. 'तू काय जादू केलीस?' असे पवारांना विचारू लागले. पवार म्हणाले, 'जादू मी केली नाही, तर दहा पैश्याच्या पोस्टकार्डने केली आहे.' साध्या पोस्टकार्डवर दिलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करून यशवंतरावांनी एका सामान्य कार्यकर्त्याचा सन्मान वाढवला होता.

# दुष्काळात एकसष्ठी नको !

सन १९७२ साली महाराष्ट्रात प्रचंड मोठा दुष्काळ पडला. या भयाण दुष्काळाशी लढताना शासन आणि जनता मेटाकुटीला आली. पुढची दोन-तीन वर्षे महाराष्ट्रात जगण्यासाठीचा खडतर संघर्ष सुरू होता. अशातच १९७३ साली यशवंतरावांची एकसष्ठी आली. १२ मार्च हा त्यांचा वाढदिवस, ते दिल्लीत गेले तरी महाराष्ट्रात उत्साहाने साजरा केला जात असे.

त्यावर्षी तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक, ना.शरद पवार आणि महाराष्ट्रातील इतर कार्यकर्त्यांनी ठरविले की यशवंतरावांची एकसष्ठी साजरी करायची. सर्व महाराष्ट्रभर तयारी सुरू झाली. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, सातारा अशा सर्व जिल्ह्यांमध्ये विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करून प्रबोधन करण्याचे ठरले. ही सगळी तयारी चालू असताना अचानक यशवंतरावांनी दिल्लीतून निरोप पाठवला की, 'महाराष्ट्रावर कधी नव्हे ते भयानक दुष्काळाचे संकट कोसळले आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे. रोजगार हमीच्या कामावर मोठमोठे शेतकरी येत आहेत. अनेक गावांमध्ये पाणी नाही, पीक नाही. अशा भयाण दुष्काळामध्ये महाराष्ट्र सरकार आणि जनता होरपळत असताना मी एकसष्ठी साजरी करणे हे नुसते असंवेदनशीलतेचेच नाही, तर क्रूरपणाचे ठरेल. म्हणून माझी एकसष्ठी साजरी करायची नाही.' नेते आणि कार्यकर्त्यांनी यशवंतरावांना परोपरीने विनवणी करून सांगितले की, 'साहेब, हे सर्व आम्ही स्वत: खुशीने करीत आहोत. याच्यामुळे कोणालाही आर्थिक नुकसान आम्ही होऊ देणार नाही. आमची तयारी पूर्ण होत आली आहे.' पण यशवंतरावांनी ऐकले नाही. त्यांनी सगळी तयारी थांबवायला लावली. सगळे कार्यक्रम त्यांनी रद्द केले. कार्यकर्ते हिरमुसले, निराश झाले. पण साहेबांनी आपला निर्णय बदलला नाही.

ज्यांनी महात्मा गांधींना जन्मभर आपला आदर्श मानले, ते साहेब जनता दु:खात असताना स्वत:चा गौरव करून घेणे शक्यच नव्हते.

# जनतेचे समाधान ही पुढाऱ्यांची पहिली जबाबदारी आहे!

१९७२ साली महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला. अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. पशुधन धोक्यात आले. शेतकरी देशोधडीला लागले. जनतेच्या सहनशक्तीची व सरकारच्या प्रयत्नांची कसोटी पाहणारा हा दुष्काळ होता. याच काळात बाळासाहेब विखे-पाटील नगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होते. शेतकऱ्यांविषयी आणि त्यांच्या प्रश्नांविषयी बाळासाहेबांना विशेष आस्था होती. त्यांनी विसापूर येथे काँग्रेस पक्षातर्फे सर्वपक्षीय दुष्काळी परिषदेचे आयोजन केले. शेतकऱ्यांना आपले गाऱ्हाणे मांडता यावे आणि त्यावरील उपायांची चर्चा करावी हा परिषदेचा हेतू होता. पण जिल्ह्यातील काँग्रेसच्याच काही कार्यकर्त्यांना हे पटले नाही. त्यांनी चव्हाण साहेबांकडे बाळासाहेबांविरूद्ध तक्रार केली. त्यांचे म्हणणे होते की, या परिषदेला सगळ्या पक्षांचे लोक उपस्थित राहतील, सगळ्या पक्षांचे झेंडे तिथे असणार. सरकार विरोधात घोषणा होणार. काँग्रेसवर आणि मुख्यमंत्र्यांवर टीका होणार. मग अशा परिषदेला बाळासाहेबांनी कशासाठी जावे ?

चव्हाण साहेबांनी सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले, आणि मग त्यांना विश्वासात घेऊन म्हणाले, 'हे बघा, परिषद कोणी बोलावली?'

'जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षाने.'

'उपाध्यक्ष कोणत्या पक्षाचा आहे?'

'काँग्रेसचा.'

'म्हणजे यात पुढाकार काँग्रेस पक्षाचा आहे. बरं, या दुष्काळी परिषदेचा अध्यक्ष कोण आहेत?, तर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष बाळासाहेब विखे पाटील. ते आपल्याच पक्षाचे म्हणजे काँग्रेसचेच आहेत ना! म्हणजे या परिषदेचे श्रेय पक्षालाच मिळणार ना! काँग्रेस लोकांचे पुढारपण करीत असेल तर त्यात वावगे काय आहे? जनतेची मागणी पूर्ण करणे ही पुढाऱ्यांची पहिली जबाबदारी आहे. तिकीट मागणे ही नाही.'

तक्रार करायला आलेले लोक निरुत्तर होऊन निघून गेले.

# सौजन्यमूर्ती

विख्यात कथाकार रंगनाथ पठारे यांनी सांगितलेली ही आठवण. १९७२-७३ साल असेल. प्रा.पठारे तेव्हा पुण्यात शिकायला होते. एके दिवशी सहज रस्त्याने फिरत असताना आबासाहेब गरवारे कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळ त्यांना काही गाड्या उभ्या असलेल्या दिसल्या. कॉलेजमध्ये कसला कार्यक्रम आहे म्हणून त्यांनी चौकशी केली, तेव्हा त्यांना कळाले की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या रौप्यमहोत्सव समारंभासाठी केंद्रीय गृहमंत्री ना.यशवंतराव चव्हाण कॉलेजमध्ये आले आहेत. पठारे उत्सुकतेने आत जाऊन बसले. लहानपणापासून ज्यांच्याविषयी आपण ऐकत आलो त्या यशवंतराव चव्हाणांना प्रत्यक्ष पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची संधी आज आपणाला मिळणार याचा त्यांना आनंद झाला.

कार्यक्रमासाठीचा हॉल मोठा होता. अजून गर्दी झालेली नव्हती. बऱ्यापैकी माणसे आत येत होती. व्यासपीठावर मध्यभागी ना.यशवंतराव चव्हाण बसले होते. त्यांच्या बाजूला इतर मान्यवर आणि संस्थेचे पदाधिकारी बसले होते. यशवंतराव अगदी आरामात, एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमासाठी आलेल्या कर्त्या पुरुषासारखे बसलेले होते. अगदी मोकळे वातावरण होते. कार्यक्रमाची वेळ झाली होती, परंतु एक पाहुणे अजून आले नव्हते. सर्वजण त्यांचीच वाट पहात होते. अचानक यशवंतराव उठले. ते समोर बघत होते. सभागृहातील सर्वच लोक यशवंतराव पहात होते त्या दिशेला पाहू लागले. एक वयस्क, सडपातळ तरीही ताठ चालीने चालत असलेले गृहस्थ व्यासपीठाकडे येत होते. हातात छडीवजा काठी होती. ते रँग्लर महाजनी होते. यशवंतराव व्यासपीठावरून खाली आले. त्यांनी रँग्लर महाजनी यांना आदरपूर्वक अभिवादन करून त्यांचे स्वागत केले आणि त्यांना व्यासपीठावर घेऊन गेले. महाजनी त्यांच्या खुर्चीत बसल्यावरच यशवंतराव स्वतःच्या खुर्चीत बसले. हे सगळे त्यांनी इतक्या सहज आणि स्वाभाविकपणे केले की आपण विशेष काही केले असे त्यांच्या कृतीतून कोठेही दिसले नाही. पण स्वतःच्याही नकळत यशवंतरावांनी सुसंस्कृतपणाचा आणि सौजन्याचा प्रत्यय उपस्थितांना आणून दिला.

# कलावंतांनी काही पथ्ये पाळली तर...

केंद्रात मंत्री असताना कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेकदा यशवंतराव मुंबईला येत असत. नरिमन पॉईंट येथील 'रिव्हिएरा' या त्यांच्या निवासस्थानी विविध क्षेत्रांतील लोक त्यांच्या भेटीसाठी येत असत. त्यात कलाकार, साहित्यिक, संगीतज्ञ, सहकार क्षेत्रातील लोक आणि पत्रकार असत.

एके दिवशी विख्यात संगीत दिग्दर्शक सी.रामचंद्र (राम चितळकर) यशवंतरावांना भेटायला आले. त्यांचे आत्मकथन नुकतेच प्रसिद्ध झाले होते. त्या पुस्तकाची एक प्रत साहेबांना भेट म्हणून देण्यासाठी ते आले होते. पुस्तक हातात घेतल्यावर यशवंतराव म्हणाले, 'तुमचा हा ग्रंथ मी वाचला आहे.' यशवंतरावांचे हे शब्द ऐकून सी. रामचंद्र थक्कच झाले. नुकतेच प्रकाशित झालेले आपले आत्मचरित्र आपण भेट देण्यापूर्वीच साहेबांनी वाचले आहे हे समजल्यावर त्यांना सुखद धक्का बसला. साहेब पुढे म्हणाले, 'तुमच्या या पुस्तकामध्ये तुम्ही लता मंगेशकर यांच्याबद्दल ज्या तऱ्हेने काही गोष्टी नमूद केल्या आहेत ते केले नसते तरी चालले असते. त्या एक ज्येष्ठ व लोकप्रिय गायिका आहेत. तुम्ही ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक आहात. एकमेकांच्या सहकार्याने तुम्ही संगीत रसिकांना संतुष्ट केले आहे. दिल्लीत पं.नेहरुंच्या उपस्थितीत तुम्हा दोघांचा एक कार्यक्रम होणार होता. त्यावेळी तुम्हाला क्लेशकारक असे काही घडले, त्यात कुणाची चूक होती, या तपशिलात मी जात नाही. ती क्लेशकारक घटना तुम्ही पुस्तकात लिहिली आहे. अखेर तुमच्या मनाप्रमाणे कार्यक्रम यथासांग पार पडला. ते संगीत ऐकून पंडितजी गहिवरले. मला वाटते तो विषय तिथेच संपला. ज्येष्ठ कलावंतांनी अशी काही पथ्ये पाळली, तर समाजमनावर याचा मोठा अनुकूल परिणाम घडतो. माणूस म्हणून कलाकार अधिक श्रेष्ठत्व पावतो.'

सी.रामचंद्र शांतपणे ऐकत होते. त्यांच्या डोळ्यात पाणी आले. साहेबांनी खुबीने विषय बदलला. ते चित्रपटसृष्टी, त्याचे व्यक्तिगत जीवन याविषयी बोलू लागले. शेवटी उठताना सी.रामचंद्र म्हणाले, 'तुम्ही म्हणता तसा विचार मी करायला हवा होता.' असे म्हणून अश्रूपूर्ण नेत्रांनी त्यांनी यशवंतरावांचा निरोप घेतला. आज त्यांना सुसंस्कृतपणाचे मूर्तीमंत उदाहरण पहायला मिळाले होते.

# का आला आहात मावशी?

महाराष्ट्रातील जनतेने यशवंतरावांवर उदंड प्रेम केले. यशवंतरावांनीही या ऋणातून उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. महाराष्ट्रभर यशवंतरावांचे अनेक चाहते होते, पण कराडच्या जनतेने त्यांच्यावर जे प्रेम केले ते खरोखरच शब्दातीत होते. कराडचे नाव राष्ट्रीय स्तरावर नेणाऱ्या यशवंतरावांचा कराडच्या आबालवृद्धांना सार्थ अभिमान वाटत होता.

यशवंतराव केंद्रात मंत्री असताना एकदा कराडला आले होते. सोबत वेणुताईसुद्धा होत्या. कराडच्या गेस्ट हाऊसला त्यांचा मुक्काम होता. त्यावेळी भाई माधवराव बागल यशवंतरावांना भेटायला आले होते. दोघेजण गप्पा मारत असताना यशवंतरावांचे लक्ष दूरवर उभ्या असलेल्या म्हातारीकडे गेले. फाटक्या लुगड्यात काहीतरी गुंडाळून ती यशवंतरावांच्या भेटीसाठी ताटकळत उभी होती. पण पोलीस तिला आत जाऊ देत नव्हते. यशवंतराव पोलीसांना म्हणाले, ‘त्यांना आत येऊ द्या.’ दबकत दबकत ती म्हातारी आत आली. अंग चोरून कोपऱ्यात उभी राहिली. यशवंतरावांनी तिला जवळ बोलावले आणि आपुलकीने विचारले, ‘का आला आहात मावशी ?’

म्हातारी म्हणाली, ‘सगळं गाव यशवंतरावाला नावाजतयं, तवा त्याला भेटून हार द्यावा म्हणून आलिया.’ असे म्हणून तिने हार काढला व तो यशवंतरावांना घालू लागली. त्यांनी तो घेतला व परत तिच्याच गळ्यात घातला. तिला नमस्कार केला. इतक्यात वेणूताई बाहेर आल्या. त्यांनी तिला आत नेले. प्रेमाने जेवू घातले. यशवंतराव भाई माधवराव बागल यांना म्हणाले, ‘माधवराव, अशी निखळ माया करणारी माणसे भेटली, की मला माझी आई आठवते. या लोकांच्या प्रेमातून मी कसा उतराई होऊ ?’ असे म्हणून साहेबांनी डोळे पुसले.

# आमचा महानोर कुठे आहे?

साहित्य आणि समाज हे यशवंतरावांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय होते. अनेक साहित्यिकांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. हे संबंध औपचारिक किंवा कृत्रिम नव्हते, तर सहजपणे जपलेले आणि जोपासलेले होते. महाराष्ट्रातील शेकडो नव्या जुन्या लेखक कवींची नावे त्यांना पाठ होती आणि त्या त्या भागात गेल्यावर तिथल्या साहित्यिकांची ते आवर्जून चौकशी करायचे.

एकदा औरंगाबाद शहरात यशवंतरावांची सभा होती. कार्यक्रम राजकीय नव्हता पण व्यासपीठावर राजकारण्यांचीच गर्दी होती. त्या भाऊगर्दीत लेखकांना व कवींना कोण विचारतो? ते बिचारे जागा मिळेल तिथे बसले होते. काहीजण उभेच होते. इतर वक्त्यांची भाषणे झाल्यावर शेवटी यशवंतराव बोलायला उठले. भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा नामोल्लेख करू लागले. हे करीत असताना त्यांची नजर व्यासपीठावर कोणाला तरी शोधत होती. पण त्यांना अपेक्षित असलेली व्यक्ती तिथे दिसेना. शेवटी ते म्हणाले, ‘अरे, या सभेत आमचा तरुण कवी कुठे दिसत नाही?’ साहेब कोणाबद्दल बोलत आहेत हे नेतेमंडळींना समजेना. मग यशवंतरावांनीच खुलासा केला, ‘अरे, आमचा महानोर कुठे आहे?’ मग सभेत महानोरांचा शोध सुरू झाला. ते सभेत उपस्थित होते पण दूरवर पाठीमागे गर्दीत उभे होते. कार्यकर्त्यांनी धावपळ करून महानोरांना शोधून काढले. यशवंतरावांनी त्यांना व्यासपीठावर बोलावून घेतले आणि श्रोत्यांना त्यांची ओळख करून दिली. खरं तर महानोर तेव्हा तरुण होते, नवखे होते. प्रसिद्धीच्या झोतात आले नव्हते. अशा नवख्या कवीला देशाच्या गृहमंत्र्यांनी इतका मोठेपणा द्यावा याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले. अशा छोट्या-छोट्या कृतीतूनच यशवंतरावांनी साहित्यिकांचा सन्मान जपला. उदयोन्मुख राजकीय नेत्यांना एक आदर्श घालून दिला.

# सत्ता राबवणं अवघड असतं!

राजकारणी व्यक्तींना अनेक प्रकारच्या समारंभांना उपस्थित रहावे लागते. त्या त्या वेळी समयोचित भाषण करावे लागते. त्यासाठी अर्थातच अभ्यास आणि पूर्वतयारी आवश्यक असते. पण काही अपवाद वगळता अनेकांना अशी पूर्वतयारी करणे नकोसे वाटते. ते आयत्यावेळी उत्स्फूर्त भाषण करतात. त्यांचे हे उत्स्फूर्त भाषण अर्थातच विषयाला धरून नसते. त्यामुळे श्रोत्यांचा विरस होतो. यशवंतरावांना अशाप्रकारे अनावश्यक व अघळपघळ बोललेले अजिबात आवडत नसे. ते स्वतः मोजक्या शब्दांत व मुद्देसूद भाषण करीत असत. त्यांच्या भाषणात फाफटपसारा नसायचा. असाच एक प्रसंग.

मिरज येथील उद्योजक भाई ताराचंद शहा यांनी मिरज शहरात सुभाषनगर गृहनिर्माण सोसायटीची स्थापना केली. या गृहनिर्माण प्रकल्पाच्या उद्‌घाटनासाठी त्यांनी फॉरवर्ड ब्लॉकचे नेते व स्वतंत्र विदर्भाचे कट्टर पुरस्कर्ते आ. जांबुवंतराव धोटे यांना बोलावले. समारंभाचे अध्यक्ष होते यशवंतराव चव्हाण. जांबुवंतराव तेव्हा फारच लोकप्रिय नेते होते. आपल्या आक्रमक भाषणांनी ते विधानसभा दणाणून सोडायचे. यशवंतरावांच्या व जाबुवंतरावांच्या राजकीय भूमिका वेगळ्या होत्या. अशा दोन नेत्यांची भाषणे ऐकायला मिळणार म्हणून लोकांनी खूप गर्दी केली होती. जांबुवंतरावांनी अपेक्षेप्रमाणे आक्रमक भाषण केले. पण जाता-जाता त्यांनी यशवंतरावांना चिमटा काढलाच. तो कार्यक्रम राजकीय नव्हता तरीही भाषणाच्या शेवटी जांबुवंतराव म्हणाले, 'आम्ही नेहमीच सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लढत राहू. त्यासाठीच आमचा जन्म आहे. आम्हाला सत्तेचा मुळीच लोभ नाही.' शेवटचे वाक्य अर्थातच यशवंतरावांना उद्देशून होते. खरेतर आपण राजकीय भाषण करायचे नाही असे यशवंतरावांनी ठरविले होते पण जांबुवंतरावांच्या टीकेला उत्तर देणे भाग होते. अध्यक्षीय भाषण करण्यासाठी यशवंतराव उठले. संथ लयीत त्यांनी बोलायला सुरुवात केली. जांबुवंतरावांच्या भाषणाचा संदर्भ देत ते म्हणाले, 'जांबुवंतराव फारन छान बोलले. पण केवळ बोलून चालत नाही. विरोधात बोलणं सोपं असतं. सत्ता राबवणं अवघड असतं. जांबुवंतरावांनीही सतत विरोधाची भाषा न करता कधीतरी सत्ता राबविण्याचीही तयारी ठेवावी. नेहमीच विरोधात राहण्यापेक्षा सत्ता राबविण्याचं आव्हान जरूर स्वीकारावं.'

यशवंतरावांची ही गुगली भलतीच परिणामकारक ठरली. धोटेंच्या भाषणाचा श्रोत्यांवरील प्रभाव तिने पुसून टाकला. श्रोत्यांनी जोरदार टाळ्या वाजवल्या.

# हे माझं गाणं आहे !

महाराष्ट्रात अनेक थोर कवी होऊन गेले. पण एकाचवेळी बालगीत, भावगीत आणि लावण्या सारख्याच सहजपणाने लिहिणारे ग. दि. माडगुळकर हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्र वाल्मिकी होते. 'पराधिन आहे जगती पुत्र मानवाचा' हे त्रिकालबाधित सत्य गीत रामायणातून सांगणारे माडगूळकर 'बुगडी माझी सांडली गं, जाता साताऱ्याला' सारखी झकास लावणी सहज लिहित आणि तेच माडगूळकर 'नाच रे मोरा' सारखे तमाम बालकांना डोलायला लावणारे गीतही लिहू शकत असत.

गदिमांच्या या अलौकिक प्रतिभेमुळेच यशवंतराव त्यांचे निस्सीम चाहते बनले होते. गदिमांविषयी त्यांना अपार आदर आणि जिव्हाळा होता. एकदा यशवंतराव, विनायकदादा पाटील आणि इतर काही जण गप्पा मारीत बसले होते. गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. बालपण आणि शालेय जीवनातील आठवणींविषयी बोलताना यशवंतरावांनी ग.दि.माडगूळकरांनी लिहिलेले 'झुक् झुक् झुक् आगीनगाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी' हे गीत गायला सुरूवात केली. सर्वांनीच ठेका धरला. हे गाणं गाता गाता 'मामा मोठा तालेवार, रेशीम घेईल हजारवार' या ओळीपाशी यशवंतराव एकदम थांबले. त्यांचा कंठ दाटून आला. ते म्हणाले, 'विनायकराव, हे गाणं 'माझं गाणं' आहे. या गाण्याचं माझ्या व्यक्तिगत आयुष्यात खूप महत्त्व आहे. लहानपणी बिकट आर्थिक परिस्थितीमुळे मला मामाच्या गावी रहावे लागले. मामांनी आम्हाला खूप मदत केली. हे गाणं ऐकलं की मला माझं आजोळ आठवतं, मामा आठवतो, मामाने केलेली मदत आठवते आणि पुन्हा एकदा मी माझं बालपण अनुभवतो. म्हणून हे गाणं मला 'माझं गाणं' वाटतं.'

असे होते यशवंतराव, एका साध्या बालगीताने देखील हळवे होणारे!

## 'त्याच्या वाटेतून बाजूला व्हा !'

डॉ.अनिल अवचट हे विख्यात लेखक व पत्रकार आहेत. माणसांविषयी त्यांना अपार कुतुहल आहे आणि वेगवेगळ्या सामाजिक व आर्थिक स्तरातील लोकांच्या जीवनशैलीविषयी त्यांनी विपुल लिखाण केले आहे. 'साधना' साप्ताहिकासाठी डॉ.अवचट बलुतेदारांची पाहणी करीत होते. त्यांचे मित्र वसंत देशपांडे हे तेव्हा टिळक महाराष्ट्र विद्यापीठात काम करीत होते. ते डॉक्टरांना म्हणाले, 'तू करीत असलेले संशोधन समाजोपयोगी आहे. अशा प्रकारच्या संशोधनासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अनुदान देत असते. तू एक काम कर, या कामाचा प्रोजेक्ट बनवून विद्यापीठाला सादर कर.' त्याप्रमाणे अवचटांनी विद्यापीठाला प्रस्ताव सादर केला. विद्यापीठाने त्यांना संशोधनासाठी अनुदानही दिले. संशोधन पूर्ण झाल्यावर अवचटांनी तो रिपोर्ट विद्यापीठाला सादर केला. त्यावेळी एक कडक प्रतिमेचे माजी प्राचार्य तिथे कुलगुरू होते. अवचटांचा प्रबंध समाजशास्त्रीय नाही, या कारणास्तव त्यांनी तो नाकारला. साहजिकच डॉ.अवचट नाराज झाले. आपण अहोरात्र कष्ट करून तयार केलेल्या संशोधन निबंधाची विद्यापीठाने साधी दखलही घेऊ नये याचे त्यांना वाईट वाटले. असेच काही दिवस निघून गेले. मौज प्रकाशनाने तो शोधनिबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची तयारी दर्शविली, पण त्यासाठी विद्यापीठाची परवानगी आवश्यक होती. अवचटांनी जेव्हा विद्यापीठाला शोधनिबंध प्रसिद्ध करण्याची परवानगी मागितली तेव्हा तीही नाकारली गेली. हा उघड उघड अन्याय होता. अवचट खूप निराश झाले. त्यावेळी यशवंतराव टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती होते. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ते पुण्यात आलेले असताना शेवटचा उपाय म्हणून डॉ.अवचट त्यांना भेटले. प्रांजळपणे सगळी हकीकत सांगितली. त्यांना वाटले, यशवंतराव 'बघू', 'बोलू' असे मोघम आश्वासन देतील. पण यशवंतरावांनी थेट फोनच उचलला. कुलगुरूंना लावला. अत्यंत कडक शब्दात ते म्हणाले, 'तो मुलगा त्याचा निबंध बाहेर प्रसिद्ध करतोय ना? तुमची कसली हरकत ?'

कुलगुरू म्हणाले, 'पण त्यामुळे चुकीचा पायंडा (प्रेसिडेन्स) पडेल.'

'काय आतापर्यंत कधी प्रेसिडेन्स बदलले नाहीत का? हे तर चांगलं काम आहे. याच्यासाठी तुमचा तो प्रेसिडेन्स मोडा आणि त्याच्या वाटेतनं बाजूला व्हा.'

एका तरुण संशोधकाच्या समाजोपयोगी संशोधनात अडथळा निर्माण करणाऱ्या कुलगुरूंना देखील यशवंतरावांनी खडे बोल सुनावले. कारण त्यांना युवकांविषयी व नवीन ज्ञानाविषयी आस्था होती.

# मी लक्षात ठेवून येईन!

कराडच्या मातीविषयी आणि माणसांबद्दल यशवंतरावांना विशेष आपुलकी वाटत असे. आपल्या भागातला माणूस कुठेही भेटला, तरी ते आपुलकीने त्याची चौकशी करीत असत. केंद्रात मंत्री असताना एकदा विलेपार्ले येथे एका कार्यक्रमाला ते येणार होते. त्यावेळी कराडचे श्री.वामन जंगी, बाबू आपटे व के. वा. नेने हे तिघे पार्ल्यातील पार्लेश्वर सोसायटीत रहात होते. यशवंतरावांबद्दल त्यांनाही आदर व अभिमान वाटत होता. अनायासे यशवंतराव विलेपार्ल्यात येत आहेत, तर त्यांनी आपल्या घरी यावे अशी या तिघांची फार इच्छा होती. त्यांनी यशवंतरावांचे सचिव डोंगरे यांच्याशी संपर्क साधला. डोंगरेंनी परस्पर कळवले की साहेबांना वेळ नाही. ते सगळेच नाराज झाले, पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. ते यशवंतरावांना समक्ष भेटले व घरी येण्याची विनंती केली. यशवंतराव म्हणाले, 'अरे, कराडच्या माणसांनी बोलावल्यावर मी त्यांच्याकडे जाणार नाही, हे शक्य आहे का ?'

त्या तीघांनी डोंगरेंनी दिलेल्या नकाराविषयी सांगितल्यावर ते म्हणाले, 'अरे त्यांना काय माहीत कराडच्या माणसांबद्दलची माझी आपुलकी? मी लक्षात ठेवून येईन.'

त्यानुसार विलेपार्ल्याचा कार्यक्रम आटोपल्यावर यशवंतराव श्री.वामन जंगी यांच्या दोन खोल्यांच्या घरी गेले. १५-२० मिनिटे थांबले. घरातील सर्वांची आत्मीयतेने चौकशी केली. दिलखुलास गप्पा मारल्या. जुन्या आठवणींना उजाळा दिला व पुढच्या कार्यक्रमासाठी निघून गेले. आपल्या मतदारसंघातील माणसांना यशवंतराव कधीही नाराज करीत नसत. याच कारणामुळे ते आयुष्यात एकही निवडणूक हरले नाहीत.

# आपला मान आपणच राखला पाहिजे !

राजकारणाच्या मुख्य प्रवाहात असूनही यशवंतरावांचे जीवन एकांगी बनले नाही याचे कारण त्यांना इतिहास, साहित्य, शास्त्र, नृत्य, संगीत अशा अनेक क्षेत्रांमध्ये रुची होती व जिज्ञासू वृत्तीने नवे ज्ञान घेण्याची त्यांची सदैव तयारी होती. प्रत्येक क्षेत्र आणि त्या क्षेत्रातील तज्ज्ञांविषयी त्यांना डोळस आदर होता. या आदराची साक्ष देणारा हा प्रसंग.

औरंगाबाद शहरात संगीत महोत्सवाचे आयोजन केले गेले होते. यशवंतरावांच्या शुभहस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन होणार होते. त्याप्रमाणे यशवंतराव आले. महोत्सवाचे उद्‌घाटन त्यांनी केले. पण संपूर्ण उद्‌घाटनसमारंभात त्यांना काहीतरी खटकले होते. मंचकावर चाललेली राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची लुडबूड त्यांना आवडली नाही. स्टेजवर राजकारणी पुढे व कलाकार मागे असे चित्र दिसत होते. कलाकारही बिचारे कोपऱ्यात अंग चोरून, जागा मिळेल तिथे बसले होते. काहीजण उभे होते. आपल्या उद्‌घाटनपर भाषणात यशवंतरावांनी अशा कार्यकर्त्यांना फटकारले. ते म्हणाले, 'अशा कलेच्या क्षेत्रात राज्यकर्त्यांची जागा येथे व्यासपीठावर अगर रंगमंचावर नसून श्रोत्यांत कुठेतरी मागच्या बाजूला आहे. रसिक श्रोता अगर प्रेक्षक म्हणून त्याने पुढचे स्थान जरूर मिळवावे. परंतु हे स्थान प्रेक्षकांतले व श्रोत्यांतलेच असेल हे लक्षात ठेवावे, आणि कलेच्या क्षेत्रात काम करणारांनीही आपला मान स्वत:च राखला पाहिजे. सत्तेचा तिरस्कार नको, हे खरे पण सत्तेपुढे सदैव लांगुलचालन तर अजिबातच नको.'

यशवंतरावांचे हे भाषण रसिकांना व कलाकारांनाही खूप काही शिकवून गेले.

# यशवंतराव गुणगणू लागले !



एकदा यशवंतराव गाडीने कोल्हापूरहून साताऱ्याला निघाले होते. त्यांच्यासोबत एन.के.पी. साळवे होते. गाडीत लतादीदींच्या गाण्याची एक टेप लावली होती. दर्दभऱ्या आवाजात लतादीदी एक उर्दू गझल गात होत्या. यशवंतराव एकाग्र चित्ताने गझल ऐकत होते. मग त्यांनी गुणगुणायला सुरूवात केली. ते स्वत:शीच गात होते. साळवेंना आश्चर्य वाटले. कारण, यशवंतरावांना गाताना कोणीही पाहिलेले नव्हते. साळवे म्हणाले, 'साहेब, हे काय ?'

यशवंतराव म्हणाले, 'या गाण्याचा मुखडा मला फार आवडला. आपल्या प्रियतमेच्या सौंदर्याचे नायकाने केलेले वर्णन अप्रतिम आहे.'

यावर साळवेंनी पुन्हा विचारले, 'आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर हा मुखडा तुम्हाला आवडला असता का ?'

'अर्थातच आवडला असता. हा मुखडा मला तारुण्यातही आवडला असता. परमेश्वराने व निसर्गाने माणसाला आनंदी करण्यासाठी व जीवनाला अर्थ प्राप्त होण्यासाठी ज्या वस्तू उपलब्ध केलेल्या आहेत त्याचा आस्वाद घ्यायला पाहिजे. जे हे करीत नाहीत ते दांभिक आहेत, ढोंगी आहेत.'

राजकारणात राहूनही यशवंतरावांनी आपली रसिकता जपली हेच त्यांचे वेगळेपण होते.

# अभ्यास कधी सुटता कामा नये !

प्रशासन आणि राजकारण यात समतोल कसा साधावा आणि हे करीत असताना आपले ज्ञान अद्ययावत कसे ठेवावे याचा आदर्शच यशवंतरावांनी घालून दिला. त्यांचा हा आदर्श त्यांच्या पक्षातील आणि मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी मात्र घेतला नाही. ही मंडळी वैचारिकदृष्ट्या वाढली नाहीत.

एकदा असेच बोलणे चालले असताना कोणीतरी विचारले, 'आजकाल मंत्री फारशी तयारी करून सभागृहात येत नाहीत असे दिसून येते. तुम्ही यावर काय म्हणाल?' साहेब म्हणाले, 'शेवटी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मी सांगून पाहतो, विचारले तर सल्ला देतो, मार्गदर्शन करतो. मिळालेल्या संधीचा उपयोग करून न घेणारे दुर्दैवी, दुसरे काय ? मंत्र्यांनी वृत्तपत्रे वाचायला हवीत. त्यातील टिका टिप्पणी वाचून सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्या खात्याच्या फाईली नीट काळजीपूर्वक पाहून अधिकाऱ्यांशी चर्चा करायला हवी. असेंब्लीत जाताना तयारी करून जायला हवे, असे ज्युनिअर मंडळींना मी बोलावून सांगतो. काहीजण त्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करतात. बाकीचे आपल्या बुद्धीने, आपल्या मार्गाने जातात. नवनवीन पुस्तके वाचणारे, वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत मंडळींशी संपर्क ठेवून त्यांचे विचार ऐकणारे फार थोडेजण आढळतात. मराठी भाषेवर प्रभुत्व असावे, इंग्रजी व हिंदी भाषा चांगली बोलता यावी असा जाणीवपूर्वक प्रयत्न करणारे क्वचितच आढळतात. ज्ञानलालसा नसेल तर पुढे कसे जाता येईल? ज्ञानार्जन आणि अभ्यास कधी सुटता कामा नये. माझी ही बैठक कायम आहे. इतरांचीही असावी अशी इच्छा आहे.'

सर्व काळातील सर्वच राज्यकर्त्यांना हा उपदेश तंतोतंत लागू पडेल यात काही शंका नाही.

# मला त्यांना भेटलं पाहिजे !

ज्योत्स्ना भोळे या थोर भावगीत गायिका होत्या. यशवंतराव त्यांच्या गायनाचे चाहते होते. जोत्स्नाताईंचा आवाज त्यांना इतका आवडायचा की १९५८ साली साहेबांवर शस्त्रक्रिया झाली असताना त्यांना त्रास व्हायला लागल्यावर ते म्हणायचे, 'ज्योत्स्ना भोळेंचे 'माझिया माहेरा जा,' हे भावगीत लावा म्हणजे मला बरे वाटेल.' यशवंतरावांची ही (नकळत दिलेली) उत्स्फूर्त दाद कशी काय कोण जाणे, ज्योत्स्नाताईंना कोणीतरी कळविली. त्यांना खूप आनंद झाला. हा त्यांच्या गायनाचा मोठा सन्मान होता.

त्यानंतर खूप वर्षांनी केंद्रीय मंत्री असताना एकदा यशवंतराव लंडनला गेले होते. योगायोग म्हणजे ज्योत्स्ना भोळे या देखील तेव्हा लंडनमध्येच होत्या. लंडनमधील महाराष्ट्र मंडळाने यशवंतरावांचे भाषण आयोजित केले होते. या कार्यक्रमात जोत्स्नाबाईंनी महाराष्ट्रगीत गायले. साहेबांचे भाषण झाल्यावर अनौपचारिक गप्पा मारताना ज्योत्स्नाताई म्हणाल्या, 'तुम्हाला भेटण्याची माझी इच्छा आहे.' लगेच साहेबांनी सेक्रेटरीला विचारून भेटीची वेळ ठरविली. साहेब तेव्हा जीवराज मेहता यांच्याकडे उतरले होते. ज्योत्स्नाताईंना यायला पाच-दहा मिनिटे उशिर झाला. त्या आल्या तेव्हा जीवराज मेहता त्यांना म्हणाले, 'मॅडम, आपण फार उशिर केलात. आम्ही आता निघालो.'

इतक्यात यशवंतराव बाहेर आले व म्हणाले, 'नाही नाही, प्लीज, मला त्यांना पाच मिनिटे तरी भेटलेच पाहिजे. त्या महाराष्ट्राच्या श्रेष्ठ गायिका आहेत.' नंतर त्यांनी ज्योत्स्नाताईंशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली.

# ‘यशवंतरावांचा आम्हाला पाठिंबा आहे’ असं लिहा !

यशवंतरावांनी समाजसेवेसाठी राजकारण केले. विदर्भाकडे त्यांनी जाणीवपूर्वक विशेष लक्ष दिले. विकासाच्या प्रक्रियेत विदर्भ मागे पडू नये याची त्यांनी नेहमीच काळजी घेतली. १९६२ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर त्यांचा राज्यातील जनतेशी असलेला संपर्क कमी झाला, तरी त्यांनी तो तुटू दिला नाही. नागपूर येथे होणाऱ्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान ते आवर्जून विदर्भात जायचे व जनतेच्या अपेक्षा व समस्या जाणून घ्यायचे.

खासदार टी. जी. देशमुख हे विदर्भातील मोठे नेते होते. त्यांचे व यशवंतरावांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. विदर्भासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करावे यासाठी आंदोलन सुरू होते. या आंदोलना दरम्यान अमरावतीत शेतकऱ्यांची तरुण मुले पोलीसांच्या गोळीबारात ठार झाली होती. यशवंतराव त्यावेळी केंद्रीय अर्थमंत्री होते. दिल्लीत या विषयावर त्यांच्याशी चर्चा करताना टी.जी. रागाने म्हणाले, ‘विदर्भाचे स्वतंत्र राज्य आम्ही मागत होतो, ते उगीच नाही. आज आम्ही विदर्भातील दहा खासदार एकत्र येऊन कृषी विद्यापीठ विदर्भात झाले पाहिजे असे निवेदन देणार आहोत. आम्हाला ठाऊक आहे, तुम्ही काहीएक बोलणार नाही.’

‘टी.जी., तुम्ही रागात असला म्हणजे तुमच्या वाणीला बहर येतो. पण इतरांना बोलण्याची संधी द्याल की नाही?’

‘तुम्ही हेच म्हणणार की काँग्रेसची शिस्त पाळली पाहिजे व महाराष्ट्राची महान परंपरा जपली पाहिजे’ टी. जी. म्हणाले.

‘टी.जी. जरा दम खा. माझं उत्तर तुम्ही देऊ नका. विदर्भात कृषी विद्यापीठ झालं पाहिजे, असे निवेदन तुम्ही काढणार आहात ना, मग त्याच्या शेवटी लिहा, यशवंतराव चव्हाणांचा आम्हाला पाठिंबा आहे.’

निवेदनाच्या शेवटी टी. जीं. नी लिहिले की, आमच्या या मागणीस अर्थमंत्री यशवंतराव चव्हाणांचा पाठिंबा आहे. अखेरीस विदर्भात कृषी विद्यापीठ झाले. विदर्भाच्या विकासाला यशवंतरावांचा नेहमीच हातभार लागला.

# पैजेचा रुपाया !

उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर यांनी सांगितलेली ही आठवण. एकदा ते दिल्लीत यशवंतरावांच्या घरी त्यांना भेटायला गेले. किर्लोस्कर त्यावेळी नुकतेच अमेरिकेतून आले होते. अमेरिकेत तेव्हा अध्यक्षीय निवडणुकीची धामधुम सुरू होती. यशवंतराव तेव्हा परराष्ट्रमंत्री होते आणि इतर देशातील घडामोडींविषयी माहिती जाणून घ्यायला ते नेहमीच उत्सुक असत. ते किर्लोस्करांना म्हणाले, 'शंतनुराव, या निवडणुकीत निक्सन पडणार, असं माझं मत आहे.'

किर्लोस्कर म्हणाले, 'तुमचा अंदाज जर भारत सरकारच्या मतावर आधारलेला असेल, तर तो चुकणार.' यावर यशवंतराव म्हणाले, 'तुम्ही सरकारवर नेहमी टीका करता, पण यावेळी निक्सन येणार नाही असं मला वाटतं.' किर्लोस्करांचे असे मत होते की, निक्सन नक्की निवडून येणार. यशवंतरावांना ते पटेना. शेवटी दोघांमध्ये पैज लागली. निक्सन निवडून आल्यास यशवंतरावांनी किर्लोस्करांना एक रुपाया द्यायचा आणि निक्सनचा पराभव झाला तर किर्लोस्करांनी यशवंतरावांना एक रुपाया द्यायचा असे ठरले. तो विषय तिथेच संपला.

पुढे यथावकाश अमेरिकेत अध्यक्षपदाची निवडणूक झाली. निक्सन निवडून आले. किर्लोस्कर पैज जिंकले. या निवडणुकीचा निकाल लागला तेव्हा किर्लोस्कर पुण्यात होते आणि यशवंतराव दिल्लीत होते. किर्लोस्करांच्या कारखान्याचे काही अधिकारी कामानिमित्त दिल्लीला गेले होते. ते जेव्हा यशवंतरावांना भेटायला गेले, तेव्हा यशवंतरावांनी त्यांच्याबरोबर एक रुपाया पाठवून दिला आणि किर्लोस्करांना एक चिठ्ठी पाठवली त्यात लिहिले, 'निक्सन निवडून आल्यामुळे मी पैज हरलो, त्याचा हा रुपाया.'

खिलाडूवृत्ती आणि दिलेला शब्द पाळण्याची यशवंतरावांची वृत्ती हेच त्यांच्या मोठेपणाचे एक कारण आहे.

# कुठं आहेत तुझी हरणं?

वृक्षमित्र कै. धों. म. मोहिते यांच्याबद्दल यशवंतरावांना विशेष आपुलकी वाटत असे. यशवंतरावांचे आजोळ देवराष्ट्रे; आणि मोहिते यांचे वडगाव ही दोन गावे सख्ख्या भावंडांसारखी, एकमेकांना खेटून वसलेली आहेत. यशवंतरावांनी आपल्या बालपणातील बराचसा काळ त्या परिसरात व्यतीत केलेला असल्यामुळे त्या भागातील मातीविषयी आणि माणसांविषयी त्यांच्या अंतर्यामी एक प्रकारचा जिव्हाळा होता.

धों.म. मोहिते यांनी राजकाणारपेक्षा पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य दिले आणि अथक परिश्रम करून सांगली जिल्ह्यात सागरेश्वर अभयारण्य निर्माण केले. या अभयारण्याच्या प्रगतीविषयीची माहिती ते वेळोवेळी पत्राद्वारे यशवंतरावांना कळवीत असत. एका पत्रात त्यांनी यशवंतरावांना लिहिले की 'सागरेश्वर अभयारण्यात आता हरणांचा कळपसुद्धा बागडतोय आणि तो पाहण्यासाठी आपण एकदा अभयारण्यास अवश्य भेट द्यावी.' योगायोगाने त्यानंतर काही दिवसांनी यशवंतराव सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले. यावेळी त्यांनी सागरेश्वर अभयारण्यास भेट द्यायचे ठरवले. मोहितेंना खूप आनंद झाला. त्यांनी यशवंतरावांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम ठरवला. मोहितेंच्या पत्रातील हरणांच्या कळपाविषयीचा उल्लेख यशवंतरावांच्या चांगलाच लक्षात होता. अभयारण्यात आल्याबरोबर ते मोहितेंना म्हणाले, 'अरे धोंडिराम, कुठं आहेत तुझी ती हरणं? मला तर ती कुठंच दिसत नाहीत. खरंच हरणं आहेत की नुसतीच हरणं दाखवतोयस?'

ग्रामीण भागात 'हरणं दाखवणे' हा वाक्यप्रचार खोटी आशा दाखवणे या अर्थाने वापरतात. या वाक्यप्रयोगाचा चपखल उपयोग करून यशवंतरावांनी आपल्या भाषाप्रभुत्वाची प्रचितीच घडवली. उपस्थित कार्यकर्ते हास्यकल्लोळात बुडाले.

# हे योग्य नाही !

सन १९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेल्यापासून मारोतराव कन्नमवारांची अल्पशी कारकीर्द वगळता जवळपास बारा वर्षे वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी सचोटीने आणि दूरदृष्टीने महाराष्ट्राचा कारभार केला. पण १९७४ साली मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद द्यावे अशी मागणी सुरु झाली. वसंतराव विदर्भातून आले होते. विदर्भाला पुरेशी संधी मिळाली असून आता मुख्यमंत्री मराठवाड्याचा झाला पाहिजे, अशी मागणी विधीमंडळातील काँग्रेसचे सदस्यसुद्धा करु लागले. याबाबतीत यशवंतरावांची भूमिका फार महत्त्वाची होती. त्यांचे म्हणणे होते की, मराठवाड्याच्या आग्रहाचा स्वीकार आपण निश्चितपणे केला पाहिजे, पण वसंतराव नाईक यांची कारकीर्द पूर्ण झाल्यानंतर पुढील पाच वर्षांसाठी मराठवाड्याच्या नेतृत्वाचा विचार करावा. वसंतरावांनी दहा - अकरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून समर्थपणे काम केलेले असताना त्यांना एकदम दूर करणे योग्य होणार नाही. पक्षाच्या बैठकीमध्ये यशवंतरावांनी ही भूमिका मांडली, परंतु बहुसंख्य आमदारांचे मत वेगळे होते. मग मात्र यशवंतरावांनी त्यांचे व्यक्तिगत मत बाजूला ठेवले आणि बहुमताचा आदर करुन मराठवाड्याचे शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री करण्याच्या प्रक्रियेमध्ये मोलाचे सहकार्य केले.

यशवंतराव हे असे नेते होते की त्यांच्या सहकाऱ्यांनीसुद्धा त्यांची एखादी भूमिका पटली नसेल तर तसे त्यांनी स्पष्टपणे सांगावे हा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला होता.



# कलाप्रकल्प

ना. धों. महानोर हे यशवंतरावांचे लाडके कवी होते. त्यांच्या 'रानातल्या कविता' वाचून साहेबांना 'कृष्णाकाठ' आठवायचा. थोर संगीतकार पं.हृदयनाथ मंगेशकर यांनी महानोरांच्या अनेक कवितांना अप्रतिम संगीत दिले. स्वत: लतादीदींनी आपल्या अलौकिक आवाजात त्या कविता गायल्या. मंगेशकर परिवाराशी महानोरांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

एकदा लतादीदी महानोरांना म्हणाल्या, 'मुंबईत एक मोठा कलाप्रकल्प उभारावा असे मला वाटते. आपल्याकडील शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, लोकसंगीत, भावगीत व गायकीच्या क्षेत्रातील अनेक प्रयोग, घटना, गीतकार व गायकांचा इतिहास, रेकॉर्डींग वगैरे जतन करून त्याची मोठी लायब्ररी करावी. तसेच तिथं संगीताचं सगळं शिक्षण दिलं जावं. रेकॉर्डिंगचं अद्ययावत तंत्र व यंत्रसामुग्री शासनाने कमीत कमी किंमतीत लोकांना उपलब्ध करून द्यावी आणि त्याला जोडूनच कला व ललितकला यासाठी हा कलाप्रकल्प सुरू करावा अशी माझी इच्छा आहे. त्यासाठी शासनाने बांद्रा परिसरात अर्धा एकर जागा नाममात्र दराने दिली तर फार बरे होईल.'

लतादीदींची ही इच्छा महानोरांनी यशवंतरावांना सांगितली. यशवंतराव तेव्हा केंद्रात मंत्री होते. ते म्हणाले, 'लता मंगेशकर स्वत: लक्ष देऊन हा प्रकल्प करणार असतील तर त्याच्याइतकी चांगली गोष्ट कोणतीही नाही. इतर लक्षावधी लोकांनी हे काम करण्यापेक्षा, लताबाईंनी ते करण्यास फारच महत्त्व आहे.'

यशवंतरावांचा अनुकूल प्रतिसाद मिळालेला पाहून महानोर सुखावले. त्यांनी लतादीदींकडून प्रकल्पाचा लेखी आराखडा मागवला. तो यशवंतरावांना दाखवला. त्यांनी संपूर्ण आराखडा बारकाईने पाहिला व म्हणाले, 'महानोर, मी मुख्यमंत्री असताना १९६० साली रविंद्र नाट्य मंदिराला जी जागा दिली होती ती त्यावेळी जास्त वाटायची. आज पहा, ती किती अपुरी वाटते. हा कलाप्रकल्प रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन प्रमाणे सर्वांगसुंदर व्हावा असे मला वाटते. यासाठी तुम्ही शासनाकडे अर्धा एकर जागा

न मागता अडीच एकर जागा मागा. लतादीदींनी शासनाला देण्यासाठी जो प्रस्ताव तयार केला होता, त्यावर २० हजार चौरसफूट जागेची मागणी केली होती. त्याच्याच पुढे यशवंतरावांनी महानोरांना एक लाख आकडा टाकायला लावला आणि '१ लाख २० हजार चौरसफूट जागा शासनाने या प्रकल्पाला द्यावी' हे सांगण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांना फोन लावला.

कलेची कदर करणारे यशवंतराव रसिक तर होतेच, पण त्याचवेळी भविष्याचा वेध घेऊन त्याप्रमाणे पावले उचलण्याची दूरदृष्टी त्यांच्याकडे होती.



# तुझ्या उदार अंत:करणामध्ये...!

भारताचे परराष्ट्रमंत्री असताना १९७४ साली एका संस्थेच्या वार्षिक अधिवेशनासाठी यशवंतराव कौलालंपूरला गेले होते. हिल्टनमधील एका अत्यंत भव्य हॉटेलच्या चोविसाव्या मजल्यावर त्यांच्या मुक्कामाची सोय केली होती. सायंकाळच्या वेळी त्या उंच हॉटेलच्या चोविसाव्या मजल्यावरुन जगाकडे पाहताना यशवंतराव भावुक झाले. भूतकाळातील सुखदु:खांच्या आठवणींनी त्यांच्या मनात गर्दी केली. वेणूताईंच्या संगतीत काढलेले कष्टाचे, आनंदाचे क्षण त्यांना आठवले, आणि कृतज्ञतेने त्यांचे मन भरुन आले. त्या दौऱ्यात साहेबांनी वाचनासाठी जी पुस्तके नेली होती, त्यात एका इंग्लिश लेखकाचे आत्मचरित्र होते. त्यादिवशी रात्रीच्या निवांत वेळी साहेबांनी ते आत्मचरित्र वाचनासाठी हातात घेतले. पहिल्याच पानावरील अर्पणपत्रिका वाचली आणि साहेबांचे वाचन तिथेच थांबले. ती अर्पणपत्रिका म्हणजे एका फ्रेंच कलावंताने त्याच्या पत्नीला लिहिलेले चार ओळींचे पत्र होते. साहेबांना त्या ओळी खूप आवडल्या. आपल्याच मनातील भावना त्या लेखकाने शब्दांकित केल्या आहेत असे त्यांना वाटले. सत्तर वर्षांच्या त्या कर्तृत्ववान विचारवंताने आपल्या जीवनाची ही कहाणी कृतज्ञताबुद्धीने आपल्या पत्नीला अर्पण केली होती.

त्यानंतर काही दिवसांनी वेणूताईंना पाठविलेल्या पत्रात यशवंतरावांनी लिहिले, 'त्या चार ओळी मी तुझ्यासाठी इथे देत आहे. त्यातल्या भावना फक्त त्या लेखकाच्या नाहीत. माझ्या, अगदी माझ्या आहेत.'

> ''तुझ्या संगतीची साथ ही ईश्वराने दिलेली देणगी आहे. त्याच्या या कृपेच्या जाणिवेने माझे मन आकंठ भरलेले आहे. तुझ्या उदार अंत:करणामध्ये माझ्या या जाणिवेला जागा राहू दे, एवढे सांगण्यासाठीच हे पत्र लिहित आहे.''

त्यानंतर नऊ वर्षे निघून गेली. १ जून १९८३ ला वेणूताई साहेबांना सोडून गेल्या. 'सह्याद्री'ची सावली हरपली. त्यांच्या जाण्याने साहेब पुरते खचले. आपल्या जीवनाची कहाणी लिहावी असे त्यांना वाटले. पहिला भाग लिहून झाला. 'कृष्णाकाठ' या आत्मकथनाची अर्पणपत्रिका त्यांनी अशी लिहिली, 'आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी पत्नी सौ. वेणूताई हिच्या स्मृतीस.'

दु:ख हेच होते की, ही अर्पणपत्रिका वाचायला वेणूताई या जगात नव्हत्या.

# गाडी पळसखेडला वळवा!



केंद्रीय मंत्री असताना यशवंतराव एकदा मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले होते. गाडीतून प्रवास करीत असताना 'रानातल्या कविता' हे एका नवोदित कवीच्या रानकवितांचे पुस्तक त्यांच्या हातात आले. सहज म्हणून सुरूवातीच्या चार-पाच कविता त्यांनी वाचल्या आणि त्या अद्‌भूत शब्दकळेने, त्यातील नादमाधुर्याने व अर्थसौंदर्याने ते भारावून गेले. त्यांनी पुन्हा एकदा मुखपृष्ठ पाहिले - कवीचे नाव होते - 'ना.धों. महानोर'. यशवंतराव लगेच ड्रायव्हरला म्हणाले, 'अरे! गाडी पळसखेडला वळवा.'

ड्रायव्हरला काही कळेना. साहेबांचे तर पळसखेडला भाषण नाही, कार्यक्रम नाही. पण साहेब सांगतात म्हणून ड्रायव्हरने गाडी पळसखेडला वळवली आणि यशवंतरावांनी कवी ना. धों. महानोरांना बोलावून आपल्या गाडीतच घेतले. त्यांचे पाठ थोपटून कौतुक केले. त्यांनी लिहिलेल्या रानकविता त्यांच्याकडून वाचून घेतल्या. दुसऱ्या दिवशी सगळ्या मराठी वृत्तपत्रांत ना. धों. महानोरांचे नाव झळकले. आज महानोरांच्या कविता महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचल्या आहेत. पण या कवितांचा पहिला महान रसिक म्हणून यशवंतरावांचा उल्लेख करावा लागेल.

# तुम्ही महाराष्ट्राची मोठी सेवा केलीय !



कला आणि कलावंत यांच्याबद्दल यशवंतरावांना विशेष प्रेम होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी नाट्यकला, लोककला व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या उत्कर्षासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. पुढे दिल्लीला गेल्यावरसुद्धा त्यांनी ही परंपरा जपली. महाराष्ट्रातील एखाद्या कलावंताने राष्ट्रीय पातळीवर नाव कमावले तर साहेबांना खूप आनंद व्हायचा. ते संबंधित कलावंताला दिल्लीतील आपल्या निवासस्थानी बोलावून त्यांचा सन्मान करायचे.

ज्येष्ठ चित्रपट अभिनेत्री सुलोचना यांना 'प्रपंच' या चित्रपटातील भूमिकेबद्दल अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ यशवंतरावांनी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी विविध क्षेत्रांतील मान्यवरांना मेजवानी दिली. त्याप्रसंगी यशवंतराव म्हणाले, 'सुलोचनाबाईंनी महाराष्ट्राची फार मोठी सेवा केली आहे.'

यावर सुलोचनाबाई संकोचून म्हणाल्या, 'माझे क्षेत्र अभिनयापुरते मर्यादित आहे. महाराष्ट्राची खरी सेवा तुम्ही केली. मी असे काय केले ?'

यशवंतराव म्हणाले, 'तुमची भूमिका बघून आपली थोरली बहीण, भावजय, आई तुमच्यासारखी असावी अशी भावना रसिकांच्या मनात उत्पन्न होते... हीच तुम्ही केलेली सेवा होय.'

# कुरूप बदकाची गोष्ट !

परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर यशवंतरावांना वारंवार विदेश दौऱ्यावर जावे लागे. प्रवासाची दगदग सोसवत नसल्यामुळे वेणुताई सहसा त्यांच्याबरोबर जात नसत. वेणूताईंना सोडून परदेशात जाताना यशवंतरावांना अपार वेदना होत, पण त्यांचा नाईलाज होता. अशावेळी मन रिझविण्यासाठी यशवंतराव प्रवासात भरपूर वाचन करीत असत. देशातील रूक्ष राजकीय वातावरणापासून दूर गेल्यावर त्यांचे मन प्रसन्न व्हायचे. यशवंतरावांना मद्याचे किंवा सिगारेटचे व्यसन नव्हते. त्यांच्या गरजा खूपच मर्यादित होत्या. अनावश्यक भेटीगाठी ते शक्यतो टाळत असत. खरेदी करण्याचीही त्यांना हौस नव्हती. त्यांना फक्त दोनच गोष्टी मनापासून आवडायच्या- प्रेक्षणीय स्थळे पाहणे आणि भरपूर वाचन करणे.

असेच एकदा ते डेन्मार्क देशाच्या दौऱ्यावर होते. ओडेन्स या छोट्या गावाजवळून जात असताना त्यांना अचानक हॅन्स ख्रिश्चन अँडरसनची आठवण झाली. लहान मुलांसाठी सोप्या भाषेत आशयगर्भ कथा लिहिणाऱ्या अँडरसनच्या अनेक कथा यशवंतरावांनी वाचल्या होत्या. त्याने लिहिलेली एका कुरूप बदकाची गोष्ट तर त्यांची आवडती कथा होती. प्रतिभावंत मराठी कवी ग.दि. माडगूळकर यांनी या कथेवर आधारित 'तो राजहंस एक' ही तितकीच सुंदर कविता लिहिली होती.

ओडेन्स गावाजवळून जाताना यशवंतरावांना अँडरसन आठवला, राजहंस आठवला आणि गदिमासुद्धा आठवले. बरोबरच्या लोकांना ते म्हणाले, 'अरे, एका महान लेखकाच्या जन्मभूमीला भेटण्याचा योग आज जुळून आला आहे. तो चुकवून चालणार नाही.' आणि मग त्यांनी ओडेन्स गावाला भेट दिली. अँडरसनने त्याच्या कथांमधून चित्रित केलेला निसर्ग यशवंतरावांनी प्रत्यक्ष पाहिला. त्यांना अपार आनंद झाला.

# मी फक्त नेत्रसुखासाठी आलो आहे!

परराष्ट्रमंत्री असताना युनोच्या अधिवेशनात भाग घेण्यासाठी यशवंतराव अमेरिकेला गेले होते. न्युयॉर्क शहरात त्यांचा मुक्काम होता. एकेदिवशी दुपारी न्युयॉर्क शहरात फेरफटका मारण्यासाइी यशवंतराव बाहेर निघाले. सोबत शरद काळे होते. फिरता फिरता एका चित्रप्रदर्शनाजवळ ते आले. एका नामवंत चित्रकाराने काढलेली अनेक अप्रतिम चित्रे तिथे प्रदर्शनासाठी व विक्रीसाठी ठेवली होती. त्यांची किंमतही तशीच होती. दहा हजार डॉलर्सच्या खाली एकाही चित्राची किंमत नव्हती. इच्छा असूनही यशवंतराव ती चित्रे विकत घेऊ शकत नव्हते. कारण त्यांच खिसा रिकामा होता. पण डोळे भरून ते प्रत्येक चित्र पहात होते. त्या प्रदर्शनातले सगळ्यात स्वस्त व यशवंतरावांना आवडलेले चित्र होते एकशेवीस डॉलर्सना. म्हणजे त्यावेळचे एक हजार दोनशे रुपये. पण यशवंतरावांकडे तेवढेदेखील पैसे नव्हते. पुढे गेल्यावर त्यांना जुन्या कोरीव लाकडी वस्तूंचे दुकान दिसले. विविध आकाराच्या त्या सुबक मुर्ती पाहून यशवंतराव फारच प्रभावित झाले. कितीतरी वेळ ते पहातच राहिले. शेवटी दुकानदार म्हणाला,

'काही घेणार का सर?'

यशवंतराव चटकन भानावर आले व म्हणाले, 'मी फक्त नेत्रसुखासाठी आलो आहे.'

दुकानदार सज्जन होता. तो म्हणाला, 'जरूर पहा. आता पैसे नसतील तरी घेऊन जा. भारतात गेल्यावर चेकने पैसे पाठवून द्या. माझा तुमच्यावर विश्वास आहे.'

यशवंतरावांनी दुकानदाचे आभार मानले व म्हणाले, 'भविष्यात माझ्याजवळ एवढे पैसे आले तर मी जरुर परत येईन.' आवडलेले एक साधे चित्र विकत घेण्याइतकही यशवंतरावांची ऐपत नव्हती. यावर आजची पिढी विश्वास ठेवेल काय? तीस वर्षे मंत्रीपदावर राहिलेल्या यशवंतरावांची ही 'श्रीमंती' अविश्वसनीय आहे खरी!

# मागेल त्याला शिक्षण द्या !

सन १९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले. त्यानंतरचे त्यांचे सगळे राजकीय जीवन यमुनेच्या काठीच गेले. पण महाराष्ट्राकडे त्यांचे बारीक लक्ष होते. अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने ते राज्याच्या वेगवेगळ्या भागात फिरत असत. एकदा केंद्रीय मंत्री असताना श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील सी.डी. जैन कॉमर्स कॉलेजच्या उद्‌घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ते आले होते. कार्यक्रमात आधीच्या वक्त्यांनी शाळेला सरकारी जमीन मिळण्यात नियमाची आडकाठी कशी निर्माण होते आणि शिकलेल्या मुलांची बेकारी कशी वाढतेय हे प्रश्न मांडले.

चव्हाण साहेब भाषणासाठी उठले. अत्यंत समयोचित असे भाषण त्यांनी केले. भाषणाच्या शेवटी अगोदरच्या वक्त्यांनी मांडलेल्या मुद्यांचा परामर्श घेताना ते म्हणाले, 'महाराष्ट्र सरकारला यशवंतराव चव्हाणांचा निरोप सांगा की, शैक्षणिक संस्थांना सरकारी जमीन देताना नियम आडवे येत असतील तर त्यात दुरूस्ती करा, पण जमिनी द्या. तुम्हाला जमीन मिळाली नाही तर मला पत्र द्या.' सुशिक्षित बेरोजगारांविषयी ते म्हणाले, 'मुलं शिकली तर बेकार राहणार नाहीत आणि न शिकलेल्या बेकारांपेक्षा शिकलेले बेकार मला आवडतील. ते विचार करतील, आंदोलन करतील आणि शासनाकडून हवं ते मिळवतील, प्रसंगी शासनसुद्धा बदलतील. प्रत्येक मुलानं शिकलं पाहिजे. मागेल त्याला शिक्षण द्या. हेलपाटे मारायला लावू नका. आणि तुम्हाला सांगतो, शिक्षणासाठी इमारतीची गरज असतेच असे नाही. रविंद्रनाथांचे शांतीनिकेतन उघड्या आकाशाखाली, झाडांच्या सान्निध्यात आहे. इन्स्पेक्शन इमारतींचे नाही तर बुद्धीचे करा. सुंदर इमारतींमधून सुंदर ज्ञान घेऊन मुले बाहेर पडली तरच त्याला अर्थ आहे.'

महाराष्ट्राच्या व देशाच्या विकासासाठी शिक्षण किती महत्त्वाचे आहे याची पूर्ण जाणीव यशवंतरावांना होती. शिक्षणावर खर्च केलेला पैसा ही चैन नसते, तर उज्वल भविष्यासाठीची ती तरतूद असते हे यशवंतरावांनी ओळखले होते.

# तत्त्वनिष्ठा

सन १९७५ सालचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कराड येथे घ्यायचे ठरले. तो काळ राजकीय अशांततेचा होता. देशात आणीबाणी चालू होती. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी विख्यात विदुषी दुर्गा भागवत व कथाकार वामन चोरघडे हे दोन प्रमुख साहित्यिक निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते.

दुर्गा भागवतांचा आणीबाणीला कट्टर विरोध होता, आणि यशवंतराव तर केंद्रीय परराष्ट्रमंत्री होते. साहजिकच वामनराव चोरघडे यांची अध्यक्षपदी निवड होणे यशवंतरावांसाठी सोयीचे ठरणार होते, कारण संमेलनाचे स्वागताध्यक्ष स्वत: यशवंतरावच होते. स्वागत मंडळाच्या सर्व सदस्यांना मतदानाचा अधिकार होता. यशवंतरावांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सुचविले असते तर चोरघडे नक्कीच निवडून आले असते. पण त्यांनी या निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कसलाही हस्तक्षेप केला नाही. निवडणूक झाली आणि दुर्गा भागवत विजयी झाल्या. बहुमताने दिलेला हा कौल यशवंतरावांनी सहजपणे स्वीकारला व तो कार्यवाहीतही आणला. लोकशाहीची प्रतिष्ठा कशी राखायची असते याचा जणू धडाच यशवंतरावांनी घालून दिला.



वामन चोरघडे



दुर्गा भागवत

# मी ते चित्र पाहिले!

अनंतराव माने हे मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे निर्माते-दिग्दर्शक होते. त्यांचे अनेक चित्रपट रौप्यमहोत्सवी ठरले. त्यांनी दिग्दर्शित केलेला 'सांगत्ये ऐका' हा चित्रपट तर प्रचंड लोकप्रिय झाला. या चित्रपटाचा शतकमहोत्सवी शो पाहण्यासाठी अनंतरावांनी यशवंतरावांना बोलावले. यशवंतरावांचीही खूप इच्छा होती, पण कामाच्या रेट्यामुळे ते जाऊ शकले नाहीत. अनंतरावांना वाईट वाटले. यशवंतरावांना कलेची व कलावंतांची कदर नाही, असे त्यांचे मत झाले. त्यानंतर काही वर्षांनी अनंतराव पाटील, शंकर पाटील, भालचंद्र नेमाडे वगैरे लेखक दिल्लीला गेले होते. दिल्लीत आलोच आहोत तर यशवंतरावांची भेट घ्यावी असे सर्वांना वाटले. त्यांनी साहेबांना फोन केला. साहेबांनी सर्वांनाच घरी येण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले. रात्री नऊची वेळ ठरली. यशवंतरावांच्या घरात प्रवेश केल्यावर साहेबांनी सर्वांचे स्वागत केले. 'या, या, अनंतराव,' असे म्हणून अनंतरावांना प्रेमाने खांद्यावर हात ठेवून जवळ बसवून घेतले आणि म्हणाले, 'अनंतराव, तुमचा आमच्यावर राग आहे. ' अनंतराव गोंधळले. त्यांना काही आठवेना. पण साहेब पुढे म्हणाले, 'तुमचं 'सांगत्ये ऐका' चित्रपटाचं शतकमहोत्सवी निमंत्रण मी नाकारलं म्हणून तुम्ही रागावला होता. पण खरोखरच कामाच्या रगाड्यात मला येणं जमलं नाही. तुमची निराशा केल्याची खंत मनात राहून गेली होती म्हणून वेळात वेळ काढून कराडच्या मुक्कामात मी कुणालाही न कळवता ते चित्र पाहिले. मला खूप आवडले. प्रत्यक्ष खेडेगांव, त्यातील समस्या, बारकावे यांचा साक्षात्कार एका मराठी दिग्दर्शकाने घडवला याचा अभिमान वाटला.' असे म्हणून साहेबांनी पुन्हा एकदा अनंतरावांचा खांदा थोपटला. अनंतरावांचे डोळे पाण्याने डबडबले. पटकन् त्यांनी यशवंतरावांचे पाय धरले. आठ-नऊ वर्षे मनात रुतून बसलेल्या गैरसमजाचा अश्रूवाटे निचरा झाला होता.

# भाषणस्वातंत्र्य

सन १९७५ साली कराड येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. संमेलनाच्या अध्यक्षपदी दुर्गा भागवत यांची निवड झाली होती. स्वागताध्यक्ष या नात्याने संमेलनाची पूर्ण जबाबदारी यशवंतरावांकडे होती. ते त्यावेळी केंद्रात मंत्री होते. या संपूर्ण संमेलनात यशवंतराव प्रेक्षकांमध्ये बसून होते. त्यावेळी देशात आणीबाणी चालू होती. पंतप्रधान इंदिरा गांधी व काँग्रेस पक्षाच्या विरोधात जनमत वाढत चालले होते. आणीबाणी लादणाऱ्या सरकारमध्ये यशवंतराव मंत्री होते तर दुर्गाबाई आणीबाणीच्या कट्टर विरोधक होत्या. दुर्गाताईंचे अध्यक्षीय भाषण जवळपास संपूर्णपणे आणीबाणीच्या विरोधात होते. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये यशवंतरावांकडे पाहून त्या आवेशाने म्हणाल्या, 'जे आणीबाणीचे समर्थक आहेत, ते देशाचे शत्रू आहेत.' साहेबांच्या शेजारी बसलेले एक नेते म्हणाले, 'बाई फारच जहाल बोलत आहेत. मला वाटतं त्या मर्यादा ओलांडत आहेत.'

यावर शांतपणे साहेब म्हणाले, 'बोलण्याचा त्यांचा अधिकार आहे. तो त्यांनी बजावलेला आहे. त्याबद्दल मला वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही.'

एवढेच नव्हे तर भाषण संपल्यावर यशवंतरावांनी मंचाजवळ जाऊन दुर्गा भागवतांना नमस्कार करुन, भोजनासाठी भोजनगृहाकडे चलण्याची विनंती केली. भाषणस्वातंत्र्यावरची यशवंतरावांची श्रद्धा अशी कृतीशील होती. ती वरवरची नव्हती.



# आबा चेअरमन झाले पाहिजेत!

शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी सहकारी संस्था आवश्यक आहेत हे ओळखून यशवंतरावांनी राज्यात सहकार चळवळीला उत्तेजन दिले. अनेक सहकारी कारखाने व सहकारी बँका स्थापन झाल्या.

सातारा जिल्हा सहकारी बँकेची स्थापना १९५० साली झाली. यशवंतरावांच्या मार्गदर्शनाखाली या बँकेने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विकासाचे नवे पर्व सुरू केले. यशवंतरावांचे विश्वासू मित्र व ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक किसन वीर अनेक वर्षे बँकेचे संचालक म्हणून काम पहात होते. यशवंतरावांचे जावई दत्ताजीराव सूर्यवंशी हे देखील सलग पंधरा वर्षे जिल्हा बँकेचे संचालक होते. त्यांची लक्ष्मी सेंट्रल कोऑपरेटीव्ह बँक त्यांनी जिल्हा बँकेत विलिन केली. त्यामुळे बँकेचे भागभांडवल वाढले. बँकेची स्वतःच्या मालकीची भव्य इमारत उभी राहिली. दत्ताजीरावांचे बँकेसाठीचे योगदान लक्षात घेता यशवंतराव त्यांना बँकेचे चेअरमनपद देतील असे सर्वांना वाटत होते. दत्ताजीरावांचीही चेअरमन होण्याची इच्छा होती. विशेष म्हणजे त्यावेळच्या १५ पैकी ९ सदस्यांचा त्यांना पाठिंबाही होता. फक्त यशवंतरावांच्या संमतीचा अवकाश होता. पण साहेबांच्या मनात काही वेगळेच होते. यावेळी किसन वीर यांनी बँकेचे चेअरमन व्हावे अशी साहेबांची इच्छा होती. दत्ताजीरावांचे प्रयत्न चालू आहेत हे त्यांना समजले. साहेब अस्वस्थ झाले. एका बाजूला जावई तर दुसऱ्या बाजूला जिवलग मित्र. त्यांनी निर्णय घेतला. दत्ताजीरावांना पुण्याला बोलावून घेतले व म्हणाले, 'जावईबापू यावेळी किसनवीर आबा बँकेचे चेअरमन झाले पाहिजेत. तुमचे मत त्यांना द्या.' प्रश्न मिटला. खुद्द दत्ताजीरावच जर आबांना मत देणार असतील तर निवडणुकीचा प्रश्न येतोच कुठे? दत्ताजी रावांनीही साहेबांचा आदेश प्रमाण मानून आबांना पाठिंबा दिला. आबा चेअरमन झाले. व्हाईस चेअरमनपदी दत्ताजीरावांची निवड झाली. यशवंतरावांना समाधान वाटले.

# विचारस्वातंत्र्याचा आदर



सन १९७५ साली कराडला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले गेले होते. त्यावेळची परिस्थिती मोठी विचित्र होती. देशात आणीबाणी चालू होती. आणीबाणीला प्रखर विरोध करणाऱ्या दुर्गा भागवत या संमेलनाच्या अध्यक्षा होत्या आणि स्वागताध्यक्ष होते यशवंतराव चव्हाण. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन होणार होते. दुर्गाताई आणि लक्ष्मणशास्त्री जोशी आणीबाणीच्या विरोधात होते आणि यशवंतराव आणीबाणी जाहीर करणाऱ्या सरकारमधील एक महत्त्वाचे मंत्री होते. अशा परिस्थितीत हे संमेलन अयशस्वी होईल असेच अनेकांना वाटत होते. सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते अस्वस्थ होते. काही अनुचित घडू नये यासाठी प्रयत्नशील होते. तर्कतीर्थांनी त्यांचे उद्‌घाटनाचे भाषण लिहून आणले होते. आणीबाणीत काही गोष्टी बदलल्या पाहिजेत, असे विचार त्यांनी त्यात मांडले होते. तर्कतीर्थांच्या भाषणातील तो भाग वृत्तपत्रात कोठेही येऊ नये असे आदेश निघाले. तर्कतीर्थांचे भाषण सुरू होण्यापूर्वी किसन वीर मंचकावर गेले व तर्कतीर्थांना हळूच म्हणाले, 'आणीबाणीवर तुमच्या भाषणात जी टीका आहे, ती काढता येणार नाही का ?'

तर्कतीर्थ म्हणाले, 'नाही !'

किसन वीर नाराज होऊन यशवंतरावांकडे गेले आणि म्हणाले, 'शास्त्री माझे ऐकत नाहीत. तुम्ही त्यांना सांगता का ?'

यशवंतराव म्हणाले, 'मी शास्त्रीजींना सांगू शकत नाही. त्यांचे भाषण आपण बंद करू शकत नाही.'

किसन वीरांसह अनेक कार्यकर्ते नाराज झाले, पण त्यांची नाराजी ओढवूनसुद्धा यशवंतरावांनी विचारस्वातंत्र्याचा आदर केला. स्वत: तर्कतीर्थांनीच ही आठवण सांगितली आहे.

# हे मला आवडले नाही !

सन १९७५ मध्ये लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी निमित्त पुण्यात टिळक स्मारक मंदिरात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे व्याख्यान होते. अध्यक्ष होते यशवंतराव चव्हाण. त्यावेळी वसंतराव थोरात पुण्याचे महापौर होते. व्यासपीठावर ते यशवंतरावांच्या शेजारीच बसले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष असूनही यशवंतरावांनी अगोदर भाषण केले. ते म्हणाले, 'आपण सर्वजण तर्कतीर्थांचे भाषण ऐकण्यासाठी जमलेले आहोत. त्यांचा मोठेपणा लक्षात घेऊन मी माझे भाषण अगोदर करतो.'

भाषण करताना यशवंतरावांनी आपले बूट बाजूला काढून ठेवले होते. भाषण संपल्यावर नकळत यशवंतराव त्यांच्या जागेवर येऊन बसले. विचारांच्या तंद्रीत असल्याने पायात बूट घालायचे राहून गेले. बूट माईक शेजारीच राहिले. ही गोष्ट महापौरांच्या लक्षात आली. ते उठले आणि त्यांनी माईकजवळ जाऊन यशवंतरावांचे बूट आणून दिले. साहेबांविषयी वाटणाऱ्या निस्सीम भक्तीभावामुळेच त्यांनी ही कृती केली होती. पण यशवंतरावांना हे आवडले नाही.

कार्यक्रम संपल्यानंतर गाडीत बसल्यावर यशवंतराव महापौरांना म्हणाले, 'वसंतराव, तुझे माझे संबंध काहीही असले तरी तू बूट उचलायला नको होते. असे करता कामा नये.'

महापौर म्हणाले, 'साहेब तुमच्याबद्दल आम्हाला इतका आदर आहे, की तुमचे बूट उचलण्यात मला कमीपणा वाटत नाही. उलट आनंदच वाटतो.'

'तरीही मला हे आवडलेले नाही. तू महापौर आहेस. लोकांच्यासमोर तू असे वागायला नको होते. आपला महापौर मंत्र्याचे बूट उचलतो, हे पुणेकरांना मुळीच आवडणार नाही. सार्वजनिक जीवनात या गोष्टीचं भान राखत जा.'

निष्ठा आणि लाचारी यातला फरक यशवंतरावांनी महापौरांच्या लक्षात आणून दिला आणि तो त्यांच्या चांगलाच लक्षात राहिला.

# मायेची भाकर

यशवंतराव केंद्रात मंत्री असताना एकदा कराडच्या दौऱ्यावर आले होते. सर्किट हाऊसवर त्यांचा मुक्काम होता. दुपारी ज्येष्ठ नेते भाई माधवराव बागल यशवंतरावांना भेटण्यासाठी कोल्हापूरहून मोटारीने आले. साहेबांचे स्वीय सहाय्यक श्रीपाद डोंगरे यांनी माधवराव आले असल्याची वर्दी साहेबांना दिली. यशवंतराव तात्काळ बाहेर आले. माधवरावांचे स्वागत करून त्यांना आत घेऊन गेले. दोघांच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात सहज यशवंतरावांचे लक्ष मैदानातील एका झाडाकडे गेले. त्या झाडाखाली एक वृद्ध स्त्री उभी होती. यशवंतरावांनी तात्काळ त्या स्त्रीला ओळखले. ते माधवरावांना म्हणाले, 'माधवराव, तुम्ही बसा, मी लगेच परत येतो.' आणि उठून अनवाणी पायानेच चालत यशवंतराव या वृद्ध स्त्रीकडे गेले.

तिला वाकून नमस्कार केला. म्हातारीने यशवंतरावांच्या दोन्ही गालावरून हात फिरवून त्यांची दृष्ट काढल्यासारखे केले आणि फडक्यात गुंडाळलेली एक पुरचुंडी यशवंतरावांच्या हातात दिली. साहेबांनी त्याची आपुलकीने चौकशी केली. पुन्हा एकदा नमस्कार केला व परत आले. ती पुरचुंडी आतल्या खोलीत नेऊन ठेवली आणि पुन्हा माधवरावांशी गप्पा सुरू केल्या. इतका वेळ हा सारा प्रकार पाहणारे माधवराव बागल मात्र अस्वस्थ झाले. यशवंतरावांसारखा केंद्र सरकारमधील एक मोठा मंत्री एका साध्या वृद्धेला भेटण्यासाठी अनवाणी चालत जातो, तिला आदरपूर्वक नमस्कार करतो, तिने दिलेली एका शिदोरी मोठ्या श्रद्धेने घेऊन येतो हे त्यांना खटकले. यशवंतरावांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा जपली पाहिले असे त्यांना वाटले आणि त्यांनी तसे बोलूनही दाखवले.

यशवंतराव किंचित हसून म्हणाले, माधवरावजी, मघाशी झाडाखाली उभी होती ती वृद्ध स्त्री माझ्या आईची मैत्रीण आहे. मी कराडमध्ये शिकत असताना ती अधूनमधून आमच्या घरी यायची. येताना भाकरी बांधून आणायची. माझी आई व ती एकत्र भाकरी खात असत. त्यावेळी मी तिथे असलो तर मलाही भाकरी मिळायची. एकदा अशीच न्याहारी करताना आई तिला म्हणाली, 'यशवंताला भाकरी आवडते. मी आता थकले.

उद्या असेन, नसेन. पण तू त्याला माझी म्हणून भाकरी देत जा. मला समाधान होईल.' या मावशीने माझ्या आईचा शब्द अक्षरशः पाळला आहे. मी कराडात येणार आहे असे तिला समजले तर ती खेड्यातून भाकरी घेऊन येते मला देते आणि समाधानाने परत जाते. ज्यादिवशी तिची भाकरी मला मिळते त्यादिवशी जेवताना अगोदर मी तिची भाकरी खातो आणि मगच ताटातील इतर पदार्थांना हात लावतो. ती वृद्धा मला आईच्या ठिकाणी आहे. माधवरावांच्या डोळ्यात अश्रू दाटले. सद्‌गदित आवाजाने ते म्हणाले, 'मातृप्रेम काय असते याचे साक्षात दर्शन आज मला घडले.'



# तू राज्याचा मंत्री आहेस !

ज्येष्ठ नेते कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी सांगितलेली ही आठवण. मा.वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात उद्योग व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री म्हणून कल्लाप्पाण्णांचा समावेश झाला. मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर यशवंतरावांचे आशीर्वाद घेण्यासाठी कल्लाप्पाण्णा दिल्लीला गेले. यशवंतरावांनी त्यांचे अगत्याने स्वागत केले. मंत्री म्हणून काम करीत असताना फायलींचे अवलोकन कसे करावे, नोंदी कशा कराव्यात, टिपणे कशी काढावी वगैरे बारकावे यशवंतरावांनी त्यांना समजावून दिले. सत्तेची खुर्ची ही सेवेची संधी असते, म्हणून समाजातील शेवटचा माणूस डोळ्यासमोर ठेवून सत्ता राबवावी असे सांगितले. इतरही काही विषयांवर चर्चा झाली आणि कल्लाप्पाण्णा जायला उठले. त्यांना निरोप देण्यासाठी यशवंतराव स्वत: उठून दरवाज्यापर्यंत आले. कल्लाप्पाण्णा संकोचून गेले. आपण इतके नवीन आणि अननुभवी असतानाही यशवंतराव आपणाला निरोप द्यायला दरवाजापर्यंत आले या गोष्टीचे त्यांना अप्रुप वाटले. यशवंतरावांनी ते ओळखले. ते हसून म्हणाले, 'किती झाले तरी, तू एका राज्याचा मंत्री आहेस. तुझी प्रतिष्ठा सांभाळणे हे माझे कर्तव्य आहे.'

मनाचा हा मोठेपणा मूळचाच असावा लागतो. त्याचे सोंग फार काळ करता येत नाही. अकृत्रिम आत्मियता हे यशवंतरावांच्या जीवनाचे आधारभूत तत्त्व होते.

# ही आमची संस्कृती नाही!

सन १९७७ साली आणीबाणी उठली. देशात लोकसभेच्या निवडणुका लागल्या. यशवंतरावांचे प्रचार दौरे सुरू झाले. एका शहरात त्यांची सभा होती. त्याच शहरात आदल्या दिवशी विरोधी पक्षाच्या उमेदवाराची प्रचारसभा झाली होती. त्या सभेत एका नेत्याने यशवंतरावांवर बेताल टीका केली. वाट्टेल ते आरोप करून त्यांची मानखंडना केली. दुसऱ्या दिवशी यशवंतरावांची सभा सुरू होण्यापूर्वी एक कार्यकर्ता साहेबांना म्हणाला, 'साहेब, आजच्या सभेत याचे उत्तर द्या. चांगला टोल्यास टोला हाणा.'

पण यशवंतराव हसले व म्हणाले, 'गांधी-नेहरूंच्या काँग्रेसने मला शिव्या द्यायला शिकवले नाही. शिव्या देणे ही आमची संस्कृती नाही.'

त्या प्रचारसभेत यशवंतरावांनी कालच्या प्रचार सभेतील टीकेचा उल्लेखही न करता भारतापुढील समस्यांचे विवेचन केले. विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा आदरपूर्वकच उल्लेख केला. अशा छोट्या छोट्या प्रसंगांतूनच यशवंतरावांनी कार्यकर्त्यांवर संस्कार केले.



# विरोधासाठी विरोध नाही !



सन १९७७ साली आणीबाणी संपल्यावर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाचा पराभव झाला व जनता पक्षाचे सरकार आले. यशवंतराव लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते झाले. गेली तीस वर्षे ते सत्तेत होते. आता प्रथमच विरोधी बाकावर बसण्याची वेळ त्यांच्यावर आली. तरीही ही नवी भूमिका ते चोख बजावत होते. त्यावेळी मधु दंडवते रेल्वेमंत्री होते. दंडवतेंनी एकदा संसदेत रेल्वेचे बजेट मांडले. त्यावेळी बजेटसंबंधी विविध नेत्यांची भाषणे ऐकण्यासाठी महाराष्ट्रातील युवा नेते शरद पवार गॅलरीत बसले होते. दंडवतेंनी रेल्वे प्रवासाचे दर वाढवले होते. दरवाढीचा प्रस्ताव बरेच दिवस देशापुढे होता पण निवडणुका जवळ आल्यामुळे गरज असूनही काँग्रेसच्या सरकारने दर वाढवले नव्हते. दर वाढविणे आवश्यक आहे हे यशवंतरावांना माहीत होते. पण ते आता विरोधी पक्षाचे नेते होते. बजेट सादर केल्यानंतर विरोधी पक्षाच्या नेत्याची प्रतिक्रिया घ्यायला पत्रकार थांबतात. चव्हाण साहेब काय प्रतिक्रिया देतात हे ऐकण्यासाठी शरद पवार गॅलरीतून उठून त्यांच्याकडे निघाले. पण ते तिथे पोहोचण्यापूर्वीच यशवंतरावांनी प्रतिक्रिया द्यायला सुरूवात केली होती. ते म्हणाले, 'दर वाढविण्याच्या निर्णयामुळे लोकांना यातना होतील, पण हे करायला पाहिजे होते. कारण हे केल्याशिवाय गत्यंतर नव्हते आणि म्हणून त्यांनी हे केलेले आहे.'

नंतर यशवंतरावांच्या गाडीतून त्यांच्या घरी जाताना शरदराव म्हणाले, 'साहेब, तुम्ही विरोधी पक्षाचे नेते म्हणून, 'सामान्य माणसाच्या दृष्टीने दरवाढ व्हायला नको होती,' अशी प्रतिक्रिया द्यायला हवी होती.

तेव्हा यशवंतराव म्हणाले, 'शरद, केवळ विरोधासाठी विरोध करणे मुळीच बरोबर नाही. प्रशासनाचे स्वतःचे काही प्रश्न असतात. शेवटी राज्य चालविताना काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात.'

# तो माझा रस्ता नाही !

सन १९७७ साली निलम संजीव रेड्डी यांची भारताच्या राष्ट्रपतीपदी निवड झाली. या निवडणुकीत यशवंतरावांनी त्यांना खूप सहकार्य केले होते. म्हणून यशवंतरावांविषयी रेड्डींना विशेष आस्था होती. आणीबाणी उठल्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला व जनता पक्षाचे सरकार आले. पण दोन वर्षांतच अंतर्गत वादामुळे ते गडगडले. या अस्थिरतेच्या काळात राष्ट्रपतींनी त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांना भेटीला बोलावले व म्हणाले, 'चव्हाणांना पंतप्रधान होण्याची संधी आहे. मी त्यांना पंतप्रधानपदाची शपथ देतो. त्यांना सरकार स्थापनेचं निमंत्रण देणारं पत्र देतो. त्यांनी मला बहुमताचं पत्र आणून द्यावं.' त्याप्रमाणे राष्ट्रपतींनी यशवंतरावांना पत्रही पाठवलं. यशवंतराव तेव्हा काँग्रेसमध्ये नव्हते. त्यांनी बहुमत मिळविण्यासाठी तीन दिवस प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा त्यांना मिळाला नाही. पुढे काय करायचे याची चर्चा करण्यासाठी महाराष्ट्रातील नेते यशवंतरावांच्या घरी जमले. शरद पवार म्हणाले, 'तुम्ही राष्ट्रपतींना सरकार स्थापनेचा दावा करणारं पत्र द्या. पंतप्रधानपदाची शपथ तर घ्या. नंतर आपण बहुमत सिद्ध करू.'

पण यशवंतरावांनी ते मान्य केलं नाही. ते म्हणाले, 'माझ्याकडे बहुमत नाही. मी सरकार बनवणार नाही.' आणि त्यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहून तसं कळवलं. दुसऱ्या दिवशी राष्ट्रपतींनी पुन्हा शरद पवारांना बोलावून घेतलं व म्हणाले, 'तुला काही कन्व्हिन्स (प्रवृत्त) करता आलं नाही का ?'

'नाही आलं. ते ऐकत नाहीत.'

'तू असतास इथे तर आता पंतप्रधान झाला असतास. सरकार बनवलं असतंस नंतर बहुमत प्राप्त केलं असतंस', राष्ट्रपती म्हणाले.

त्यानंतर काही दिवसांनी राष्ट्रपती स्वत: यशवंतरावांशी बोलले. तेव्हा यशवंतराव म्हणाले, 'हा काही माझा रस्ता नाही. मी ते काही करणार नाही.'

अशा प्रकारे (काही काळ का होईना पण) पंतप्रधान होण्याची दाराशी चालून आलेली

संधी यशवंतरावांनी नाकारली. त्यानंतर चौधरी चरणसिंग पंतप्रधान झाले. ते एक दिवससुद्धा बहुमत मिळवू शकले नाहीत. पण सहा महिने ते पंतप्रधान होते. या काळात ते एकदाही पार्लमेंटमध्ये गेले नाहीत. त्यांचे पंतप्रधान पद औट घटकेचे ठरले. पण भारताच्या इतिहासात पंतप्रधान म्हणून त्यांची नोंद झाली. यशवंतरावांना हे सहज शक्य होतं, पण त्यांनी ते केले नाही. कारण खरोखरच तो त्यांचा रस्ता नव्हता.



संजीव रेड्डी यांच्याबरोबर यशवंतराव

# मिस्टर चव्हाण कसे आहेत?

भारताचे भारताचे ज्येष्ठ नेते माजी कृषिमंत्री ना.शरद पवारसाहेब यांनी सांगितलेली ही एक आठवण. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना ते एकदा इंग्लंडच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात लंडनमधील कॉमनवेल्थ लायब्ररीला त्यांनी भेट दिली. तिथे एक व्यक्ती पुस्तक चाळत उभी होती. त्यांना आपण कुठेतरी पाहिलयं असं पवार साहेबांना वाटलं. चेहरा ओळखीचा वाटला म्हणून त्यांनी बरोबर असलेल्या भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांकडून ती व्यक्ती कोण आहे याची खात्री करून घेतली. ते इंग्लंडचे माजी पंतप्रधान होते. मग त्यांच्याजवळ जाऊन पवारसाहेबांनी आपली ओळख करून दिली. मुंबई व महाराष्ट्राचा उल्लेख करताच ते उत्सुकतेने म्हणाले, 'आर यू फ्रॉम बॉम्बे ? हाऊ इज मिस्टर चव्हाण ?'

सातासमुद्रापार असलेल्या इंग्लंड देशाच्या माजी पंतप्रधानाने यशवंतरावांची आठवण काढलेली पाहून पवारसाहेबांना आनंद व अभिमान वाटला. पण दुर्दैवाने यशवंतराव तेव्हा हयात नव्हते. पवारसाहेब म्हणाले, 'ते आता हयात नाहीत. पण आपली व त्यांची मैत्री कशी ?'

ते माजी पंतप्रधान म्हणाले, 'मी परराष्ट्रमंत्री असताना आम्हाला पंधरा-पंधरा दिवस युनोच्या अधिवेशनाकरिता न्यूयॉर्कमध्ये जाऊन रहावे लागायचे. इकडे तिकडे फिरायला मला आवडत नसे. भारततर्फे अधिवेशनासाठी आलेल्या परराष्ट्रमंत्री चव्हाणांनाही ते आवडायचं नाही. मग आम्ही दोघं पुस्तकांच्या दुकानात जायचो. चांगली पुस्तके पहायचो. चव्हाणांच्या बरोबर जगातल्या चांगल्या पुस्तकांसंबंधी चर्चा करण्याची जी संधी मला मिळाली, तशी संधी मला माझ्या देशातसुद्धा मिळाली नाही.'

एका थोर ग्रंथप्रेमीने दुसऱ्या एका श्रेष्ठ ग्रंथप्रेमी व्यक्तिमत्वाला दिलेली ती दाद पाहून पवारसाहेब भारावून गेले.

# 'मेड फॉर इच अदर'



यशवंतराव चव्हाण आणि सौ.वेणूताई हे एकमेकांशी पूर्णपणे समरस झालेले दांपत्य होते. १९४५ साली वेणूताईंना क्षयाची बाधा झाली. त्यांना मिरजेच्या दवाखान्यात दाखल केलेले होते. पुढे १९४६ साली मिरजच्या दवाखान्यातून डिस्चार्ज घेताना एका उदास दुपारी वेणूताईंनी यशवंतरावांना जेव्हा सांगितले की, त्यांना आता मूल होऊ शकणार नाही आणि तुम्ही दुसरे लग्न करायला माझी हरकत नाही. तेव्हा ते फक्त एवढेच म्हणाले, 'इथून पुढे तुला मी आणि मला तू. हा विषय इथेच संपला.' , यशवंतराव असं फक्त म्हणाले नाहीत तर आयुष्यभर त्यांनी हा शब्द पाळला!

सत्तरीच्या दशकात 'मेड फॉर इच अदर' अशी घोषणा असलेली एक जाहिरात देशभर गाजत होती. यशवंतराव तेव्हा केंद्रीय मंत्री होते. एकदा विनायकदादा पाटील गप्पांच्या ओघात त्या जाहिरातीचा संदर्भ देऊन त्यांना म्हणाले, 'तुम्ही आणि सौ.वेणूताई 'मेड फॉर इच आदर' वाटता.' यशवंतराव मनापासून सुखावले आणि म्हणाले, 'खरंय ते, मी माझाच एक अनुभव सांगतो. मी गृहमंत्री असताना एकदा संसदेत प्रश्नोत्तरांचा तास सुरू होता. तेव्हाच बातमी आली की कऱ्हाडमध्ये जातीय दंगल उसळली आहे. या बातमीने मी अस्वस्थ झालो. प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर थेट घरी आलो आणि वेणूताईंना विचारले, 'बातमी ऐकली का ?'

तेव्हा त्या म्हणाल्या, 'हो, बातमी ऐकली आणि तुमची बॅग भरून तयार आहे.' मी लगेच कराडला जाणार हे ओळखून तिने त्यासाठी सर्व व्यवस्था अगोदरच करून ठेवली होती. आम्हाला काय म्हणायचं आहे हे न बोलताच आम्हाला समजत असे. खरंच विनायकराव, We are made for each other.'

# गप्पा मारायला येऊ का?

यशवंतराव दिल्लीला राहत होते, तेव्हाची गोष्ट. महाराष्ट्रातून अक्षरश: शेकडो लोक दिल्लीला त्यांना भेटायला जायचे. कामाच्या निमित्ताने दिल्लीला गेलेला मराठी माणूस आवर्जून त्यांना भेटायला जायचा. नियमितपणे यशवंतरावांना भेटायला जाणाऱ्या व्यक्तींपैकी एक होते गं. नि. जोगळेकर.

असेच एकदा जोगळेकर दिल्लीला यशवंतरावांकडे गेले. त्यांना न्यायला यशवंतरावांनी विमानतळावर गाडी घेऊन माणूस पाठवला होता. त्यांना राहण्यासाठी एक खोली स्वच्छ करून ठेवली होती. जोगळेकर आपल्या खोलीत शिरल्यावर यशवंतराव आणि वेणूताई दोघेही त्या खोलीत आले. त्यांनी जोगळेकरांच्या चहा कॉफीच्या वेळा विचारून घेतल्या. जेवणाच्या वेळा आणि पथ्ये विचारून घेतली. त्यांना कांदा व लसूण चालत नाही हे कळल्यावर, त्या काळापुरती स्वयंपाकघरातून कांदा व लसणाची हकालपट्टी झाली. यशवंतरावांच्या घरी गेलेल्या पाहुण्याची इतकी सुंदर व्यवस्था व्हायची, की पाहुणा त्या आतिथ्याने भारावून जायचा.

एके दिवशी दुपारी जोगळेकर त्यांच्या खोलीत काहीतरी वाचत बसले होते. इतक्यात यशवंतरावांचा गंगा नावाचा एक नोकर आत येऊन नम्रपणे त्यांना म्हणाला, 'साहेब विचारत आहेत, की मोकळे असलात तर गप्पा मारायला येऊ का?' या प्रश्नाने जोगळेकर चकीत झाले. भारताचे गृहमंत्री, नवमहाराष्ट्राचे शिल्पकार त्यांच्या घरी राहणाऱ्या एका साध्या पाहुण्याला विचारीत होते, 'तुम्हाला वेळ असेल तर गप्पा मारायला येऊ का?'

मूर्तीमंत सुसंस्कृतपणा, अंतर्बाह्य सौजन्यशीलता यापेक्षा वेगळी काय असते? जोगळेकर लाजून यशवंतरावांना म्हणाले, 'साहेब, तुम्ही तुमच्या कामाच्या व्यापातून आमच्यासाठी वेळ काढताय हेच आमचं भाग्य! आमचं कसलं आलंय काम?' यावर यशवंतराव म्हणाले, 'अरे, तसे नव्हे, आपण एकमेकांची प्रायव्हसी जपली पाहिजे.'

# यशवंतराव, तुम्ही शब्द राखलात!

ग. त्र्यं. माडखोलकर हे महाराष्ट्रातील विख्यात लेखक व पत्रकार होते. महाराष्ट्राच्या राजकारणाचा त्यांचा चांगला अभ्यास होता. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. मराठी मनाला उत्साहाचे उधाण आले. यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. 'महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर' त्यांनी जनतेला सोबत घेऊन सुरू केली. अशा नवीन आशावादाने भारलेल्या काळात माडखोलकरांनी त्यांच्या दैनिकात एक अग्रलेख लिहिला- 'हे मराठी राज्य होणार की मराठा राज्य होणार?' असे शीर्षक असलेला हा अग्रलेख महाराष्ट्रात फार गाजला. महाराष्ट्रात मराठा समाज संख्येने जास्त असून सत्तेच्या माध्यमातून हा समाज महाराष्ट्रावर वर्चस्व गाजवेल, असा त्यांच्या प्रश्नाचा रोख होता.

माडखोलकरांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नाला यशवंतरावांनी ५ जानेवारी १९६० रोजी सांगली येथे झालेल्या जाहीर सभेत उत्तर दिले. माडखोलकर विचारवंत व साहित्यिक असून आपले मित्र असल्याचा निर्वाळा देऊन साहेब म्हणाले, 'असे प्रश्न उपस्थित करून संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न कोणी करीत असेल, तर मला त्यांना जरूर सांगायचे आहे की, हे मराठा राज्य मुळीच होणार नाही. जोपर्यंत माझ्या हातात सत्तेची सूत्रे असतील तोपर्यंत तरी मी हे राज्य एखाद्या जातीचे होऊ देणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेला आम्ही तसे वचन दिले आहे.'

यशवंतरावांनी दिल्लीला जाईपर्यंत आपला शब्द नेकीने पाळला. त्यानंतरही त्यांनी मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक यांच्या रूपाने तब्बल तेरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मराठेतर समाजाला दिले. माडखोलकरांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नाला व यशवंतरावांनी दिलेल्या उत्तराला खूप वर्षे उलटून गेल्यावर माडखोलकरांची व यशवंतरावांची एकदा भेट झाली, तेव्हा माडखोलकर म्हणाले, 'यशवंतराव तुम्ही दिलेला शब्द राखलात.' त्यांची ही प्रतिक्रिया यशवंतरावांना खूप सुखावून गेली. त्यांच्या तत्त्वनिष्ठेला मिळालेली ही पावतीच होती. माडखोलकरांचे हे शब्द यशवंतरावांना बळ देत राहिले.

## ....म्हणून परत आलो!

न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी सांगितलेली ही आठवण. पुण्याच्या ‘ दैनिक प्रभात’ ने एक कार्यक्रम आयोजित केला होता. न्या.धर्माधिकारी प्रमुख पाहुणे होते, तर यशवंतराव त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यशवंतरावांनी आपल्या भाषणात वर्तमानपत्रांच्या दायित्वाबद्दल सखोल विवेचन केले. त्यावेळी ते मंत्री नव्हते. धर्माधिकारी मात्र उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. समारंभ संपल्यावर एका हॉटेलच्या गच्चीवर निमंत्रितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. यशवंतरावांची आणि न्या.धर्माधिकारी यांची जिव्हाळ्याची चर्चा झाली. जुन्या आठवणींना उजाळा दिला गेला. भोजनानंतर यशवंतराव लिफ्टमधून खाली त्यांच्या गाडीजवळ गेले. परंतु आपण काहीतरी विसरलोय हे त्यांच्या लक्षात आले व ते पुन्हा गच्चीवर आले. न्या.धर्माधिकारी यांच्याशी प्रेमाने हस्तांदोलन केले व म्हणाले, ‘तुमचा व न्यायमूर्तींचा निरोप घ्यायलो विसरलो होतो, म्हणून परत आलो.’ न्यायालयीन पदावर असलेल्या व्यक्तीची व पर्यायाने न्यायालयाची प्रतिष्ठा जोपासणारे असे सुसंस्कृत व्यक्तिमत्व विरळाच.

# जिकडे यशवंतराव तिकडे...

जनता सरकार गडगडल्यानंतर १९८० साली लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. यशवंतरावांनी सातारा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. पण यावेळची परिस्थिती वेगळी होती. ते काँग्रेसचे उमेदवार नव्हते, तर रेड्डी काँग्रेसचे उमेदवार होते. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने या निवडणुकीत यशवंतरावांच्या विरूद्ध शालिनीताई पाटील यांना उमेदवारी दिली. यशवंतरावांना मानणारे खूप लोक या मतदारसंघात होते, पण त्यांच्या पक्षाचा प्रभाव महाराष्ट्रात नगण्य होता. ज्या काँग्रेस पक्षाला आपण आपले जीवन वाहिले त्या पक्षाविरूद्ध लढण्याची वेळ आपल्यावर आली, याचे यशवंतरावांना मनस्वी दुःख झाले. पण त्यांचा नाईलाज होता. या निवडणुकी दरम्यान माण तालुक्यातील पत्रकार एस.के. कुलकर्णी लोकांचा कल आजमावत गावोगावी फिरत होते. एका गावात त्यांनी काही शेतकऱ्यांना विचारले, 'यावेळी तुम्ही कोणाला मतदान करणार ?'

कोणाला म्हणजे? चव्हाण साहेबांनाच!'

'पण यशवंतराव यावेळी काँग्रेसचे उमेदवार नाहीत.'

'पण ते उभे आहेत ना ?'

'होय.'

'मग आमचं मत त्यांनाच.'

'पण पक्षाचे काय ?'

'जिकडे यशवंतराव तिकडे आमचे मत.'

असा होता यशवंतरावांचा करिश्मा! या करिश्म्यामुळे व जनतेच्या हृदयात स्थान मिळाल्यामुळेच इंदिरा काँग्रेसची लाट आली असूनही त्या निवडणुकीत यशवंतराव विजयी झाले. विशेष म्हणजे रेड्डी काँग्रेसचे ते महाराष्ट्रातील एकमेव विजयी उमेदवार होते.

# मिसेस साळवेंना त्रास नको !

सन १९८० च्या सुमाराची गोष्ट. यशवंतराव तेव्हा दिल्लीत होते, पण सत्तेत नव्हते. एक सामान्य खासदार म्हणून ते वावरत होते. उगवत्या सूर्याला अर्घ्य देणारी जनरीत अनुभवीत होते. एकदा एन.के.पी. साळवे यांनी आपल्या दिल्लीतील घरी पं.जसराज यांची मैफल आयोजित केली होती. गाणे ऐकण्यासाठी त्यांनी यशवंतरावांना आग्रहाने बोलावले होते. यशवंतराव आले. त्यांची प्रकृती बरी नव्हती. ते म्हणाले, 'मी तासभर गाणे ऐकेन व जाईन.' पण नंतर पं.जसराज यांचे गायन ऐकण्यात ते तल्लीन झाले. शेवटी पंडितजींनी दरबारी कानडा गायल्यावर यशवंतराव जायला उठले, तेव्हा दोन तास उलटून गेले होते. यशवंतराव साळवेंना म्हणाले, 'गाण्यातून उठण्याची माझी इच्छा नाही, पण मला आता भूक लागली आहे. जेवण करून मला औषधं घ्यायची आहेत. मी आता निघतो.'

साळवे म्हणाले, 'साहेब, तुम्ही मला हुकुम का नाही केलात? आत्तापर्यंत जेवण तयार झाले असते.'

यशवंतराव हसून म्हणाले, 'तुम्हाला हुकूम दिला असता की मला जेवण आणा, तर तुम्ही लगेच मिसेस साळवेंना स्वयंपाक करण्याचा हुकूम दिला असता. म्हणजे त्रास मिसेस साळवेंना झाला असता. ते मला करायचं नाही.'

स्वत:ला कितीही त्रास झाला तरी कधी कोणाला बोलायचे नाही, हा यशवंतरावांचा स्वभाव होता. आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये याची ते नेहमीच काळजी घेत असत.

# तुम्हाला वेळ आहे का ?

डॉ.कन्हैय्या कुंदप हे कराडच्या सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक होते. महानुभाव संप्रदायाच्या वाङ्मयासंबंधी त्यांनी सखोल संशोधन केले होते. ३० ऑगस्ट १९८० रोजी नेहमीप्रमाणे ते कॉलेजमध्ये गेले होते. चहापानासाठीची पंधरा मिनिटांची विश्रांती संपल्यावर ते एम.ए. च्या वर्गावर अध्यापनासाठी जाणार इतक्यात त्यांच्यासाठी एक फोन आला. डॉ.कुंदप यांनी फोन घेतला. पलिकडून आवाज आला, 'डॉ.कुंदप, तुम्हाला आज संध्याकाळी वेळ आहे का ?'

'माफ करा, पण आपण कोण बोलत आहात हे मला समजले नाही,' कुंदप सर म्हणाले.

'मी यशवंतराव चव्हाण बोलतोय.' पलीकडून आवाज आला. साक्षात् यशवंतराव चव्हाण यांनी आपल्याला फोन केलाय, या जाणिवेने सरांना एवढा धक्का बसला की त्यांना काही बोलताच येईना. महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात व्यस्त असणारे यशवंतराव आपल्याला कशाला फोन करतील? त्यांचा स्वत:च्या कानांवर विश्वासच बसेना. कसेबसे सावरून ते म्हणाले, 'होय साहेब, दुपारी चारनंतर मी मोकळाच आहे.'

यशवंतराव म्हणाले, 'मग संध्याकाळी भेटायला या. तुमच्याशी चर्चा करायची आहे.'

ठरल्याप्रमाणे कुंदप सर संध्याकाळी यशवंतरावांकडे गेले. महानुभाव वाङ्मयाबद्दल साहेबांना आपल्याशी चर्चा करायची असेल असा अंदाज करून त्यांनी स्वत:चे शोधनिबंध व इतर पुस्तके सोबत नेली. ते यशवंतरावांच्या जीवनातील अखेरचे पर्व होते. राजकीय आयुष्यात त्यांच्या वाट्याला विजनवास आला होता. कराडला आल्यावर 'विरंगुळा' या आपल्या निवासस्थानी ते साहित्य, कला, क्रीडा, इत्यादी क्षेत्रातील होतकरू लोकांना बोलावून घ्यायचे. त्यांची आपुलकीने चौकशी करून प्रोत्साहन द्यायचे. त्यांच्यासाठी हा एक 'विरंगुळाच' होता. यशवंतरावांनी कुंदप सरांना महानुभाव वाङ्मयाविषयी माहिती विचारली. त्यांच्याकडून महानुभवांच्या लिपीचे वाचनही करवून घेतले. डॉ.कुंदप म्हणाले, 'मला महानुभवांच्या २६ लिप्या वाचता येतात. यशवंतरावांना आनंद झाला. ते म्हणाले,

'तुम्ही तंजावरच्या सरस्वती महालाला भेट द्यायला हवी. तुमची सगळी व्यवस्था मी करतो. पण तिथे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत, त्यांचे वाचन करून छ.शिवाजी महाराज व मध्ययुगीन महाराष्ट्राच्या लोकजीवनाविषयी काही मौलिक संशोधन व्हायला हवे आहे. सुदैवाने तुम्हाला त्या लिप्या वाचता येतात. त्याचा फायदा सर्वांना व्हायला पाहिजे.'

अशाप्रकारे यशवंतरावांनी कुंदप सरांशी सुमारे तासभर चर्चा केली आणि उठताना त्यांच्या पाठीवर थाप टाकून म्हणाले, 'तुमच्यासारखा साक्षेपी संशोधक माझ्या रयत शिक्षण संस्थेत व त्यातही माझ्या गावात आहे याचा मला अभिमान आहे.'

एका थोर नेत्याने मनापासून केलेले हे कौतुक कुंदप सरांना आयुष्यभर पुरले.



# भस्मासूर उलटला !

थोर स्वातंत्र्यसैनिक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ॲड.रावसाहेब शिंदे यांनी सांगितलेली ही आठवण. सन १९६६ मध्ये रावसाहेबांनी सहकारी साखर कारखानदारीतील अनिष्ट प्रवृत्तींविरुद्ध व बेशिस्त आर्थिक धोरणांविरुद्ध आपल्या सहकाऱ्यांसह लढा उभारला होता. कारखानदारांच्या भ्रष्ट आर्थिक व्यवहाराला पायबंद घालण्यासाठीच हा लढा होता. सुमारे तीन वर्षे हा लढा त्यांनी सातत्याने चालवला आणि त्यात त्यांना बऱ्यापैकी यशही मिळत चालले होते.

एकदा, १९६९ साली यशवंतरावांचा नगर जिल्ह्यात दौरा होता. पारनेर येथे सेनापती बापट यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी यशवंतराव येणार होते. त्यांच्याबरोबर किसन वीर, मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील व इतर अनेक मान्यवर मंडळी होती. किसन वीरांना रावसाहेबांच्या कार्याविषयी सहानुभूती होती. त्यांनीच रावसाहेबांना आपल्या आंदोलनाविषयी यशवंतरावांना माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ घेऊन येण्यास सुचविले. त्याप्रमाणे समारंभ संपल्यानंतर रावसाहेब शिंदे, गोविंदराव आदिक व इतर कार्यकर्ते सुप्याच्या सरकारी बंगल्यावर गेले. त्यांनी आपली भूमिका यशवंतरावांसमोर मांडली. यावेळी बोलताना रावसाहेब शिंदे यशवंतरावांना उद्देशून काहीशा आक्रमकपणे म्हणाले, 'सहकारक्षेत्रात तुम्ही भ्रष्ट वृत्तीचे भस्मासूर पोसत आहात. एक दिवस हे भस्मासूर तुमच्या आणि इंदिरा गांधींच्याही डोक्यावर हात ठेवल्याशिवाय राहणार नाहीत.' हे निर्भीड व परखड बोल कोणालाही फारसे रुचले नाहीत. यशवंतरावांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले, आणि तो विषय तिथेच संपला.

त्यानंतर बराच काळ उलटला. सहकार क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्ती वाढतच गेल्या. यशवंतरावांची पदे बदलत गेली व अखेरीस त्यांच्याही वाट्याला एकटेपणा आला. या त्यांच्या अखेरच्या दिवसात एकदा आण्णासाहेब शिंदे (रावसाहेबांचे थोरले बंधू) यशवंतरावांना भेटायला त्यांच्या दिल्लीतील घरी गेले. जिव्हाळ्याच्या गप्पा झाल्या आणि एकदमच यशवंतराव म्हणाले, 'अण्णासाहेब, अनेक वर्षांपूर्वी तुमचे धाकटे बंधू सुप्याच्या बंगल्यावर सहकारी कारखानदारीविषयी माझ्यापुढे बोलले होते. त्यांचे बोलणे त्यावेळी मला रुचले नव्हते, पण काळाने त्यांचे बोलणे सत्य ठरवले आहे.'

यशवंतराव दुराग्रही कधीच नव्हते. आपली मते दुरुस्त करण्यात त्यांनी कधीच कमीपणा मानला नाही.

# अशा घरात मी राहणार नाही!

यशवंतरावांनी महाराष्ट्रातल्या व महाराष्ट्राबाहेरच्या असंख्य लोकांवर प्रेम केले, पण माथाडी कामगारांचे नेते आण्णासाहेब पाटील यांच्यावर त्यांनी जे प्रेम केले त्याची तुलना कशाशीही करता येणार नाही. माथाडी कामगारांची संघटना उभी रहावी, कामगारांवरील अन्याय दूर व्हावेत अशी त्यांची इच्छा होती. या भूमिकेतून त्यांनी सतत माथाडींची पाठराखण केली. वेळप्रसंगी सरकारची ताकद कामगारांच्या मागे उभी केली.

पुढे एक काळ असा आला की, यशवंतरावांना मुंबईत रहायला घर नव्हते. मुंबईत आल्यावर ते 'सह्याद्री' अतिथीगृहात उतरत असत. माथाडींचे नेते आण्णासाहेब पाटील यांना हे पहावले नाही. महाराष्ट्राच्या शिल्पकाराला महाराष्ट्राच्याच राजधानीत राहण्यासाठी स्वत:चे साधे घर नसावे, याचे आण्णासाहेबांना दु:ख झाले. यशवंतरावांना मुंबईत घर घेऊन द्यायचे असा त्यांनी निर्धार केला. संघटनेच्या प्रत्येक सभासदाकडून वर्गणी गोळा केली गेली. काही लाख रुपये जमा झाल्यावर स्वत: आण्णासाहेब दिल्लीला गेले. यशवंतरावांना आपल्या मनातला हेतू सांगितला. साहेब रागावले व म्हणाले, 'आण्णासाहेब, कामगारांच्या घामाच्या पैशातून बांधलेल्या अशा घरात मी कधीच राहणार नाही. माझ्यावर तुमचे खरेच प्रेम असेल तर माझ्यासाठी एक करा, ही जमविलेली रक्कम लवकरात लवकर प्रत्येक कामगाराला परत करा.' आण्णासाहेब खूप निराश झाले. पण त्यांनी आशा सोडली नाही. त्यांनी मा.शरद पवार यांच्यामार्फत यशवंतरावांना पुन्हा एकदा विनंती करण्याचा प्रयत्न केला, पण यशवंतरावांनी नकार दिला तो कायमचाच. शेवटी अगदी नाईलाज होऊन आण्णासाहेबांनी कामगारांकडून जमविलेली ती रक्कम प्रत्येक कामगाराला युनियनच्या ऑफिसमध्ये बोलावून परत केली.

यशवंतराव जवळजवळ चाळीस वर्षे सत्तेत होते, पण मुंबईमध्ये त्यांनी स्वत:च्या मालकीचे साधे दोन खोल्यांचे घरसुद्धा बांधले नाही. धन्य ते यशवंतराव, ज्यांनी कष्टकऱ्यांच्या घामातून बांधलेल्या घरात रहायला नकार दिला, आणि धन्य ते आण्णासाहेब ज्यांनी गोळा केलेली लाखो रुपयांची वर्गणी कामगारांना साश्रू नयनांनी परत केली !

# तुमचं 'बलुतं' आवडलं !

दया पवार उर्फ दगडू मारुती पवार हे विख्यात दलित कवी होते. १९७८ साली त्यांचं 'बलुतं' हे आत्मकथन प्रकाशित झालं आणि महाराष्ट्रभर गाजलं. त्यातील दग्ध जीवनानुभवांनी पांढरपेशी जगात खळबळ माजली. या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले.

१९८२ साली दया पवारांना फोर्ड फाउंडेशनची शिष्यवृत्ती जाहीर झाली. जवळपास दीड लाख रुपयांची ही शिष्यवृत्ती पवारांच्या सगळ्या अडचणी दूर करणार होती. पण दया पवार रेल्वेत कर्मचारी असल्यामुळे त्यांना त्यांच्या खात्याच्या परवानगीशिवाय ही शिष्यवृत्ती घेता येत नव्हती. मग त्यांच्या दिल्लीला फेऱ्या सुरु झाल्या. दरम्यान त्यांना न्यूयॉर्कला येण्याचे निमंत्रण मिळालं. पण जिथे अजून शिष्यवृत्ती स्वीकारण्याचीच परवानगी मिळाली नव्हती, तिथे परदेशी जाण्यासाठी पासपोर्ट व व्हिसा मिळणे ही खूप दूरची गोष्ट होती. दया पवारांच्या विषयी वरिष्ठांच्या मनात असूया असल्यामुळे त्यांची परवानगीची फाईल पुढे सरकत नव्हती.

त्यांच्या खात्याचे दिल्लीचे मुख्य कार्यालय राष्ट्रपतींच्या कार्यकक्षेत येत होते. खूप प्रयत्न करूनही परवानगी मिळेना, तेव्हा एक दिवस निराश अवस्थेत ते दिल्लीतील एका रस्त्याच्या कडेला बसून राहिले. मनात विचार आला - चव्हाण साहेबांकडे जावे का? ते दिल्लीतच आहेत. पण आज ते कोणी मंत्री नाहीत तर साधे खासदार आहेत. शिवाय पूर्वी आपण यशवंतरावांवर जहाल टीका केली होती. काँग्रेस व आर.पी.आय. युतीसंबंधी आपण त्यांच्यावर केलेली टीका ते विसरले असतील का? ते काहीही असो, आज साहेबांना भेटायचेच! शेवटी ओशाळवाण्या चेहऱ्याने दया पवार यशवंतरावांच्या घरी गेले. साहेबांनी त्यांचे मनापासून स्वागत केले. म्हणाले, 'तुमचं 'बलुतं' मला खूप आवडलं. लिहीत रहा.' दया पवारांनी दबकत दबकत त्यांचं काम सांगितलं. त्यांना वाटलं साहेब फार फार तर शिफारसपत्र देतील. पण साहेबांनी लगेच फोन उचलला. भालचंद्र देशमुख हे मराठी अधिकारी तेव्हा केंद्र सरकारमध्ये उच्चपदावर होते. साहेब त्यांच्याशी बोलले व पवारांना म्हणाले, 'उद्या तुम्ही देशमुखांना भेटा, तुमचे काम होईल.'

दुसऱ्या दिवशी पवार ऑफिसमध्ये गेले, तेव्हा त्यांना सहज प्रवेश मिळाला. देशमुखांनी त्यांना सांगितले, 'चव्हाण साहेबांनी मला सर्वकाही सांगितले आहे. तुम्ही अजिबात काळजी करु नका. परवा सकाळी येऊन परवानगीचे पत्र आणि ॲडव्हान्स घेऊन जा.'

अशा प्रकारे पाच-सहा महिन्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले. साहेबांविषयीची कृतज्ञता मनात वागवतच दया पवार अमेरिकेला जाणाऱ्या विमानात चढले.



# माझे घर कृष्णाकाठीच असू शकते !

सन १९८० साली लक्ष्मण माने यांचं 'उपरा' हे आत्मकथन प्रसिद्ध झालं. ते महाराष्ट्रभर गाजलं. 'उपरा' वाचून यशवंतराव इतके भारावले, की लक्ष्मण मानेंना भेटण्यासाठी ते स्वत: साताऱ्यामधील वडार वस्तीतील त्यांच्या भाड्याच्या घरी गेले. त्यांनी मानेंचे तोंडभरून कौतुक केले. आधार दिला. म्हणाले, 'असेच लिहित रहा. भटक्या विमुक्तांसाठी काम करा. त्यांच्या दु:खांना वाचा फोडा.'

हळूहळू लक्ष्मण मानेंचा नावलौकिक वाढू लागला. त्यांचे बरेच मित्र पुण्यात रहात होते. आपणही पुण्यात रहावे असे मानेंना वाटू लागले. नाहीतरी साताऱ्यात काय आहे? पुण्यात सर्व सोयी आहेत. प्रवासाच्या दृष्टीने पुणे चांगले आहे. दोघा पती-पत्नींचा पुण्याला जाण्याचा निर्णय पक्का झाला. एकदा सहज पुण्याला स्थायिक होण्याचा बेत लक्ष्मण मानेंनी यशवंतरावांना सांगितला. यशवंतराव बराच वेळ गंभीर झाले मग म्हणाले, 'लक्ष्मण, मी दिल्लीला अनेक वर्षे राहिलो, पण दिल्लीत घर नाही केले. कामाच्या निमित्ताने मुंबईतही बरीच वर्षे राहिलो पण तिथेही मी घर केले नाही. पुण्यातही अधून मधून राहतो. तिथे पुतण्याने घर बांधले आहे, पण तेही माझे घर नाही. माझे घर कृष्णाकाठी कराडलाच असू शकते. त्याच मातीने आपल्याला घडविले. आपली माणसं खेड्यापाड्यातनं येतात, मोठी होतात आणि महानगरांमध्ये हरवून जातात. ज्या गावांनी त्यांना समृद्ध केलं, ती गावं मात्र ओकीबोकी होतात. तेव्हा मला वाटतं, शशी-लक्ष्मणचं घर साताऱ्यातच असायला हवं. कामाच्या निमित्ताने तुम्ही कुठेही जा, पण आपलं घर आपल्या मातीतच असलं पाहिजे, आणि पुणे तरी असे किती अंतरावर राहिले आहे?'

१९८२ मध्ये यशवंतरावांनी दिलेला सल्ला लक्ष्मण मानेंनी शिरोधार्य मानला व ते साताऱ्यात स्थायिक झाले. याचा त्यांना फायदाच झाला. त्यांचा आणि साताऱ्याचाही नावलौकिक वाढला. आज पुणे-सातारा हा प्रवास अवघ्या एका तासाचा बनलाय. तीस वर्षापूर्वी हा विचार करणारे साहेब किती द्रष्टे होते, याची प्रचिती या प्रसंगातून येते.

# आमच्यासोबत चहा घ्या !

प्रा.सुरेश जाधव हे परभणीमधील एका कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम करीत होते. १९८१ साली त्यांचा 'माती' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. त्या कथासंग्रहाची एक प्रत त्यांनी यशवंतरावांना दिल्लीच्या पत्त्यावर भेट म्हणून पाठविली. उत्तराची अपेक्षा अर्थातच नव्हती. पण ध्यानीमनी नसताना एकेदिवशी त्यांना एक लिफाफा मिळाला. ते यशवंतरावांनी दिल्लीहून पाठविलेलं पत्र होतं. अत्यंत समर्पक शब्दात त्यांनी पुस्तकाविषयीचा आपला अभिप्राय त्यांना कळविला होता व पुस्तक भेट दिल्याबद्दल लेखकाचे आभार मानले होते.

त्यानंतर काही दिवसांनी प्रा.जाधव ज्या संस्थेत काम करीत होते, त्या संस्थेने नवीन विधी महाविद्यालय सुरू करायचे ठरविले. या नूतन कॉलेजच्या उद्‌घाटन समारंभासाठी यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील आले होते. कार्यक्रम संपल्यावर पाहुणे चहापानासाठी प्राचार्यांच्या केबिनमध्ये गेले. यशवंतरावांचे दर्शन घ्यावे या हेतूने प्रा.जाधवही तिथे गेले. त्यांनी टेबलावर पुस्तके ठेवली. साहेबांना नमस्कार केला. आपली ओळख करून दिली, तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता यशवंतराव म्हणाले, 'अहो, मी परवाच तुम्हाला पत्र पाठवलं. मिळालं नाही का?'

'मिळालं साहेब, आभारी आहे' असे म्हणून प्रा.जाधव जायला निघाले तेव्हा यशवंतराव म्हणाले, 'तुम्हीही थांबा. तुम्ही लेखक आहात. आमच्या सोबतच चहा घ्या. बसा.' एका थोर नेत्याने आपल्या छोट्याशा लेखनकृतीला दिलेली ही दाद पाहून सुरेश जाधव भारावले. हीच तर यशवंतरावांची खासियत होती. साध्या साध्या प्रसंगातून यशवंतरावांनी माणसे उभी केली. त्यांच्या पंखांना बळ दिले.

# न बोलता मदत !

श्री.विठ्ठलराव पाटील हे कराड येथे ग्रंथपाल म्हणून काम करीत होते. १९८२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात फुफ्फुसाच्या विकाराने ते आजारी पडले. आजार बळावला तेव्हा त्यांना पुण्याच्या रूबी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सांगितले की, शस्त्रक्रिया करावी लागेल. खरं तर शस्त्रक्रियेचा खर्च विठ्ठलरावांच्या आवाक्याबाहेर होता, पण दुसरा पर्याय नव्हता. शेवटी 'पैशांची तरतूद झाल्यावर परत येतो,' असे डॉक्टरांना सांगून ते कराडला आले. पैसे कोठून आणायचे हा एकच प्रश्न त्यांना भेडसावत होता. अचानक त्यांना यशवंतरावांची आठवण झाली. त्यांना पैसे मागावेत काय? पण यशवंतरावांचा व आपला विशेष परिचय नाही. ते ओळखतील का? शिवाय ते दिल्लीला राहतात आणि आज ते मंत्री नाहीत तर साधे खासदार आहेत. काय करावे? शेवटी विठ्ठलरावांनी यशवंतरावांना एक पत्र लिहिले. त्यांच्या आजारासंबंधी व शस्त्रक्रियेसंबंधी माहिती सांगितली व मदतीची अपेक्षा व्यक्त केली आणि दिल्लीच्या पत्त्यावर ते पत्र पाठवून दिले. त्यानंतर काही दिवसांनी रूबी हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाकडून विठ्ठलरावांना कराडच्या पत्त्यावर एक पत्र आले. त्यात म्हटले होते की, 'आपल्या शस्त्रक्रियेसाठीच्या खर्चाची तरतूद झाली असून आपण ताबडतोब पुण्याला यावे.'

विठ्ठलरावांचा विशेष परिचय नसताना, केवळ ते आपल्या गावचे आहेत, म्हणून यशवंतरावांनी त्यांना परस्परच मदत केली. याविषयी कोणाजवळही एका शब्दाने ते बोलले नाहीत. खुद्द विठ्ठलरावांनादेखील त्यांनी कधी हे सांगितले नाही. गरजूंना केलेल्या मदतीची जाहिरात करणे हा यशवंतरावांचा स्वभावच नव्हता. आपल्या आयुष्यात अशा प्रकारे हजारो लोकांना त्यांनी तदत केली, पण त्याचा गवगवा कधीच केला नाही.

# अशी प्रस्तावना लिहू शकणार नाही!

श्री. बा. ह. कल्याणकर हे एक लेखक व कार्यकर्ते होते. यशवंतरावांचा आणि त्यांचा जुना स्नेह होता. आपले नवीन पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्या पुस्तकाची एक प्रत ते आवर्जून दिल्लीला यशवंतरावांना पाठवत असत. यशवंतराव देखील ते पुस्तक वाचून त्याविषयीचा आपला मार्मिक अभिप्राय त्यांना कळवत.

१९८३ साली कल्याणकरांचा 'दिशा आणि दृष्टी' हा वैचारिक लेखसंग्रह प्रकाशित होणार होता. या पुस्तकाला यशवंतरावांची प्रस्तावना असावी असे कल्याणकरांना वाटले. त्यांनी यशवंतरावांना भेटून तशी विनंती केली. यशवंतराव म्हणाले, 'पुस्तकाची मुद्रणप्रत पाठवा. प्रस्तावना देतो.' त्याप्रमाणे कल्याणकरांनी एक मुद्रणप्रत यशवंतरावांना दिल्लीच्या पत्त्यावर पाठवली. प्रत हाती मिळताच त्यांनी ती वाचून काढली. कल्याणकरांनी छ.शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्याबद्दल लिहिलेले लेख त्यांना आवडले. पण चालू राजकीय स्थितीवरील त्यांचे भाष्य मात्र त्यांना आवडले नाही. त्यांनी कल्याणकरांना पत्र लिहून सांगितले की, या पुस्तकासाठी मी प्रस्तावना लिहू शकणार नाही. मात्र नकार कळविताना त्यांनी जी भाषा वापरली त्यामुळे लेखकाचा हिरमोड न होता उलट त्याला आधारच मिळाला. साहेबांनी लिहिले होते,

> 'तुमचे पत्र आणि 'दिशा आणि दृष्टी' या पुस्तकाची मुद्रणप्रत मिळाली. मी हाती येताच वाचून काढली. शिवाजी महाराज व महात्मा फुले यांच्याबद्दलचे तुमचे लेख उत्तम आहेत. परंतु चालू राजकीय स्थिती आणि त्यावरील तुमची निदाने वाचल्यानंतर माझ्या हे लक्षात आले की तुमच्या पुस्तकाला मी प्रस्तावना लिहिणे योग्य नाही, कारण प्रस्तावना लिहायची म्हणजे मला तुमच्या विचारांवर सपाटून टीका करावी लागेल आणि अशी प्रस्तावना लिहिण्याची माझी इच्छा नाही. कारण मला तुमच्याबद्दल लोभ आहे व तुमच्या साहित्यगुणांबद्दल कौतुक आहे. स्पष्ट लिहिल्याबद्दल राग मानू नका. असेच प्रेम असू द्यावे.'
>
> आपला,
>
> यशवंतराव चव्हाण

# मी तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही

सन १९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेले. अनेक वर्षे सातत्याने दिल्लीत वास्तव्य घडल्यामुळे त्यांचा महाराष्ट्रच्या राजकारणातील प्रभाव हळूहळू कमी होत गेला. विशेषत: १९७५ साली त्यांच्या विचारांना मानणाऱ्या वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांचे राजकीय सामर्थ्य कमी झाले. दिल्लीने हात सोडला व महाराष्ट्राने साथ सोडली. एकेकाळी त्यांचा प्रत्येक शब्द झेलणारे लोक आता त्यांच्याकडे साफ दुर्लक्ष करू लागले.

या अखेरच्या काळात (१९८३ साली) एकदा यशवंतराव आणि वसंतदादा पाटील पुण्यातील शिवाजी मराठा प्रिपरेटरी स्कूलमध्ये एका कार्यक्रमासाठी येणार होते. वसंतदादा तेव्हा मुख्यमंत्री होते आणि यशवंतराव आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष होते. त्यावेळी पुण्यातल्या मुंढवा येथील जमिनीचा प्रश्न चिघळला होता. ब्रिटीशांनी गुन्हेगार जमातींना दिलेल्या शेकडो एकर जमिनी त्या जमाती वहिवाटत होत्या. महापालिकेने या जमिनी ताब्यात घेऊन त्या गोठ्यांना दिल्या होत्या. या जमिनी परत मिळाव्यात म्हणून उपेक्षितांसाठी लढणारे सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक लक्ष्मण माने यांनी शिवाजी मराठा प्रिपरेटरी स्कूलवर हजारो लोकांचा मोर्चा काढला. यशवंतराव आणि वसंतदादा आत कार्यक्रमात होते. बाहेर पोलीस आणि आंदोलकांची धुमश्चक्री चालू होती. पोलीसांचा लाठीमार चालू होता. यशवंतरावांना बाहेर काय चाललयं हे समजले. त्यांनी दहा-बारा लोकांचे शिष्टमंडळ घेऊन लक्ष्मण मानेंना आत बोलावले. त्याप्रमाणे दहा-बारा लोकांना घेऊन माने आत आले. पण मुख्यमंत्री इतर लोकांशी बोलत होते. यशवंतराव शिष्टमंडळाचे म्हणणे मुख्यमंत्र्यांना सांगत होते, पण मुख्यमंत्र्यांचे त्यांच्याकडे लक्षच नव्हते. हा यशवंतरावांचा अपमान होता. घोर अपमान होता. आपल्या लाडक्या नेत्याची अप्रतिष्ठा झालेली पाहून लक्ष्मण माने संतापले व त्यांनी तिथेच सरकारविरोधी घोषणा द्यायला सुरूवात केली. मुख्यमंत्र्यांना ते म्हणाले, 'आमच्याकडे बघायला व आमच्याशी बोलायला तुम्हाला वेळ नसेल तर नसू द्या, पण तुमच्याशेजारी बसलेल्या या थोर नेत्याकडे तरी लक्ष द्या.' कार्यकर्तेही चिडले. त्यांनी 'यशवंतराव झिंदाबाद' अशा घोषणा द्यायला सुरुवात

केली. यशवंतराव तात्काळ उठले. त्यांनी घोषणा बंद करायला लावल्या.

वसंतदादा जिल्हाधिकाऱ्याला म्हणाले, 'ते जे काय आहे ते आत्ताच्या आत्ता मिटवा.' कलेक्टरनी आपली बाजू मांडली. मुख्यमंत्री आपल्या गाडीत बसून निघून गेले. यशवंतराव बाहेर जमलेल्या उपेक्षितांच्या गर्दीला सामोरे गेले. गर्दी एकदम स्तब्ध झाली. यशवंतराव म्हणाले, 'या सर्व जमिनी तुम्हाला दिल्या आहेत, त्याचा मी साक्षीदार आहे. या जमिनी कुणीही काढून घेऊ शकत नाही. मी रेकॉर्ड पाहिले आहे. आपण जमिनीचा ताबा सोडू नका. मी योग्य ठिकाणी बोलतो. हा प्रश्न नक्की सुटेल. याच्यासाठी जे जे करायला लागेल ते ते मी करतो. पुढच्या महिन्यात मी पुन्हा येईन. प्रशासनाबरोबर बोलेन. पण तुम्हाला वाऱ्यावर सोडून देणार नाही.'

लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांना हुरूप आला व मनात आशा जागवत ते आपापल्या घरी गेले... आणि मनाला झालेली जखम वागवत यशवंतराव आपल्या गाडीत शिरले.



तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचेसमवेत यशवंतराव

# तुम्ही मला दवाखान्यात नेताय ?

यशवंतराव आणि वेणूताई यांच्या संसारात तीन दिवसांचे विशेष महत्त्व होते. लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीला वेणूताई तुरूंगात होत्या. म्हणून त्यानंतरच्या प्रत्येक संक्रांतीला यशवंतराव घरीच थांबत असत. १२ मार्च हा यशवंतरावांचा वाढदिवस आणि २ जून हा त्यांच्या लग्नाचा वाढदिवस. हे दिवसही दोघांसाठी 'खास' होते. एकमेकांच्या सहवासात ते आनंदाने हे दोन दिवस साजरे करीत. खरं तर वेणूताईंना यशवंतरावांचा सहवास फार कमी लाभला. राजकारणाच्या व्यापामुळे आपण पत्नीला पुरेसा वेळ देऊ शकत नाही, याची यशवंतरावांना कायमच खंत वाटत राहिली.

१९८० नंतर यशवंतरावांच्या वाट्याला राजकीय विजनवास आला. जगाची संगत सुटली तरी आपल्या प्रिय पत्नीची सोबत आपल्याला आहे याचा आनंद त्यांना होता. पण दुर्दैवाने नेमक्या याच काळात वेणूताईंची प्रकृती खालावत चालली. त्यांच्यावर घरीच उपचार चालू होते. १ जून १९८३ रोजी सकाळी डॉक्टरांनी त्यांना तपासले व त्यांना दवाखान्यात हलवावे लागेल, अन्यथा त्यांच्या जीवाला धोका आहे असे यशवंतरावांना बाजूला घेऊन सांगितले. यशवंतरावांनी ताबडतोब वेणूताईंना दवाखान्यात दाखल करायचा निर्णय घेतला. पण आपल्याला सोडून वेणूताई दवाखान्यात जायला तयार होणार नाहीत हे माहित असल्यामुळे, त्यांनी वेणूताईंना काहीही सांगितले नाही.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. वेणूताई अंथरूणावरूनच तयारीच्या सूचना देत होत्या. आपल्याला दवाखान्यात नेण्याची तयारी चालू आहे याचा, कसे कोण जाणे पण त्यांना अंदाज आला. त्यांनी यशवंतरावांना जवळ बोलावले. त्यांचा हात हातात घेऊन त्या म्हणाल्या, 'खरं सांगा, तुम्ही मला दवाखान्यात भरती करणार आहात का?' यशवंतरावांनी आवंढा गिळत 'हो' म्हणून स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली, पण त्यांना मध्येच थांबवून त्या म्हणाल्या, 'मला तुमच्या मांडीवर डोकं ठेवून झोपायचं आहे.' यशवंतराव आपल्या मांडीवर त्यांचे डोके ठेवून त्यांना हळूवार थोपटू लागले आणि काही सेकंदातच वेणूताईंनी प्राण सोडला.

आपल्या प्राणप्रिय पतीला सोडून दवाखान्यात राहण्यापेक्षा त्याच्या मांडीवर शेवटचा श्वास घेतलेला बरा, असा तर विचार त्यांनी केला नसेल? वेणूताईंच्या पतीनिष्ठेचे तेजोवलय यशवंतरावांचे अंत:करण भेदून गेले आणि त्यांनी आर्त टाहो फोडला. सायंकाळच्या विमानाने वेणूताईंचा निष्प्राण देह मुंबईत आणला गेला. लग्नाच्या वाढदिवसाची तयारी करणाऱ्या वेणूताई हिरवी वस्त्रे व हिरवा चुडा लेवून अंतिम प्रवासाला निघाल्या. आईच्या मृत्युनंतर वाट्याला आलेले पोरकेपण पुन्हा एकदा यशवंतरावांच्या वाट्याला आले!



# आधी दाढी कर !

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी दिल्लीत इंदिरा गांधींची त्यांच्या शीख अंगरक्षकांनी हत्या केली. देशभर शीखांच्या विरोधात वातावरण तापले. दिल्लीत तर शीखांचे हत्याकांड सुरू झाले. हत्येच्या दुसऱ्या दिवशी डॉ.सतीश देसाई दिल्लीला यशवंतरावांकडे गेले होते. इंदिराजींच्या हत्येने यशवंतराव कमालीचे दु:खी झाले होते.

डॉ.देसाईंचा यशवंतरावांशी विशेष परिचय नव्हता, पण साहेबांनी मनाच्या त्या दु:खी अवस्थेतही त्यांची जेवणाची, राहण्याची व्यवस्था नीट झाली आहे का, याची विचारपूस केली. सर्व सोय झाली आहे असे सांगून डॉ.देसाई जायला निघाले, तेव्हा त्यांना थांबवून साहेब म्हणाले, 'अरे, तू दाढी वाढविलेली आहेस, सध्या दिल्लीत जमाव अनावर झालेला आहे. काहीही घडू शकते. दाढी असताना तू बाहेर पडू नकोस. इथेच दाढी कर आणि मग जा.' त्यांनी लगेच एका नोकराला दाढीचे सामान आणायला सांगितले. डॉ.देसाईंनी यशवंतरावांच्या घरीच दाढी केली आणि ते जायला निघाले, तेव्हा त्यांच्या पाठीवर हात ठेवून यशवंतराव म्हणाले, 'आता जायला हरकत नाही. आता तू बाहेर पडलास तरी मला धास्ती नाही.'

दिल्लीत येणाऱ्या प्रत्येक मराठी माणसाची अशी पुत्रवत् काळजी यशवंतराव घ्यायचे. म्हणूनच महाराष्ट्रातून दिल्लीला गेलेल्या मराठी माणसाला दिल्लीतील यशवंतरावांचे घर हे आपले हक्काचे घर वाटायचे.

# शब्दांशिवायचे भाषण

१ जून १९८३ रोजी सौ.वेणूताई या जगातून गेल्या. यशवंतरावांच्या जीवनातील चैतन्य हरपले. ते खचले. त्यांना कशातच रस वाटेनासा झाला. अगोदरच राजकीय जीवनात विजनवास भोगत असलेले यशवंतराव वेणूताईंच्या जाण्याने अक्षरशः पोरके झाले. आपल्या प्रिय पत्नीच्या निधनाने दुःखी होणारे लाखो-करोडो लोक या जगात आहेत, पण वेणूताईंच्या निधनानंतर यशवंतरावांची जी अवस्था झाली तशी क्वचितच कुणाची झाली असेल. यशवंतराव किती खचले होते याची साक्ष देणारा हा प्रसंग.

पुण्यातील टिळक स्मारक मंदिरामध्ये यशवंतरावांचे व्याख्यान होणार होते. तुडुंब गर्दी जमली होती. यशवंतराव आले. प्रास्ताविक, स्वागत वगैरे झाले. उपस्थित श्रोत्यांना त्यांचे भाषण ऐकण्याची प्रचंड उत्सुकता होती. याच टिळक स्मारक मंदिरामध्ये यशवंतरावांनी दिलेली अप्रतिम भाषणे अजून लोकांच्या लक्षात होती. यशवंतरावांचा शब्द न् शब्द टिपून घ्यायला ती गर्दी आतुर झाली होती. ते बोलायला उभे राहिले. क्षणभर त्यांनी सभागृहावर नजर फिरवली आणि काय झालं कोणास ठाऊक, अचानक त्यांचा कंठ दाटून आला. वेणूताईंच्या आठवणींने त्यांचे डोळे भरून आले. अवघे सभागृह स्तब्ध झाले. आयुष्यभर पापण्यांमध्ये आसवांच्या नद्या गोठवणारे साहेब, भर सभागृहात स्वतःचे अश्रू रोखू शकले नाहीत. स्वतःला सावरत मोठ्या मुश्किलीने यशवंतराव फक्त एकच वाक्य बोलले, 'माफ करा, मी बोलू शकणार नाही. आपण शांतपणे निघून जावे.' असे म्हणून ते आपल्या जागेवर जाऊन बसले. जमलेले श्रोते डोळे पुसत एक एक करीत बाहेर पडले. आज त्यांना एक जगावेगळे भाषण ऐकायला मिळाले होते- शब्दांशिवायचे भाषण...!

# तू गेल्यावर...

१ जून १९८३ रोजी सौ.वेणूताई यशवंतरावांना सोडून गेल्या आणि साहेबांचे जीवन अंधारमय झाले. त्यांचा ऊर्जास्रोत हरवला आणि होकायंत्र नसलेल्या जहाजासारखी त्यांची अवस्था झाली. ते वेणूताईंवर इतके अवलंबून होते, की त्यांच्या जाण्याने त्यांची जगण्याची इच्छा आणि शक्तीसुद्धा हरवली.

वेणूताई गेल्यानंतर यशवंतराव दिल्लीतच रहात होते. काही विश्वासू नोकर हेच त्यांचे सोबती होते. एके दिवशी नोकराने भाजी आणण्यासाठी साहेबांकडे पैसे मागितले. चाळीस वर्षांच्या सहजीवनात वेणूताईंनी घरातील किरकोळ बाजार व इतर कामे करण्याची जबाबदारी आनंदाने पेलली होती. पण आता त्या नव्हत्या. यशवंतराव एकटे होते. मग नोकर दुसऱ्या कोणाला पैसे मागणार? त्यांनी त्याला दहा रुपये दिले. दहा रुपयांमध्ये पाच माणसांची दोन तीन दिवसांसाठीची मंडई कशी आणायची हे नोकराला कळेना. महागाई वाढली होती, पण मंडई आणण्याबाबत कधीच माहिती नसलेल्या यशवंतरावांना ही बाब माहित नसणे स्वाभाविक होते. त्या नोकराने दबकत दबकत साहेबांना भाज्यांच्या वाढलेल्या दरांविषयी माहिती दिली. मग त्यांनी आणखी दहा रुपये खिशातून काढून त्याच्या हातात दिले. नोकराला आणखी पैसे मागावेसे वाटेनात. शेवटी त्याने त्याच्या जवळचे पंधरा रुपये त्यात घालून पस्तीस रुपयांची मंडई आणली व बील यशवंतरावांना दिले. पण त्यांनी ते बघितले सुद्धा नाही. त्यांना आता कशातच रस उरला नव्हता. त्यानंतर पुन्हा एकदा असेच घडले. नोकर म्हणाला, 'साहेब, भाज्यांचे दर वाढले आहेत. इतक्या कमी पैशात मंडई कशी आणणार?'

साहेब म्हणाले, 'अरे, मग अगोदरच सांगायचेस ना?'

बिचारा नोकर गप्पच बसला. त्याला माहित होते, यशवंतरावांना काही समजावून सांगण्याची क्षमता जशी वेणूताईंकडे होती तशी आपल्याकडे नाही.

# भावना उचंबळून येतात!

१९८४ मधील एक प्रसंग. उन्हाळ्याचे दिवस होते. औरंगाबाद येथे शे.का.पक्षाचे ज्येष्ठ नेते भाई उद्धवराव पाटील यांचा सत्कारसमारंभ आयोजित केलेला होता. यशवंतरावांच्या हस्तेच आपला सत्कार व्हावा अशी उद्धवरावांची इच्छा होती. या सोहळ्यासाठी यशवंतराव दिल्लीहून आले होते. समारंभ संपल्यावर यशवंतराव श्रीरामपूर येथे असलेले त्यांचे मित्र श्री आण्णासाहेब शिंदे यांच्या घरी गेले. तिथे जेवण करून पुढे शिर्डीला जायचा त्यांचा विचार होता. आण्णासाहेबांनी यशवंतरावांना मुक्कामाचा आग्रह केल्यावर साहेब म्हणाले, 'वेणुताईंच्या निधनामुळे माझे फायनान्स कमिशनचे काम व इतर बरीच कामे लांबली आहेत. ती मार्गी लावणयासाठी मला लगेच गेले पाहिजे.'

त्यावर आण्णासाहेब म्हणाले, 'आपण आयुष्यभर धावपळच केलीत साहेब, एक दिवस निवांत राहिल्याने काही इकडची दुनिया तिकडे होत नाही.' या प्रेमाच्या सक्तीने यशवंतराव विरघळले व त्यांनी आण्णासाहेबांकडे मुक्काम केला. त्या रात्री त्यांच्या अनेक विषयांवर गप्पा झाल्या. बोलता बोलता संरक्षणखात्याच्या कारभाराविषयी चर्चा सुरू झाली. बन्सीलाल हे तत्कालीन संरक्षणमंत्री होते. संरक्षणखात्यातील शस्त्रास्त्र खरेदीच्या व्यवहारात संजय गांधी यांच्या अवास्तव हस्तक्षेपाची चर्चा वृत्तपत्रांतून होत होती. यशवंतरावांनी आपल्या कारकिर्दीत एक अतिशय नाजुक कालखंडात हे खाते सांभाळले होते. कमकुवत सैन्यदलाला त्यांनी अल्पकाळातच सामर्थ्यवान बनविले होते. देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या जिवाशी खेळणाऱ्या या भ्रष्ट व्यवहारांविषयीच्या बातम्या ऐकून त्यांना तीव्र वेदना झाल्या.

ते म्हणाले, 'आण्णासाहेब, संरक्षणमंत्री असताना मी स्वतः लेह-लडाखमधील आपल्या सैनिकांची स्थिती काय असते हे पाहिलेले आहे. तिथे इतकी थंडी असते की शरीराचा एखादा अवयव जर गरम कपड्याशिवाय उघडा पडला तर त्या अवयवाचे रक्तच गोठून जाते. अशा जीवघेण्या थंडीत आपले सैनिक आपल्या प्राणांची बाजी लावून देशाचे रक्षण करीत असतात. त्यांच्या हातात जर दुय्यम प्रतीचा दारुगोळा पडला तर शत्रूशी लढताना त्यांचे नाहक बळी जातील. मी अनेकवेळा त्यांची अवस्था सरहद्दीवर जाऊन पाहिली आहे.

त्या सैनिकांबद्दल माझ्या मनात नितांत कळकळ आहे. अशा बातम्या ऐकून मला त्यांची काळजी वाटते, भावना उचंबळून येतात..!'

एवढे बोलून यशवंतराव भावविवश झाले, त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्यांना पुढे बोलता येईना. हजारो मैल दूर असलेल्या आपल्या सैनिकांविषयीचे यशवंतरावांचे प्रेम पाहून आण्णासाहेब व रावसाहेब हे दोघेही अक्षरशः वितळून गेले. त्यांचेही डोळे पाणावले. काही क्षण वातावरण धीरगंभीर झाले. थोड्या वेळाने यशवंतराव उठून वॉश बेसीनकडे गेले व तोंड धुवून परत आले.

गांधी-नेहरूंच्या पिढीतील यशवंतरावांसारख्या देशभक्तांचे देशप्रेम किती उच्च प्रतीचे होते हेच वरील प्रसंगावरून दिसून येते.



# आर.आर. ना आत बोलवा..!

महाराष्ट्राचे गृहमंत्री ना. आर.आर. पाटील यांनी सांगितलेली ही आठवण! १९७९ साली सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजय संपादन करून आबांनी अपली राजकीय कारकीर्द सुरू केली. यशवंतरावांनी लावलेल्या 'पंचायत राज' नावाच्या रोपट्याला आता मधुर फळे येऊ लागली होती. आबांप्रमाणेच इतरही अभ्यासू आणि ग्रामीण प्रश्नांची जाण असणारे तरुण नेते पुढे येऊ लागले होते. या सर्वांचे प्रेरणास्थान अर्थातच यशवंतराव होते. साहेबांविषयी आबांच्या मनात नितांत आदर होता. एकदा यशवंतराव कराडला येणार आहेत हे कळाल्यावर सांगली जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांनी 'विरंगुळा' बंगल्यावर यशवंतरावांना भेटायचे ठरविले. साहेबांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार म्हणून आर.आर. ही त्यांच्याबरोबर कराडला गेले. अंकलखोपचे दिनकरबापू या मंडळाचे नेतृत्व करीत होते. त्यांनी यशवंतरावांशी सर्वांची ओळख करून दिली. त्यातील बहुतेकांना यशवंतराव नावानिशी ओळखत होते. आबांची ओळख करून देताना बापू म्हणाले, 'हे आर.आर. पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत.'

'आर.आर. पाटील? म्हणजे?' यशवंतरावांना पूर्ण नाव अपेक्षित होते.

'रावसाहेब रामराव पाटील' आबा म्हणाले.

'छान..! सध्या काय करताय?'

'एलएल.बी. चं शिक्षण घेतोय.'

'अरे व्वा..! चांगलं आहे.' यशवंतरावांना कौतुक वाटले. ते स्वतःदेखील एक वकील-राजकारणी होतेच. इतक्यात विलासराव शिंदे म्हणाले, 'साहेब, हा अतिशय गरीब व सामान्य कुटुंबातला मुलगा आहे. लोकांनी एका मोठ्या नेत्याचा पराभव करून त्याला निवडून दिलं आहे.'

आबांची ही पार्श्वभूमी ऐकून यशवंतराव एकदम खूष झाले. आबांकडे पाहून त्यांनी प्रसन्न स्मित केले. आबांनीही पटकन् पुढे होऊन वाकून साहेबांना नमस्कार केला. त्यावर साहेब म्हणाले, 'असू दे, असू दे.. मोठा हो..! आज आपल्याला तरुण व अभ्यासू नेत्यांची अतिशय गरज आहे.'

त्यानंतर इतर विषयांवर चर्चा सुरू असतानाच साहेबांचा नोकर साहेबांना जेवणाची वेळ झाल्याचे सांगून जेवणासाठी आत बोलावत होता. 'साहेबांच्या औषधपाण्याची वेळ चुकता कामा नये' असा खुद्द वेणुताईंचा कटाक्ष होता. तसा त्यांचा हुकुमच असल्याने नोकर काही केल्या साहेबांना आत बोलवायचा थांबेना. पण भेटायला आलेल्या लोकांना ताटकळत ठेऊन आपण जेवण करणे हे साहेबांना योग्य वाटेना. शेवटी कोणीतरी म्हणाले, 'साहेब, आपण जेवण करून घ्या, आम्ही थांबतो.' यावर 'ठीक आहे' म्हणून यशवंतराव उठले व आत जाताजाता मागे वळून त्यांनी विचारले, 'तुम्ही सगळे जेवलात का?' यावर सगळेजण म्हणाले, 'हो हो.., आम्ही जेवण करूनच आलोय.' पण साहेबांच्या शेजारीच उभे असलेल्या आर.आर. आबांच्या तोंडून खरे उत्तर बाहेर पडले 'नाही..!'

इतर सर्वजण अवाक् होऊन आबांकडे पाहू लागले. आपले नेमके काय चुकले हे आबांना कळेना.। कारण त्यांनी 'नाही' हे उत्तर दिले ते त्यांना भूक लागल्यामुळे नव्हे, तर चव्हाण साहेबांशी खोटं कसं बोलायचं म्हणून! साहेब आत गेल्यावर बाकीचे सगळे लोक आबांना म्हणाले,

'आर.आर...अशा वेळी 'जेवलो' म्हणून वेळ मारून न्यायची असते. तुम्ही आमची मोठीच पंचाईत केलीत.'

इतक्यात साहेबांचा नोकर बाहेर आला व आबांना म्हणाला, 'तुम्हाला साहेबांनी आत जेवायला बोलावलं आहे.' जमलेल्या लोकांना आणखी एक धक्का बसला. आर.आर. हसून सर्वांना उद्देशून म्हणाले, 'खरं बोलण्याचेही काही फायदे असतात..! '

त्यादिवशी आबा यशवंतरावांसोबत जेवले. गप्पा मारत मारत जेवण चालले असताना साहेबांनी आबांच्या कुटुंबाविषयी, कॉलेजविषयी माहिती विचारली. जेवण झाल्यावर ते दोघे जेव्हा बाहेर आले तेव्हा लोक यशवंतरावांकडे आदराने आणि आबांकडे कौतुकाने पाहात राहिले..!

# या प्रेमाला पात्र ठरण्याचे भाग्य मला लाभावे

यशवंतराव बुद्धिवादी होते. तर्कशुद्ध विचार करणे हा त्यांचा स्वभावधर्म होता पण तरीही बहुतेक बुद्धीप्रामाण्यवाद्यांमध्ये आढळणारा रुक्षपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात नव्हता. आईवडील, मित्रपरिवार आणि जनताजर्नादनावर त्यांची श्रद्धा होती. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती पण श्रद्धेने माणसांच्या जीवनाला ओलावा मिळतो अशी त्यांची भावना होती. सातारा शहरात खिंडीतील गणपती हे प्रसिद्ध देवस्थान आहे. सवड मिळाली आणि साताऱ्यात मुक्काम असला की कामातून वेळ काढून यशवंतराव या गणपतीच्या दर्शनाला जात असत.

साताऱ्यात राहणारे रा.ना. तथा बन्याबापू गोडबोले हे साहेबांचे जवळचे मित्र होते. एकदा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या निमित्ताने यशवंतराव साताऱ्याला आले होते. अर्ज भरण्यापूर्वी खिंडीतील गणपतीचे दर्शन घ्यावे असे यशवंतरावांना वाटले. त्यांनी बन्याबापूंना निरोप पाठवला व त्यांना बरोबर घेऊन साहेब गणपतीच्या दर्शनाला निघाले. जाताना बन्याबापू गंमतीने म्हणाले, ‘तुम्हाला या गजाननाच्या आशीर्वादाची गरज का भासावी ?’

यशवंतराव हसले, थोड्या वेळाने धीरगंभीर आवाजात म्हणाले, ‘बन्याबापू, आयुष्यात मला खूप काही मिळालं आहे. आता मला देवाजवळ स्वतःसाठी काही मागायचे नाही. जनताजनार्दनाचं असीम प्रेम मला लाभलं आहे. या प्रेमाला आणि आदराला आपण कायम पात्र ठरण्याचे भाग्य मला लाभावे एवढीच माझी इच्छा आहे. तेवढी साधनशुचिता मजजवळ रहावी एवढीच प्रार्थना मला गणपतीला करायची आहे.’

गुरुदेव रविंद्रनाथ टागोर एका कवितेत देवाला प्रार्थना करताना म्हणाले होते, ‘देवा, संकटांपासून माझा बचाव कर असे माझे मागणे नाही, संकटांशी लढण्याचे सामर्थ्य मला लाभाले एवढीच माझी अपेक्षा आहे.’ देवाकडे साधनशुचिता मागणाऱ्या यशवंतरावांची प्रार्थना त्याच जातकुळीतली होती.

# पैशाची अडचण आहे!

फलटण येथील ज्येष्ठ सामजिक कार्यकर्ते दत्ताजीराव सूर्यवंशी यांनी सांगितलेली ही आठवण. दत्ताजीराव हे ज्ञानोबादादांच्या कन्येचे (सुधाचे) पती, म्हणजे यशवंतरावांचे जावईच होते. दत्ताजीरावांच्या थोरल्या बंधूंच्या विश्वासरावांच्या कन्येचा विवाह लातूर येथे संपन्न होणार होता. या विवाहाचे निमंत्रण यशवंतरावांना देण्यासाठी ते दोघे बंधू कराडला गेले. यशवंतराव तेव्हा कराडच्या विश्रामगृहावर उतरले होते. एकटेच होते. त्या अखेरच्या दिवसात त्यांना सोबत होती ती फक्त वेणूताईंच्या आठवणींची.

विश्वासरावांनी निमंत्रणपत्रिका साहेबांच्या हातात दिली व म्हणाले, 'साहेब तुम्ही लग्नाला आलंच पाहिजे असा आम्हा सर्वांचा आग्रह आहे.'

साहेबांनी निमंत्रण पत्रिका वाचली व म्हणाले, 'आपली कन्या तुम्ही मराठवाड्यात दिलीत हे छान झाले. मी मराठवाड्याशी राजकीय संबंध जोडले. पण तुम्ही कौटुंबिक संबंध जोडलेत याचा आनंद आहे. मराठवाड्याशी रक्ताचे नाते असावे असे मला नेहमीच वाटत आले आहे.'

'मग तर तुम्ही अवश्य आले पाहिजे.' दत्ताजीराव म्हणाले.

यशवंतराव स्तब्ध झाले. त्या दोघांना बाजूला घेऊन हळू आवाजात म्हणाले. 'या लग्नाला मी आनंदाने आलो असतो. पण आता पहिले दिवस राहिलेले नाहीत. पूर्वी मी कुठेही निघालो तरी माझ्यासाठी सरकारी विमान, हेलिकॉप्टर आणि मोटारींचा ताफा सज्ज असे. आज मी सत्तेत नाही. पैशाची ही अडचण आहे. मी लग्नाला येवू शकणार नाही. पण त्या भागातले केंद्रीय मंत्री श्री. तुकाराम शृंगारे हे माझे मित्र आहेत. त्यांना मी माझा प्रतिनिधी म्हणून अवश्य पाठवेन. आपण मला समजून घ्याल अशी आशा आहे. माझे आशीर्वाद सदैव तिच्या पाठीशी राहतील.' एवढे बोलून यशवंतरावांनी आवंढा गिळला व ते परत फिरले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ते दोघे बंधू पहात राहिले. चाळीस वर्षे सत्तेत राहिलेल्या यशवंतरावांची ही अवस्था..! त्यांचा आपल्या कानांवर विश्वास बसला नाही.

असा एक राजकारणी या महाराष्ट्राच्या मातीत होऊन गेला यावर भावी पिढ्यांचा तरी विश्वास बसेल काय?

# अधिक काय लिहावे?

यशवंतरावांच्या अखेरच्या दिवसांतील हा प्रसंग. त्यांचे वास्तव्य दिल्लीत होते, पण अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांचे महाराष्ट्रात येणे व्हायचे. यापैकी बहुतेक समारंभ सांस्कृतिक व वाङ्मयीन विश्वाशी निगडित असायचे. राजकीय सभांपासून ते काहीसे दूर पडत चालले होते.

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी 'स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था' स्थापन केली आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या विकासाचे चक्र गतीमान केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांना गुरू मानणाऱ्या बापूजींनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार हे ध्येय उराशी बाळगून खेडोपाडी माध्यमिक शाळांचे जाळे विणले. यशवंतरावांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना व पुढे केंद्रात गेल्यावरही स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला सढळ हाताने मदत केली होती. बापूजींचे आता वय झाले होते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा भव्य सत्कार करायचे ठरविले. बापूजींचा सत्कार करण्यासाठी यशवंतरावांहून अधिक योग्य व्यक्ती कोण असणार होती? साताऱ्यातील लालबहाद्दूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य मो.नि. ठोके यांनी १९८२ च्या मार्च महिन्यात यशवंतरावांना दिल्लीच्या पत्त्यावर पत्र पाठवले.

यशवंतरावांनी हे निमंत्रण आनंदाने स्वीकारले. 'एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात मला वेळ आहे. तारीख आणि वेळ आयोजकांनी ठरवावी' असे त्यांनी पत्राने ठोकेंना कळविले. त्याप्रमाणे सत्कारसमारंभ सकाळी अकरा वाजता होईल असे आयोजकांनी यशवंतरावांना कळविले. हा कार्यक्रम झाल्यावर संध्याकाळी यशवंतराव पिंपोडे (ता. कोरेगाव) येथे दुसऱ्या एका छोट्या घरगुती समारंभाला जाणार होते. पण कार्यक्रमापूर्वी काही दिवस अगोदर सत्कारसमारंभाची वेळ बदलून ती दुपारी चारची करण्यात आली. आयोजकांनी केलेला हा बदल मो.नि. ठोकेंनी यशवंतरावांना पत्र लिहून कळविला. सत्कार समारंभाची वेळ बदलल्याने यशवंतराव अस्वस्थ झाले. या बदलामुळे त्यांचे पुढील अनेक कार्यक्रमांचे वेळापत्रक कोलमडणार होते. मग यशवंतरावांनी स्वहस्ताक्षरात ठोकेंना पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात,

'श्री.प्रा. ठोके, यांस सनविवि,

तुमचे पत्र मिळाले. समारंभाची वेळ सकाळची अकरा वाजताची (मला तसे सांगण्यात आले होते.) बदलून आपण माझी मोठी गैरसोय केली आहे. मला हा कार्यक्रम झाल्यावर पिंपोडे येथे पाच वाजता पोहोचायचे आहे. तेव्हा कृपा करून सायंकाळची चार वाजताची वेळ बदलून अडीच-तीनची केल्यास मला मदत होईल. अधिक काय लिहावे?'

आपला,

यशवंतराव चव्हाण

या छोट्याशा पत्रातून यशवंतरावांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाची पुरेपूर ओळख पटते. खरेतर साहेब सांगतील त्या दिवशी व सांगतील त्या वेळी आयोजकांनी कार्यक्रम घेतला असता इतका त्यांच्या शब्दाला मान होता. पण आदेश देण्याचा अधिकार असतानाही विनंती करूनच काम सांगायचे हा यशवंतरावांचा स्वभाव होता. म्हणूनच सत्तेने साथ सोडली तरीही त्यांच्या सुसंस्कृतपणाला ओहोटी लागली नाही. आजचा महाराष्ट्र साहेबांची आठवण काढतो ती या अभिजात आणि निखळ सुसंस्कृतपणासाठीच!



# माझी जीवननौका भरकटू लागलीय!

साताऱ्याचे बन्याबापू गोडबोले हे यशवंतरावांचे बालपणापासूनचे मित्र होते. १९६२ पासून यशवंतराव दिल्लीत रहात होते, तर बन्याबापू साताऱ्यात राहूनच समाजकारण करीत राहिले. १ जून १९८३ रोजी वेणूताईंचे निधन झाले आणि यशवंतराव एकटे झाले. राजकीय जीवनात अनेक आघात झेलणारे यशवंतराव या कौटुंबिक आघाताने मात्र घायाळ झाले. यशवंतरावांचे महाराष्ट्रातील अनेक चाहते दिल्लीला जाऊन त्यांचे सांत्वन करून आले.

एकदा मुंबईतील रिव्हेरा या निवासस्थानी यशवंतराव आले असताना, बन्याबापू साहेबांना भेटायला आले. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर एकटेपणा वाट्याला आलेल्या आपल्या मित्राला सांत्वनपर दोन शब्द सांगावेत म्हणून ते गेले होते. वेणूताईंचा विषय निघाला आणि यशवंतरावांचा चेहरा कधी नव्हे इतका शोकाकुल झाला. भावनातिरेकामुळे त्यांना नीट बोलतासुद्धा येईना. स्वतःला सावरत ते म्हणाले, 'बन्याबापू, माझ्या जीवनातली ही पोकळी मला सर्वांगाने वेढून टाकत आहे. उभ्या आयुष्यात कशाचीच मागणी न करणारी माझी पत्नी मला सोडून गेली...., मी पोरका झालो आहे. आयुष्याच्या चढउतारावर तिने माझी फक्त सेवाच केली. सावलीप्रमाणे ती नेहमी माझ्या समवेत राहिली. माझे आयुष्य तिनेच घडविले. तिच्याविना माझी ही जीवननौका भरकटू लागलीय. लवकरच ती काळाच्या भोवऱ्यात सापडणार आणि संपणार.'

# अखेरचा प्रवास



लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्या होत्या. यशवंतराव सातारा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरणार होते. इंदिराजींच्या हत्येमुळे राजीव गांधी सैरभैर झाले होते व त्यांना यशवंतरावांचे मार्गदर्शन हवे होते. निवडणूक जिंकून 'पुनश्च हरिओम' करण्याचे स्वप्न यशवंतराव पहात होते. परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. एकाकी अवस्थेत दिवस कंठणाऱ्या यशवंतरावांना आजाराने घेरले.

२१ नोव्हेंबर १९८४ ची सकाळ उगवली तीच मुळी एक उदास गारवा घेवून. यशवंतरावांना सकाळपासूनच अस्वस्थ वाटू लागले. संध्याकाळी त्यांना भेटण्यासाठी श्री.मदन भोसले आपल्या मित्रांसह आले. साहेबांच्या नोकराने-गंगारामने त्यांची प्रकृती बरी नसल्याचे सांगितले पण यशवंतरावांनी सर्वांना आत पाठवायला सांगितले. मदनदादांनी या अखेरच्या दिवसांत साहेबांची मनोभावे शुश्रुषा केली होती. साहेबांचा चेहरा व एकूण अवस्था पाहून मदनदादांनी दिल्लीत जमलेल्या प्रमुख मराठी नेत्यांना निरोप दिला.

एन.के.पी.साळवे, वसंतदादा पाटील आदी नेत्यांनी त्यांना दवाखान्यात दाखल केले. पण साहेबांची तब्येत बिघडतच गेली. २३ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान राजीव गांधी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करून गेले. त्यांनी डॉक्टरांना सूचना दिल्या मात्र साहेबांची तब्येत खालावतच गेली. २५ नोव्हेंबरला सायंकाळनंतर ते अत्यवस्थ झाले आणि पाहता पाहता हे जग सोडून गेले.

हिमालयाच्या मदतीसाठी धावून गेलेला सह्याद्री उत्तरेत धारातीर्थी पडला. कृष्णा-कोयनेच्या प्रीतीसंगमावर सुरु झालेला हा प्रवास यमुनेकाठी संपला. आता उरल्या आहेत त्या या रोमहर्षक प्रवासाच्या अस्विस्मरणीय आठवणी !

# जीवनपट

| | |
|---|---|
| **१२ मार्च १९१३ -** | जुन्या सातारा जिल्ह्यातील (सध्या सांगली जिल्ह्यातील) देवराष्ट्रे या गावी जन्म. |
| **१९१७ -** | वडील बळवंतराव चव्हाण यांचे प्लेगच्या साथीत निधन. |
| **१९२७ -** | कराडच्या केंद्रशाळेतून व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा उत्तीर्ण झाले व कराडच्याच टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. |
| **१९३१ -** | असहकार चळवळीत सहभाग व १८ महिन्यांचा तुरुंगवास. |
| **१९३४ -** | मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले व कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश. |
| **१९३८ -** | इतिहास व राजकारण हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी मिळविली आणि पुण्यातील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. |
| **ऑगस्ट १९४१ -** | एलएल.बी.ची पदवी घेतली आणि कराड येथे वकीली व्यवसाय सुरू केला. |
| **२ जून १९४२ -** | कराड येथे वेणूताईंशी विवाहबद्ध. चलेजाव चळवळीत सहभाग व भूमीगत. |
| **१९४३ -** | सर्वात थोरले बंधू ज्ञानोबा यांचे निधन. |
| **मे १९४३ -** | अटक आणि ८ महिन्यांचा तुरूंगवास. |
| **१९४४ -** | तुरुंगातून सुटका. |
| **मार्च १९४६ -** | दक्षिण सातारा मतदारसंघातून विधानसभेवर निवड. |
| **१४ एप्रिल १९४६ -** | गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नियुक्ती. |
| **१५ डिसें.१९४७-** | थोरले बंधू गणपतराव यांचे निधन. |
| **१९५२ -** | कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवड. मोरारजी देसाई यांच्या मंत्रीमंडळात नागरी पुरवठा, समाजकल्याण व वनखात्याचे मंत्री. |
| **२८ सप्टें. १९५२-** | श्री.भाऊसाहेब हिरे व नानासाहेब कुंटे यांच्या समवेत पश्चिम महाराष्ट्राच्या वतीने नागपूर करारावर स्वाक्षरी. |
| **१० ऑक्टो.१९५५-** | राज्य पुनर्रचना समितीचा अहवाल प्रसिद्ध. |
| **१ नोव्हें. १९५६ -** | द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी. |

१९५७ - विधानसभा निवडणुकीत कराड मतदार संघातून विजयी व पुनश्च मुख्यमंत्रीपदी.

**३० नोव्हें. १९५७-** पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावरील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण.

**१ मे १९६० -** स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती व पहिले मुख्यमंत्री.

**१९६१ -** दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष.

**१ मे १९६२ -** महाराष्ट्रात पंचायत राज कायदा लागू.

**२२ नोव्हें. १९६२ -** भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रे ग्रहण.

**१९६३ -** नाशिक लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर बिनविरोध निवड.

**१८ ऑगस्ट १९६५-** आई विठामाता यांचे मुंबईत निधन.

**१४ नोव्हेंबर १९६६-** केंद्रीय गृहमंत्रीपदी निवड.

**२३ फेब्रुवारी १९६९-** कानपूर विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ ' पदवी बहाल केली.

**१० फेब्रुवारी १९७०-** औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची डॉक्टर ऑफ लॉ पदवी.

**२६ जून १९७० -** केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती.

**१९७२ -** सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड.

**२१ ऑक्टोबर १९७४-** केंद्रीय परराष्ट्रमंत्री म्हणून निवड.

**१ डिसेंबर १९७४ -** कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉज' पदवी.

**जून १९७५ -** पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात अंतर्गत आणीबाणी लागू केली.

**डिसेंबर १९७५ -** कराड येथील अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष.

**१९७७ -** लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकात काँग्रेस पराभूत.जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. यशवंतरावांची विरोधी पक्षाच्या

**जुलै १९७९ -** नेतेपदी.

**१९८० -** चौधरी चरणसिंग यांच्या मंत्रीमंडळात उपपंतप्रधान व गृहमंत्री.

**१९८२ -** सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड.

**१ जून १९८३ -** इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष.

**७ फेब्रुवारी १९८४ -** पत्नी सौ.वेणूताई यांचे दिल्ली येथे निधन.

**२५ नोव्हेंबर १९८४ -** कृष्णाकाठ (आत्मचरित्र - खंड पहिला) प्रकाशित.

**२७ नोव्हेंबर १९८४ -** सायंकाळी ७.४५ वाजता दिल्ली येथे निधन. दुपारी ३.४० वाजता कराड येथे कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार.

# संदर्भग्रंथ सूची


१. केळकर भा. कृ.-***यशवंतराव:राष्ट्रीय व्यक्तिमत्व*** -म.रा. साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.

२. पाटील अजित- ***माणसातील देव,*** मॅकमिलन इंडिया लिमिटेड.

३. महानोर ना. धों. - ***यशवंतराव चव्हाण.*** साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४. थोरात संभाजीबाबा- ***यशवंतराव चव्हाण : झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध,*** आगाशिव प्रकाशन कराड.

५. गोडबोले माधव - ***अपुरा डाव,*** देशमुख अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे.

६. प्रधान राम - ***वादळ माथा,*** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

७. जोशी लक्ष्मणशास्त्री - ***श्री.यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ,*** यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती प्रकाशन.

८. बाबर सरोजिनी (संपा)-***मी पाहिलेले यशवंतराव,*** म. रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई

९. हेगे नागनाथ - ***जनमनातील यशवंतराव,*** पद्मगंधा प्रकाशन, पुणे

१०. यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर - ***युगप्रवर्तक यशवंतराव.***

११. जोशी रामभाऊ - ***सह्याद्रीवरील सूर्यास्त,*** समर्थ प्रकाशन, सातारा

१२. मंगुडकर मा. प. - ***यशवंतराव चव्हाण - प्रेरणा व कार्य,*** सुवर्णा प्रकाशन, पुणे.

१३. सूर्यवंशी उत्तम - ***मराठी मातीचे वैभव,*** सांगाती प्रकाशन, नांदेड.

१४. कायंदे-पाटील गंगाधर - ***यशवंतराव चव्हाण,*** चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक

१५. जोशी रामभाऊ - ***विरंगुळा,*** श्री यशोदा प्रकाशन, पुणे

१६. जोशी रामभाऊ - ***यशवंत स्मृतीसुगंध,*** विहंग प्रकाशन, पुणे

१७. प्रधान राम - ***बंधनांचे ऋण,*** अमेय प्रकाशन, पुणे

१८. कल्याणकर बा. ह. - ***युगंधर नेते-यशवंतराव चव्हाण, १*** आकांक्षा प्रकाशन, नागपूर

१९. कुलकर्णी जी. व्ही. - मा.यशवंतराव चव्हाण - एक स्मरण

२०. जाधव पंजाबराव - ***यशवंतराव चव्हाण : जीवन दर्शन,*** कर्मवीर प्रकाशन, पुणे

२१. शेवते अरूण (संपादित)-***स्मरण साहेबांचे,*** अनुभव-अक्षरधन प्रकाशन, मुंबई.

२२. प्रधान राम - ***शब्दांचे सामर्थ्य,*** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

२३. बागल माधवराव - ***माझे यशवंतराव,*** समाज प्रकाशन, कोल्हापूर

२४. जोशी रामभाऊ - ***यशवंतराव - इतिहासाचे एक पान,*** केसरी प्रकाशन, पुणे

२५. काळे बाबुराव - ***यशवंतराव चव्हाण,*** ना. द. रेगे, मुंबई

२६. सहकार प्रेरणा (मासिक) - ***आठवणीतले यशवंतराव चव्हाण***

२७. सत्याग्रही विचारधारा (मासिक), दिवाळी अंक - २०१२ संपादक-डॉ.कुमार सप्तर्षी
२८. जडणघडण (मासिक), दिवाळी विशेषांक २०१२, संपादक-सागर देशपांडे
२९. अंतर्नाद (मासिक), दिवाळी २०१२ संपादक - भानु काळे
३०. कांबळे उत्तम (संपा.) - ***यशवंतराव चव्हाण - नवमहाराष्ट्राचे शिल्पकार,*** सकाळ प्रकाशन, पुणे
३१. तळवलकर गोविंद - ***यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व,*** मौज प्रकाशनगृह, मुंबई
३२. चव्हाण यशवंतराव - ***कृष्णाकाठ*** (आत्मचरित्र), प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे
३३. कुलकर्णी एस. के. - ***लोकोत्तर लोकनेता,*** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
३४. नाईकवाडे अशोक (संपा.)-***महाराष्ट्राचे भाग्यविधाते:यशवंतराव चव्हाण*** विद्याभारती प्रकाशन, लातूर
३५. लोकराज्य (मासिक), मार्च २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
३६. शेतकरी (मासिक), कै.यशवंतरावजी चव्हाण जन्मशताब्दी विशेषांक, ऑक्टोबर २०१२, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन
३७. पवार बा.ग. - ***क्रांतीसिंह नाना पाटील*** मातृभूमी प्रकाशन, पुणे.
३८. नाईकनवरे विश्वास - ***महाराष्ट्र भूषण यशवंतराव चव्हाण,*** गंधर्व वेद प्रकाशन, पुणे
३९. कुलकर्णी भुजंगराव - ***मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र,*** प्रतिक्षा प्रकाशन, पुणे
४०. गाडगीळ गंगाधर - ***एका मुंगीचे महाभारत.***
४१. वाघ रामनाथ, जोशी रामभाऊ, शितोळे खा.ह. (संपा.) - ***युगप्रवर्तक यशवंतराव*** - यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर (जुना संदर्भग्रंथ क्र. १०)
४२. जोशी न.म.- ***सह्याद्रीचा सुपुत्र*** -अ.भा.मराठी बालकुमार साहित्यसंस्था, पुणे - २०१३.
४३. यशवंतराव चव्हाणांची विधिमंडळातील निवडक भाषणे (१९४६-१९६२), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
४४. ठोके मो.नि. -***महाराष्ट्राची अस्मिता: यशवंतराव चव्हाण***- अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर.
४५. संपा. रामभाऊ जोशी - ***चव्हाण यशवंतराव : विदेश दर्शन,*** श्री यशोदा प्रकाशन, पुणे. १९८८.
४६. भोंगळे सुधीर - ***बिकट वाट, नाजुक गाठ***
४७. गजेंद्रगडकर पी.बी. - ***To the best of my memoris*** भारतीय विद्याभवन, मुंबई. १९८३.
४८. चांदवडकर तुषार - ***यशोकथा यशवंतरावांच्या*** - कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक. २०१३.
४९. चव्हाण यशवंतराव - ***ऋणानुबंध*** - रोहन प्रकाशन, पुणे. २०१३.

# व्यक्तीसूची


अ)

अत्रे प्र.के. - ६३, ६८, ८०, ९२, ११९, १८१

अणे मा.श्री. - ११५

अवचट अनिल - २२३

अॅण्डरसन हॅन्स ख्रिश्चन - २३८

आ)

आढाव बाबा - १३०

आदिक गोविंदराव - २६३

आपटे बाबू - २२४

आपटे माधवराव - १६९

आंबेडकर बाबासाहेब - ३८, ६९, ७२

आमोणकर किशोरी - १८३

आवडे कल्लाप्पाण्णा - २४९

इ)

इनामदार आप्पासाहेब - ८८

इनामदार शांताराम - २६

इनामदार हे.वि. - ३७

इंगळे उद्धवराव - ३५

क)

कठारिया चांदमल - ९८

कन्नमवार मारोतराव - १३९, १४०

कल्याणकर बा.ह. - २३२, २५७, २३२, २५७

कर्वे महर्षी - १४९

कवठेकर द.र. - १८७

कळंबेकर - १०१

कळंबे गुरुजी - २४

काणेकर अनंत - १२४

कारखानीस त्र्यं.सं. - १५२

कासेगावकर वैद्य - २६

काळे कमलाताई - ४०

काळे बाबुराव - ३२

काळे शरद - २३९

किप्लींग रुदयार्ड - १७३

किर्लोस्कर शंतनुराव - २३०

कुलकर्णी अनंतराव - १८७, १९०

कुलकर्णी भुजंगराव - ६२

कुलकर्णी एस.के. - २५९

कुंदप कन्हैय्या - २६१

कुलसुमदादी - ४

कुसुमाग्रज - १८८

कुंटे नाना - २९

कुंभार रत्नाप्पा - ४०, १३७

कृष्णम्माचारी टी.टी. - १६०

कृष्णमेनन व्ही.के. - १५८, १६०, १६१

कृश्चेव्ह निकिता - १७३

केळकर न.चिं. - २०३

कोतवाल बाबुराव - ३६, ४४, ५९

कोपर्डेकर दयार्णव - २६

कोल्हटकर श्रीपाद कृष्ण - १०८

कोरे तात्यासाहेब - १३७

ख)

खताळ-पाटील बी.जे. - १३२

खंडकर बाळू - १७३

खाडीलकर निळकंठ - १९३, २०१

खांडेकर वि.स. - १२६, १८७

खाँ बिस्मिल्ला - १३३

खेर बाळासाहेब - २८, २९, ३०, ३१, ६९

ग)

गजेंद्रगडकर पी.बी. - ११८, १३८,

गडाख यशवंतराव - १८६

गाडगीळ काकासाहेब - ३२

गाडगीळ गंगाधर - १२१, १२३

गांधी इंदिरा - १९०, १९७, २०२, २०३, २७५

गांधी महात्मा - १५, ३३, ७६, १७१

गोखले बाबुराव - ८८, १३४

गोखले विद्याधर - ८८

गोगटे रामभाऊ - ८८

गोडबोले बन्याबापू - २८२, २८६

गोडबोले माधव - १८९

गोडसे नथूराम - ३३

गोरेगावकर नारायण - ६१

गोसावी बबनराव - ४५

डॉ. ग्रॅण्ट - १७६

घ)

घाटगे माधवरा - १४

घोगरे दादासाहेब - १४९

घोष अतुल्य - १९०

च)

चव्हाण गणपतराव - ६, ७, २४

चव्हाण बळवंतराव - २

चव्हाण वेणूताई - २९, ३४, ३६, ४५, ११३
११४, १२०, १२९, १३९, १५६, १६८, १७२
१८३, १८८, २१९, २३५, २३८, २५५, २५६,
२७३, २७६, २७७, २८६

चव्हाण शंकरराव - २३२

चव्हाण ज्ञानोबा - ११३

चोरघडे वामन - २४१

चौधरी चरणसिंह - २५२

चौधरी मधुकरराव - ६७, ७२, ९१

चौधरी सोपानदेव - १०८

चौधरी जनरल - १६१, १६२

छ)

न्या.छगला - ३७

छ.शिवाजी महाराज - ६६, ६८, ७७, १०६, १७१
१८७, २६२, २७०,

छ.शाहू महाराज - ६९

ज)

जगताप नामदेवराव - १००

जाधव सुरेश - २६८

जेधे केशवराव - ११, १९५

जेधे गुलाबराव - १९५

जैन सी.डी. - २४०

जैन रमा - १५९

जोशी गुरुजी - १६३

जोशी रामभाऊ - १९८

जोशी लक्ष्मणशास्त्री - ४७, ६८, ७५, १४१, २४५, २४६

जोगळेकर ग.नी - २०६, २५६

जोशी एस.एम. - ३३, ६३, ८७, ९४, ९५, १०६

जोशी भिमसेन - १६८

जंगी वामन - २२४

झ)

झा एम.के. - १२५

झैलसिंग ग्यानी - १९१

ट)

टागोर रविंद्रनाथ - २४०, २८२

टिळक लोकमान्य - १७१, २४६

ठ)

ठाकरे प्रबोधनकार - ७७, ७८

ठोके मो.नि. - २८४

ड)

डाकले शेठ - १८६

डांगे श्रीपाद अमृत - ६३, ९४, १०६

डोंगरे श्रीपाद - ३१, ६१, ८८, १२८, १६५, १८४,
१८९, १९३, १९८, २००, २०६, २११, २२४, २४७

त)

तळवळकर गोविंद - १९२, २०६

थ)

थोरात वसंतराव - २४५

थोरात संभाजीबाबा - १७६

द)

दंडवते मधु - २५१

दांगट भीमाबाई - ५३

दांडेकर गो.नि. - १५३

दांडेकर वि.म. - १९२

दाते केशवराव - १४

दास जतींद्रनाथ - ९, १०

दिक्षित विठ्ठलराव - ३७

देशपांडे पु.ल. - १८०, १८७

देशपांडे मुरारबाजी - १७१

देशपांडे वसंत - २२३

देव शंकरराव - ११, ३२, ४६

देशमुख काशीनाथ - २६

देशमुख टी.जी. - २२९

देशमुख भालचंद्र - २६५

द)

देशमुख दत्ता - १४७

देसाई बाळासाहेब - ५९, ६७

देसाई मोरारजी - २८, ३१, ३९, ४६, ५१, ५३, ५५, ६९, ७१, १६१, १९०

देसाई सतीश - २७५

ध)

धर्माधिकारी चंद्रशेखर - २५८

धोटे जांबुवंतराव - २२१

धोंडगे केशवराव - ८९

न)

नंदा गुलझारीलाल - ११७

नाईक वसंतराव - ५७, ११७, १७५, २०२, २०९ २१५, २३२, २५७, २६३, २७१

मि.नॉफ - २७०

नाईक निंबाळकर मालोजीराजे - ६४, ७५, ९८

निक्सन निचर्ड - २३०

निजलिंगप्पा - १९०

निंबाळकर आबासाहेब - १४७, १६६, १९५

नियोगी शंकर गुहा - ११६

निसळ राम - १३५

नेने वि.वा. - ५७

नेमाडे भालचंद्र -१२६, २४२

नेहरू जवाहरलाल - १५, १६, ३२, ५१, ६२, ६६, ६८, ७२, ७६, ७७, ९८, १०३, ११७, १२१, १२३, १२५, १५६, १५७, १५८, १६०, १६१, १७६, १८५

प)

पटेल सरदार - ११, १२

पठारे रंगनाथ - ११६, २१७

पवार उल्लास - २१४

पवार केशवराव - ५४

पवार प्रतापराव - ४३

पवार वसंतराव - १९५

पवार शरद - १८२, १९५, २०२, २०६, २१५, २५१, २५२, २५४, २६४

पवार शारदाबाई - १९६

पवार दया - २६५

प्रसाद राजेंद्र - १०१, १४१

प्रधान राम - ८६

पं. जसराज - २६०

पाटणे संभाजीराव - ४२

पाटील आत्माराम - ११, १२

पाटील अनंतराव - १९७, २४२

पाटील आण्णासाहेब - २६४

पाटील उद्धवराव -

पाटील के.डी. - २८

पाटील चंदू - २८

पाटील नाना - ६३, १८८

पाटील पी.डी. -२१३

पाटील दत्ता - ९२

पाटील भाऊराव -८३, १३१, १४३, १४९

पाटील राजरामबापू - १०४

पाटील आर.आर. - २८०

पाटील वसंतराव - ९६, ११४, २३३, २४९, २६३, २६८, २७१, २८६

पाटील शंकर - २४२

पाटील स. का. - १९०, २१०

पाटील श्रीनिवास - १२९

पाटील विठ्ठलराव - २६९

पाठक सर - ३

पाटील विनायक - १६९, १९५, २२२, २५५

फ)

फडके ना.सी. - १२६, १८७, १८९

फुले जोतिबा - १४९, २७०

ब)

बटाणे शिवाजीराव - १७

बागल माधवराव - ६३, ७७, १०९, १४१, २१९, २४७

बापट सेनापती - ६६, २६३

बाबर सरोजिनी - ९०, १५१

बालगंधर्व - १७५, १८८

न्या बावडेकर - ११८

बिर्ला आर. डी. - ५५, १०६

बियाणी - ५६, ७४

बिंदू दिगंबरराव - ५६

बुधगावकर राधाबाई - १०३

बोरकर दुर्गादास - १२४

डॉ. बोस - १६७

भ)

भगवानरावबाबा महाराज - ९६
भागवत दुर्गा - २४१, २४३, २४५
भारदे बाळासाहेब - ९३, १५२
भावे विनोबा - ८२
भिंगारदेवे - ६४
भोगटे रमेश - २१०
भोसले सुमित्राराजे - १३१
भोळे जोत्स्ना - २२८
भोसले मदन - २८६

म)

मते नामदेवराव - १००
महाजनी ह.रा. - ७५
महाजनी रँग्लर - २१७
महानोर ना.धों. - २२०, २३३, २३६
मंगेशकर लता - २१८, २२६, २३३
मंगेशकर ह्दयनाथ - २३३
माडखोलकर ग.त्र्यं. - २५७
माडगूळकर ग.दि. - १२७, १४४, १८७, २२२, २३८
माने अनंतराव - २४२
माने बळवंतराव - १६५
माने लक्ष्मण - ६४, २६७, २७१
मेहता जीवराज - ७०, २२८
मोरे शंकरराव - ३७
मोहिते धों. म. - २३१
मोहोळ मामासाहेब - १००

य)

यशवंत कवी - १८७

र)

राजगोपाल एस. - १११, १२२
राजभोज - ३८
राधाकृष्णन सर्वपल्ली - १२१, १२३
राव पी.व्ही.आर. - १६०, १६२
रेड्डी निलम संजीव - १९०, २५२

ल)

लाल प्रतापचंद - १६१
लिमये नरूभाऊ - ९४, १५१, २०६
लिमये राघुआण्णा - १८
लेले जयंत - २०३

व)

वाघोलीकर आबासाहेब - ३७
विखे-पाटील बाळासाहेब - १४७, १४८, २१६
वीर किसन - ११४, २४४, २४५, २६३

श)

शहा ताराचंद - २२१
शहा शांतीलाल - १५२
शास्त्री लालबहादूर - १७८
शिंगटे आर.डी. - १०१
शिंदे आण्णासाहेब - १६६, १८६, २१०, २६३, २७८
शिंदे रावसाहेब - २६३
शिंदे विठ्ठल रामजी - २०, ४२, २१४
शिंदे विलासराव - २८०
शुक्ला माधोचरण - ११६
शुक्ला शामाचरण - ११६
शुक्ला विद्याचरण - ११६
शृंगारे तुकाराम - २८६
शेठ रुईया - ८६
शेंडे ना.रा. - ११५
शेणोलीकर गुरुजी - ३
शेलवणकर (राजदूत) - २०५, २०८
शेळके शिवाजीराव - १७७

स)

साखवळकर दादासाहेब - ७६
साठे डी. डी. - १२५
सावरकर वि.दा. - १८, १९
साळवे एकनाथ - १७०
साळवे एन.के.पी. - २२६, २६०, २८६
साळुंखे बापुजी - २८४
सितारामैय्या पट्टाभि - ३२
सिंदकर नरेंद्र - २०५, २०८
सिंदकर सलूताई - २०५, २०८

स)
सिंहासने गौरीहर - २९
सी. रामचंद्र - २१८
सुधांशु - ९०, १२०
सुलोचना - २३७
सूर्यवंशी दत्ताजीराव - ४३, २४४, २८३
सूर्यवंशी सुधा - ४३, ४४

ह)
हिरे भाऊसाहेब - ४६, ५१, ५६
हेडगेवार केशव बळीराम - २२

# ऋणनिर्देश

**मा.श्री. श्रीनिवास पाटील**
राज्यपाल, सिक्किम

**मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.ॲड.रावसाहेब शिंदे,**
माजी चेअरमन, रयत शिक्षण संस्था.

**मा.डॉ. अनिल पाटील,**
व्हा. चेअरमन,रयत शिक्षण संस्था.

**मा.प्रिं.डॉ. गणेश ठाकूर**
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.

**मा.प्रिं.डॉ. डी.डी. पाटील**
सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.

**मा.प्राचार्य शहाजी डोंगरे**
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.

**मा.लक्ष्मणराव पाटील**
अध्यक्ष, सातारा जि.म.सह.बँक

**मा.प्रिं.डॉ. मोहन राजमाने**
प्राचार्य, स.गा.म.महाविद्यालय,कराड

**मा.डॉ.अरविंद बुरुंगले**
प्राचार्य, एस.एम.जोशी महाविद्यालय,हडपसर

**मा. प्रिं. सीताराम गोसावी**
प्राचार्य, श्रीपतराव कदम महा. शिरवळ

**मा.ना. जयंत पाटील**
अध्यक्ष, य.च.प्रतिष्ठान,विभागीय केंद्र, कराड

**मा.आ. विलासराव पाटील (उंडाळकर)**
ज्येष्ठ विधानसभा सदस्य

**मा.आ. बाळासाहेब पाटील**
सचिव, य.च.प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, कराड

**मा.सौ.अरुणादेवी पिसाळ**
अध्यक्षा, जिल्हा परिषद, सातारा

**मा.सुभाषराव सूर्यवंशी(बेडके)**
अध्यक्ष,श्रीराम एज्यु.सोसायटी,फलटण

**मा. ना. शरद पवार**
मा.कृषीमंत्री, भारत सरकार

**मा.ना.श्री.अजितदादा पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.डॉ. पतंगराव कदम**
वनमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर**
उपाध्यक्ष, नियोजन मंडळ,महाराष्ट्र राज्य

**मा. गणपतराव देशमुख**
माजी मंत्री व ज्येष्ठ विधानसभा सदस्य

**मा.खा.सुप्रियाताई सुळे,**
विश्वस्त, य.च.प्रतिष्ठान,मुंबई

**मा. प्रतापराव भोसले**
माजी खासदार, सातारा

**मा.ना. शशिकांत शिंदे**
जलसंपदामंत्री, महा.राज्य

**मा.आ.बबनदादा शिंदे**
विधानसभा सदस्य, माढा

**मा.आ.दीपक चव्हाण**
विधानसभा सदस्य, फलटण

**मा.आ.भारत भालके**
विधानसभा सदस्य, पंढरपूर

**मा.श्री.चिमणराव कदम**
मा.आमदार

**मा.ॲड.वामनराव माने**
मा.सभापती, पंढरपूर

**मा.मदनदादा भोसले**
चेअरमन, किसनवीर सह.सा.का., भुईंज

**मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर**
उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा

**मा.शरद काळे**
सरचिटणीस,य.च.प्रतिष्ठान,मुंबई

मा.प्रा.डॉ. पी.एम.पाटील
अभ्यास मंडळ सदस्य,शि.वि.कोल्हापूर
मा.श्री.विठ्ठल माने
चेअरमन,प्राथ.शिक्षक बँक,सातारा
मा.श्री.सोमनाथ लोखंडे
मा.व्हा.चेअरमन,प्राथ.शिक्षक बँक,सातारा
प्रा.आर.एस.भोसले, लोणंद
प्रा.श्री. शंकरराव लोखंडे (सर)
श्री. नितीनकुमार भरगुडे पाटील
माजी उपाध्यक्ष, जि.प.सातारा
डॉ.शिवाजीराव ठोंबरे
लेखक व कृषीतज्ज्ञ,कराड
मा.श्री.बाळासाहेब शिंगाडे
मा.श्री.रविंद्र परमाळे.
मा.श्री.ज्ञानोबा भोसले,एकसळ
मा.श्री.प्रदीप पवार
मा.श्री.एम.बी. भोसले
मा.श्री.नितीन करे

मा.श्री.सुभाष माने
अध्यक्ष,महा.राज्य मुख्याध्यापक महामंडळ
मा.श्री.भाऊराव उर्फ दादा तरंगे
मा.उपसभापती,पं.स.माळा
मा.श्री.सुभाषभाऊ शिंदे
ज्येष्ठ नेते, फलटण
मा.श्री.बाबुराव शिंदे
ज्येष्ठ पत्रकार, सातारा
मा.श्री.रविंद्र बेडकीहाळ
ज्येष्ठ पत्रकार, फलटण
मा.श्री.दत्ताजीराव सूर्यवंशी (बेडके)
मा.श्री.मोहनराव डकरे
व्यवस्थापक,सौ.वेणुताई चव्हाण
स्मारक ट्रस्ट,कराड.
मा.श्री.मारुती तांबे
मा.श्री.बापूराव गोफणे
मा.श्री.रविंद्र सावंत.
मा.श्री.दादासाहेब चोरमले
कार्याध्यक्ष, महात्मा शिक्षण संस्था,फलटण

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई
यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र,कराड
सौ.वेणुताई चव्हाण स्मारक ट्रस्ट ग्रंथालय, कराड



● लेखक परिचय

● नाव - श्री. नवनाथ ज्ञानदेव लोखंडे ● जन्म - ०८ मे १९८१

● शिक्षण - एम.ए. डी.एड., बी.एड. नेट (English) ● पद- सहाय्यक प्राध्यापक

● मार्च १९९८ मध्ये झालेल्या एच.एस.सी. परीक्षेत कोल्हापूर विभागात द्वितीय क्रमांक

● रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील म. फुले अध्यापक विद्यालयातून डी.एड.पदविका संपादित.

● सन २००१ ते २०१० या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून काम.

● दरम्यान बहिस्थ विद्यार्थी म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. व एम. ए. या पदव्या प्रथम श्रेणीत मिळविल्या.

● डिसेंबर २००८ मध्ये युजीसी तर्फे घेण्यात आलेली NET उत्तीर्ण. तसेच JRF (Junior Research Fellowship) जाहीर.

● फेब्रुवारी २०१० पासून रयत शिक्षण संस्थेच्या कराड येथील सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन.

● सध्या श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथे कार्यरत.

● जुलै २०११ मध्ये पीएच.डी साठी नोंदणी

● दै. ऐक्य, दै. गावकरी, मुंबई संध्याकाळ, मुंबई लक्षद्विप, दै. सागर या दैनिकांमध्ये सातत्याने आठ वर्षे मूल्यशिक्षण विषयक संस्कारदीप हे दैनंदिन सदर लिहिले.

● राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून काम.

● अनुवादामध्ये विशेष रस.

● अनेक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभाग.

● यशवंतराव चव्हाण, बाबा आमटे व इतर अनेक विषयांवर शेकडो व्याख्याने दिली.

● महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, ढवळचे संस्थापक अध्यक्ष

● सानेगुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील, बाबा आमटे आणि दिवंगत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा व कार्याचा विशेष प्रभाव.

● प्रकाशित पुस्तके -

१) बाबा आमटे विचारधन

२) भाषाप्रभू विनोबा

३) युवर इन्फिनिट पॉवर टु बी रिच (अनुवादित)

४) हाऊ टु रिच फ्रॉम व्हेअर यु आर टु व्हेअर यु वॉन्ट टु बी (अनुवादित)

५) कथारुप यशवंतराव

पत्ता : मु. पो. ढवळ, ता. फलटण, जि. सातारा

संपर्क : 9822991603 / 8275275968

इ मेल : ndlokande@gmail.com



प्रिय प्रा. लोखंडे,

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वावर आपण संपादित केलेल्या 'कथारूप यशवंतराव' या पुस्तकाची प्रकाशनपूर्व प्रत पोहोचली. लहान लहान गोष्टींच्या माध्यमातून आपण स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या गुणांवर साध्या सोप्या भाषेत लिहिलेल्या कथा फारच सरस आहेत. स्व. यशवंतरावांचे चारित्र्य समजून घेण्यासाठी या पुस्तकाचे वाचन फारच उपयोगी सिध्द होईल असा माझा विश्वास आहे.

संस्कार प्रकाशन